'' पेशवेकालीन अहमदनगर एक अभ्यास ''

सन १७५८ ते १८०३

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

इतिहास विभाग

तात्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयातील

विद्यावाचस्पती [पीएच.डी] पदवीसाठी सादर केलेला

शोधप्रबंध

संशोधक

श्री. यादव संतोष अरुण

PRN No : 02111000960

मार्गदर्शक

प्रा. डॉ.के. एम. अंबाडे

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे विभाग

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ , पुणे

सन सप्टेंबर २०१८

मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की. टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये तात्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा अंतर्गत इतिहास विषयावरील विद्यावाचस्पती [पीएच. डी] या पदवीसाठी संतोष अरुण यादव यांनी '' **पेशवे कालीन अहमदनगर एक अभ्यास**''सन १७५८ ते १८०३ या विषयावरील हा शोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे.

सदर शोध प्रबंधामध्ये त्यांनी नोंद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहिती प्रमाणे बरोबर आहे . यापूर्वी हा शोध प्रबंध या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठास कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेला नाही.

मार्गदर्शक

प्रा. डॉ.के. एम. अंबाडे

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,

न्यू आर्टस् कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,

अहमदनगर

प्रतिज्ञापत्र

मी , संतोष अरुण यादव असे घोषित करतो की, **'' पेशवेकालीन अहमदनगर एक अभ्यास ''** **सन १७५८ ते १८०३** या विषयावरील हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये तात्विक व सामाजिक शास्त्रे अंर्तगत इतिहास विषयातील विद्यावाचस्पती [पीएच.डी.]या पदवी साठी सादर करीत आहे .तो मी डॉ. किसन अंबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे.

सदर शोध प्रबंध यापूर्वी या किंवा इतर कोणत्याही विद्यापीठास कोणत्याही पदवीसाठी सादर करण्यात आलेला नाही.

दिनांक : ०३/१०/२०१८

ठिकाण : अहमदनगर

संशोधक

संतोष अरुण यादव

ऋणनिर्देश

टिळक महराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या सामाजिकशास्त्रे विषयात ''पेशवेकालीन अहमदनगर एक अभ्यास'' सन १७५८ ते १८०३ हया विषयावरील शोध निबंध सादर करणे अत्यंत महत्वाचे होते. कारण या मुळे अहमदनगरच्या इतिहासावरील एक पैलू समोर येणार होता. आजपर्यंत ज्या विषयावर काम कमी प्रमाणात झाले आणि अजूनही बरेच काम हाईल येवढे मोडी दस्तऐवज आजही पेशवे दप्तर, अहमदनगर संग्रहालय, भारत इतिहास संशोधन मंडळ,पुणे, वि.का. राजवाडे इतिहास संशोधन मंडळ धुळे, डेक्कन कॉलेज, मेणवली दप्तर, मुंबई पुरालेखागार, तंजावर, अशा अनेक संस्थेत हे दस्तऐवज उपलब्ध आहेत. म्हणून या विषयात संशोधन करावे असे मला वाटले त्यासाठी मोडीचे तज्ज्ञ अभ्यासक कै. मिलींद जोशी यांच्याकडून मी मोडीचे शिक्षण घेऊ लागलो. त्यात मला आवड निर्माण झाली, नवीन शोध, नवीन मोडीदप्तर समोर येवू लागले म्हणून मी हा विषय घेतला आहे.

मी या संशोधनाकडे कसा वळलो हाच मुळात संशोधनाचा विषय ठरेल. माझे बालपण खूप काबाडकष्टात गेले. म्हणजे काम करुन शिकण्याशिवाय काही गत्यंतरच नव्हते. त्यात घरची परिस्थिती सावरण्यासाठी सर्वांचीच तारेवरची कसरत व्हायची. मला सांगायला काहीच कमीपणा वाटत नाही उलट अभिमानच वाटतो की मी, चहाच्या हातागडीवर चहा वाटला आहे, नगरच्या नहार हाऊस ऑफ व्हिडीओकॉन मधे झाडू मारुन फरशी पूसली आहे. लक्झरी बस वर क्लिनरकी केली आहे, हॉटेलवर वेटर पासून तर मालकापर्यंतचे सर्व काम मी केलेले आहेत. त्यामूळे माझे शिक्षण म्हणजे परिक्षा आली की लगेच सुरु व्हायचे . बी.ए. , एम. ए. त्यात इतिहास विषय इतिहासात होत गेलेली आवड मला संशोधनाकडे घेऊन गेली आहे. मी ही सर्व टायपिंग माझ्या हातानेच केली आहे. यात जर काय काही दुरुस्त्या असतील तर मोठया अभिमानाने मला दाखवून द्या त्या मी दुरुस्त करतो. एक वेळ माझ्यावर अशी होती की मी ज हा शब्द लिहीला की तो च असा हातून लिहीला जात होता. इतका मी या शिक्षणापासून लांब गेलो होतो . पण भगवंताच्या कृपाआशिर्वादाने मी पुन्हा शिक्षणात आलो आणि आज हे संशोधन माझ्या हातून होत आहे.

या संशोधनात जीचा मोलाचा वाटा आहे ती म्हणजे माझी आई कै. उषा यादव जीने काबाडकष्ट करुन , दुस-याच्या शेतावर मोल मजूरी करुन मला घडवले, शिकवले तिचीच ईच्छा होती, की मी खूप शिकावे माझ्या कष्टाचे चीज करावे, उच्च शिक्षित व्हावे. तीच्याच प्रेरणेमुळे मी शिक्षणाकडे वळलो. त्यामुळे संशोधनाचे, शिक्षणाचे जेवढे काही काम माझ्या हातून झाले ते तिला समर्पित करतो. त्याशिवाय प्रबंधाच्या लेखनासाठी मला आपला वेळ देऊन मार्गदर्शन केले ते प्रा. डॉ किसन अंबाडे सर यांनी वेळो वेळी अत्यंत चांगले मार्गदर्शन केले. त्यांच्याच सहकार्यामुळे हा प्रबंध पूर्णत्वास गेला आहे. संशाधनाकरिता लागणारी शिस्त, कठोर परिश्रम आणि संयम यांचे माझ्यावर संस्कार करुन मोकळेपणांनी ज्ञानाची शिदोरी देणारे डॉ. किसन अंबाडे सर यांच्या ऋणात असणे मी योग्य समजतो. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे डॉ. के.डी. कुलकर्णी सर यांचेही वेळो वेळी मार्गदर्शन लाभले. या संशोधनात मला दिशा देण्याचे काम भारत इतिहास संशोधन मंडळातील विश्वस्त डॉ. चंद्रकांत अभंग यांनी माझ्या संशोधना विषयासंबंधीत प्रकाशीत अप्रकाशित संशोधकिय माहिती उपलब्ध करुन दिली त्याचा मला खूप उपयोग झाला.

या संशोधनासाठी पुण्याचे पेशवे दप्तर [पुरालेखागार] येथील लोखंडे साहेब, पाटील साहेब सर्व स्टाफ यांनी मला वेळो वेळी मोडीलिपीचे दस्तऐवज उपलब्ध करुन दिले. त्यामूळेच मी कमी वेळेत हे काम पूर्ण करु शकलो. टिळक महराष्ट्र विद्यापीठच्या डॉ. नलिनी वाघमारे मॅडम यांनी सतत संशोधनाच्या बाबतीत मला प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर डॉ. कुलकर्णी मॅडम यांचे मला मोलाचे सहकार्य मिळाले. अहमदनगर ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाची या बाबत मोलाची मदत झाली. संग्रहालयाचे कार्यकारी विश्वस्त डॉ. रवींद्र साताळकर तेथील सर्व कर्मचारी मंडळी यांनी मला वेळो वेळी संदर्भ साधने मोडी दस्तऐवज दाखवले त्यामूळे हा विषय मी चांगल्या पध्दतीने मांडू शकलो. अहमदनगरमधील तज्ज्ञ इतिहास अभ्यासक भूषणजी देशमुख, प्रा. डॉ. नारायण गवळी, श्री. गोपाळराव [आण्णा] मिरीकर, श्री. शब्बीरभाई शेख, प्रा. अशोकजी नेवासकर, डॉ. मीना साळी, भा.इ.सं.मंडळाच्या ग्रंथपाल श्रीमती जयश्री बागायतकर मॅडम यांनी मला वेळोवेळी संदर्भग्रंथ उपलब्ध करुन दिले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. नगर टाईम्सचे अशोकराव निंबाळकर, माझे मित्र राज मेमाने, पदमशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री शरदशेठ क्यादर, मार्कंडेय ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य श्री . क्षेत्रे सर, सर्व स्टाफ, सर्व नगरमधील पत्रकार संपादक, वार्ताहार मंडळी, माझे पीएच .डी . चे सहकारी प्रा. अमोल बुचूडे, प्रा. कुंभार, प्रा. क्षेत्रिय, प्रा. अरीफभाई शेख यांचे वेळो वेळी


मार्गदर्शन लाभले. यात माझे वडील श्री. अरुण बाबासाहेब यादव, मोठा भाऊ श्री . किरण यादव, वहिनी सौ. वंदना यादव, मेव्हने श्री. विजयराव जाधव बहीण सौ. मंगल जाधव, पत्नी छाया यांची जर साथ नसती लाभली तर हा प्रबंध वेळेत पूर्ण होऊ शकला नसता. याशिवाय या कामात मला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे सहकार्य करणारे माझे मित्र, स्नेही यांचाही या ठिकाणी उल्लेख करावा वाटतो कारण त्यांच्या सहकार्यामुळेच हे मला साध्य करता आले. या सर्वांच्या सदिच्छा व सहकार्य संशोधनासाठी मला मोलाचे सहकार्य मिळाले. सर्वात महत्वाचे ज्यांनी टायपिंगच्या कामी व वाक्य रचना बारकाईने पाहिल्या त्या सौ. शुभांगी भालेराव मॅडम यांचा मी ऋणी आहे. शेवटी येवढेच सांगेन की हे संशोधन माझे एकटयाचे नाही यात प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभागी असणा-या सर्व गुरुजनांचे, मित्र परिवाराचे आहे.

स्थळ : अहमदनगर

दि : ३/ १० / २०१८

अनुक्रमणिका

क्र.	शिर्षक	पृष्ठ क्रं.
I	प्रमाणपत्र	I
II	प्रतिज्ञापत्र	II
III	ऋणनिर्देश	III
१.	प्रस्ताविक	१ ते ४
२.	पूर्व साहित्याचा आढावा	५ ते १९
३.	संशोधन पध्दती	२० ते २६
४	पेशवेकालीन अहमदनगरची पूर्व पार्श्वभूमी	२७ ते ६२
	पेशवेकालीन अहमदनगरची राजकिय परिस्थिती	६३ ते १३५
	पेशवेकालीन अहमदनगरची सामाजिक परिस्थिती	१३६ ते २००
	पेशवेकालीन अहमदनगरची आर्थिक परिस्थिती	२०१ ते २४४
	पेशवेकालीन अहमदनगरची सांस्कृतिक परिस्थिती	२४५ ते २७२
५	उपसंहार	२७३ ते २८०
	संदर्भ सूची	२८१ ते २८४
	परिशिष्ठ	२८५ ते ३१४



प्रकरण १ ले
प्रस्ताविक

प्रकरण १ ले

प्रस्ताविक

अहमदनगर हा महाराष्ट्रातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा जिल्हा ऐतिहासिक धार्मिक, राजकिय, सांस्कृतिक, पंरपरा लाभलेला हा जिल्हा अनेक ऐतिहासिक घडामोडीचा साक्षीदार आहे. अहमदशहा बादशाहने सन. १४९० साली या शहराची पायाभरणी केली. जवळ - जवळ ११ निजामशाह बादशाह अहमदनगरच्या गादीवर विराजमान झाले "चाँद सुलताना" सारख्या शुर विरांगनेने मोगलशाही सोबत यशस्वी लढा देऊन अहमदनगरच्या निजामशाहीचे शुरत्व सिध्द केले. मलिक अंबरने तर मोगलांच्या नाकी नऊ करुन सोडले, भातोडीच्या रणसंग्रामात मोगलांना धूळ चारली. शहाजीराजे भोसले, शरीफजीराजे भोसले असे पराक्रमी मराठी पुरुष अहमदनगरच्या निजामशाहीने या देशाला दिले. याचा सार्थ अभिमान या जिल्हयाला आहे. सन. १६३६ साली मोगलांनी निजामशाहीवर वर्चस्व प्रस्थापीत केले. आणि मोगली अंमल या शहरावर प्रस्थापित झाला.

मोगल सत्तेचा अंमल या शहरावर सन १६३६ ते १७५९ पर्यंत होता आजही शहरात मोगलसरदार सर्जेखान महाल, औरंगजेब बादशाहचे [अलमगीर] या वास्तु मोगल अंमलाची साक्ष देतात. सन १७०७ साली औरंगजेब बादशहा अहमदनगर मध्येच पैगंबरवासी झाला. आणि मोगलाईस उतरती कळा लागली. वारसा युध्दास सुरुवात झाली. त्यातच निजाम उल्मुल्कने मुघल बादशहाचा सुभेदार म्हणून स्वता:स घोषित केले. आणि हैद्राबाद येथे "निजामशाहीची स्थापना" केली. मोगलांच्या अंतर्त कलहाचा त्याने येवढा फायदा घेतला की निजाम स्वता: अहमदनगरवर व इतर मोगल प्रांतावर महसुल गोळा करुन स्वता:चा अंमल प्रस्थापित केला. मोगलांचा नगरचा किल्लेदार 'कवीजंग' हा त्याच्याच हातातील बाहूले होता. निजाम सांगेल त्याप्रमाणे तो वागत होता.

मराठयांच्या इतिहासाला वळण देणारी घटना त्याच वेळी घडली. सन १७१३ मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथांना पेशवाईचे वस्त्रे दिले. बाळाजी विश्वनाथाने

मोगलांकडून चौथाई व सरदेशमुखीचे अधिकार मिळवून एक प्रकारे मोगलांवर व निजामांवर आपले राजकीय वर्चस्व कायम ठेवले. सन १७२०-२१ पासून पहिल्या बाजीरावाने मराठयांचा साम्राज्य विस्तार करुन मराठे शाहीचे लौकीक देशभर पसरवले निजामावर यशस्वी रित्या अंकूश प्रस्थापित करुन त्याची कोंडी केली. याच वेळी सन १७३९ -४० दरम्यान अहमदनगर मधील अनेक भागांची गावाची तो चौथाई गोळा करण्याचे उल्लेख मोडी कागदपत्रात सापडले आहेत. सन १७४०-४१ पासून बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे हे पेशव्यांच्या गादीवर आले. आणि याच दरम्यान सन १७५९ साली नानासाहेबांनी अहमदनगरचा किल्ला मोगलांकडून मराठयांच्या ताब्यात घेतला. त्याचे नियोजन आणि व्यवस्थापन किल्लेदार नारोबाबजी नगरकर यांच्याकडे देण्यात आले. पण या ठिकाणी आणखी एक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे, सन १७५९ पूर्वी अहमदनगरमधील काही भागांचा महसूल मराठयांचे अधिकारी गोळा करत होते. अनेक वेळा निजाम, मोगलांकडून महसूल वेळेवर न भरल्यामुळे, मराठयांनी अनेक गावे जप्त केलेली आहेत. नगरचा किल्ला घेणे ही गोष्ट निजामाला न रुचनारी होती आणि याच कारणातून मराठे - निजाम यांच्या सन १७५९-६० मध्ये उदगीरची लढाई झाली. निजामाला मराठयांनी जबरदस्त धूळ चारली. याच लढाईत निजामाने देवगीरीचा किल्ला [दौलताबाद] भेंट म्हणून दिला. यावेळी सदाशिवराव भाऊ, राघोबादादा, शिंदे, होळकर यांनी मराठयांची ख्याती भारतभर पसरवली, सहाजिकच मराठयांनी अनेक देशी सत्ताधिश सोबत वैरही घेतले त्याचीच परिणीती तिस-या पानीपत लढाईत झाली. इकडे उदगीरच्या मोहिमेत यशस्वी कामगीरी बजावलेले सदाशिवराव भाऊ यांच्याकडे पाणीपत लढाईची जबाबदारी सोपवण्यात आली. पाणीपतात पराभवाचा सामना मराठयांना करावा लागला. सदाशिवरावभाऊ, विश्वासरावभाऊ, असे मातब्बर सरदार यावेळी धारातीर्थी पडले मराठयांची एक पिढीच नाहीशी झाली असे म्हटले तरी वावगे ठरु नये. या धक्याने नानासाहेब पेशव्यांचेही देहावसन झाले. आता मराठे संपले अशी निजामाची, ब्रिटीशांची धारणा झाली पण याच वेळी थोरल्या माधवरावांकडे पशेवाईचे सूत्र आली आणि पेशवे अजूनही संपलेले नाहीत हे माधवरावांनी पुन्हा एकदा दाखऊन दिले.

याच दरम्यान माधवरावांचा आणि अहमदनगरचा संबंध येतो या सर्व नोंदी वाड डायरी, माधवरावांची रोजनिशी मध्ये येतो. अहमदनगरचा सामाजिक , धार्मिक, आर्थिक, राजकिय इतिहास समजण्यास मोठया प्रमाणावर मदत होती. नारोबाबजी नगरकर नगरचे पेशव्यांचे किल्लेदार यांचाही कार्याचा उल्लेख अहमदनगरच्या पेशव्यांच्या इतिहासात येतो. थोरल्या माधवरावांनंतर राघोबादादास सत्ता पदाची लालसा सुटते काही काळापुरता का होईना त्याला पेशव्यांची गादी मिळते. नारायणरावाचा खून, बारभाईमंडळाचे कार्य, राघोबादादाचा सत्तेतून पायउतार या सर्व गोष्टींचा परिणाम अहमदनगरच्या इतिहासावर होत होता. नाना फडणवीसांचा अहमदनगरशी अनेक बाबतीत उल्लेख येतो. खडर्याची लढाई, शिंद्याच्या काळात नगरच्या किल्ल्यात कैदेत असताना असे वर्णन नाना फडणवीसांचे येते. सवाई माधवराव आणि दुसरा बाजीराव म्हणजेच सन १८०३ पर्यंत अहमदनगरवर पेशव्यांचे वर्चस्व होते. दुस-या बाजीरावाने शिद्यांना नगर दिले. पुढे शिंदेच नगरचा कारभार पाहू लागले. यातच शिंदे, होळकर यांचा अंतर्गत कलह उफाळून आला, सहाजिकच त्याचा परिणाम अहमदनगरच्या राजकारणावर झाल्याचे दिसते. सन १८०३ साली ब्रिटीशांनी नगर जिंकले पण लगेच शिद्यांकडे ते दिले ख-या अर्थाने सन १८१८ साल ब्रिटीशांचा पूर्ण अंमल अहमदनगरवर प्रस्थापित करण्यास लागले.

या दरम्यानच्या सामाजिक, धार्मिक, राजकिय, आर्थिक घडामोडींचा उल्लेख या प्रबंधात घेण्यात आलेला आहे. निजामशाही कालखंडावर, मोगल कालखंडावर, ब्रिटिशकाळावर अनेक जनांनी लिखान केले आहे. काही संदर्भ साधनेही उपलब्ध आहेत. परंतु पेशवे कालखंडावर जास्त काही लिखान झालेले नाही. असंख्य मोडीचे दस्त पुणे पुराभिलेखागारात, मुंबई पुराभिलेखागारात, अहमदनगरच्या ऐतिहासिक वस्तु संग्रहालयात संशोधन करत असताना मी पाहिले त्यावरुन असे सुचले की आपण या विषयात संशोधन करायला हवे. जास्तीत जास्त पेशवे कालिन जीवनावर लिखान करायचे ठरवले. या कामी मला अनेक जनांची बहुमोल मदत झाली माझे मार्गदर्शक डॉ. किसन अंबाडे सर यांना मी ही कल्पना बोलून दाखवली त्यांनी लगेच होकार दिला. अस्सल कागदपत्रे पाहून त्यांनी कामास

सुरवात करण्यास सांगितली. या विषयाची व्याप्ती यातील ठळक बाबी सरांमुळेच मला समजल्या. विषयास लिहीण्यास प्रारंभ केल्यावर अनेक गोष्टी आपल्या हातून राहून तर जाणार नाहीत ना ? ही नेहमी काळजी वाटायची पण अभ्यास करत असताना असे समजले इतिहास कधीच पुर्ण होत नसतो. तो सतत वाढत जाणारा विषय आहे. संशोधन कधीच पुर्ण होत नाही . पण जास्तीत जास्त गोष्टी यात मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न यात मी केला आहे.

या संशोधनात ऐतिहासिक वस्तू संग्रहालयाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी अनिल कवडे, सध्याचे जिल्हाधिकारी श्री. राहूलजी व्दिवेदी, संग्रहालयाचे कार्यकारी विश्वस्त डॉ. रवींद्र साताळकर यांनी नेहमीच प्रोत्साहन दिले. वेळो वेळी आर्थिक सहकार्य पण केले त्यामुळेच हे संशोधन वेळेत पुर्ण होऊ शकले.

पेशवे कालीन अहमदनगरच्या सर्वांगीन अभ्यासात अहमदनगर, सोलापूर, नाशिक या शहरांमधील काही गावांचा यात उल्लेख करण्यात आला. अहमदनगरचा सामाजिक, राजकिय, आर्थिक, सांस्कृतिक इतिहासावर प्रकाश टाकण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. या संशोधनात काही अस्सल कागदपत्रांचा, फोटोंचा उपयोग केला आहे. जे या संशोधनात महत्वाची भूमिका बजावतात. या आणि इतर 'पेशवेकालीन अहमदनगर एक अभ्यास' या संशोधनात आपण अभ्यासणार आहोत.

प्रकरण २

पूर्व साहित्याचा आढावा

प्रकरण २

पूर्व साहित्याचा आढावा

२.१ प्रास्ताविक :-

प्रस्तुत संशोधनाचा हेतू हा पेशवेकालीन अहमदनगर मधील राजकिय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक व इतर बाबीचा अभ्यास करणे हा असून यामध्ये पुर्व साहित्याचा अभ्यास कसा परिणामकारक आहे ते तपासणे आहे. संशोधकाला प्रस्तुत विषयावर संशोधन करतांना या विषयासंबंधी यापूर्वीच्या साहित्याचा आढावा घेणे उचित ठरेल. यामुळे संशोधन कार्याला योग्य दिशा व संशोधन कर्त्याला या विषयासंबंधी योग्य माहिती मिळू शकेल.

संशोधन विषयाच्या संबंधात जे महत्वपूर्ण ज्ञान उपलब्ध आहे त्याचा सारांश देणे व त्या विषयात ज्ञानाचा शोध घेण्यासाठी अथवा उपलब्ध ज्ञानाचा शोध घेण्यासाठी अथवा उपलब्ध ज्ञानाचा नवीन परिस्थितीमधील बदललेला अर्थ विशद करण्यासाठी संबंधीत संशोधन विषयाचा पाया भक्कम करणे म्हणजे संबंधीत साहित्याचे परिशिलन होय. महत्वपूर्ण ज्ञान संशोधन विषयाच्या संबंधातील विविध ग्रंथामध्ये लेखात उपलब्ध असते त्यातील योग्य त्या घटकांचे वाचन, चिंतन, मनन व उपयोजन म्हणजेच संबंधीत पुर्व साहित्याचा आढावा होय.

२.२ पूर्व साहित्याच्या संशोधन अभ्यासाची आवश्यकता

इतिहास अभ्यासना-या संशोधकाला कोणतेही संशोधन करताना ते संशोधन यापूर्वी झाले आहे काय ? जर झाले असेल तर कशा प्रकारचे आहे. त्यातून आपल्याला काही बोध, माहिती घेण्यासारखे आहे का हे पाहतो नंतरच आपल्या कार्याला संशोधक सुरवात करतो. हयाच प्रकारे संशोधनात सुध्दा पूर्वी झालेल्या संशोधकाच्या प्रतीचा अभ्यास करणे जरुरीचे आहे. कारण त्यामुळे संशोधन करताना येणाऱ्या अडचणी टाळता येतात. संशोधनात काही त्रुटी असतील तर त्या दुरुस्त करता येतात. कधी कधी पूर्व संशोधनाच्या साहित्याने

नवीन संशोधन कर्त्याला स्वत:चा संशोधन विषय निवडण्यास मदत होते. विषयाचे स्वरुप कसे मांडावे हे कळते. संशोधनाचा अवधी, माहिती संकलन यासाठी किती वेळ लागेल ह्याचा अंदाज घेता येतो.

संशोधकाने निवडलेल्या विषयासंबंधी अस्तित्वात असलेल्या संशोधनाचा अधिकाअधिक अभ्यास केल्यामुळे अधिक आत्मविश्वासाने समस्येसंबंधी संशोधकाला अभ्यास करता आला. कोणत्याही संशोधन कार्याला सुरवात करण्यापूर्वी आपण निवडलेली समस्या प्रामुख्याने नवीन ज्ञानाच्या शोधासंबंधी असल्याची खात्री येण्यासाठी पूर्व साहित्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. नाहीतर एखादया संशोधकाने पूर्वी केलेल्या संशोधनाची पुनरावृत्ती होऊ शकते. आणि संशोधनाचा खरा आनंद नवीन काहीतरी चैतन्यमय करीत असल्याच्या भावनेत असतो, पुनरावृत्तीत नसतो. संशोधकाने निवडलेल्या विषयाशी मिळते जुळते वा साधर्म्य असलेल्या विषयाचे वाचन, अवलोकन केल्याने संशोधनाच्या पध्दती, निष्कर्ष इत्यादी मध्ये वाढ होते. तसेच संशोधकाच्या अंतर्भुत घटकांचे आकलन वाढते. प्रश्नांची उत्तरे शोधण्यास योग्य मार्ग मिळतो व संशोधनाला योग्य दिशा मिळते, संबंधीत विषयाशी योग्य माहिती मिळते. जॉन डयूई यांनी केलेल्या विश्लेषणानुसार पूर्वी झालेल्या कार्याचे सर्वेक्षण म्हणजे संशोधन प्रक्रियेची तिसरी पायरी. "अशा प्रकारचा अभ्यास फार महत्वाचा असून त्यामुळे तुलनात्मक माहिती, संशोधन पध्दती व कार्यक्षम तंत्राब÷ल निश्चित कल्पना प्राप्त होते. या संदर्भात खालील विधानात अधिक स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे.

"The review of the literature promotes a greater understanding of the problem and its crucial aspects and ensures the avoidance of unnecessary duplication. It also provides comparative date on the basis of which to evaluate and interpret the significance of one's finding".

पूर्व साहित्याच्या अभ्यासामुळे संशोधन कार्याला योग्य दिशा व संशोधन कर्त्याला याविषयासंबंधी योग्य माहिती मिळू शकते. यावर जॉन डयूईने केलेल्या विश्लेषणानुसार पूर्वी झालेल्या कार्याचे सर्वेक्षण म्हणजे संशोधन प्रक्रियेची तिसरी पायरी होय असे म्हटले आहे. अशा प्रकारे झालेले संशोधन व कार्यक्षक तंत्राबद्दल निश्चित कल्पना प्राप्त होते. या संदर्भात **एफ.एल.व्हाईट** या तज्ञाचे खालील विधान महत्वाचे वाटते.

"The student should find analyze and evlaute critically every pertinent research repart dealing with his chosen problem. Any thing less than this will be neither sensible nor scientific"

पूर्वी झालेल्या कार्याचा शोध घेण्याकरिता दीर्घ प्रयत्न करावे लागत असले तरी त्यामुळे संशोधनाचे कार्य पध्दतशीर व सफल होण्यास मदत होत असते. निवडलेल्या विषयासंबंधी पूर्वी झालेल्या संशोधनाची कल्पना प्राप्त करुन त्याची पुनरावृत्ती टाळणे व उचित संशोधन विषय निवडण्यास मार्गदर्शन मिळते. संदर्भ साहित्याचा अभ्यास करुन स्वत:ची ज्ञानवत्ता वाढविता येते व चाचण्या तसेच सिध्दांत, उद्दिष्टे व गृहितकृत्य यांची माहिती मिळते. यावरुन संशोधकाला संशोधन कार्याविषयी निश्चित कल्पना प्राप्त करुन घेता येते. पुर्व संशोधनाला संशोधन कार्यात फार महत्व प्राप्त झाले आहेत. पूर्व संशोधनाच्या अभ्यासामुळे स्वत:विषयी आत्मविश्वास वाढतो व होणारे संशोधन अचूक व पध्दतशीर होते.

पूर्व साहित्य अभ्यासाचे महत्वाचे कारण म्हणजे आपण जो विषय संशोधनाला घेतला आहे तो पूर्वी झाला आहे काय हे कळते. आपल्या निवडलेल्या संशोधन विषयाशी संबंधीत विषयावर किंवा त्याचप्रकारचे संशोधन झाले तर संशोधकाला त्याची मदत मिळते व संशोधन हे वस्तुनिष्ठ होते. दुसऱ्या संशोधकाने प्रश्न कसा हाताळला, समस्या कशी सोडविली त्याने कोणत्या पध्दती व तंत्रे वापरलीत याची माहिती आपल्याला मिळते. त्याद्वारे संशोधकाला माहित नसलेली नवीन आधार सामग्री उपलब्ध होते. स्वत:च्या संशोधन प्रयत्नाने मूल्यमापन व इतरांच्या कार्याशी तुलना करता येते. यातून संशोधनात अधिकाधिक

सुस्पष्टता व सत्यता आणता येते. अशा तऱ्हेने इतिहास संशोधन अधिक परिणामकारक होईल. ऐतिहासिक बाबींवर एका चांगल्या नवीन विषयावर संशोधन होईल.

२.३ <u>पूर्व साहित्याचा आढावा.</u>

१) निसळ स.शि. दिवाण पळशीकर दप्तर, खंड १ अहमदनगर जिल्हा वस्तु संग्रहालय प्रकाशन - १९७२

दिवाण पळशीकर अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील पळशी या गावी राहणारे पेशवे काळात होळकरांचे ते महसूल गोळा करणे, सरकारचे आदेश पाळणे, मौजे सुभा यांच्या व्यवस्था पाहणे आदि कामांचा उल्लेख सदर ग्रंथात करण्यात आलेला आहे. अहमदनगरच्या ऐतिहासिक वस्तु संग्रहालयात पळशीकरांचे मोडी मधील अनेक रुमाल आहेत. त्यातून काही निवडक मोडी कागदपत्रांच्या आधारे स.शि.निसळ आाणि ऐतिहासिक वस्तु संग्रहालय अहमदनगर यांनी दिवाण पळशीकर दप्तर खंड - १, १९७२ साली प्रकाशित केला.

पळशीकरांचे मुळ आडनांव कांबळे या घराण्याची विस्तृत वंशावळ सदर खंडात देण्यात आली आहे. पळशी गावातील जमा महसूल, न्याय व्यवस्था, धार्मिक बाबींवरील माहिती आर्थिक गोष्टी यामध्ये विस्ताराने सांगितल्या आहेत. पेशवे कालीन नगरवर प्रकाश टाकण्याचे काम सदर ग्रंथात झाले आहे. त्यामुळे इतिहास अभ्यासकांना सदर ग्रंथाचा उपयोग मोठया प्रमाणावर होत आहे.

१) **दिवाण पळशीकर दप्तर खंड- १ अभ्यासण्याचा हेतू :**

१) अहमदनगर जिल्हयातील पेशवेकालिन माहितीचा उपयोग नवीन संशोधनासाठी व्हावा हा हेतु.

२) पेशव्यांचे सरदार श्रीमंत होळकर यांचा अहमदनगर मधील इतिहास समोर यावा.

३) दिवाण पळशीकरांचे सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय कार्य अभ्यासने.

४) पारनेर, पळशी भागातील जमीन महसूल व्यवस्था अभ्यासने.

५) पळशीकर घराने, त्यांचे अहमदनगरच्या इतिहासातील योगदान अभ्यासने.

उद्दिष्ट :-

अहमदनगर सारख्या विस्ताराने मोठया असणा-या जिल्हयामध्ये मराठे, निजाम, पेशवे यांचा अंमल होता. यामध्ये पळशीकर दप्तर खंड- १ आधारे माहिती घेणे. इतिहास संकलित करुन त्याव्दारे पुढील संशोधन करणे हे उद्दिष्ट आहे.

या ग्रंथाचा उपयोग करुन पेशवेकालिन अहमदनगर यावर प्रकाश टाकणे, आजपर्यंत पेशवेकालीन नगरवर विस्ताराने जे लिखान झाले नाही ते करणे हे प्रमुख उद्दिष्ट आहे.

२) **अहमदनगर गॅझेट, महाराष्ट्र शासन, १८८५**

अहमदनगर इतिहास शास्त्रशुध्द केले असेल तर ते ब्रिटीश प्रशासनाने तत्कालीन ग्रंथाच्या आधारे, पुराव्यांच्या मदतीने स्थळ, ठिकानांना भेट देऊन अहमदनगर जिल्हयावर जर कोणी लिखान केले असेल तर ते अहमदनगर गॅझेटने केले आहे. यामध्ये प्राचीन अहमदनगर पासून ब्रिटीशकाळापर्यंत सर्व इतिहास विस्ताराने मांडलेला आहे. यामध्ये राजकिय, सामाजिक ,धार्मिक, सांस्कृतीत, अर्थिक बाबींवर महत्वपूर्ण प्रकाश टाकण्याचे काम अहमदनगर गॅझेटने केले आहे.

अहमदनगर मधील प्रमुख शासक त्यांचे राजकिय योगदान, त्यांची न्यायव्यवस्था सामाजिक सलोखा, धार्मिक बाबींवर निर्णय, आचार, विचार सदर गॅझेटरमध्ये विस्ताराने आलेल्या आहेत. अहमदनगरचे गॅझेट पुढे अनेक वेळा पुर्नप्रकाशित झाले आहे. आजही अहमदनगरवरील अभ्यास करण्यासाठी सदर गॅझेटचा महत्वपूर्ण उपयोग होत आहे.

अहमदनगर गॅझेट अभ्यासण्याचा हेतू

१) अहमदनगरचा अभ्यास व त्याबाबतचे अधिक संशोधन अहमदनगर गॅझेटच्या माध्यामातून व्हावे.

२) अहमदनगर गॅझेटची पहिली आवृत्ती सन १८८४ साली प्रकाशीत झाली त्याची दुसरी आवृत्ती कुंटे सर यांनी सन १९७६ साली पुर्नमुर्दीत केली. याचाच उपयोग अहमदनगरवरील संशोधनासाठी महत्वपूर्ण ठरेल.

३) अहमदनगर गॅझेटमध्ये जमीन महसूल रेकॉर्डची माहिती विस्ताराने मांडली आहे. या लॅड माहितीच्या आधारे इतिहास संशोधन करण्यास अहमदनगरचा इतिहास विस्ताराने लिहण्यास मोठया प्रमाणावर मदत होईल.

उद्दिष्ट :-

अहमदनगर गॅझेट मधील माहिती फार उपयुक्त आणि संदर्भासहीत आहे. आजही अहमदनगर जिल्हयावर कोणतेही लिखान करावयाचे झाल्यास अहमदनगर गॅझेट हे उपयुक्त संदर्भ ग्रंथ मानले जाते.

१७५७ ते १८०३ "पेशवेकालीन अहमदनगर एक अभ्यास" या विषयावर संशोधन करताना अहमदनगर गॅझेट अभ्यासावेच लागते. त्यातील राजकिय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व इतर माहिती ही संशोधनासाठी उपयोगी ठरणारी आहे. या माहितीच्या आधारे पेशवेकालीन अहमदनगरवर संशोधन करणे अधिक सोपे व महत्वपूर्ण होईल. या माहितीच्या आधारे संशोधन करण्यास योग्य ती दिशा मिळेल व अधिक माहितीपूर्ण संशोधन समोर येईल.

३) **अहमदनगर शहरपालिकेचे अहमदनगर पंचशताब्दी, अहमदनगर शहरपालिका प्रकाशक-१९९०**

अहमदनगर शहराला सन -१९९०मध्ये ५०० वर्ष पूर्ण झाली. त्यानिमित्ताने अहमदनगर ग्रंथ निर्मिती करण्याचे ठरवले त्या अनुषंघाने अनेक अभ्यासक मंडळींनी एकत्र येऊन या ग्रंथाची निर्मिती केली. या ग्रंथात प्राचीन अहमदनगर पासून ते स्वातंत्र्यानंतरची माहिती विस्ताराने दिलेली आहे. सामाजिक, आर्थिक, राजकिय, धार्मिक, शैक्षणिक इतर गोष्टींवर या ग्रंथात विस्तार पूर्वक लिखान केलेले आहे.

''अहमदनगर पंचशताब्दी'' हा ग्रंथ अभ्यासण्याचा हेतू -

१) अहमदनगरचा इतिहास विस्तारपूर्वक जाणून घेणे व संशोधनात त्याचा उपयोग करुन घेणे.

२) ऐतिहासिक वारसा असलेले अहमदनगर शहर. या शहरात अनेक इतिहास घडलेले आहेत त्याचा उपयोग "पेशवेकालीन अहमदनगर" या संशोधनात करणे.

३) अहमदनगर पंचशताब्दी या ग्रंथात अहमदनगरची पाणी योजना विस्ताराने दिलेली आहे. राजधानीच्या शहरात पाणी पुरवठा कोठुन व्हायचा, त्याकाळी कोण-कोणते तलाव होते, याचा उपयोग शहरवासीयांना कसा व्हायचा, पेशवेकाळातही हीच पाणी-पुरवठा योजना सुरु होती त्यावर प्रकाश टाकण्याचे काम या ग्रंथाव्दारे होणार आहे.

४) अहमदनगर पंचशताब्दी मधील शैक्षणीक बाबींवरील महत्वपूर्ण माहिती अभ्यासणे त्याचा उपयोग पेशवे कालीन अहमदनगर या संशोधनात करुन घेणे.

५) अहमदनगर पंचशताब्दी ग्रंथातील राजकिय माहितीच्या आधारे ''पेशवे कालीन अहमदनगरमध्ये विस्ताराने संशोधन करने.

<u>अहमदनगर पंचशताब्दी ग्रंथ अभ्यासनाचे उद्दिष्टये</u>

राजधानीचे शहर असलेला जिल्हा त्या काळी कैरो-बगदाद या शहरांशी स्पर्धा करीत होते. निजामशाही कालीन वैभव येथील स्थापत्य आजही पर्यटकांना, अभ्यासकांना भुरळ घालत आहे. या शहराचा अभ्यास जसा विस्तारपूर्वक व्हायला पाहिजे तसा झालाच नाही. त्यामुळेच या शहरावर अधिकाधिक संशोधन व्हावे ही सर्वांचीच इच्छा आहे. अहमदनगर पंचशताब्दी या ग्रंथाच्या माहितीच्या आधारे "पेशवेकालिन अहमदनगरवर" प्रकाश टाकणे अधिक सोपे जाणार आहे. "पेशवेकालीन अहमदनगर" यामध्ये विस्ताराने लिखान केले जाणार आहे. यामुळे अहमदनगरचा इतिहास सर्वांसमोर येण्यास मदत होणार आहे.

४) सरदार ना.य.मिरीकर, अहमदनगर शहराचा इतिहास -

अहमदनगर ऐतिहासीक वस्तुसंग्रहालय प्रकाशन- तृतीय आवृत्ती- २०१६

सरदार कै.ना.य.मिरीकर (नानासाहेब) यांनी १९१६ मध्ये लिहीलेल्या "अहमदनगर शहराचा इतिहास" या ग्रंथाची तिसरी सुधारीत आवृत्ती अहमदनगर ऐतिहासिक वस्तु संग्रहालयाने प्रकाशित केली आहे.

एखादया शहराची स्थापना नक्की कधी झाली हे फार थोडया वेळा माहिती असते. अहमदनगर शहराला हे भाग्य लाभले आहे. दिनांक २८ मे १४९० या दिवशी निजामशहाने कोट बागच्या रुपाने अहमदनगर शहराची मुहूर्तमेढ रोवली. शहराचा इतिहास म्हणजे फक्त राज्यकर्त्यांचा इतिहास आणि सनावळया नसतो. इतिहासात शहरातील सर्वसामान्य लोकांची जिवनशैली, तेथील शिक्षण व्यवस्था, न्यायव्यवस्था, तसेच वैदयकिय सुविधांचा अंतर्भाव असतो. शहराचे अर्थकारण, व्यापार उदिम तसेच उदयोग धंदयांवर त्यात प्रकाश टाकला जातो. कै.सरदार बाबासाहेब मिरीकरांनी संपादित केलेल्या अहमदनगर शहराच्या इतिहासात या सर्व गोष्टींचा अभ्यास दिसून येतो. या ग्रंथातील सर्व तपशिल संदर्भासहित दिलेला आहे. त्यामुळे हा परिपूर्ण ग्रंथ झाला आहे. याचा उपयोग "पेशवेकालिन अहमदनगर" या संशोधनासाठी नक्की होईल यात शंका नाही.

<u>अहमदनगर शहराचा इतिहास अभ्यासन्याचा हेतू</u> :-

१) अहमदनगर शहराविषयी माहिती जाणून घेणे, इतिहास संशोधनाच्या लिखानासाठी त्याचा उपयोग करुन घेणे.

२) अहमदनगर शहराच्या इतिहासाच्या घडामोडी अभ्यासणे.

३) अहमदनगर मधील सुत्रे, त्याची रचना हद्द याची माहिती संकलित करणे.

४) अहमदनगर मधील महसूल, न्याय व्यवस्था याबाबतची सखोल माहिती मिळवणे.

५) अहमदनगर शहराचा इतिहास हा ग्रंथ अनेक संदर्भ ग्रंथाच्या सहाय्याने लिहिलेला आहे. त्याचा उपयोग "पेशवेकालिन अहमदनगर एक अभ्यास" हे संशोधन करण्यास होईल.

<u>अहमदनगर शहराचा इतिहास हा ग्रंथ अभ्यासनाचे उद्दिष्टये</u> :-

अहमदनगर जिल्हा हा विस्ताराने अधिक मोठा आहे. पेशवेकाळात तर नाशिक जिल्हयाचा भाग अहमदनगर मध्ये समावलेला होता. येवढया मोठया शहराची रचना, न्याय व्यवस्था, समाज जीवन, धार्मिक, सांस्कृतिक जीवन कशा प्रकारे होते याचे सविस्तर वर्णन अहमदनगर शहराच्या इतिहासात केलेले आहे. या ग्रंथाच्या आधारे "पेशवेकालिन

अहमदनगर" या संशोधन विषयावर सविस्तर अभ्यासपूर्ण माहिती संकलीत करुन लिखान करणे हा उद्देश आहे.

५) **बी.डी.कुलकर्णी, ईस्ट इंडियाकालीन न्यायदान पध्दत, पीएच.डी. प्रबंध- १९८९**

ईस्ट इंडिया कंपनी कालीन अहमदनगर जिल्हयाची न्यायदान व्यवस्था हा समाज जीवनाशी निगडीत असलेला विषय आहे. पेशवाईचा अस्त व ब्रिटीश सत्तेचा उदय या संधीकाळातील हा अभ्यास होय. समाज जीवन व पाश्चात्य कल्पनांचे नेतृत्व करणा-या ब्रिटिशांनी निर्माण करु घातलेले आधुनिक समाज जीवन यांच्या स्थित्यंतराचा हा काळ होय. न्यायसंस्थेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रबंधातून केला आहे.

<u>ईस्ट इंडिया कालीन न्यायदान अभ्यासन्याचा हेतू</u> :-

१) पेशवे कालखंडात असणारे न्यायदानाचे कार्य पुढे बिटीश काळात कसे बदलत गेले ते अभ्यासने.

२) ब्रिटिशांनी पेशव्यांची कोणती जुनी मुल्ये स्वीकारली व नवीन मुल्यांमध्ये कोणते बदल केले हे अभ्यासने.

३) सदर प्रबंधात प्राचीन भारतापासून ते ब्रिटीशांपर्यंत न्यायदानाच्या कार्याचा आढावा विस्ताराने मांडलेला आहे. त्याचा उपयोग संशोधनासाठी करुन घेणे.

४) अहमदनगर जिल्हयाच्या इतिहासाचा अभ्यास फारसा सखोल झालेला नाही. जो झाला तो राजकिय इतिहासावर झालेला आहे. त्यामुळे न्यायदानावर प्रकाश टाकणारा हा पहिलाच प्रबंध ठरेल याचा उपयोग "पेशवे कालिन अहमदनगर" या संशोधनासाठी होईल.

इस्ट इंडिया कालिन न्यायदान अभ्यासनाचे उद्दिष्ट :-

ईस्ट इंडिया कालिन न्यायदान पध्दत- १८१८ ते १८३५ या प्रबंधात प्राचीन भारतीय न्यायसंस्था यादव कालीन, शिवकालीन व पेशवेकालीन न्यायसंस्थेचा परामर्श

घेतलेला आहे. सदर प्रबंधाच्या अभ्यासामुळे पेशवेकालीन न्याय व्यवस्था स्पष्ट होते. त्यावर अधिक विस्ताराने लिखान करण्यास हा प्रबंध अधिक उपयोगी पडतो.

६) **चॉवेली वि., टेल्स ऑफ अहमदनगर प्रकाशन- १९७०**

इ.स. १९१९ साली लिहीले गेलेले इंग्लिशमधील संदभ ग्रंथ "द टेलस ऑफ अहमदनगर" यामध्ये प्राचीन इतिहासापासून यादव कालखंड तुघलक कालखंड, अफगान सैनिक अहमदनगर निजाम शाहीतील शासक, चॉदबीबी ऐतिहासीक लढाया, मोगल, मराठा काळाबाबत महत्वपूर्ण लिखान केले आहे.

टेल्स ऑफ अहमदनगर अभ्यासनाचा हेतू :-

१) प्राचीन मध्ययुगीन अहमदनगरची माहिती जाणून घेणे.

२) ब्रिटीश अधिका-यांनी अभ्यासलेल्या अहमदनगरची माहिती सर्वासमोर आणने.

३) सदर संदर्भ ग्रंथ इंग्रजीमध्ये अनुवादीत व १९१८ सालची दुर्मिळ प्रत आहे. या संशोधना मार्फत टेलस ऑफ अहमदनगरचा अधिक उपयोग करुन घेणे.

टेल्स ऑफ अहमदनगर अभ्यासण्याचे उद्दिष्टये :-

ब्रिटीश अधिका-यांनी अनेक संदर्भ साधनांच्या आधारे टेलस ऑफ अहमदनगर हे माहिती पूर्ण पुस्तक लिहीले याच्या माहितीचा अधिकाअधिक उपयोग करुन पेशवे कालिन अहमदनगर एक अभ्यास या विषयावर संशोधन करणे , मोगल मराठा साम्राज्यातील अधिकाधिक माहिती अभ्यासणे.

७) **दैनिक लोकमत ''नगर पंचशताब्दी विशेषांक''**

दैनिक लोकमत प्रकाशन सन- १९९०

अहमदनगर शहरास ५०० वर्षे पूर्ण झाले त्या निमित्ताने अहमदनगरमधील तज्ञ इतिहास अभ्यासकांनी एकत्र येऊन लिहिलेले लेख या संदर्भबुकात समाविष्ठ करण्यात आलेले आहेत.

१) प्रा.अशोक नेवासकर यांचा "नाथ संप्रदाय".

२) नगर किल्ल्याचा सहवास- प.जवाहरलाल नेहरु.

३) बबलू जोशी यांचे- गोदा प्रवरा संगम.

४) सरदार बाबासाहेब मिरीकर यांचे १९व्या शतकातील नगर.

५) प्रा.क.शं.शहाणेसर यांचा भिल्ल, कोळी समाजाचा स्वातंत्र्य संग्राम.

६) शेख रहेमान यांचे ऐतिहासिक नगर.

७) सुरेश जोशी यांचे निजामकालीन पाणीपुरवठा.

८) सौ.सुप्रिया कुलकर्णी यांचे नगरची जन्मगाथा

९) सौ.हेमलता नेवासकर यांचे निजामशाहीतील धार्मिक परिस्थीती

असे अनेक मान्यवरांचे अहमदनगरवर प्रकाश टाकणारे अभ्यासपूर्ण लेख "नगर पंचशताब्दी विशेषांक" समाविष्ठ करण्यात आले आहे.

संदर्भग्रंथ अभ्यासण्याचा हेतू :-

१) अहमदनगर वरील माहिती संकलित करुन त्याचा संशोधनासाठी उपयोग करने.

२) नाथ संप्रदाय, अहमदनगर मधील पाणी पुरवठा याचाही संशोधनात उपयोग करुन घेणे.

संदर्भग्रंथ अभ्यासण्याचे उद्दिष्टे :-

नगर पंचशताब्दी विशेषांकात अनेक इतिहास अभ्यासकांचे माहितीपूर्ण लेख आहेत या माहितीच्या आधारे "पेशवे कालीन अहमदनगर एक अभ्यास" या विषयावर संशोधन करताना या संदर्भग्रंथाचा उपयोग करुन अभ्यासपूर्ण माहिती समोर आनण्याचे उद्दिष्ट आहे.

८) **जोगळेकर वि.क्र., "कुंपणी सरकारचे डाक्तर"**

अहमदनगर जिल्हा ऐतिहासीक वस्तू संग्रहालयाचे प्रकाशन-१९७८

कै.डॉ.माधवराव जोगळेकर यांनी कुंपनी सरकारच्या राज्यात (इ.स.१८५७ च्या सुमारास) व पुढेही आपले जीवन जिद्दीने परिश्रमाने कसे घडविले त्याचे ओझरते दर्शन या चरित्रात आढळते. त्यांना आलेले अनुभव व त्यांना भेटलेल्या व्यक्तीच्या व्यक्तिरेखा त्यांनी मोजक्या शब्दात रेखाटल्या आहेत. किंबहूना १८३० ते १९२० या काळात देशात सामाजिक, राजकिय, शैक्षणिक क्षेत्रात स्थित्यंतरे झपाटयाने होत होती. त्या स्थित्यंतराची

जाण व भान ठेवून या चरित्राकडे पाहिले तर त्याचे वेशिष्टये लक्षात येईल. आंग्ल वैदयकिय विद्येच्या प्राविण्य मिळविण्याच्या पहिल्या पिढीतच कै.माधवराव पुढे आले.

९) **चिंतामण लक्ष्मण नगरकर,''नारो बाबजी अभ्यंकर उर्फ नगरकर चरित्र''**

अहमदनगर जिल्हा ऐतिहासिक वस्तू संग्रहालय प्रकाशन- १९६८

नारो बाबजी अभ्यंकर हे पेशवाईतील एक अधिकारी म्हणून नगरला आले. पण नगरच्या राज्यकारभाराचे प्रत्येक बाबतीत ते इतके समरस झाले की त्यांचे अभ्यंकर हे मूळ उपनाम मागे पडून ते "नगरकर" झाले आजतागायत पिढयान पिढया त्यांचे वंशज नगरकर हेच उपनाम लावीत आहेत. नारो बाबजी नगरकर ही नगरचे इतिहासातील एक अष्टपैलू व्यक्तीमत्व असलेली व्यक्ती पेशवाईचे मराठी इतिहासात ही अद्यापपर्यंत अप्रकाशितच राहिली आहेत. या काळातील अस्सल कागदपत्रेही बरीच उपलब्ध झालेली आहेत. त्यावरुन नगर प्रांताचा बराच इतिहास ज्ञात होईल असा अंदाज आहे. पारनेर तालुक्यातील कान्हूर या गावची जहागिरी, गढीचा वाडा, ऐतिहासिक नोंदी आदिंचा उपयोग "पेशवेकालीन अहमदनगर" या संशोधन विषयासाठी होणार आहे.

<u>संदर्भग्रंथ अभ्यासण्याचा हेतू</u> :

१) पेशवे कालीन अहमदनगरचा इतिहास जानून घेणे.

२) पेशवे काळातील जमीन महसूल, न्याय व्यवस्थेचा अभ्यास करणे.

३) पेशव्यांची अहमदनगर मधील व्यवस्था, सामाजिक,राजकिय परिस्थिती अभ्यासने.

४) नारो बाबजी यांचे अहमदनगर मधील योगदान अभ्यासने.

५) धार्मिक बाबतील, नारो बाबजी आणि त्यांचे वंशज यांचे अहमदनगर मधील योगदान अभ्यासने.

<u>संदर्भग्रंथ अभ्यासण्याचे उद्दिष्टये</u> :-

सदर संदर्भ ग्रंथाच्या माहितीच्या आधारे पेशवेकालीन अहमदनगर एक अभ्यास या संशोधनात ऐतिहासिक नोंदीच्या आधारे बदल करणे. पेशव्यांची राजकिय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतीक माहितीचा संशोधनात उपयोग करुन प्रबंध पूर्ण करणे.

१०) **जोशी रेवती, नारायणराव खुणाची बखर**

अहमदनगर ऐतिहासिक वस्तु संग्रहालय प्रकाशन- इ.स.१९८०

कै.नाथ विठ्ठल पाठक गुरुजी हे नगर जिल्हयातील एक निष्ठावंत, तळमळीचे आणि अभ्यासू इतिहास संशोधक होते. नगर जिल्हा इतिहास संशोधक मंडळाचे संस्थापक व अनेक वर्षे चिटणीसही होते. प्राथमिक शिक्षक म्हणून त्यांच्या अनेक गावी बदल्या होत. त्या त्या गावी असताना अनेक हस्तलिखीते, ऐतिहासिक कागदपत्रे ते जमा करीत असत. त्यांनी आयुष्यभर जमा केलेला हा मोठा आणि मौल्यवान संग्रह नगर जिल्हा ऐतिहासिक वस्तु संग्रहालयास देणगी म्हणून दिला. त्यांचा संत वाड:मयाचा अभ्यास गाढा होता. मोडी वाचनातही गती होती. महानुभावी हस्तलिखिते वाचता यावी म्हणून त्यांनी सांकेतीक लिप्याही अवगत केल्या होत्या व त्यावर ते संशोधनपर निबंध लिहीत असत.

त्यांच्या संग्रहातील श्रीमंत नारायणराव पेशव्यांच्या खुनाच्या बखरीची मुळ संहिता अहमदनगर संग्रहालयानी प्रकाशीत केली आहे.

नगर जिल्यातील नेवासे तालुक्यातील सोनई येथील श्री.शेटे यांचेकडून ही अपूर्ण बखर त्यांना उपलब्ध झाली. दौलतराव शिंदे यांच्या काळात श्री.शेटे यांचे पूर्वज नगरचे किल्लेदार होते. या बखरीचे पहिले दहाबंद (कलमे) उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे ही बखर कोणी व केंव्हा लिहीली याचा अंदाज करणे कठीण आहे. या बखरीचे प्रामुख्याने दोन भाग पडतात.

पूर्वार्धात पानिपतच्या पराभवापासून श्रीमंत माधवराव पेशवे यांच्या मृत्यूपर्यंतची हकीगत आणि उत्तरार्धात श्रीमंत नारायणराव पेशवे यांच्या खुनाच्या कटाची हकीगत देऊन, शेवटी युक्तीने नाना फडणीसांनी सुमेरसिंगास पकडून जिवंत कसे जाळले त्याचा वृत्तांत सदर बखरीत विस्ताराने करण्यात आला आहे.

जुन्नरी हातसडीच्या २५से.मी. X २०से.मी. या आकाराच्या कागदावर मोडीत प्रत्येक पानावर सुमारे २०-२२ ओळीत या बखरीचा मजकूर लिहिलेला आहे. अक्षर एकटाकी, स्वच्छ, स्पष्ट आहे. या बखरीतील नव्याने प्रकाशात येत असलेल्या माहितीच्या आधारे एक

लेखमाला (तीन लेख) दै.सकाळच्या दि.२७, २८, २९ जून १९६६ व दै.समाचार (नगर)च्या दि.२२, ३० जून १९६६च्या अंकात मुद्दाम प्रकाशीत करण्यात आले. तसेच प्रा.सहाणे यांनी या संस्थेच्या वार्षिक संमेलनात या बखरीचे विश्लेषण करणारा निबंध वाचला होता. या सर्व माहितीच्या आधारे "पेशवे कालीन अहमदनगर" या प्रबंध लेखनात सदर ग्रंथाची मोलाची मदत होणार आहे. या माहितीच्या आधारे संशोधनाची दिशा मिळण्यास मदत होणार आहे.

११) **पारखे हरि गणेश "आमचा नगर जिल्हा"**

विद्याधर हरि दामले, नवीन किताखाना, पुणे- १९३१

मुळचे अहमदनगरचे डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्डचे चेअरमन, हरि गणेश पारखे यांनी अहमदनगर जिल्हयावर अभ्यास करुन, अहमदनगर गॅझेटिअर, शिवभारत, राधा माधवविलास चंपू, खरेकृत मालोजी व शहाजी, ब्राम्हणी राज्याचा जुना ग्रंथ, रा.ब.पारसनीस कृत मराठा सरदारांच्या कैफियती, नानासाहेब मिरीकृत नगर शहराचा इतिहास या ग्रंथांचा उपयोग केलेला आहे.

सदर ग्रंथात स्थानिक इतिहास, निजामशाही, मराठेशाही, पेशवाई, इंग्रजकाळ, अहमदनगर शहर, पौराणिक इतिहास, ऐतिहासिक स्थळांची माहिती, धार्मिक इतिहास अभ्यासपूर्ण पध्दतीने संदर्भग्रंथाचा आधार घेऊन लिहिलेले आढळते. सदर संदर्भग्रंथ अभ्यासकांना मोलाची दिशा देण्याचे काम करते. नगरमधील अनेक अप्रकाशित बाबी समोर आल्या आहेत.

<u>संदर्भ ग्रंथ अभ्यासण्याचा हेतू</u> :-

१) अहमदनगरचा इतिहास अभ्यासणे.


२) निजामशाहीतील सामाजिक माहितीच्या आधारे समाज व्यवस्थेवर प्रकाश टाकणे.

३) मराठेशाही, पेशवाई या माहितीच्या आधारे पेशवेकालीन अहमदनगर हे संशोधन पुर्ण करणे.

<u>संदर्भ ग्रंथ अभ्यासण्याचे उद्दिष्टय :-</u>

अहमदनगर शहराला स्थापनेपासून ते आत्तापर्यंत पाचशे वर्षाचा इतिहास आहे. राजधानीच्या शहरात कला, स्थापत्य, राजकिय, सामाजिक आर्थिक, धार्मिक इतिहासाचे आगळे वेगळे महत्व आहे.

आमचा नगर जिल्हा या संदर्भ ग्रंथाच्या माहितीच्या आधारे "पेशवे कालिन अहमदनगर" या संशोधनात संदर्भाचा उपयोग करुन पेशवे कालिन अहमदनगर प्रकाश टाकण्याच्या कामी सदर ग्रंथ फार उपयोगी पडेल.



प्रकरण ३

संशोधन पध्दती

प्रकरण ३

संशोधन पध्दती

प्रास्ताविक :

आदिमानवाच्या काळापासून ते आजतागायत मानवी व्यवहारांचे एक निश्चित उद्दिष्ट राहिले आहे, ते म्हणजे मानवी जीवन अधिकाधिक सुखकर करणे. सुखी जीवनाचे दोन पैलू असतात. एक भौतिक जीवन आणि दुसरे आत्मिक जीवन. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीने भौतिक जीवन सुखी होते, तर लौकिक व्यावहारिक जीवन सुखी असण्यासाठी माणसाच्या व्यक्तिमत्वाचा विकास आवश्य असतो. व यासाठी इतिहास महत्वाचा ठरतो. इतिहास हा गतकालीन मानवी जीवनाचा आलेख आहे. मानवी जीवनाचा प्रवाह हा अखंडित वाहणारा प्रवाह आहे, त्यामुळे भूतकाळ व वर्तमानकाळ यांचा अतूट संबंध असतो. दोहोत हवाबंद अगर अपारदर्शक रेषा काढता येत नाहीत. वर्तमानाची बीजे गतकाळात रुजलेली असतात. गतकाळाच्या आधारेच वर्तमानकाळ उभा असतो, त्यामुळे गतकाळातून वर्तमानाची कधी सुटका नसते. या वास्तवाची जाणीव इतिहास करुन देतो.

इतिहास हे एक भव्य ज्ञानभांडार आहे. गतकालीन मानवी जीवनाबाबतची माहिती इतिहासाद्वारे होते. रानटी अवस्थेपासून मानवाने क्रमाक्रमाने प्रगती कशी केली, याची माहिती इतिहासातून मिळाली की उत्क्रांतीच्या तत्त्वाचा बोध होतो. आणि मानवी जीवनाच्या उद्दिष्टांचाही अर्थबोध होतो. पूर्वीच्या लोकांनी केलेल्या प्रशसंनीय, साहसी कार्यातून प्रेरणा मिळते, चांगले कार्य करण्यास प्रोत्साहन मिळते, तर पूर्वी केलेल्या चुका कळल्या की ते खाच खळगे कसे टाळायचे तेही कळते. इतिहास अशा प्रकारे माणसाला दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतो. याच अर्थाने "इतिहास न जाणणारा माणूस पुन्हा पुन्हा त्याच चुका करीत राहतो" असे विधान प्रसिध्द तत्त्ववेत्ता **सात्यांयन** याने केलेले आढळते.

इतिहास म्हणजे समाजाचे अगर राष्ट्राचे स्मृतीभांडारही आहे. माणूस स्मरण शक्तीच्या आधारे आपले अनुभव विश्व जतन करतो. समाजाच्या स्मरण शक्तीचे कार्य इतिहास करतो. 'पुढच्याला ठेच आणि मागचा शहणा ' या न्यायाने इतिहासाचे अध्ययन करणा-या व्यक्तीचे व समाजाचे ज्ञानभंडार समृध्द व परिपक्व बनतो, आणि अनुभव विश्व अप्रत्यक्षपणे समृध्द बनते. रोमन सिनेटर सिसेरो याने या संदर्भात मोठे मार्मिक विधान केले आहे. तो म्हणतो "ज्या व्यक्तीला त्याच्या जन्मापूर्वी घडलेल्या गोष्टींचे ज्ञान नाही, त्याची बाल्यावस्था संपली नाही असे समाजावे". (To be ignorant of what happened befor you were born, is to be ever a child .) इतिहासाबाबत अज्ञानी असलेला समाज स्मृतीभ्रंश झालेल्या व्यक्तीप्रमाणे दिशाहीन, अस्मिताहीन जीवन जगतो.

इतिहास या संस्कृत शब्दाचा अर्थ असे घडले, अशा प्रकारे घडले [इति +ह+ आस] असा हेातो . म्हणजे भूतकाळात जे जे घडले ते सर्व इतिहासाच्या कक्षेत सामावते. इंग्रजी भाषेतील History हया शब्दाचे मूळ Istoria हया ग्रीक शब्दात सापडते. या शब्दाचा अर्थ जिज्ञासेने केले जाणारे संशोधन व त्याद्वारे नव्या माहितीचा शोध असा आहे. जर्मन भाषेतील इतिहास वाचक शब्द geschichte हा असून त्याचा अर्थ गतकालीन घटनांचे तर्कशुध्द व अर्थपूर्ण विवेचन असा आहे. हया तीन शब्दांच्या अनुरोधाने इतिहासाची व्याख्या स्थूलमानाने भूतकाळातील माहितीचा शोध घेऊन, जे घडले त्याचे तसेच्या तसे वर्णन तर्कशुध्द व अर्थपूर्णरीत्या करणे अशी करणे समर्पक ठरेल.

"पेशवेकालीन अहमदनगर एक अभ्यास" या संशोधनात संशोधनाच्या चार पध्दती वापरण्यात आलेल्या आहेत, त्यातील पहिली पध्दत आहे.

१. विश्लेषणात्मक पध्दती

यात वर्ण्यविषयासंबंधी नवी माहिती प्रकाशात आणण्यापेक्षा, उपलब्ध असलेल्या ऐतिहासिक माहितीचा , ऐतिहासिक साधनांचा नव्या दृष्टीकोणातून अभ्यास करुन प्रस्थापित प्रमेयाहून भिन्न प्रमेय मांडणे हा उद्देश असतो. उपलब्ध साधन सामग्रीचे

पुन:परीक्षण करुन प्रचलित मतापेक्षा वेगळा निष्कर्ष काढण्याचा अशा संशोधनांचा प्रयत्न असतो. यात नव्या साधनांच्या शोधाला स्थान नसते असे नव्हे. अनेकदा नवी सामग्री नवा पुरावा हाती लागल्यामुळे नवे प्रमेय मांडण्यास पुष्टी मिळते. मात्र अशा संशोधनात संपूर्ण भर नव्या पुराव्यांच्या मांडणीवर नसतो. उपलब्ध माहितीचा नवा अन्वयार्थ लावण्याचा संशोधकाचा हेतू असतो. डॉ.सुमन वैद्य यांचा पेशवा दुस-या बाजीरावाचे पुनर्मूल्यांकन करणारा 'Peshwa Bajirao II and the Downfall of the Maratha Power ' हा ग्रंथ विश्लेषणात्मक संशोधनाच्या वर्गात मोडतो .

इतिहास आणि सामाजिक शास्त्रामधील अतिशय महत्वाचा संशोधन प्रकार आहे. यासाठी संशोधक उपलब्ध माहिती आणि वस्तुस्थितीचा उपयोग करु शकतो. संशोधक उपलब्ध माहिती व वस्तुस्थितीचे विश्लेशन करुन प्रसंगाचे टीकात्मक मूल्यमापन करतो. उदा. भूतकाळात भारतावर अनेक परकीय आक्रमण केले, यासाठी संशोधक हा उपलब्ध माहितीचे विश्लेषण करुन आक्रमण होण्याची कारणे परिणाम व हेतू या सर्वांचे विश्लेषण करतो.

ऐतिहासिक कागदपत्रांच्या परीक्षणाचा टप्पा चिकित्सात्मक व विश्लेषणात्मक स्वरुपाचा असतो. या टप्प्याच्या दरम्यान संशोधकाची भूमिका तपासनीसाची असते, ज्या प्रमाणे गुप्तहेर खात्यातील तपासणीस डोळे व कान उघडे ठेऊन घडलेल्या घटनेचा सुक्ष्मपणे तपास करतो, तसेच काम या वेळी संशोधकाला करावयाचे असते. यासाठी त्याला कुशाग्र तल्लख बुध्दी, नीरक्षीर विवेक आणि कायम शंकेखोर वृत्ती असावी लागते. ज्या घटना घडल्या या आपण ऐकतो /वाचतो. तशाच खरोखर घडल्या का? याची शहनिशा करणे गरजेचे असते, कारण विश्वासार्हतेच्या निकषावर परखून ख-या ठरलेल्या माहितीलाच पुराव्याचे स्वरुप प्राप्त होते व त्याचा उपयोग इतिहास लेखनात करता येतो. घटिते हा इतिहास लेखनाचा मूळ आधार असतो. या संदर्भात घटनानिश्चिती हा परिक्षणाचा मुख्य उद्देश असतो, कारण पुढील सर्व प्रक्रियांचा मूळ आधार या परीक्षित घटना असतात. हे **हॉकेट** यांचे विधान या महत्वाच्या मुद्दयांवर नेमके बोट ठेवणारे आहे. संकलित कागदपत्रातील माहिती पुराव्यादाखल वापरता येईल की नाही याची निश्चिती करण्यासाठी संशोधकाला त्यावर परीक्षणाची प्रक्रिया

करावी लागते. विश्वसनीयता निर्धारित करण्यासाठी कागदपत्रांवर दोन प्रकारचे संस्कार करावे लागतात. म्हणजे कागदपत्रांचे बहिरंग परीक्षण आणि त्यांचे अंतरंग परीक्षण हे होत यालाच इंग्रजीत Heuristics [साधनशोध पध्दती] असे म्हणतात.

बहिरंग परीक्षण (Extrnal Criticitsm) : बाह्यांग परीक्षण ही कागदपत्रांच्या तपासणीची प्राथमिक प्रक्रिया होय. कागदपत्रे हाती आल्यानंतर त्यांची सत्यता पारखून घेण्यासाठी सुरुवातीला त्या कागदपत्राविषयी स्वत:लाच काही प्रश्न विचारावे लागतात. त्या कागदपत्राच्या खरेपणाविषयी शंका उपस्थित करुन तपासणीला प्रारंभ करावयाचा असतो. ते प्रश्न पुढीलप्रमाणे असतात.

१. संशोधनासाठी निवडलेल्या विषयासंबंधी तो कागद आहे की नाही?
२. कागद मूळ स्वरुपात आहे की नक्कल आहे ?
३. कागदाचा लेखक संशोधन विषयाच्या काळाशी निगडीत आहे का ?
४. कागदात आलेला विषय संशोधनविषयाच्या काळाशी सुसंगत आहे की नाही ?
५. उपलब्ध दस्तऐवजात स्थळाचा उल्लेख आहे का? असल्यास तो संशोधन विषयाच्या स्थलमर्यादेशी जुळतो का ?

या प्रश्नांचा हेतू मूळ कागदपत्राचा लेखक, स्थळ व काळ निश्चित करणे हा असतो. यालाच बाह्यांग [बहिरंग] परीक्षण असे म्हणता येईल. बाह्यांग व अंतरंग परीक्षणाच्या संदर्भात डॉ. शेख अली यांनी दिलेले उदाहरण बोलके आहे. ते म्हणतात, "पोस्टाने एखादे पाकीट आपल्या हाती आल्यानंतर आपली जिज्ञासा जागृत होते आणि सापेक्षी व्यक्ती त्या पाकिटावरील नाव आपलेच आहे की नाही ? पत्र आपल्याच नावाने आले की नाही , हे पाहातो. नंतर ते कोणाकडून आले आहे ? पाठवणारा कोण आहे ते पाहातो . त्याच्या स्थळाचा उल्लेख पाहातो आणि ते पत्र कोणत्या दिवशी पोस्टात टाकले आणि कोणत्या दिवशी मिळाले हे दाखविणारे पोस्टाचे शिक्के तपासतो . हे बाह्यांग परीक्षण आहे. या तीन गोष्टींविषयी खात्री झाल्यानंतर ते पत्र उघडून त्यातील मजकूर वाचतो व त्यात काय म्हटले आहे, त्याचा आशय

काय आहे त्याची छाननी करतो. "हे अंतरंग परीक्षण असते. हाच अर्थ डॉ. के.एन. चिटणीस यांनी अगदी थोडक्यात परंतु समर्पक शब्दात सांगितला आहे. 'बहिरंग परीक्षणात कागदाची सत्यासत्यता तपासायची असते, तर अंतरंग परीक्षणात त्याची विश्वासार्हता ठरवावयाची असते', हया त्यांच्या विधानात मूळ कागदपत्रांच्या परीक्षणाचे सार व्यक्त झाले आहे.

अंतरंग परीक्षण (Internal Criticism) : मूळ कागदपत्रांची विश्वासार्हता व स्वीकारार्हता ठरविण्याच्या दृष्टीने बाह्यांग परीक्षणापेक्षा अंतरंग परीक्षणाची प्रक्रिया अधिक महत्वाची आहे. कागदाचा लेखक , काळ व स्थळ यांबाबत बाह्यांग परीक्षणाने खातरजमा करुन घेतल्यानंतर, त्यातील आशयाची विश्वासार्हता ठरविणे हा अंतरंग परीक्षणाचा उद्देश असतो. पत्रातील मजकुराची चिकित्सक छाननी करायची म्हणजे पत्रात लेखकाने काय म्हटले आहे ? त्यात कोणकोणते मुद्दे आले आहेत ? कोणकोणत्या व्यक्तींचे अगर घटनांचे उल्लेख आहेत ? कोणाविषयी काय मत व्यक्त केले आहे ? त्यामागील हेतू काय असावा ? लेखकाची मानसिकता, वैचारिक भूमिका काय असेल ? मजकुरात शब्दार्थाप्रमाणे काही गर्भितार्थ आढळतो का ? अशा नानाविध पश्नांची उत्तरे शोधणे म्हणजे अंतरंग परीक्षण होय. अंतरंग परीक्षणाचे- १. सकारात्मक परीक्षण २. नकारात्मक परीक्षण असे दोन भाग पडतात. आणि याच पध्दतीनुसार मी सर्व काम केले आहे.

२. वर्णनात्मक पध्दत

वस्तुस्थिती शोधणारे हे संशोधन होय. या संशोधन प्रकारचा मुख्य उद्देश म्हणजे अस्तित्त्वात असलेल्या राज्याचा व्यवहाराचे वर्णन केले जाते. या संशोधन प्रकाराचे मुख्य वैशिष्टय म्हणजे संशोधक विविधतेवर नियंत्रण ठेवू शकत नाही. तो एखादा घडलेला प्रसंग व घटना कथन करु शकतो. त्याचबरोबर बंड, उठाव व अराजकता याच्या पाठीमागील विविध कारणे शोधण्याचा संशोधक प्रयत्न करु शकतो. हे साधे आणि विशिष्ट संशोधन असते. या प्रकारच्या संशोधनात विश्लेषणाला कमी वाव दिलेला असतो, घटनांच्या वर्णनाला जास्त अवकाश दिलेला असतो. या संशोधनासाठी आवश्य असणारी प्राथमिक माहिती अचूक आणि भरपूर प्रमाणामध्ये मिळविली पाहिजे. एखाद्या घटनेबाबत, प्रसंगाबाबत

अगर विषयासंबधी नवी माहिती, तोवर अज्ञात असलेली माहिती मिळवून ती सुसंबध्द रीतीने वाचकापुढे मांडणे हे मुख्य उद्दिष्टय होय. नव्या माहितीच्या संशोधनावर व त्याच्या पध्दतशीर सुसंगत मांडणीवर भर असतो.

३. ऐतिहासिक पध्दत

इतिहासलेखनाचा मूलाधार म्हणजे ऐतिहासिक साधनसामग्री. या साधनसामग्रीतून संकलित केलेल्या माहितीच्या आधारे इतिहास लिहिता येतो. ऐतिहासिक माहिती विषयाची चौकट तयार करते, त्यात तपशील भरते आणि इतिहासाला ग्रंथरुप देते.

ऐतिहासिक माहिती मिळविण्यासाठी कोणत्या स्त्रोतसाधनांचा वापर करावयाचा आणि कोणत्या पध्दतीने करावयाचा याचा आढावा घेतल्यानंतर पुढचा प्रश्न उपस्थित होतो, तो म्हणजे या साधनांतून मिळणारी माहिती कशा प्रकारे संकलित करावयाची ? स्त्रोतसाधनांचे परिशीलन करताना त्यातील आवश्यक ती सर्व माहिती स्मरणात ठेवणे केवळ अशक्य असते. अगणित कागदपत्रे व प्रचंड संदर्भग्रंथ वाचून त्यातून नेमकी ती माहिती नेमक्या प्रकारे स्मरणात साठविण्याची क्षमता असलेला संशोधक लाखातून एखादाच ! एकोणिसाव्या व विसाव्या शतकात स्त्रोतसाधनांचे क्षेत्र इतके विस्तारले आहे की त्यांना सर्व तपशील स्मरणात ठेवून लेखनाच्या वेळी त्याचा योग्य ठिकाणी वापर करणे सर्वसामान्य संशोधकाच्या आवाक्यातील बाब नसते. संदर्भ ग्रंथाचे नावे, त्यांच्या लेखकांची पूर्ण नावे, त्यांचा पाना - पानावरील आशय , प्रकाशक , प्रकाशन वर्ष या सर्व माहितीची गरज संशोधकाला असते. ही सर्व आवश्यक माहिती अचूक स्वरुपात हाताशी असल्यास लेखन कार्य सुकर होते, अल्पावधीत होते व गोंधळ टाळता येतो. या दृष्टीने मी आपल्या अनुभवांच्या आधारे सोयीस्कर ठरतील अशा संकलन पध्दती पुरस्कृत केल्या . याला संकलनाचे तंत्र असे म्हणता येईल. या सर्व पध्दतींच्या गुणदोषांची स्पष्ट कल्पना प्रारंभी असल्यास आपल्या संशोधनासाठी कोणती पध्दत श्रेयस्कर ठरेल याचा निर्णय करु शकतो. या मुळे संशोधनाच्या प्रारंभी येणा-या अनेक अडचणी दूर होऊ शकतात, काम सुरळीतपणे होते आणि संशोधनाचे

फलित अल्पावधीत हाती पडते. यासाठी ऐतिहासिक सामग्रीच्या सर्वसंकलन पध्दतींची माहिती असणे गरजेचे असते.

ऐतिहासिक सामग्रीच्या संकलन पध्दतींचा विचार करताना सुरुवातीला स्वत:ला काही प्रश्न विचारावे लागतात. आपल्या संशोधनाचे स्वरुप काय? त्यासाठी कोणत्या प्रकाराची माहिती गोळा करावी लागेल? आणि ती माहिती कोणत्या पध्दतीने मिळवणे लाभदायक ठरेल ? हे ते प्रारंभिक प्रश्न होत.

ऐतिहासिक पध्दतीत मोठया प्रमाणात अस्सल कागदपत्रांचा उल्लेख करण्यात आलेला आहे, ही सर्व कागदपत्रे मोडी लिपीतील आहेत. ही कागदपत्रे वाचण्याबरोबरच ते कोणत्या सालातील महिन्यातील आहेत, हे आपणांस समजण्यास सोपे जावे म्हणून इस्लामी कालगणना यामध्ये प्रामुख्याने वापरली आहे.

४. क्षेत्र भेट

पेशवेकालीन अहमदनगर हा संशोधन विषय निवडताना पूर्ण जिल्हयाचा त्यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. त्यामध्ये पेशव्यांची अहमदनगरमधील स्थळांना भेट देण्यात आलेली आहे. ती स्थळे म्हणजे श्रीगोंदेमधील शिंदेंचा वाडा, पारनेरमधील शिंदयांचे जामगाव हे राहते गाव, कान्हूर पठार हे नगरचे किल्लेदार नारो बाबजी नगरकर यांचे गाव, होळकरांचे दिवाण पळशीकर [कांबळे] यांचे पळशी हे ठिकाण, कोपरगावमधील राघोबादादांचा वाडा, नेवासा तालुक्यातील टोके हे ऐतिहासिक [धार्मिक] स्थळ इ. ठिकाणांना भेटी देऊन त्यातून पेशवेकालीन अहमदनगरची माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

वरील प्रमाणे पेशवेकालीन अहमदनगर एक अभ्यास हे संशोधन पूर्ण करण्यासाठी वरीलप्रमाणे संशोधन पध्दती वापरल्या आहेत. त्याचबरोबर अप्रकाशित साधणे, प्रकाशित साधने, प्राथमिक साधने, दुय्यम साधने, हस्तलिखिते, पत्र, चरित्र पुस्तिका, स्मरणिका, विविध संस्थांचे अहवाल, नियतकालिका, गॅझटिअर, वृत्तपत्रे, संदर्भग्रंथ इत्यादी संदर्भग्रंथाचा उपयोग करण्यात आलेला आहे.

प्रकरण ४

विश्लेषन व अन्वयार्थ
पूर्व पार्श्वभूमी

प्रकरण ४

विश्लेषन व अन्वयार्थ

पेशवेकालीन अहमदनगरची पूर्व पार्श्वभूमी

(इ.स. १४९० ते इ.स. १७५७)

पार्श्वभूमी :

अहमदनगर जिल्हा कुठेही काना, मात्रा, वेलांटी नसलेला जिल्हा आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा जिल्हा म्हणून महाराष्ट्रात ओळखला जातो. अहमदनगर शहराला राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक असा मोठा इतिहास लाभलेला आहे. हा विषय अभ्यासताना या विषयाकडे स्थानिक इतिहास, प्रादेशिक इतिहासाच्या दृष्टिकोनातून पाहणे आगत्याचे ठरते इतिहासलेखनासाठी प्रत्येक गाव ऐतिहासिकदृष्टया महत्वाचा आहे. प्रथम गावचे इतिहासलेखन, तालुक्याच्या स्थळांचे इतिहासलेखन अशी मांडणी केल्यास प्रादेशिक व राष्ट्रीय इतिहासामध्ये भर घालता येऊ शकते. इतिहास हा अतिव्याप्त विषय आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी वेगवेगळया प्रकारे त्याची विभागणी केली जाते. उदा. प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक अशी काळाच्या निकषावर केली जाणारी विभागणी. अशीच स्थळाच्या निकषावर केली जाणारी विभागणी म्हणजे जागतिक इतिहास, राष्ट्रीय इतिहास, प्रादेशिक इतिहास आणि स्थानिक इतिहास. प्रादेशिक इतिहास व विशेषत : त्याचा पोटविभाग म्हणता येईल असा स्थानिक इतिहास हे दोन्हीही महत्वाचे असल्याने त्या दोहोंचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

इतिहासाच्या जडणघडणीमध्ये समाजामधील प्रत्येक घटकाचा वाटा असतो. प्रत्येक स्तरातील व्यक्ती, घटना यांच्या माध्यमातून स्थलकालसापेक्ष इतिहास घडत असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहासातून राष्ट्रीय इतिहास आकार घेतो. प्रादेशिक इतिहासाच्या माध्यमातूनच राष्ट्राचा एकीकृत इतिहास साकार होत असतो. प्रादेशिक इतिहासाच्या मांडणीमध्ये भूतकाळ हा राष्ट्रीय नव्हे, तर स्थानिक परिवेशामध्ये सामावलेला असतो. स्थानिक व प्रादेशिक इतिहास

यांच्या साहाय्याने राष्ट्राचा सर्वांगीण इतिहास लिहिला जाऊ शकतो. प्रादेशिक व स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा अर्विभाज्य भाग आहे. म्हणूनच जागतिक इतिहासाला व राष्ट्रीय इतिहासाला Macro Study तर प्रादेशिक इतिहासाला Micro Study म्हणतात. या दोन प्रकारांना मराठीत अनुक्रमे 'समग्रलक्ष्यी अभ्यास' व 'अंशलक्ष्यी अभ्यास' म्हणता येईल.

डॉ. राजा दीक्षित यांनी प्रादेशिक इतिहासाबद्दल केलेली उपरोल्लेखित मांडणी स्थानिक इतिहासालासुध्दा ब-याच प्रमाणात लागू पडते. स्थानाची भौगोलिक मर्यादा लहान आहे. प्रदेश ही संकल्पना सापेक्ष आहे. स्थानिक इतिहासामध्ये गावाचा इतिहास समाविष्ट केला जातो. परंतु गावाच्या एखाद्या भागाचा किंवा एखाद्या पेठेचा इतिहास हा मुद्दा स्थानिक इतिहासामध्ये समाविष्ट करता येतो. तसेच एखाद्या विद्यापीठाचा इतिहास हासुध्दा स्थानिक इतिहास म्हणून गणला जाऊ शकतो.

स्थानिक इतिहासामध्ये इतिहासलेखनासाठी निवडलेल्या स्थानाच्या भौगोलिक घटकांप्रमाणे सांस्कृतिक व मानसिक घटकही अतिशय महत्त्वाचे आहे. डॉ. अरुण टिकेकर यांनी संपादित केलेल्या शहर पुणे : सांस्कृतिक संचिताचा मागोवा .. , या पुस्तकाच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेमध्ये स्थानिक इतिहासाची चर्चा केली आहे. त्यांनी स्थानिक इतिहासासाठी 'स्थानीय इतिहास' असा शब्दप्रयोग केला आहे. 'स्थानिक इतिहास ' अथवा 'Local History' ही पाश्चिमात्य देशांमध्ये प्रगत झालेली व आता मान्यता पावलेली संकल्पना आहे... 'Local History' ही संकल्पना नवीन असली तरी जुन्या काळातील अनेक लेखकांनी शहरांविषयी, सांस्कृतिक केंद्राविषयी लिहिताना ती अनुसरली आहे. आपल्याकडे स्थलमाहात्म्य सांगणा-या अनेक पोथ्या मिळत होत्या. त्यांचाच हा नवा व शास्त्रीय अवतार म्हणता येईल. त्या पोथ्यांच्या लेखकांनाही स्थानीय इतिहासकार म्हणता येईल. Local History ही पाश्चात्य संकल्पना आपल्याकडे रुजली. तेव्हा तिचे मराठीकरण स्थानिक इतिहास असे केले गेले . पण श्री. टिकेकर याबाबत थोडी वेगळी भूमिका घेतात. त्यांच्या मते Local History या संकल्पनेच्या स्थानीय इतिहास या मराठीकरणात Localised History

आणि History of Localities या दोन्ही संकल्पना अंतर्भूत आहेत. म्हणून श्री. अरुण टिकेकर यांना स्थानिक इतिहास या शब्दप्रयोगापेक्षा स्थानीय इतिहास हा शब्दप्रयोग अधिक समर्पक वाटतो.[१]

प्रत्येक गाव ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाचा आहे. त्या गावाच्या स्थानाशी संबंध असलेल्या व्यक्तीच्या मते, ते गाव ज्यावेळी सुस्थापित झाले, त्यावेळेपासून गावाविषयी आणि गावक-यांविषयी जिव्हाळा वाटणे ही स्वाभाविक भावना असल्यामुळे तो प्रत्येकाचा स्वभावधर्म असतो. स्थानिक इतिहास लिहिताना इतिहासकार त्या भावना ऐतिहासिक घटना आणि त्या घटनांशी संबंधित असलेल्या व्यक्ती यांच्या आधारे शब्दबध्द करतो. कधी स्वत:च्या स्मरणातून तर कधी इतरांना बोलके करुन त्यांच्याकडून वदवून घेतलेल्या 'मौखिक इतिहासा'च्या (Oral History) रुपात मांडतो.

स्थानिक इतिहासाचे लेखन, हा एका अर्थानं भूतकाळ रमू पाहणा-यांचा छंद, आपल्या गावाच्या वा शहराच्या गतकाळाबद्दल तसंच त्या शहरातील आपल्या ऋणानुबंधाबद्दल आपुलकी, प्रसंगी अभिमान वाटणं ही सहजभावना होय. आपल्या गावाबद्दलच्या काही स्मृती आनंददायक, तर काही क्लेशदायक असू शकतात. पण घटना घडून बरीच वर्षे उलटल्यामुळे आनंददायक व क्लेशदायक अशा दोन्ही स्मृतीबद्दल कातरता येत असते. ही स्मृतिकातरता प्रभावी शैलीत पकडण्यावर 'स्थानीय इतिहास ' काराचं यश अवलंबून असतं.

गावाचे इतिहासलेखन करताना गावातील वास्तू महत्त्वाच्या ठरतात. त्या इतिहास सांगणा-या असतात. वास्तूंनी त्या त्या काळाचे प्रतिनिधित्व केलेले असते. एखादी ऐतिहासिक वास्तू पाहताच अंगावर रोमांच उभे राहात असतील तर ते ऐतिहासिक पध्दतीने शब्दबध्द करावयास हवेत . एडवर्ड गिबन [१७३७ - १७९४] हा इंग्रज इतिहासकार १५ ऑक्टोबर १७६४ रोजी रोमशहर पाहण्यासाठी गेला असता तेथील टेकडीवरच्या देवालयाचे भग्नावशेष पाहून त्याला, रोमच्या -हासाची कहाणी लिहावी ही कल्पना सुचली. तसे त्याने

त्याच्या आत्मचरित्रामध्ये नमूद केले आहे. ते शब्दबध्द करण्यासाठी त्याने पुढील अनेक वर्षे खर्च केली.[२]

गावाचा इतिहास लिहिणे हा स्थानिक इतिहासाचा एक भाग आहे. स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग आहे. एखाद्या स्थानाभोवती किंवा ठिकाणभोवती केंद्रित राहून त्या स्थानाचे इतिहासलेखन करणे म्हणजे स्थानिक इतिहासलेखन करणे होय . भौगोलिकदृष्टया प्रादेशिक इतिहास ही इतिहासलेखनाच्या प्रांतातील त्या मानाने नव्याने उदयास आलेली ज्ञानशाखा आहे. मराठी भाषेतील लेखनविश्वात या शाखेची पावले मोठया प्रमाणात उमटलेली दिसत नाहीत. तरीही महाराष्ट्रातील इतिहास - अभ्यासक, साहित्यिक, पत्रकार व इतर अभ्यासकांनी आपल्या लेखनामधून स्थानिक इतिहासलेखनात योगदान दिले आहे. स्थानिक इतिहासलेखनाची दृष्टी आता प्रगत होत आहे. [३]

या बाबतील डॉ. राजा दीक्षीत यांचे प्रादेशिक इतिहासाच्या बाबतीतील मार्गदर्शन खूप मोलाचे ठरते ते म्हणतात, प्रादेशिक इतिहास (Regional History) कशाला म्हणावे हाच मुळात महत्त्वाचा प्रश्न आहे. भव्य एकत्वाशी जोडलेल्या 'विभागा'च्या अतिविशिष्टत्वाचा वेध प्रादेशिक इतिहास घेतो. जग हे भव्य एकत्व मानले तर पाश्चात्य जग, पौर्वात्य जग, तिसरे जग, युरोप, आफ्रिका, आशिया,पूर्व आशिया, आग्नेय आशिया इ. कितीतरी प्रकारच्या विभागांचा इतिहास 'प्रादेशिक' या सदरात मोडतो. भारत हे भव्य एकत्व मानले तर उत्तर भारत, दक्षिण भारत, ईशान्य भारत, दख्खन, काश्मीर, नागालॅंड, महाराष्ट्र हे भव्य एकत्व मानले तर विदर्भ, मराठवाडा, खानदेश [त्यातही पुन्हा पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश] कोकण [त्यातही पुन्हा उत्तर कोकण, दक्षिण कोकण] दक्षिण महाराष्ट्र, पुणे जिल्हा, मुंबई परिसर इ. कितीतरी प्रकारच्या विभागांचा समावेश 'प्रादेशिक ' या सदरात होऊ शकतो. याचा अर्थ प्रादेशिक इतिहास ही संज्ञा लवचीक आणि सापेक्ष आहे. आपण तिचा विचार मुख्यत: आपल्या देशाच्या आणि प्रांताच्या संदर्भात करु या. इतिहास हा वैश्विकता आणि विशिष्टता

या दोहोंचा वेध असतो. त्यातील अनेकदा दुर्लक्षित राहणारा विशिष्टतेचा पैलू इतिहासामुळे येतो.

इतिहासाचे चार अनुबंध आहेत - व्यक्ती, समाज, स्थल आणि काल. इतिहासात काल हा आपण घेतोच, पण प्रदेश वा स्थल यालाही एक वेगळे महत्त्व आहे. कारण माणूस जेव्हा 'स्थलवासी' झाला तेथून खरा मानवी इतिहास सुरु झाला. प्रादेशिक इतिहासाच्या संदर्भातही हे स्थलमाहात्म्य महत्त्वाचे आहे. शिकारीची आणि अन्नशोधाची अवस्था संपून मानव शेती करु लागला तेव्हा तो एका जागी स्थिरावला . जमिनीची सुपीकता नष्ट झाली की तो स्थलांतर करायचा, स्थलांतराचे हे चक्र सदैव सुपीक असणा-या भागात म्हणजे नदीकाठी थांबले. म्हणून तर पहिल्या सगळया संस्कृती नदीकाठावरच्या आहेत. अगदी तेव्हापासूनचे सीमांकन आणि त्यातील असंख्य बदल यांनी इतिहासाचा विशाल पट भरलेला आहे. प्रादेशिक इतिहासातसुध्दा त्याचा प्रत्यय येतो.

इतिहासाच्या चार अनुबंधांपैकी मानव व मानवी समाज हे अधिक मूर्त, दृश्यमान असे घटक आहेत. काळ व काही प्रमाणत स्थल हे अमूर्त घटक आहेत. यातले मानव व मानवी समाज हे घटक स्थल व काल यांना आपल्या आटोक्यात आणतात. कारण त्यांना आपल्या आवाक्यात येईल तेव्हाच आपण इतिहासाची मांडणी करु शकतो. मानवाने पंचांगाची निर्मिती केली आणि काळ त्याच्या आवाक्यात आणला, त्याचे मोजमाप तयार केले. नकाशाचे आरेखन केल्यामुळे स्थल हा घटक आवाक्यात आला. कोणता काळ असे म्हणतो की, 'मी प्राचीन युग आहे,' मी सुवर्णयुग आहे ? एवढेच नव्हे, तर काळ असेही म्हणत नाही की मी सोमवार आहे, मी मंगळवार आहे, मी २०१८ आहे. किंवा मी एकविसावे शतक आहे. काळ क्षणाक्षणाने व आपल्या गतीने पुढे सरकत असतो एवढेच. तो काही आपले रंग - रुप, अस्मिता सांगत नाही, ते माणूस करतो. कुठलीही भूमीसुध्दा असे सांगत नाही की मी पुणे आहे, मी नगर आहे, मी विदर्भ आहे. वा मी भारत आहे. पण नकाशाचे आरेखन करुन माणूस भूमीला ओळख प्राप्त करुन देतो. माणूस स्थल व काळ यांचे नामकरण करतो,

गुणवर्णन करतो. एका अर्थाने सबंध इतिहास हा असा 'नामाचा गजर' आहे. हे जो करतो, तो मानव भूमिनिष्ठ आहे. ते माणसाचे वैशिष्टय आहे. या 'भूमी'चा लहान - मोठा पसारा 'प्रदेश' म्हणून गणला जातो.

'प्रदेश ' ही संकल्पना काटेकोरपणे निश्चित केली पाहिजे. 'सीमाबध्द भूभाग' अशी प्रदेशाची व्याख्या करता येईल. प्रदेश म्हटला की सीमा आल्या, दिशा आल्या, नकाशाबध्दता आली. याचा अर्थ, प्रदेश ही मूलत: भौगोलिक संज्ञा आहे, पण प्रदेशाचा निव्वळ भौगोलिक विचार अपुरा ठरतो. इतिहासाच्या अभ्यासात भौगोलिकतेच्या जोडीला मानसिकतेचा घटकही विचारात घ्यावा लागतो. 'प्रदेश' नावाच्या ऐतिहासिक प्रवर्गाला जशी भौगोलिक, तशीच मानसिक सीमाबध्दतासुध्दा असते. प्रत्येक 'प्रदेशा'ला त्याची अशी एक मानसिकता असते, अस्मिता असते, संस्कृती [निदान उप - सस्कृती] असते. इतिहास ही एका अर्थाने आपली अस्तित्व - ओळख असते, आत्मशोध असतो, आत्मबोध असतो. एकदा हे लक्षात घेतले की, प्रादेशिक इतिहासाचे महत्त्व किती अनन्यसाधारण आहे, हे पटू शकते. 'जननी आणि जन्मभूमी या स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ होत' अशा अर्थाचे एक संस्कृत वचन आहे. जन्मभूमी किंवा मातृभूमी म्हटले की जागतिक संदर्भात आपण आपल्या देशाचा उल्लेख करतो आणि ते योग्यही आहे. 'ने मजसि ने परत मातृभूमीला । सागरा प्राण तळमळला'।। या स्वा. सावरकरांच्या कवितेतला शब्दप्रयोग याच कोटीतला आहे. पण जन्मभूमी हा शब्द उच्चारताना बरेचदा आपले जन्मगावसुध्दा स्वाभाविकपणे आपल्या मनात असते. 'नगरकर' म्हणून दोन व्यक्ती एकमेकांचे नाते पुकारतात तेव्हा त्याला मातीचा सुगंध असतो. हे मातीतले रुजलेपण फार महत्वाचे आहे. देशाची माती आपल्याला प्यारी असते. गावची माती ही देशाच्या मातीचाच भाग असते, तरीही गावाच्या मातीची एक खास ऊब आपल्याला जाणवते. ऐतिहासिक संदर्भात आपल्या प्रादेकशकतेची सुरुवात गावापासून होते. म्हणूनच स्थानिक इतिहासाला [Local History] प्रादेशिक इतिहासाचा पोटविभाग म्हणता येईल. पण ही प्रादेशिकता गावाच्या भौगोलिक सीमा ओलांडून विभागाच्या सांस्कृतिक सीमांमध्ये पसरते.

म्हणून प्रादेशिक इतिहासाची मांडणी करताना मुळात त्याच्या सांस्कृतिक सीमा ठरवाव्या लागतात. असे सीमांकन हा विशिष्टतेचा शोध असतो. त्याला संकुचितपणा म्हणणे गैर आहे. छोटया अस्मितांचे मोठया अस्मितेशी सदैव भांडण असते, असे मानण्याचे कारण नाही. अनेकदा मोठया अस्मितेच्या पोटात छोटया अस्मिता सुखाने नांदत असतात. भारतीय संदर्भात हे नुसते खरेच आहे असे नव्हे, तर इष्टही आहे. म्हणून 'भव्य हिमाचल तुमचा आमुचा । केवळ माझा सहयकडा' ही वसंत बापटांची कविता फार अर्थपूर्ण वाटते. आपले 'मराठीपण' आपल्या भारतीयत्वाच्या विरोधी नाही. किंबहुना त्याहीपलीकडे जाऊन आपण हे विश्वचि माझे घर आणि जय जगत् असे अगदी सहजतेने म्हणत असतो. केशवसुतप्रणीत 'प्रदेश साकल्याचा' आपल्याला खुणवत असतो. आपल्याला वेगळी प्रादेशिक अस्मिता असली, तरी ती राष्ट्रीय अस्मितेच्या विरोधी नसून तिला पूरक आहे. या गोष्टींचे पूर्ण द्वेत नाही ; पण पूर्ण अद्वैतही नाही. हा सारा एका विशिष्टद्वैताचा खेळ आहे. तो निकोप पध्दतीने खेळण्याचे पथ्य पाळले तर प्रादेशिक इतिहासाचा समृध्द अविष्कार पाहायला मिळू शकतो. एवढेच नव्हे, तर राष्ट्रीय इतिहासाला समृध्दी आणण्यातही त्याचा हातभार लागू शकतो. [४]

'अहमदनगरचा इतिहास'असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा १४९० साली निर्माण झालेल्या अहमदनगरच्या सीमा किंवा त्यानंतर शासकांनी जिंकलेला भूप्रदेश त्याच्या सीमा आपल्याला अभिप्रेत असतात. पण अगदी काटेकोरपणे त्या सीमाबध्दतेत महाराष्ट्राचा इतिहास आपल्याला मांडता येतो का ? तसे घडत नाही. काळानुसार अहमदनगरच्या सीमा बदलत राहिल्या. या अनेक घटणांचा जेव्हा समर्पकपणे, अभ्यासुवृत्तीने आपण त्याकडे पाहतो त्यावेळी इतिहास लेखन, संशोधन सोपे होते.

अनेक मोठी मोठी मंडळी या जिल्हयात घडलेली आहे. या जिल्हयाला ऐतिहासिक महत्व उच्चकोटीचे आहे. २८ मे १४९० मध्ये निजामशाहीची स्थापना अहमदनगरमध्ये झाली. शहर एक नावाजलेल्या शहरांच्या यादीत मध्यकालिन भारताच्या इतिहासात झळकले. आजही अनेक वास्तू या इतिहासाच्या साक्षीदार म्हणून शेवटच्या घटका मोजत आहेत.

मराठेशाहीची मुळातच पायाभरणी अहमदनगरच्या निजामशाहीपासून झाल्याचा उल्लेख येथील संदर्भ ग्रंथांमध्ये आढळतो. राजे शहाजी भोसले, लखूजी जाधव घराणे, निंबाळकर घराणे, अशी मात्तबर सरदार मंडळी याच निजामशाहीतून पुढे आली. शेवटी तर असा प्रसंग आला संगमनेरच्या पेमगिरीच्या किल्यावर शेवटचा निजाम बसवून काही काळ मराठयांनी निजाशाहीचा अजूनही अंत झाला नाही हे सिध्द केले. [५]

पेशवा पहिला बाजीराव, बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे, माधवराव पेशवे, सवाई माधवराव, नाना फडणवीस, दुसरा बाजीराव, होळकर, शिंदे यांचा जवळचा संबंध अहमदनगर इतिहासामध्ये आला. इ.स.१७५९ मध्ये तर मोगलांकडून नगरचा किल्ला खुद्द पेशव्यांनी घेतला. जवळ जवळ इ.स.१७५९ ते इ.स.१८०३ पर्यंतचा अंमल पेशव्यांनी अहमदनगरवर गाजवला. इ.स.१८०३ साली ब्रिटीशांनी अहमदनगर जिंकून शिंदेच्या ताब्यात दिले. ख-या अर्थाने इ.स. १८१८ पासून ब्रिटीशांचा अंमल अहमदनगरवर सुरु झाला. या काळात अनेक स्थित्यंतरे पेशवाईतील चढउतारही शहराने अनुभवले. शेवटची मराठयांची विजयी लढाई खर्डा येथे अनुभवली आणि याच मातीत निजामाला धूळ चारली. शेतीत, धार्मिक बाबतीत पण या शहराची जोड होतीच. कायगाव टोके, नेवासे, अगस्ती ऋषी अकोले, राशीन, सिध्दटेक, मिरावली बाबा, शेख बाबा, नाथ पंथ, रेणूका देवी, [मोहटे] अशा अनेक धार्मिक स्थळांची ओळखही सर्वदूर पोहचली.[६]

अशाच अनेक घटनांचा पेशव्यांपर्यंतचा इतिहास प्रकरण एकमध्ये आपण अभ्यासणार आहोत . यात सर्वप्रथम अहमदनगरचा भूगोल सीमा रेषा इत्यादी बाबातीत माहिती पुढीलप्रमाणे .

१.२ अहमदनगरची भौगोलिक माहिती :

अहमदनगर जिल्हा हा महाराष्ट्रातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा समजला जातो. याचा उत्तर अक्षांश १८०२ ते १९०९ व पू. रेखांश ७३०९ ते ७५०५ यादरम्यान

हा वसलेला आहे. क्षेत्रफळ १६,७६२ चौ. किमी. लोकसंख्या २२,६९,११७ [१९७१] च्या जनगनणेनुसार. जिल्हयाच्या पूर्वेस बीड, आग्नेयेस उस्मानाबाद व सोलापूर, दक्षिणेस व नैऋत्येस पुणे, पश्चिमेस आणि वायव्येस ठाणे व नाशिक, उत्तरेस नाशिक आणि ईशान्येस औरंगाबाद हे जिल्हये आहेत. अहमदनगर जिल्हयात कोपरगाव, अकोले, संगमनेर, श्रीरामपूर, राहुरी, नेवासे, शेवगाव, पाथर्डी, राहता, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, नगर, पारनेर असे चौदा तालुके आहेत. महाराष्ट्राच्या ५.४७ टक्के क्षेत्रफळ व ४.५ टक्के लोकसंख्या आहे.

सहयाद्री आणि त्याच्या उपशाखा कळसूबाई, हरिश्चंद्र गड यांनी जिल्हयाचा पश्चिम भाग व्यापलेला असून दारणा व प्रवरा या गोदावरीच्या दोन उपनद्यांची खोरी तिने विभागली आहेत. जिल्हयातील दक्षिणेकडील बालेश्वर ही रांग सर्वांत लांब आहे. पुणे - नगर जिल्हयांच्या सीमेवरुन पारनेर तालुक्यात ती शिरते व पुढे तिला दोन फाटे फुटतात. एक अहमदनगर शहराच्या दक्षिणेकडून आग्नेयेस जातो. जिल्हयातील डोंगराळ भाग अरण्यांनी व्यापलेला असून साग, गवत, बांबू, हिरडा, बेहडा, आवळा, बाभूळ, बोर व चिंच इ. वनस्पती येथे आढळतात. जिल्हयाच्या ११.३० टक्के क्षेत्र जंगलव्याप्त आहे. बांधकामाकरिता लागणा-या दगडाखेरीज जिल्हात दुसरे खनिज आढळत नाही.[७]

गोदावरी व भीमा या प्रदेशातील मुख्य नद्या होत. गोदावरी प्रथम कोपरगाव तालुक्याच्या उत्तर हद्दीवरुन वाहते. प्रवरा ही गोदावरीची महत्त्वाची उपनदी अकोले तालुक्यात उगम पावते व नेवासे तालुक्यातील प्रवरासंगम येथे गोदावरीस मिळते. या नदीवर भंडारदरा येथे धरण बांधले असून अनेक पाटबंधारे काढलेले आहेत. मुळा, आढळा व म्हाळुंगी या प्रवरा नदीच्या महत्त्वाच्या उपनद्या असून, ढोरा ही गोदावरीची आणखी एक उपनदी अहमदनगर शहराच्या उत्तरेला आहे. जिल्हयाच्या दक्षिणेकडील सर्व भाग भीमेच्या खो-यात येतो. भीमा अहमदनगर - पुणे जिल्हयांच्या हद्दीवर फक्त ५६ कि.मी. वाहते. परंतु घोड, सीना, व कुकडी या तिच्या प्रमुख उपनदयांचे जिल्हयाच्या दक्षिण भागात जाळे आहे.

अहमदनगर जवळील पिंपळगावचा तलाव शहराला पाणी पुरवठा करायचा. विसापूरचा तलाव शेती व आसपासच्या गावांची तहान भागवायाचा . सध्या शहरास मुळा धरणातून पाणीपुरवठा केला जातो.[८]

जिल्हयाचे हवामान सर्वसाधरणपणे कोरडे व उत्साहवर्धक आहे. उन्हाळयात सरासरी ३९.५० सें. तर हिवाळयात १३.५० सें. तापमान असते. जिल्हयाच्या ब-याच मोठया प्रदेशात वार्षिक ५०.८ सेंमी. ते ६३.५ सेंमी इतका कमी पाऊस पडतो. जिल्हयाच्या पश्चिमी हद्दीवरील सहयाद्रीवर ५०.८ सें.मी. पाऊस पडतो. पूर्वेस वसलेल्या अकोले गावी ५५.९ से.मी. पडतो. अकोल्याच्या पूर्वेस तो आणखी कमी होत जातो. यामुळेच जिल्हयात दर तीन किंवा सहा वर्षांतून एकदा तरी दुष्काळ येतो. थोडयाफार पावसामुळे पश्चिमेकडील अकोले. आणि नद्यांच्यामुळे शेतीला पूरक पाणी मिळण्यास मदत होते.

काळी, लाल, तांबट हलक्या दर्जाची बरड व पांढरी बरड हे जिल्हयात आढळणारे जमिनीचे मुख्य प्रकार. गोदावरी व प्रवराकाठच्या जमिनी तसेच राहुरी तालुक्यातील जमीन काळी, खोल व सुपीक आहे. साहजिकच हा जिल्हा शेतीप्रधान असून कष्टकरी लोकांपैकी ७५.१८ टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहेत. पेरणीचे निव्वळ क्षेत्र ७४.६ टक्के असून १३.६३ टक्के क्षेत्र ओलीत आहे. जिल्हयामध्ये खरीप व रब्बी दोन्ही पिके काढली जातात. ऊस हे येथील महत्वाचे बारमाही पीक असून महाराष्ट्रातील ऊस उत्पादनात आजही या जिल्हयाचा प्रथम क्रमांक लागतो. भात, बाजरी, तूर, कडधान्ये, भुईमूग व इतर गळिताची धान्ये, तंबाखू, गहू, हरभरा, ही येथील दुसरी महत्वाची पिके होत. याशिवाय मोसंबी, केळी, द्राक्षे , लिंबू वगैरे फळांचीही लागवड येथे मोठया प्रमाणात केली जाते.[९]

दक्षिण - मध्य रेल्वेचा मार्ग दौंड - मनमाड फाटा कोपरगावापासून अहमदनगरमार्गे जिल्हयातून १९६.३० कि.मी. जातो. जिल्हयातील सडकांची लांबी ४,११६ , ३५ कि.मी. असून त्यापैकी अनेक सध्या कॉंक्रीटच्या आहेत. जिल्हयातून विशाखापट्टणम हा राष्ट्रीय

महामार्ग जातो. त्याच बरोबर नशिक, पुणे राष्ट्रीय महामार्ग संगमनेरमधून जातो. पुणे औरंगाबाद, पुणे, बीड, नगर, सोलापूर असे मुख्य रस्ते अहमदनगर शहरातूनच जातात अहमदनगर जिल्हयाला मराठवाडयाचे प्रवेशव्दार म्हटले जाते.

१.३ अहमदनगरची सामाजिक माहिती :

अहमदनगर जिल्हा हा पूर्वी दंडकारण्य म्हणून ओळखला जाणा-या भागात मोडत होता असे म्हणतात. म्हणून पूर्वीच्या काळी घडलेल्या ब-याच घटनांचा या भूमीशी संबंध जोडला जातो. अगस्ती ऋषींची यात्रा आजही अकोल्याशेजारील आगर येथे महाशिवरात्रीस भरते. पाथर्डी तालुक्यात पांडवकालीन अवशेष आढळतात. शालिवाहनांची राजधानी प्रतिष्ठान [पैठण] जिल्हयाला लागूनच असल्यामुळे जिल्हयात त्यासंबंधीचे तत्कालीन अवशेष नेवासे उत्खनात सापडले आहेत. पुणतांबे शालिवाहन काळापासूनच प्रसिध्द आहे. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी येथेच लिहिली.

अहमदनगर मधील नाथपंथ :

नाथपंथातील परमपदास पोहोचलेले ते नाथ आणि मीपणा सोडून जनसेवेचे शिक्षण घेणारे ते सिध्द असे प्रकार होते. नाथपंथाचे आदिपीठ म्हणजे नगर जिल्हयातील वृध्देश्वर अगर म्हातारदेव नगरजवळील गर्भगिरीचे डोंगरात या नाथपंथीयांची कर्मभूमी आहे. नवनाथांपैकी मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ, गहिनीनाथ, जालींदरनाथ व कानिफनाथ महाराज हे प्रमुख नाथपंचायातन, त्यांचे आश्रम व समाध्या या गर्भागिरीचे डोंगरात आहेत . गोरखनाथ हे मराठीचे पहिले ग्रंथकार मानले जातात. तथापि त्यांचे हस्तलिखित जुने वाड.मय आज उपलब्ध नाही. गोरखनाथांने नाथपंथाचा झेंडा नेपाळ, पंजाब, अयोध्या, काठेवाड, राजपुताना या प्रांतातही लावला.[१०]

महाराष्ट्रीय संत परंपरेंतील परमश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर हे नाथपंथाचेच अनुयायी, ज्ञानेश्वरांचे वडील बंधु निवृत्तीनाथ हे गहिनीनाथाचे शिष्य, निवृत्तीनाथांनेंच ज्ञानेश्वरांना

गुरुपदेश दिला. संत मालिकेत सर्वश्रेष्ठ असलेली ही चार भावंडे म्हणजे निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई यांच्या, अल्प परंतु दिव्य आयुष्याचा बराच काळ या अहमदनगर प्रांतांत गेला. मराठी वाङमयाचा मुकुटमणी असा ज्ञानेश्वरी ग्रंथ याच जिल्हयांत नेवासे येथे लिहिला गेला.

१.४ अहमदनगरमधील संतमालिका

महाराष्ट्रातील प्राचीन काळापासून विद्येचे माहेरघर म्हणून गणले गेलेले प्रतिष्ठान अगर पैठण प्रांतीयदृष्ट्या आजजरी नगरबाहेर वाटत असले तरी पैठणचे संतश्रेष्ठ एकनाथ हे नगरवासीयांना अगदी जवळचे आहेत. पुणतांब्यांचे चांगदेव, मुंगीचे विठोबा खेचर, पैठणचे जगनमित्रनागा, राशीन येथील केशरीनाथ, मांडवगणचे जयराम स्वामी, देवदैठणचे निंबराज महाराज, श्रीगोंदे येथील शेखमहंमद महाराज, रामदास परंपरेतील दिनकरस्वामी, बारामतीकर दामाजी पंताचे चिरंजीव बुवाजी बुवा, पिंपळनेरचे निळोबा, सुप्रसिध्द संत चरित्रकार महिपतीबोवा ताहाराबादकर, बहिरापिसा, पैठणचे कृष्णदयार्णव व शिवदिन केसरी, शिवचरित्रकार परमानंद, नगरचे जयराम नाना देशमुख, बाळाजी बुवा, अशी अनेक मोठी श्रेष्ठ संतपरंपरा या जिल्हयास आजच्या काळापर्यंत अखंड लाभली आहे.

१.५ महानुभाव संप्रदाय :

अहमदनगर जिल्हयात महानुभाव संप्रदायाने मोठे कार्य केले. तसेच वाङमयीन कार्य केले. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर यांनी या जिल्हयात बराच संचार केला. चक्रधरांचे शिष्य महेंद्रभट राजव्यास, केशवराज भावे, देवव्यास हे या जिल्हयांतील राहणारे. हे मोठे नावाजलेले पंडीत होते. चक्रधरांचे शिष्यमालिकेंतील प्रमुख श्रेष्ठ शिष्य या जिल्हयांतीलच होते. त्यामुळे महानुभाव पंथाची खरी जोपासना या जिल्हयांतच झाली असे म्हटलेतर वावगे ठरु नये. महानुभावाचे मठ, पंजाब काबूलपर्यंत आहेत, अहमदनगरच्या ऐतिहासिक वस्तु संग्रहालयात महानुभवपंथांची वृक्षवेल आहे.[११]

१.६ अहमदनगर मधील मुस्लीम संत अवलीये :

अहमदनगर निजामशाहीत व तद्नंतर मुस्लीम अवलिये अहमदनगर मध्ये बरेच होऊन गेले. त्यामध्ये "शहा शरीफ" हे श्रेष्ठ पुरुष होऊन गेले. शहा शरीफ हे शिव छत्रपतींचे आजोबा मालोजीराजे भोसले यांना गुरुस्थानी होते. मालोजीराजांना शहाजी व शरीफजी ही देान पुत्ररत्नें या अवलियांच्या नवसामुळे झाली अशी आजही अहमदनगरमध्ये आख्यायीका प्रसिध्द आहे.[१२]

शाह ताहीर

शहा ताहीर हा शिया इस्लाम संस्कृतीचा तत्वज्ञानी असल्याने त्यास नगर शहरात दुहेरी मान मिळत असे. अहमदनगरचा निजामशहा पूर्वी सुन्नी पंथीय होता. शहा ताहीर या शिया पंथाचा असल्याने यांचेच वचनामुळे पुढे बु-हाणने शिया पंथाचा स्वीकार केला. नगरचा बारा इमाम कोठला या इमारतीचा मूळ संस्थापक होय. सांगावयाचे तात्पर्य इतकेच की, बु-हाणवर याचे अतिशय वजन होतें व ज्या ज्या वेळी बु-हाण संकटांत असे त्या त्या वेळी संकट निवारणार्थ शहा ताहीरची योजना होत असे. शहा ताहीर यांजबरोबर मौल्यवान देणग्या देऊन बु-हाणनें गुजरातचे बहादूरशहाकडे त्याचा स्नेह संपादन करण्यासाठी पाठवले. बहादूरशहा प्रथम शहा ताहीरची भेट घेईना. परंतु खान देशच्या सुलतानाच्या मध्यस्थीने अखेर भेट घडून आली. शहा ताहीरची विद्वत्ता व त्याची बुध्दीमत्ता अवलोकन करुन बहादुरशहाने त्याचा अखेर दरबारी सन्मान केला .

बहादुरशहा हा आपल्या सार्वभौमत्वाबद्दल अत्यंत अभिमानी व तसाच महत्वाकांक्षी असे, तो नेहमी मोगलांचे बरोबर बसण्याची इच्छा करीत असे व मोगलांशी तो स्पर्धा करीत असे. त्यामुळे दक्षिणेंतील मुसलमानी राजांशी वैर निर्माण करण्याची त्याची इच्छा नव्हती. शहा ताहीरचे मध्यस्थीमुळे बहादूर शहाबरोबर मित्रत्वाचे संबंध दृढ करण्याचे प्रयत्न चालविले. शहा ताहीर व कबरसेन यांच्या आग्रहावरुन बु-हाणनें बहादूरशहाची भेट घेतली. बहादूरशहा

हा स्वाभिमानी असल्याने तो सिंहासनावरुन उठून इतर राजांस आदेश देत नसे. शहा ताहीर मोठा हिकमती मुसद्दी व्यक्ती होता. त्यांनी एक कुराणाची प्रत बु-हाणच्या डोक्यावर दिली व बहादूरशशहाच्या भेटीस गेला. कुराणाचा मान ठेवण्यासाठी बहादूरास सिंहासनावरुन उठावे लागले. शहा ताहीर मुळे बहादूर बु-हाण यांची मैत्री होऊ शकली. ती मैत्री अहमदनगरची निजामशाही टिकवण्यासाठी अनेक वर्षे कामी आली. [१३]

२. अहमदनगर मधील समाजजीवन

समाज हिंदू , मुस्लीम, हिंदूतील काही जाती उपजाती, मुस्लीम समाजातील पोटजाती असा विभागला गेला होता. यामध्ये मुस्लिम सत्ताधिशांचे राजधानीचे शहर असल्याने, मुस्लिम सत्ताधिशांमुळे शहरात ही घराणी मोठया प्रमाणात आढळतात. आजही खान, सय्यद, पठाण, शेख अशी मोठीमात्तबर मंडळी अहमदनगरमध्ये आहे. सत्तेचे केंद्र त्यांच्या हाती असल्यामुळे अनेक मराठा सरदारांचा उगम येथूनच झाला. समाजात नवरोज, ईद, ताबूत मिरवणूक मोठया भक्तीभावाने साजरी केली जाते. हिंदू समाजात जाती पोट जाती मोठया प्रमाणावर होत्या. त्यामुळे श्रेष्ठ, कनिष्ठ असा भेद अहमदनगरमध्ये ही पहावयास मिळतो. काही ठिकाणी तर जातीनुसार व्यवसाय असाही भेद दिसून येतो. मुस्लीम समजात बागवान, खाटीक, वाघबकरे, मुलाणे, ईमाम, फकीर अशा अनेक पोट जाती पहावयास मिळतात. मुळात अहमदनगर मध्ये शिया पंथीय मोठया प्रमाणात असल्यामुळे त्यांचे आचार-विचार राहणीमान यात मोठया प्रमाणावर फरक जाणवतो. पण सुन्नी संख्याही त्याच प्रमाणावर असल्याची दिसते. [१४]

३. राजकीय माहिती :

३.१ बहामनी साम्राज्यातून निजामशाहीचे विघटन

अहमदनगरचे निजामशाहीचा संस्थापक अहमद निजामशहा हा बहामनी राज्याचा वजीर निजाम उलमुल्क बहिरी याचा मुलगा होय. निजाम उलमुल्क बहिरी हा पूर्वाश्रमीचा

तमाभट्ट वलद बहिरुभट नामक पाथरी या गावचा कुलकर्णी होता.[१५] अहमदशहा बहामनी यांने विजयनगरवर ज्यावेळी स्वारी केली, त्यावेळी हा दुष्काळामुळे पोट भरण्यासाठी आपल्या पित्यासह विजयनगरास गेला. तेथे तो अहमदशहाचे हाती लागला. गुलाम म्हणून याची रवानगी बिदर येथे झाली. मुस्लीम धर्माचा स्वीकार झाल्यावर यांचे नांव हसन असे ठेवण्यात आले. तथापि पूर्वाश्रमीचे बापाच्या नावावरुन त्याचे नाव मलीक हसन बहिरु असे रुढ होवून बहिरुचा पुढे अपभ्रंश बहिरी असा झाला. मलिक हसन बहिरी याचे गुण अहमदशहा यांचे नजरेस आल्यावर त्याची गुलामगिरी नष्ट होउन, त्यास सरदारकी देण्यात आली व पुढे त्यास "निजाम उल मुल्क बहिरी" अशी पदवी प्राप्त झाली.[१६]

बहामनी राज्याचा वजीर महंमद गवान याचा वध झाल्यावर वजीराचे श्रेष्ठपद या निजाम उलमुल्क बहिरीकडे आले व त्याजबरोबर राजमहेद्री, कंडाजिली येथील जहागिरी त्यास मिळाल्या. या जहागिरीची व्यवस्था त्याने आपला मुलगा अहमद यांजकडें सोपविली. हा 'अहमद' म्हणजेच अहमदनगरचे निजामशाहीचा मूळ संस्थापक होय.

३.२ अहमदनगरच्या निजामशाहीची स्थापना

अहमद स्वतंत्र वृत्तीचा व शूर होता. बहामनी राज्याची ताबेदारी अहमदनगर यास मुळीच मानवेना, तथापि बहामनी राज्याचा सुभेदार म्हणून त्याने जुन्नर येथे आपले ठाणे मुक्रर केले. अहमदने नजीकचा जो शिवनेरी किल्ला आहे तो सर केला. या किल्ल्यांत अहमदास सर्व महाराष्ट्राचा पांच वर्षाचा वसूल म्हणून जमविलेला पैसा हाती लागला. ही रक्कम बरीच मोठी असल्याने अहमदास स्वतंत्र राज्य स्थापन करण्यास अनायासेच अर्थसाहय लाभले. अशातच उलमुल्क बहिरी याचा बहामनी राज्यांत खून झाला, त्यामुळे अहमदने बहामनी राज्याचे संबंध तोडून स्वतंत्र राज्य स्थापण्याचा संकल्प केला. त्याने स्वत:स "अहमद निजाम उलमुल्क बहिरी" अशी पदवी घेउन आपली स्वतंत्र निजामशाहीची घोषणा केली. त्यामुळे अर्थातच बेदर दरबारचे बहामनी राज्याचे व त्याचे वैमानस्य आले. [१७]

३.३ गनिमी काव्याचा पहिला प्रयोग

अहमदनें स्वतंत्र राज्य स्थापल्यानंतर त्याचा बिमोड करण्यासाठी बहामनी राज्यांतील मोलाविंद या अरब सरदारास पाठविलें. त्याचे प्रचंड सैन्यापुढे समोरासमोर लढून जय मिळणे अशक्य, म्हणून गनिमी पध्दतीने छापे घालून अहमदाने त्याच्या प्रचंड सैन्याचा पराभव केला. गनिमी काव्याच्या या युध्दतंत्राचा पहिला प्रयोग करणारा अहमदच म्हणावा लागेल. अहमदनगरवर असाच दुसरा हल्ला करण्यास अठरा हजार सैन्य रवाना झाले. पण एवढया मोठया सेनेस तोंड देण्याचे टाळून अहमदने फक्त तीन हजार घोडेस्वार घेऊन खुद्द बहामनी राजधानी बिदर या शहरावर मोठया धाडसाने हल्ला केला व त्याजवर हल्ला करण्यास गुंतलेल्या सरदारांची बायकामुले त्याने बेदरहून पकडून आणली व परांडयाच्या किल्ल्यात ठेवली. या कुटुंबांची अहमदने उत्कृष्ठ व्यवस्था ठेवली.

३.४ विजयाचे स्मारक म्हणून नगरच्या किल्याची स्थापना

जहांगीर खान हा बहामनीचा सेनापती आपल्या सेनेसह बीड, परांडा, पैठण या मार्गे येऊन तिसगांव [पाथर्डी] नजीकच्या देऊळगांव घाटाने वर चढून भिंगारनजीक तळ देउन बसला. अहमद जेऊर नजीकच्या डोंगरावर दबा धरुन बसला. जहांगीरखानाने अहमदास बाहेरील मदत मिळू नये म्हणून चोहोबाजूने नाकेबंदी केली होती. त्यामुळे त्यांची सेना निर्धास्त होती. इकडे अहमद सावधतेने शत्रूपक्षाकडील बातम्या गुप्तहेरामार्फत अजमावीत होता. सन १४९० चे रज्जब महिन्याचे तिस-या तारखेस अहमदने आपल्या थोडक्याच पण शेलक्या सेनेसह बेसावध बहामनी सेनेवर एकदम छापा घातला. अहमदने या छाप्यांत शत्रू सेनेची चांगलीच कत्तल केली. शरणागतांना अभय देऊन त्यांची परत बेदरला रवानगी करुन दिली. या लढाईस 'जंगेबाग' असे म्हणतात. अहमदने आपल्या या विजयाच्या जागेवरचे स्मारक म्हणून किल्ला बांधला तोच अहमदनगरचा भूईकोट किल्ला होय. दि. २८ मे १४९० मध्ये याची स्थापना करण्यात आली. याच किल्यास त्याने "नंदनवनांतील विजय" असे संबोधले आहे. कोटबाग निजाम असेही यास म्हणतात .[१८]

त्यापूर्वी अहमदची राजधानी जुन्नर येथेच होती. यानंतर त्याचे लक्ष वेधले आणि कोकणातील दंडा राजापुरीचा किल्ला घेतला. नंतर दौलताबादच्या अभेद्य किल्ल्याकडे त्याची

नजर वळली. ज्याचे हाती दौलताबाद त्याचे ताब्यात दख्खन अशी तत्कालीन समजूत होती. त्यामुळे अहमदने दौलताबाद सर केला. बहामनी बरोबर विजयाच्या स्मरणार्थ अहमदने इ.स. १४९४ मध्ये आपली वैभवशाली राजधानी स्थापन केली ते आजचे अहमदनगर.

३.५ वैभवशाली नगर

अहमदनगर शहराचे वैभव वाढविण्यासाठी अहमदशहाने पराकाष्ठा केली. अहमदनगर, बगदाद व कैरो अशा शहरांची स्पर्धा करूं लागले. या वेळी नगर शहरात खडकपुरा, शहाजापुरा, तोफखाना, सर्जेपुरा, कमालपुरा, कपुरपुरा, हातीमपुरा, मोगलपुरा, बेहरामपुरा इ. महत्वपूर्ण ठिकाणे होती. यातील काही आजही याच नावाने प्रसिध्द आहेत. इ.स. १५०८ मध्ये अहमदने आपल्या आवडत्या नगर शहरांतच इहलोकची यात्रा संपवून सीना नदीकाठी देह ठेवला. त्याचे कबरीस 'बागरोजा' असे म्हणतात.

३.६ बु-हाण निजामशहा (१५०८ ते १५५३)

अहमदशहाचे निधनानंतर त्याचा सात वर्षांचा मुलगा बु-हाणशहा हा गादीवर बसला. त्याचे अज्ञानावस्थेत मुकामिलखान दखनी हा मुत्सद्दी सरदार त्याचा कारभार पाहू लागला. मुकामिलखानाचा मुलगा मिआन जमानउद्दीन हाही आपल्या बापास राज्यकारभारात मदत करी. या पितापुत्रांचा कारभार बरा चालू लागला, परंतु इतर सरदारांना त्यांचा हेवा वाटू लागला. त्यामुळे राजकारणात दोन तट निर्माण झाले. [१९]

३.७ मलिक-इ-मैदान तोफ :

बु-हाणचे कारकीर्दीत एक विशेष उल्लेखनीय गोष्ट घडली म्हणजे जगांतील सर्वात मोठी तोफ अहमदनगर येथे बनविली गेली. ती ज्याने ओतली तो चुलबी रुमीखान हा मूळचा तुर्की असून त्यांस ही कला स्पेन व ग्रीसमध्ये प्राप्त झाली. हिंदुस्थानात आल्यावर बु-हाणची कीर्ती ऐकून तो नगरास बु-हाणचे आश्रयास आला. त्याने त्याच्याकडून ब-याच तोफा ओतून घेतल्या. त्यामध्ये आज विजापूरास नेलेली, मुलूख मैदान व धुळधाण अशा दोन तोफा इ.स.१५५० मध्ये ओतल्या गेल्या. [२०]

३.८ हुसेन निजामशहा (१५५३ ते १५६५)

बु-हाणचे निधनानंतर त्याचा तेरा वर्षांचा मुलगा हुसेन हा गादीवर आला. त्याच्या अज्ञानावस्थेचा फायदा घेऊन सरदारांनी दुफळी गाजविण्याचा प्रयत्न केला व त्याचे विरुध्द त्याचा सख्खा भाऊ अब्दुल कादर व सापत्न बंधू यांना हाताशी धरून प्रतिस्पर्धी म्हणून उभे करण्यात आले. हुसेनचे बाजूस परदेशी हबशी मुसलमान व अब्दुल कादरचा झेंडा घेऊन नाचणारे दख्खनी मुसलमान व हिंदु असे तट पडले. परंतु पुढे अब्दुल कादरचे पक्षास ओहोटी लागून हुसेनचे प्रतिपक्षीय निजामशाही सोडून व-हाडचे इमादशहास जाऊन मिळाले. हुसेनचे सापत्न बंधु शहाअल्ली व भिरन महंमद बकर आपले मातुल पण निजामशाहीचे पिढीजात प्रतिस्पर्धी विजापुरचे अदिलशहा यांना जाऊन मिळाले. अदिलशहास हुसेनविरुध्द खेळ खेळण्यास त्याचे सापत्न बंधूची 'बाहुली' मिळाली. शहा हैदरने आपल्या सास-याच्या जोरावर ताबडतोब परांडा येथे स्वतंत्र निजामशाही राज्य स्थापन करण्याचा कट केला. त्यामुळे हुसेन यांस परांड्यावर स्वारी करून आपला भाऊ शहा हैदर व त्याचा सासरा यांना हुसकावून लावावे लागले. त्यामुळे ही श्वशूर-जामाताची जोडी परत विजापुरास पळून गेली.

हुसेनने रेवदंड्यास तटबंदी करून पोर्तुगीजांची सत्ता पश्चिम किना-यावर वाढत होती, त्यावर स्वारी करण्यासाठी महंमद वस्ताद निशापुरी व चुलबी रुमीखान या दोघांस पाठविले. पोर्तुगीजांनी पडते घेऊन आम्ही निजामशाहीस उपद्रव देणार नाही अशी हमी दिली. नंतर हुसेनने खानदेशवर स्वारी करून त्याचा जालना किल्ला घेतला. व-हाडचा इमादशहा याच्याशीही हुसेनने सख्य जोडले व त्याचे कन्येशी राजकीय संबंधासाठी विवाह केला.

३.९ नगरच्या किल्ल्याचा कायापालट :

अहमद निजामशहाच्या कारकिर्दीत नगरच्या किल्ल्याची फक्त स्थापना झाली. बु-हाणच्या कारकिर्दीत या किल्ल्यामध्ये किरकोळ फरक झाले. पण हुसेन निजामशहाच्या कारकिर्दीत मात्र आज आपणास दृश्यमान होणारे दगडी तट, अर्धचंद्राकृती २२ बुरुज, तटाभोवतालचा खोल खंदक यांचे बांधकाम पूर्ण झाले. यापूर्वी हा किल्ला केवळ मातीच्या तटाचा व खंदकविरहित असा होता. या अभेद्य किल्ल्याचे आश्रयानेंच पुढे अनेक शतकें राज्ये

अबाधीत राहिली. परचक्र आले असता बु-हाण व हुसेन या दोघांसही पूर्वी किल्ल्याच्या बाहेर पळावे लागले, त्यामुळे किल्ल्याचा संरक्षणदृष्ट्या याप्रमाणे कायापालट करणे हुसेन यांस भागच पडले होते.[२१]

३.१० दिवाण मुर्तीजा १५६५ ते १५८६ :

हुसेनचे निधनानंतर त्याचा अल्पवयीन मुलगा मूर्तीजा गादीवर बसला व त्याची आई खुजासुलताना आपले तीन भावांचे मदतीने कारभार पाहू लागली. ती पडद्यामध्ये तक्तावर बसून दैनंदिनाचा राज्यकारभार पाहत असे. अर्थात अल्पवयीन मूर्तीजा यास खेळ खेळण्याखेरीज तिने राज्यकारभाराचे प्रत्यक्ष शिक्षण दिले नाही. वृथा लाड केले. त्यामुळे मुर्तीजाचे मनावर चांगले संस्कार घडले नाहींत व त्याने आपल्या कारकिर्दीत मनोविकृतीच्या इतक्या लीला दाखविल्या की त्यामुळे इतिहासात त्यास 'दिवाणी' असे नाव पडले.

चॉंदचे विवाहामुळे निजामशाहीचा व अदिलशाहीचा जो सलोखा झाला तो अल्पजीवीच ठरला. कारण अली अदिलशाहाने निजामशाही, कुतुबशाही यांचे सहाय्याने विजयनगरचे जे मोठे साम्राज्य रसातळास मिळविले होते ते सर्व स्वत:च्या एकट्याच्याच पदरांत पडावे अशी अभिलाषा धरली होती.

रामराजाचा भाऊ वेंकटाद्री कसाबसा जीव धरून पेणकोंड्यास राहात असे, तो अगदी लहान प्रदेशावर राज्य करीत असे. त्याने घाबरून निजामशाहीची अदिलशाहीविरुध्द मदत मागितली. खुजा सुलतानाने आपल्या अल्पवयी मुर्तीजासह अदिलशाहीवर मोर्चा नेला. पण थोड्याच दिवसांत अदिलशहाचा व मुर्तीजाचा तात्पुरता सलोखा होऊन उभयताचे असे ठरले की, व-हाडचा इमादशहाचा दिवाण जो तोफालखान याने व-हाडचे राज्य बळकाविले आहे, त्या तोफालखानाचा कांटा काढावयाचा, झाले ! निजामशाही व आदिलशाही फौजा व-हाडांत शिरल्याही, व-हाडचा काही प्रदेश दोन्ही सैन्यानें लुटला व पावसाळा सुरू झाला. [२२]

३.११ चंगीजखानाची कामगिरी :

अशातच मूर्तिजास रेवदंडाचा वेढा उठवावा लागला. त्यामुळे मुर्तिजाने आपले पदरचे बरेच लोक हाकून दिले व नव्याजोमाचे सरदारांना जवळ केले. त्यांत चंगीजखान या

स्वामीनिष्ठ व कर्तृत्ववान दिवाणाचा उदय झाला. याच्या दूरगामी शहाणपणाच्या सल्ल्यानेच मूर्तिजाचे काही दिवस बरे गेले. हा पट्टीचा राजकारणी असल्यामुळे त्याने अदिलशहा व कुतुबशहा यांचे मूर्तिजाचे विरुध्द होत असलेल्या युतींत बिघाड आणला व अदिलशहास वळवून मूर्तिजाचा व त्याचा तह घडवून आणला.

चंगीजखानचे सहाय्याने मूर्तिजाने पुढे बेदरवर स्वारी केली. पण इकडे खानदेशाच्या सुलतानाने एका तोतयास हाती धरून व-हाडचे गादीवर बसविण्याचा कट केला म्हणून मूर्तिजास त्यांचे पारिपत्य करणे भाग पडून तोतयास त्याने पळविले. मूर्तिजाने खानदेश लुटला. खानदेशचा सुलतान मिरान महंमद यांजवर चंगीजखानाने स्वारी करून त्यास जेरीस आणले, त्यामुळे मोठी खंडणी देऊन त्यास मुर्तिजा निजामशहाशी तह करणे प्राप्त झाले.

मूर्तिजाने सलाबतखानास आपले वजीर नेमले. सलाबतखानाचे कारकीर्दीत प्रजा सुखी झाली. विजापूरचा अली अदिलशहा सन १५८० मध्ये मरण पावला. त्यानंतर मूर्तिजाने विजापूर प्रांतावर स्वारी केली. पण मूर्तिजा निजामशहाचे सैन्याचा पराभव झाला. इ.स. १५८४ मध्ये मूर्तिजाचा मुलगा मरिन हुसेन यांचे विजापूरचे राजकन्येशी लग्न झाले. त्यावेळी काही मत्सरी सरदारांनी सलाबतखान यांस पदच्युत करण्याचा कट केला. पण त्यामध्ये त्यांना यश आले नाही. दुसराही असाच कट उघडकीस आला. मूर्तिजाचा भाऊ बु-हाण यास फकिराचे वेषाने नगरास आणून गादीवर बसवावे, असा तो कट होता पण त्याचाही सुगावा सलाबतखान यांस लागून त्याने तोही कट धुळीस मिळविला. त्यामुळे बु-हाण यांस प्रथम कोकणांत व पुढे दिल्लीस अकबर यांजकडे पळून जावे लागले. अकबराकडून बु-हाणने मदत मिळवून मूर्तिजा निजामशहाचे हद्दीवर मोगलांचे सैन्य येऊन धडकले. पण निजामशाही सेनेनेंही मोगलांशी टक्कर देण्याची जोरांत तयारी केली. मोगलांचे सैन्य थोडे असल्याने आपण निजामशाही सैन्याशी टक्कर देऊ शकणार नाही असे बु-हाणास वाटले म्हणून प्रत्यक्ष अहमदनगरवर स्वारी न होता मोगल सैन्य परत गेले.[२३]

३.१२ फेरिस्ता [दरबारी इतिहासकार] :

प्रसिध्द इतिहासकार फेरिस्ता मूर्तिजा निजामशहाच्या पदरी होता. याचा जन्म कास्पियन समुद्राचे कांठी अस्ट्रावाद येथे झाला. त्याचा बाप गुलामअल्ली हिंदूशहा हा विद्वान असून तो प्रथम हिंदुस्थानात अहमदनगर येथे आला. मूर्तिजाने राजपुत्र मिरन हुसेन यांस शिकविण्यासाठी त्याची योजना केली. त्यामुळे लहानपणापासून अनायासेच फेरिस्ता यांस राज कुटुंबाचे सानिध्य लाभले. परंतु फेरिस्ताचा पिता वारला व तो पोरका झाला. तथापि मूर्तिजाने त्याचा आश्रय कायम ठेविला व सैनिकामध्येही त्यांस स्थान मिळाले. मुर्तिजाचे कारकिर्दीत फेरिस्ता सैन्याचा कोतवाल होता. फेरिस्ता हा शिया पंथीय होता.

परकीय व दख्खनी मुसलमानांचे तंट्यात निजामशाहीचे पदरी असलेला सुप्रसिध्द इतिहासकार फेरिस्ता अगदी कसाबसा जीव वाचवून पळाला ! कारण तो परदेशीय मुसलमान होता. फेरिस्ताने जो नगरहून पळ काढला तो थेट विजापूरचे अदिलशाहाकडे जाऊन तेथेच त्याने नोकरी धरली व आपले ऐतिहासिक ग्रंथ त्याने पुढे लिहिले.

३.१३ मिरान हुसेन (१५८६ ते १५८८):

बापाचा खून, मिर्झाखान याच्या मदतीने करून, मिरान हुसेन गादीवर बसला व वजीराची वस्त्रेही त्याने मिर्झाखानास त्यामुळे दिली. त्यामुळे पुढे तो मिरान हुसेन यांस न जुमानता अनाचार करू लागला म्हणून मिर्झाखानाचे व त्याचे जमेना. मूर्तिजाचा एक भाऊ शाहकासीम हा शिवनेरीस बंदीवासात होता. त्याचेशी मिर्झाखानाने संधान बांधून 'हातचे एक प्यादे' म्हणून मिर्झाखानाने गुप्तपणे आपले जवळ त्यास आणून ठेवले अशी खोटीच बातमी मिरान हुसेन यांस समजली. मिरान हुसेनने त्यास ताबडतोब कैदेत घातले. पण या बाबतीत कांही तथ्य नाही असे निदर्शनास आल्यावर मिर्झाखानास त्याने सोडून देऊन परत वजीरीचा अधिकार त्याजकडे सुपूर्त केला.[२४]

३.१४ इस्माईल (१५८८ ते १५९०):

वजीर मिर्झाखानाचे रक्तमय कारकिर्दीचा शेवट झाला व त्याचा दख्खनी प्रतिस्पर्धी जमालखान हा इस्माईलचे कळसूत्री बाहुले, राजा म्हणून हातांत धरून मिर्झाखानानंतर प्रबळ

झाला. जमालखान हा मेहेदवी पक्षाचा होता. त्याने आपले कळसूत्री बाहुले जो बाल इस्माईल याचे गळ्यांतही मेहेदवी पंथाची माळ चढविली.

३.१५ सलाबतखानाचा मृत्यू :

बु-हाणपुरास पळून आल्यावर सलाबतखानची प्रकृति बिघडली. अहमदनगरास असतांनाच त्याने आपले दफनासाठी एक कबर बांधून ठेवली होती. ही कबर म्हणजे आज अहमदनगरास प्रसिध्द असलेला 'चाँदबिबीचा महाल' होय. आपले दफन या महालांत व्हावे अशी सलाबातखानाने जमालखान यांस शेवटची विनंती केली व तो आपण वसविलेल्या तळेगांव दाभाडे या गावी जाऊन राहिला व इ.स.१५९९ मध्ये तो तेथेच वारला. त्याचे प्रेत नगरास आणून त्याच्या इच्छेनुसार ते डोंगरावरील महालांत पुरण्यांत आले. सलाबतखानाची योग्यता फार मोठी होती. त्याने नगर शहरांत पाण्याचे नळ आणले. मरणसमयी त्याचे वय ७० वर्षाचे होते. सलाबतखानाने हुसेन निजामशहाचे कारकिर्दीपासून इस्माईल निजामशहाचे कारकिर्दीपर्यंत राजे पाहिले. पण प्रत्यक्ष तो इ.स.१५७६ ते १५८६ पर्यंत म्हणजे दहा वर्षेच कारभार करीत होता. पुढील लहरी धन्याचे कारकिर्दीत व निजामशाहीतील पुढील धामधुमीचे काळात या कर्तबगार मनुष्याचे नशिबी बंदीवासच आला. त्याचे दहा वर्षाचे कारकिर्दीत त्याने भातोडीचा तलाव व शहापूरची म्हशिद बांधली व नगरचे पूर्वेस, तिसगांव उर्फ हुसेनाबाद यांनेच वसविले.

३.१६ बु-हाण (दुसरा) (१५९१ ते १५९४)

आपल्या मुलाचा पराभव करून व त्यास कैदेत टाकून बु-हाण अखेर आपल्या जुन्या महत्वाकांक्षेप्रमाणे गादीवर बसला. जमालखानाने वजनाने इस्माईलच्या कारकिर्दीत जे मेहेदी पक्षाचे वर्चस्व होते ते त्याने कमी केले, त्यामुळे मेहेदी पक्षाचे लोक निजामशाही सोडून जाऊ लागले व शिया पंथीय परदेशी मुसलमान जे मिरान हुसेनचे कारकिर्दीत पळाले होते ते परत येऊ लागले. विजापूर दरबारचा दिलावरखान हा तेथून पळून बेदरास गेला होता, त्यास बु-हाणने आपले दरबारी येण्याची परवानगी दिली. इतकेच नव्हे तर त्याचा मानमरातब केला. त्यामुळे अदिलशहा चिडला व त्यानें बु-हाणास याचा जाब विचारला. बु-हाणने त्यास

बेअदबीचे उत्तर दिले. त्यामुळे तो अधीकच खवळला व अदिलशाहीचे व निजामशाहीचे पुनश्च सन१५९२ मध्ये युध्द जुंपले. बु-हाणचे मदतीने दिलावरखान अदिलशहावर चालून गेला. परंतु विजापुरास परत मिळाल्यास, आपला फायदा होईल या लोभी वृत्तीने तो विजापूरला गेला. परंतु अदिलशहाने त्याचे डोळे काढून त्यास कैदेंत टाकले. अदिलशहाने बु-हाणवर समीरखान व एलावरखान यांना पाठविले व विजापूरच्या मराठा सैन्याने बु-हाणचा पूर्ण पराभव करण्याआधीच, बु-हाण परत नगरास पळाला. [२५]

याचवेळी विजापूरचे अदिलशाहीत गादीसंबंधी तंटा सुरू झाला. त्यांत हस्तक्षेप करण्यास बु-हाणास फावले. इतक्यात इस्माईल अदिलशहास, इब्राहिम अदिलशाहाने ठार करून विजापूरची गादी बळकावली. बु-हाण निजामशहा हा इस्माईल अदिलशाहाचा पक्षपाती होता म्हणून साहजिकच ईब्राहिम अदिलशहा त्याजवर संपप्त होऊन त्याने निजामशाही सरहद्दीवर स्वारी केली. बु-हाणने, विजयनगरचा वेंकटाद्रि पेणकोंड्यास होता, बु-हाणने सोलापूरवर हल्ला केला. पण त्यांत अपयश आले. म्हातारा बु-हाण त्यामुळे फारच खचला व त्यावेळी त्याचा पदच्यूत मुलगा इस्माईल यांस गादीची हांव सुटली. त्याने एकलासखान मौलीवी या सरदाराचे सहाय्याने नगरवर स्वारी केली. बु-हाणने पालखीत बसून त्या स्वारीचा प्रतिकार व पराभव केला. सन १५९४ मध्ये तो नगरास मरण पावला.

३.१७ इब्राहिम (१५९४)

बु-हाणला इस्माईल व इब्राहीम असे दोन पुत्र होते. त्यापैकी इस्माईलने आपले बापाचे अगोदरच राज्यपद भोगले होते. इस्माईल हा मेहेंदी पंथाचा असल्यामुळे त्याचे बापाचे मर्जीतून तो उतरला होता. एकलासखानास हाती धरून बापाचे देखत परत गादीवर बसण्याचा त्याने प्रयत्न केला, पण तो फसला. त्यामुळे बु-हाणने मरणसमयी इच्छा प्रदर्शित केल्याप्रमाणे त्याचा दुसरा मुलगा इब्राहिम हा निजामशहाच्या गादीवर आला व पित्याच्या इच्छेप्रमाणे त्याने मियानमंजू यांस प्रधान नेमले. इस्माईल यांस हाताशी धरणारा एकलासखान सरदार हा इब्राहीम यांस शरण आला, पण ही शरणागती अगदी तात्पुरती होती, कारण त्याने हबशी व मौलीवी यांची एक स्वतंत्र आघाडी उघडली. त्यामुळे मियानमंजू व एकलासखान यांच्यात दोन

तट पडले, निजामशाहीत दुफळी माजली. त्याचा फायदा अदिलशहा घेऊ लागला. परंतु नगर व विजापूर यांचे तंट्यांत, अकबर हा दोघांची राज्ये गिळकृत करण्यास टपलेलाच होता, तेव्हा दोन्ही दक्षिणेतील राज्यांत सख्य ठेवावे हा शहाणपणाचा सल्ला अकबराला पटला नाही. इब्राहीम सर्व प्रकारे दुर्व्यसनी बनला होता. त्याने अविचाराने अदिलशहावर हल्ला चढविला. त्यांत तो मारला जाऊन त्याच्या सैन्याचा पूर्ण पराभव झाला.

३.१८ अहमद दुसरा (१५९४)

इब्राहीम नंतर कोणास गादीवर बसवावे याबद्दल सरदार लोकांत वाद सुरू झाला. अखेर इब्राहीमचा एकुलता एक पुत्र बहादुर यांस गादीवर बसवून राज्य सूत्रें हांकण्यास विजापूरची अदिलशाही सावरून धरणारी चाँदबिबी हिच्या स्वाधीन करावीत असा निकाल केला. पण हा सल्ला महत्वाकांक्षी मंजूस रुचला नाही.[२६]

३.१९ मियानमंजू मोगलांच्या आश्रयास :

मियानमंजू व एकलासखान केवळ राजसत्तेसाठी एकमेकांच्या नाशार्थ तयार झालेले होते, अकबराचा मुलगा मुराद यावेळी गुजराथेत होता. एकलासखानाचे पारिपत्य करण्यासाठी मियानमंजूनें मुरादला मदतीस बोलावले. निजामशाहीच्या अंतरंग कलहाचा फायदा घेऊन तिचा बिमोड करण्यास मोगल टपलेला असल्यामुळे, मुरादने खानदेशचा सुलतान व खानझनान यासह अहमदनगरवरच चाल केली.

मध्यंतरी मियानमंजूची परिस्थिती थोडीशी सुधारली होती. कारण एकलासखानाचे हबशी त्यास येऊन मिळालेले होते. परंतु अकबराच्या स्वारीचे संकटातून मुक्त करण्यास योग्य व्यक्ति कोण याबद्दल विचार केला चांदबिबीशिवाय दुसरे कोणी त्यास दिसले नाही.

३.२० चाँदबीबी :

चाँदबिबीचा जन्म निजामशाहीचे पोटीच झाला, परंतु तिच्या तेजस्वी कार्याचा प्रकाश या वेळेपर्यंत निजामशाहीत पडला नव्हता, तिचे आयुष्याचे पूर्वार्धात तिने अदीलशहीमध्येच म्हणजे आपल्या सासरी मोठी कामगिरी केली होती. तथापी अदिलशाहीत माजलेल्या अंतर्गत कलहामुळे यापुढे आपल्या माहेरी राहून आयुष्याचा उत्तरार्ध सुखासमाधानाने घालवावा या

हेतूने ती इसवी सन १५८५ मध्ये अहमदनगरास येऊन राहिली. अहमदनगरास आल्यावर चाँदबिबीस नगरच्या दरबारांत बरेच अंत:कलह दिसून आले. मुरादची स्वारी हे मोठेच संकट होते यावेळी चाँदबिबीकडे कारभार सोपवून मियानमंजू मोगलाविरुध्द अदीलशाहीची काही मदत मिळते का ? हे पाहण्यासाठी अहमदसह निघून गेला. चाँदबिबीचे मदतीसाठी त्याने अनसारखान या सरदाराची योजना केली पण हा विश्वासघातकी ठरल्यामुळे चाँदबिबीने त्याचा वध केला. व महंमद याचे मदतीने तिने निजामशाही सावरण्याचा प्रयत्न केला. तिने राज्याचा खराखुरा मालक बहादुरशहा याचे नावाने द्वाही फिरवून निजामशाहीचे सर्वाधिकार आपल्या हाती घेतले. सर्व सरदारांनी तिला मनोभावे पाठिंबा देऊन निजामशाहीचे संरक्षण करण्याचा निर्धार केला. मुरादचे अधिपत्याखालील मोगल सेना अहमदनगरवर येऊन तर आदळली.

चाँदबीबीचे अतुलनीय धैर्य व शौर्य :

२० फेब्रुवारी १५९३ हा दिवस अहमदनगरच्या इतिहासांत अमर म्हणून राहील. चाँदबिबीस बाहेरून मदत मिळण्याच्या अगोदर अहमदगरचा किल्ला हस्तगत करून निजामशाहीचा शेवट करावयाचा म्हणून मुरादने चंग बांधला. नगरचा किल्ला अभेद्य असल्याने किल्याचे उत्तरेच्या बाजूस पांच बुरुजांखाली भुयारे बाहेरून खणीत आणावीत व त्यामध्ये दारू भरून सुरुंग उडवून किल्ल्यांत मोगल सैन्याने प्रवेश करावा असे मुरादने ठरविले व त्याप्रमाणे भुयारे खाणण्यास सुरुवात झाली. ही भुयारे पक्की चुन्यांत बांधून त्यामध्ये तोफा नेता याव्यात एवढा त्यांचा व्यास ठेवण्यात आला. त्याप्रमाणे तीन भुयारें तर तयार झाली. इकडे चाँदबिबीनेही किल्ल्यांत प्रतिकाराची जय्यत तयारी केली होती. चाँदबिबीचे शूर व कुशल नेतृत्वाखाली सर्वांनी जीवावर उदार होऊन किल्ला लढविण्याचे ठरविले. मुरादकडील सरदार ख्वाजा महंमद यांस चाँदबिबीच्या या तयारीचे कौतुक वाटून त्याने गुप्तपणे तिला या तीन भुयारांची माहिती कळविली.[२६] चाँदबिबीने दोन भुयारांचा शोध लावून त्यातील दारूगोळा काढून टाकून निकामी केले. परंतु तिसरे भुयारांतील दारुगोळा काढून टाकण्याचे तयारीत असतांना मुरादने त्या भुयारातील दारुगोळा पेटवून भुयार उडवून

दिले. चाँदबिबीने या समयी अतुल शौर्य व धैर्य दाखविले. ती स्वत: पडलेल्या तटापाशी आली त्यामुळे सैनीकांत धैर्य व उत्साह उत्पन्न झाले.

या तिस-या भुयाराच्या स्फोटाने तटाला खिंडार पडले. त्यांतून मुरादचे सैन्य किल्ल्यात घुसण्याचा प्रयत्न करण्यासाठी याठिकाणी उभय पक्षांमध्ये तुंबळ युध्द माजले. दिवसभर गोळा-गोळी, कापाकापी होऊन उभयपक्षांतील अनेक वीर धारातीर्थी , मरण पावले. चाँदबिबी जातीने सशस्त्र राहून सैन्यास धीर व आवेश उत्पन्न करीत होती. या तिच्या शौर्यामुळे चाँदबिबी या नावाऐवजी 'चाँदसुलताना' असे नांव पडले. सायंकाळ होताच मोगलांचे सैन्य बेहस्तबागेत गेले. इकडे चाँदबिबीने रात्रीतून सुरुंगाने पाडलेले खिंडार गवंड्यांकडून बुजून बांधून काढले. सात आठ फुटाचा नवीन तटच तेथे बांधला. त्याच रात्री तिने बीड येथे दोन सैन्यें होती त्यांना पत्रे पाठवून त्यांत किल्ल्यातील धान्याची टंचाई व मोगलांचे हल्ल्यामुळे झालेली कुचंबणा इत्यादि माहिती कळविली. पत्रे हातात पडताच ती सैन्येही चाँदबिबीच्या मदतीस नगरकडे येऊ लागली. त्यामुळे मुरादने चाँदबिबीशी तह करण्याची मध्यस्थी सुरु केली. चाँदबिबी प्रथम तह करण्यास कबूल नव्हती. परंतु दूर विचार करून तिने मोगलांशी तह पत्करला. व-हाड प्रांत निजामशाहीनें मोगलास द्यावा या अटीवर तह झाला. तह झाल्यावर मोगल सैन्य दौलताबादापर्यंत मागे परत गेले. मोगल सैन्य तह झाल्यावर निघून गेल्यावर तीन दिवसांनी बीडचे सैन्य नगरांत आले. त्यात मियानमंजू होतांच. त्याने अहमदचे तुणतुणे परत वाजवावयास सुरुवात केली. पण चाँदबिबीने स्पष्टपणे त्यास नकार दिला. व चाबंद किल्ल्यातून गादीचा खरा वारस जो बहादूर यास आणण्यास तेहंगखानास चाबंदला पाठविले.[२७]

३.२१ बहादूर (१५९४ ते १६००)

महंमद खानाने मोगलांचा सरदार खानखानान व-हाडांत होता त्यास, आपल्या मदतीस बोलविले. चाँदसुलताना व इतर जे सरदार निजामशाहीत होते त्यांना हे समजतांच या वेड्या महंमदास गिरप्तार करून चाँदसुलतानाचे हवाली केले. तीने नेहंगखानास बंधमुक्त करून त्यास वजिरी दिली व विजापूरचे सोहलखानाचा सन्मान करून त्यास विजापुरास रवाना केले

पण इकडे मोगलांनी व-हाडांत पाथरी वैगरे शहरे लुटण्यास सुरुवात केली. म्हणून अदिलशाही कुतुबशाही व अहमदनगरची निजामशाही यांचे साठ हजाराचे संयुक्त सैन्य मोगलांशी सामना देण्यास सज्ज झाले व व-हाडकडे रवाना झाले. परंतु १५९७ मधील या स्वारीत मोगलांनी या त्रिकुटाचा पराभव केला व मोगलांची अधिकच वक्रदृष्टी अहमदनगरकडे वळली.

४. अहमदनगर निजामशाहीकडून मोगलाकडे :

मोगलांनी व-हाडांत पराभव केल्यावर निजामशाहीमध्ये दुर्दैवी घटनांचे एक नवीनच पर्व सुरु झाले. चाँदबिबीचे विश्वासातील नेहंगखान हा तिच्यावरच आता उलटला व बालराजास आपल्या हातांत घेऊन राज्य चालवावे असे त्यास वाटू लागले. त्यामुळे चाँदबिबीने बहादुरास आपल्या ताब्यात घेतले व नेहंगखानास किल्ल्यांत येण्यास प्रतिबंध केला. नेहंगखानाने कांही दिवस पडती घेऊन एकदम किल्ल्यावर हल्ला केला व या दोन्ही पक्षांच्या किरकोळ चकमकीही झाल्या. म्हणून अदिलशहाने मध्यस्थी केली. पण दोघांत समझोता होऊ शकला नाही. परंतु नेहंगखानाने अविचाराने निजामशाहीवर दुसरेच एक संकट ओढवून घेतले.

नेहंगखानाने मोगलांचे महत्वाचे ठाणे जे बीड त्याजवर हल्ला केला व त्याने बीडचा सुभेदार शीरख्वाजा याचा पराभव केला व बीडला वेढा घालून तो बसला. शीरख्वाजाने अकबराची कुमक घेतली. अकबराने आपला कनिष्ठ पुत्र दानियल व खानखानान या दोघांस दक्षिणेस पाठविले व स्वत: अकबरही पाठोपाठ आला. अकबराचा मुक्काम ब-हाणपुरला असतांना निजामशाहींतील चाँदबीबी व नेहंगखान यांचे दुहीचे राजकारण नीट समजून घेतले व दानियल व खानखानास अहमदनगरवर स्वारी करण्यास पाठविले. या स्वारीमुळे नेहंगखानाने बीडचा वेढा उठवून तो अहमदनगर येथे आला. आपल्या चुकीमुळे या स्वारीचे संकट ओढवून घेतले याबद्दल त्यास आता पश्चाताप होऊन तो चाँदशी [चाँदबीबी] सलगी करण्याकरिता प्रयत्न करू लागला. पण तिने त्यास धुडकावून दिल्यामुळे तो जुन्नरास पळाला. दानियल हा अहमदनगरचे मागील हल्यांत प्रमुख असल्याने आता त्यांस किल्ल्याची

पूर्ण माहिती होती. यावेळी चाँदची मोठी बिकट परिस्थिती झाली होती. निजामशाहीत यावेळी कोणी विश्वासू सरदारच न उरल्यामुळे किल्ल्याचा एक हमीदखान नामक जो अधिकारी होता. त्याचा सल्ला चाँदने विचारला. त्याने मोगलांचा प्रतिकार करावा असे सुचविले. परंतु अहमदनगरचा किल्ला मोगलांचे स्वाधीन करावा व बालराजासह जुन्नरास जावे असा चांदबिबीने विचार केला होता. पण हमीदखानाने त्याचा वेगळा अर्थ घेतला. ''चाँदबीबी ही मोगलांस फितूर आहे'' असे मोठमोठ्याने ओरडून लोकांत मन कलुषित करण्यास आरंभ केला. हमीदखानाने आपल्या भोवती असे अनेक लोक जमा करून किल्ल्यांत चाँदबीबीचे खाजगी महालात शिरला व त्याने कोणताहि दुरवरचा विचार न करता चाँदबीबीवर एकदम हत्यार चालवून तिचा खून केला. [याबाबत इतिहासात अभ्यासंकामध्ये अनेक मतप्रवाह आहेत. त्यामूळे चाँदबीबीचा मृत्यु हा आजही एक गुढच आहे.] चाँदबीबीच्या अमानुष वधाने निजामशाहीलाही उतरती कळा लागली. चाँदबीबीचे खुनानंतर अहमदनगरचा किल्ला मोगलांच्या ताब्यात आला. दानियलने बहादूरशहास कैद करून त्याला ग्वाल्हेरच्या किल्ल्यात कैदी म्हणून ठेवण्यास रवाना केले. इ.स. १६०० मध्ये अहमदनगरचे किल्ल्यावर मोगलांचे निशाण फडकू लागले. अकबराने ख्वाजाबेग मिर्झा यांस अहमदनगरचा सुभेदार नेमले व अहमदनगरवर मोगलांचा अंमल सुरू झाला.[२८]

४.१ मूर्तिजा दुसरा हुसेन दुसरा (१६०० ते १६३७)

अहमदनगरची निजामशाही अकबराने इ.स.१६०० मध्ये जरी गिळंकृत केली असली तरी संपूर्ण अहमदनगर ताब्यात येण्यास आणखी ३७ वर्षे लागली. निजामशाहीच्या बुडत्या काळांत निजामशाहीला वाचविणारे मलिकंबर व शहाजीराजे भोसले असे कर्तबगार पुरुष लाभले. मलिकंबरचे समकालीन मियानराज हा तितकाच योग्यतेचा थोर सरदार होता. मलिकंबर व मियानराज या दोघांनी निजामशाही वंशातील शहा अलीचा मुलगा मुर्तिजा यांस निजामशाहीच्या गादीवर बसविले. आवशाचा किल्ला व सभोवतालची काही जहागीर मुर्तिजास खर्चासाठी तोडून दिली व निजामशाहीचे छत्राखाली दोघेहि मुलुखगिरी करून मोगलांना छळू लागले. मलिकंबरने पुढे पंचवीस वर्षे मोगलांना सळो की पळो करून सोडले.

४.२ अहमदनगरमध्ये मराठा घराण्यांचा उदय :

मलिकअंबर आणि मराठा सरदार घराण्यांची कामगिरी

मोगलांच्या हल्ल्यातून निजामशाही जर कोणी वाचवली असेल तर ती मलिकंबर व मियान राज या दोघांनीच. अहमदनगरखेरीज दौलताबादच्या सभोवती बीडपासून चौलबंदरापर्यंत गुजरातचे हद्दीपर्यंचा सर्व मुलूख या दोघांच्या ताब्यात होता. तथापी निजामशाही परंपरेप्रमाणे मलिकंबर व मियानराज या दोघांतही पुढे वैमनस्य उत्पन्न झाले.

मलिकंबरची कर्तबगारी इतकी वाढली की मोगल, आदिलशाही, कुतूबशाही यांचा तो कट्टर शत्रू बनला. इ.स.१६०५ मध्ये अकबर मरण पावला व त्याचा मुलगा जहांगीर गादीवर आला. त्याने खाननखानास अहमदनगरच्या निजामशाहीवर आक्रमण करण्यास पाठविले. मलिकंबरने खाननखानाचा तेलंगणाचे सरहद्दीवर पराभव केला, त्यामुळे चिडून जाऊन त्याने आपला मुलगा मिर्झाएलिच यांस मलिकअंबरवर पाठविले. मलिकंबर व मिर्झाएलिच यांची नांदेडजवळ लढाई होऊन मलिकंबर जखमी झाला. पण रणांगणांतून तो सुरक्षित येऊ शकला. मलिकंबरच्या जखमा भरून आल्यानंतर तो पुन्हा सैन्याची जमवाजमव करू लागला. खाननखान यांस मलिकंबरचे कर्तृत्वाची पूर्ण जाणीव होती. त्याने मलिकंबरशी सख्य जोडून त्याच्याशी तह केला. यावेळी मलिकंबरचे मियानराजूशी बरेच शत्रूत्व आले होते. त्यामुळे मियानराजूचे विरुध्द त्यास बलवान असा मित्र हवाच होता. मलिकंबरने मोगलाशी तह केला हे अर्थातच मुर्तिजास आवडले नाही. याच सुमारास मलिकंबरचे व्यंकटराव कोळी वगैरे काही सरदार मलिकंबरास सोडून मुर्तिजाकडे गेले व स्वतंत्ररित्या फौज जमवू लागले. हे मलिकंबरास न पटून त्याने त्यांच्यावर हल्ला करून त्यांना जेर केले व मूर्तिजा आता पूर्णपणे मलिकंबरच्या स्वाधीन झाला. तथापि मलिकंबर हा मोगलास फितूर आहे अशा समजुतीने निजाशाहीमधील काही सरदार त्याचा द्वेष करू लागले. त्यामध्ये मियानराजू हा प्रमुख होता. मूर्तिजा निजामशहा हाही मलिकंबर आपणांस नीट वागवीत नाही अशा मियानराजू जवळ गुप्तपणे तक्रार करु लागला. त्यामुळे मियानराजूचा काहीतरी निकाल लावल्या शिवाय आपणांस निजामशाही स्थिर करता येणार नाही, असा मलिकंबरचा ग्रह

बनला. मूर्तिजाचा आपणास पाठिंबा आहे असे समजल्यावर मियानराजुही मलिकंबरावर राग धरु लागला. त्याने मलिकंबरवर हल्ले करून मलिकंबरला जेर केले, त्यामुळे मोगलांची मदत घेऊन मलिकअंबरने मियानराजूवर चाल करून त्याचा पराभव केला, त्यामुळे मियानराजू दौलताबादेस पळाला व त्याने उलट मोगलांची मलिकंबर विरुध्द मदत मागितली. खाननखानाचे मध्यस्थीने मलीकंबर व मियानराजू यांचेमध्ये तात्पुरता तह झाला. मूर्तिजा निजामशहा हाही मलिकंबरास त्रास देऊ लागला. त्यामुळे मलिकंबरचे मनांत मूर्तिजाला पदच्युत करून दुसरा कोणीतरी शासक निजामशाही गादीवर बसवावा याचा विचार करू लागला. अदिलशहाला मलिकंबरने या बाबतीत सल्ला विचारला व अदिलशहाने मूर्तिजासच गादीवर असू द्यावे असा सल्ला दिला. मलिकंबरने इ.स. १६०७ मध्ये जुन्नरवर स्वारी करून ते सर केले व निजामशाहीची राजधानी जुन्नरास हलविण्यांत आली. मूर्तिजा आता पूर्णपणे मलिकंबरच्या सल्ल्याने वागत होता त्यामुळे मलिकंबरने मियानराजूवर स्वारी करून त्याचा पराभव केला व त्यास कैद केले त्यामुळे मियानराजूचे ताब्यांत असलेला निजामशाहीचा सर्व प्रांत मलिकंबरचे ताब्यांत आला. तद्नंतर मलिकंबरने दौलताबादेजवळ खडकी म्हणून गांव होते तेथे निजामशाहीची राजधानी नेऊन या शहरांत सुंदर इमारती व जनतेसाठी सुखसोयी निर्माण केल्या. हे राजधानीचे शहर म्हणजे आजचे औरंगाबाद शहर होय. पुढे मोगल दरबारात पुष्कळ घडामोडी झाल्या व मोगलांचा अंमल दक्षिणेत त्यामुळे ढिला पडला. मलिकअंबर हा धूर्त मुत्सद्दी असल्याने त्याने मोगलांचे ताब्यांत जो निजामशाहीचा भाग होता तो पुन्हा जिंकून घेण्यास सुरुवात केली. या वेळी मोगलांचा सुभेदार खानखानान याचाही त्याचे सरदारांशी बेबनाव झाला. मलिकंबरने या संधीचा फायदा घेऊन निजामशाहीचे गेलेले प्रांत परत मिळविले.[२९] याच सुमारास एक फ्रेंच प्रवासी फ्रांसीऑस पायरार्ड हा अहमदनगरच्या राज्यांत आला होता. त्याने या कालामधील निजामशाहीच्या राजवैभवाचे वर्णन करून ठेवले आहे.

मलिकंबरने मराठा घराण्यास उत्तेजन देण्याचे धोरण आखल्याने तो सर्व स्थानिक लोकांस प्रिय झाला. त्यांने जमीनधा-यांची नवी पध्दत चालू केली. या पध्दतीमुळे निजामशाही

प्रजा फार समृध्द झाली. युध्दकलेमध्ये दक्षिणेत जी 'काझाकी' पध्दत असे त्यांत मलिकंबर निपुण असे. दक्षिणेत गनिमी काव्याची लढाई ही निजामशाही पासून पुढे लौकिकास आली तीच पुढे मराठा साम्राज्य निर्माण करण्याकामी छ. शिवाजी महाराजांनी गनिमी काव्याचा उपयोग किल्ले घेण्याकरीता केला.

४.३ भातोडीचा घनघोर संग्राम आणि शहाजीराजे यांची कामगिरी :

दिल्लीस जहांगीर बादशहा आणि त्याचा मुलगा शहजहान यांच्यात वैर आले. शहाजहान यांस दक्षिणेत निजामशाहीचा आश्रय घ्यावा लागला. मलिकंबरने त्यास योग्यती मदत केली त्यामुळे मोगलांनी विजापूरचे अदिलशाहीची मदत घेऊन मलिकंबरचा पराभव करण्याचे ठरविले. त्यामुळे मोगल व अदिलशाहा यांच्या प्रचंड युतीला [फौजेला] मलिकंबरला तोंड द्यावे लागले. दिल्लीस जहांगीर व त्याचे पुत्र यांचेमध्ये बेबनाव झाला आहे त्याचा फायदा घेऊन अदिलशहाने निजामशाहीस मदत करावी म्हणजे मोगलांना आता पार दक्षिणेतून हुसकावून लावण्यास ही संधी योग्य आहे, असे मलिकंबरने अदिलशहास सुचविले. पण अदिलशहाचे मनात मलिकंबरचे कर्तुत्वाबद्दल धास्ती वाटत होती. म्हणून अदिलशहा व कुतुबशहा उलट मलिकंबरचे विरुध्द मोगलाच जाऊन मिळाले. या सर्वांच्या प्रचंड संयुक्त सेनेने मलिकंबरवर इ.स. १६२४ मध्ये हल्ला चढविला. मलिकअंबरची सेना सामान्य असल्यामुळे त्याने अहमदनगरपासून दहा मैलावर भातोडी तेथील गढीचा आश्रय घेतला. शत्रु सेनेचे बळ जरी जास्त असले तरी मलिकंबरचे बुध्दीबळ त्यांच्यापुढे श्रेष्ठ ठरले. मलिकंबरने गनिमी काव्याने व शत्रूची रसद तोडून त्यांना जेरीस आणले. मलिकंबरने भातोडीचा तलाव फोडून दिल्याने शत्रू सैन्याचे फार हाल झाले. पावसाळा सुरु झाल्यामुळे शत्रु सैन्यास बेसावध गांठून त्यांच्यावर एकतर्फी विजय मिळवला. या युध्दांतच तरुण मराठा सरदार 'शहाजीराजे भोसले' पराक्रमाने पुढे आले. त्या पराभवाने चिडून जाऊन मोगलांचा गुजरातचा सुभेदार अब्दुल्लाखान याने मलिकंबरवर स्वारी केली पण मलिकंबरने त्याची तसेच प्रती उत्तर दिले, त्यामुळे खुद्द बादशहाचा मुलगा शहाजहान दक्षिणेंत आला. शहाजहानने भेदनीतिचा अवलंब करून विजापूरचा अदिलशहा व मलिकंबरचे मराठे सरदार फोडले. त्यामुळे

मलिकंबरास शहाजहानास शरण जाणे प्राप्त झाले व त्यास अहमदनगर व सभोंवतालचा प्रांत परत सोडावा लागला. हे यश मिळवून दक्षिणेतून शहाजहान परत फिरतो तोच, गेलेला प्रांत मलिकंबरने फिरून काबीज केला. त्यामुळे शहाजहान यास फिरून परत यावे लागले. शहाजहानचे प्रचंड सेनेशी मलिकंबरास तोंड देणे शक्यच नव्हते. त्यामुळे गनिमी काव्याचा बराच अवलंब करूनहि मलिकंबरास यश आले नाही. म्हणून परत शहाजहानशी तह करावा लागला. यापुढे मलिकंबर मात्र मोगलांचे वाटेस गेला नाही. इ.स.१६२६ मध्ये तो वयाच्या ऐंशीव्या वर्षी अहमदनगर जिल्ह्यातील अमरापूर [शेवगाव] या गांवी वारला. अमरापूर गांवी त्याची कबर आहे. [३०]

४.४ शहाजीराजे (१६३३ ते १६३६)

फत्तेखानाने निजामशाही मोगलांचे स्वाधीन केली खरी परंतु तिचे तारण करणारा अद्याप एक स्वामीनिष्ठ सरदार निजामशाहीत होता. ते म्हणजे शहाजीराजे होय. या समयी शहाजीने आदिलशहाशी संधान बांधले व निजामशाहीची त्यावेळची राजधानी दौलदाबाद यावर त्यानी आदिलशाही सैन्य आणले. मोगलांचा सरदार महाबतखान हाही निजामशाहीच्या तख्ताचा ताबा घेण्यास दौलताबादेस आला. विजापूरच्या सैन्याने दौलताबादेस अगोदरच वेढा दिलेला त्यास आढळून आले. मोगल सैन्याचे व विजापूर सेनेचे युध्द जुंपून त्यात विजापूर सेनेचा पराभव झाला. शहाजीने या युध्दांतही चांगलेच शौर्य गाजविले. मोगल सेनेने प्रत्यक्ष दौलताबाद किल्ल्याबाहेर जरी विजापूरी सेनेचा पराभव केला तरी फत्तेखान मोगलास किल्याचा ताबा देईना, त्यामुळे महाबतखान अतिशय चिडला व मोगल सेनेने अठ्ठावन्न दिवसांचा दीर्घ वेढा दौलताबाद किल्ल्यास घालून फत्तेखानास शरण आणविले व बाल निजामशहास कैद करून ग्वालेरच्या किल्ल्यांत बंदिस्त ठेवले. अशा बिकट परिस्थितीतही निजामशाही जिवंत ठेवण्याचा शहाजीने प्रयत्न चालविला. बलिष्ठ मोगल सत्तेशी झुंझण्यास त्यांनी सह्याद्रीचा आश्रय घेऊन मराठ्यांच्या गनिमी काव्यानेच आपली पुढील पावले टाकली. दौलताबादेच्या भोवतालच्या सपाटीचा प्रदेश जरी मोगलांनी व्यापला तरी सह्याद्रीच्या कुशींतील पश्चिमेचा प्रदेश अजून प्रत्यक्ष मोगल अंमलाखाली आला नव्हता. त्यावर शहाजीने

आपला प्रथम ताबा बसविला व निजामशाहीतील एक मूर्तिजा नामक बालकास शोधून अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर नजिक असलेल्या पेमगिरीस [पेमगड अगर भीमगड] नामक जो किल्ला आहे त्यांत इ.स.१६३३ मध्ये या नूतन निजामशहास गादीवर बसविले व त्याचे नावाने निजामशाहीची द्वाही फिरविली. नवीन फौजफांटा जमविणे, डोंगरी किल्ल्याची डागडुजी करणे, स्थानिक वतनदारांना हाताशी धरणे, शत्रुपक्षीय सरदार फोडणे, अशा त-हेने त्याने अविरत प्रयत्न केले. तथापी पेमगिरीचा किल्ला या प्रचंड उद्योगाला तोटका पडू लागल्यामुळे माहुलीचे किल्ल्यांत शहाजीने निजामशाहीची गादी हलविली. शहाजीने आपल्या पराक्रमाने सर्व कोकणपट्टी व निजामशाहीच्या पूर्वीच्या राज्यांतील बराचसा मुलुख परत मिळविला. या सर्व कार्यात आजपर्यंतच्या मुसलमानी अमलांत निस्तेज राहिलेले शहाण्णव कुळीचे अनेक मराठे त्यास आपल्याकडे आकर्षित करावे लागले.[३१]

४.५ मोगल आणि मराठे (१६३३ ते १७५९)

निजामशाही मोगलांनी जिंकल्यावर शहाजहानने आपला मुलगा औरंगजेब यास दक्षिणेचा सुभेदार म्हणून पाठविले. मलिकंबरने त्या काळात जे खडकी शहर वसविले होते, त्यासच औरंगजेबाने औरंगाबाद हे नांव दिले व दक्षिणेतील आतापर्यंतचे जे पहिल्या प्रतीचे शहर अहमदनगर होते ते मागे पडले. औरंगजेबाने मलिकंबरने लावून दिलेली जमीनधारापध्दत मोडून टाकून राजा तोडरमलाची मोगली 'जमीनधारा' पध्दत चालू केली. त्यामुळे या भागांत असलेल्या कोळी लोकांनी चिडून मोगलशाही विरुध्द बंड उभारले पण मोगलांनी कोळ्यांच्या सरनाईकास पकडून त्यांचा वध केला.

औरंगजेबाच्या मृत्युनंतर मोगली सत्ता खिळखिळी झाली. त्यामुळे मोगलांचा माळव्याचा सुभेदार चिनकिलीचखान निजाम उल्मुल्क यांस दख्खनचा प्रांत बळकाविण्याची इच्छा उत्पन्न झाली, तथापी शाहूचे महाराजांचे पुनरागमनामुळे दक्षिणेत मराठे परत प्रबळ होऊ लागले व त्याचे वर्धिष्णू राज्याचे हात प्रथम दिल्लीचे राजकारणापर्यंत पोहचू लागले. दिल्लीच्या राजकारणात नव्यानेच उदय पावलेले सय्यद बंधू व मराठ्यांचा संग्राम अहमदनगरमध्ये झाला पण पुढे मराठ्यांना मोगलांकडून चौथाई वसूल करण्याचा हक्क प्राप्त

झाला. दिल्लीस मराठ्यांचे वजन वाढत होते. परंतु निजाम उल्मुल्क व सय्यद बंधू यांचे आपसात वितुष्ट आल्यामुळे निजामाने बादशहाचे करवी सय्यद बंधूंचे पारिपत्य करविले व स्वत:ची दक्षिणेचा सुभेदार म्हणून कायमची नेमणूक करून घेतली. निजामाने पुढे बादशहाच्या सुभेदारीची जोखड भिरकावून देऊन तो स्वतंत्रपणे हैद्राबादेस राजधानी स्थापून राहिला. हैद्राबादची निजामशाही म्हणजे मोंगली अंमलाचे एक शकल होय. [३२]

४.६ पेशवाई आणि मराठे :

इ.स. १७२४ पासून १७४९ पर्यंत अहमदनगर नावाने फक्त मोगल अंमलाखाली पण प्रत्यक्ष निजामाचे ताब्यात हा प्रदेश होता. निजाम सुरुवातीपासूनच मराठयांचा द्वेष करी. छत्रपती शाहू व ताराबाई यांच्यामधील वारसा युध्दाचा तो फायदा घेऊन मराठ्यांचे राज्यांत कलह उत्पन्न करी. त्यामुळे मराठ्यांना वारंवार निजमाचे पारिपत्य करावे लागे. यावेळी मराठेशाही मध्ये पेशवा बाळाजी विश्वनाथ यांची निवड छत्रपती शाहू महाराजांनी केली. यावेळेपासून पेशवे ख-या अर्थाने उदयास आले. दक्षिणेतील मोगलशाहीचा -हास होऊन निजाम अधिकच बळावला होता. पेशवेपदावर बाळाजी बाजीराव होता व निजाम उल्मुल्क चिनकिलीजखान इ.स१७४८ मध्ये मृत्यू पावल्यावर त्याचा पुत्र सलाबतजंग निजाम तक्तावर आला, त्यावेळी मराठ्यांनी निजामावर स्वारी केली. याचवेळी फ्रेंचांचा राजकारणात शिरकाव झाल्याने फ्रेंच सेनापती बुसी याने निजामाची बाजू घेऊन श्रीगोंद्यानजीक मराठ्यांच्या सैन्यावर छापा घातला पण अखेर या युध्दांत मराठ्याचाच विजय होऊन निजमाने मराठ्यांशी तह केला. या तहान्वये मराठ्यांस अहमदनगर जिल्ह्याचे गंगथडीचा मुलूख मिळाला. तथापि मराठ्यांनी निजमाचा पूरा नायनाट न केल्यामुळे तो संकटकाळी फक्त माघार घेत असे व पुन्हा प्रसंग आला की डोके वर काढून मराठ्यांस छळीत असे. या चुकीचे प्रायश्चित पुढे पेशव्यांस अनेकवेळा मिळाले आहे.[३३]

संदर्भ सूची :-

१. प्रा. वांबूरकर जास्वंदी 'इतिहासातील नवे प्रवाह,' डायमंड प्रकाशन - २०१४ पृ. ५

२. कित्ता पृ. १२

३. कित्ता पृ.१९

४. कित्ता पृ.१९

५. नगर पालिका प्रकाशन, अहमदनगर पंचशताब्दी ग्रंथ, नगर पालिका प्रकाशन १९९०पृ. ३३ ,३४

६. कित्ता पृ. १४,१५

७. महाराष्ट्र शासन, अहमदनगर शहराचा भूगोल, महाराष्ट्र पाठय पुस्तक मंडळ, पृ. ३,४

८. कित्ता पृ. ६

९. कित्ता पृ. ९

१०. नगर पालिका अहमदनगर, अहमदनगर पंचशताब्दी ग्रंथ, नगर पालिका प्रकाशन १९९०, पृ. ३३,३४

११. कित्ता पृ. ३७

१२. कित्ता पृ. ४०

१३. डॉ. कुंटे भ.ग., बुरहाने मासीर, [मराठी अनुवाद] मुरली प्रकाशन ,मुंबई . पान ६२

१४. नगर पालिका अहमदनगर, अहमदनगर पंचशताब्दी ग्रंथ , नगर पालिका प्रकाशन १९९०, पृ. ६

१५. डॉ. कुंटे भ.ग, बुरहाने मासीर, [मराठी अनुवाद] मुरली प्रकाशन, मुंबई पृ.१

१६. कित्ता , पृ.२

१७. कित्ता, पृ.२४

१८. कित्त, पृ. २५

१९. नगर पालिका अहमदनगर, अहमदनगर पंचशताब्दी ग्रंथ, नगर पालिका प्रकाशन १९९०, पृ. ११

२०. कित्ता पृ. १५

२१. कित्ता पृ. १७

२२. कित्ता पृ. १९

२३. कित्ता पृ. २६

२४. Kunte B,G Gazetteer of India , Ahmednagar Dist, Second Edition 1976 Page 57

२५. डॉ.कुंटे भ.ग. बुरहाने मासीर , मुरली प्रकाशन ,मुंबई . पृ.६२

२६. डॉ. धर्माधिकारी शशी, चॉद सुलताना, पुणे २०१४ , पृ २५

२७. नगर पालिका अहमदनगर, अहमदनगर पंचशताब्दी ग्रंथ , नगर पालिका प्रकाशन १९९०, पृ. ३०

२८. कित्ता पृ. ३१

२९. Kunte B.G, Gazetteer of India , Ahmednagar Dist, Second Edition 1976 Page 53

३०. नगर पालिका अहमदनगर, अहमदनगर पंचशताब्दी ग्रंथ , नगर पालिका प्रकाशन १९९०, पृ. ३७

३१. कित्ता पृ. ३९

३२. डॉ.कुंटे भ.ग., बुरहाने मासीर , मुरली प्रकाशन ,मुंबई . पृ.२८३

३३. सरदार मिरीकर ना.य., अहमदनगर शहराचा इतिहास, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, तृतीय आवृत्ती २०१६, पृ. १५,१६

प्रकरण ४ भाग २

राजकीय व प्रशासकीय परिस्थिती

• पेशवेकालीन अहमदनगरची राजकीय व प्रशासकीय परिस्थिती

प्रास्ताविक :

प्राचीन काळी ग्रीकांनी इतिहास लेखनाला राजकीय इतिहासापासून प्रारंभ केला व त्यानंतर कित्येक शतके या विषयावर प्रामुख्याने लेखन केले जाई. इतिहास म्हणजे राजकीय जीवनाचा आलेख, असे समीकरणच तयार झाले होते. म्हणूनच सीलेसारखा प्रसिध्द ब्रिटीश इतिहासकार 'इतिहास म्हणजे गतकालीन राजकारण' अशी इतिहासाची सुटसुटीत व्याख्या करतो. राजकारण हे माणसाच्या जीवनाचे प्रमुख अंग आहे. समाजाचा गाडा सुव्यवस्थित चालण्यासाठी कायदे लागतात. ते करणा-या आणि त्यांची अंमलबजावणी करणा-या प्रशासकीय संस्था लागतात, राज्ययंत्रणा लागते. राज्ययंत्रणा नीटपणे चालविण्यसाठी शासक लागतो; मग तो शासक राजा असो, पंतप्रधान असो किंवा राष्ट्राध्यक्ष असो. कायद्यांचे परिपालन न झाल्यास शिक्षा करण्यासाठी न्यायसंस्था लागते. शासकांनी घेतलेल्या निर्णयांचा, केलेल्या कायद्यांचा परिणाम नागरिकांच्या जीवनावर, पर्यायाने सामाजिक जीवनावर होतो. याशिवाय राजकारणातील घडामोडी, कारस्थाने, सत्तांतरे, राजकीय जीवनातील हेवेदावे, संघर्ष या बाबीही रोचक वाटतात. या दृष्टीने राजकीय जीवनाचे महत्त्व वादातीत आहे. गतकालीन सामाजिक जीवनाचा आढावा घेताना देखील त्याकाळी कोण शासक होता, त्याची धोरणे काय व कशी ठरत होती, धोरणांची अंमलबजावणी कशी व कोणत्या यंत्रणेद्वारा होत होती, हा विचार अपरिहार्य ठरतो. यामुळे राजकीय जीवनाचा, राज्ययंत्रणेचा, राज्यसंस्थेचा इतिहास जाणून घेण्याची जिज्ञासा स्वाभाविक होती. तसेच महान व्यक्तीच्या कामगिरीचा आलेखही नेहमी मनोवेधक ठरतो. त्यापासून उद्‌बोधन होते, प्रेरणा मिळते. यामुळे इतिहासकार या प्रकाराकडे वळले व सामान्य वाचकांनाही हा प्रकार रोचक वाटला.

इतिहासलेखनासाठी विश्वसनीय पुरावा अत्यावश्यक असतो. राजकीय इतिहास लेखनासाठी असे विश्वासार्ह पुरावे मिळणे सुकर असते. यासाठी मूळ स्वरुपातील लिखित साधने मोठया प्रमाणात सापडतात. उदाहरणार्थ, राजांच्या दरबारातील शासकीय कामकाजाच्या नोंदी, आज्ञापत्रे, धोरण निर्धारिणाच्या नोंदी, राष्ट्राराष्ट्रांतील पत्रव्यवहार, प्रशासकीय कामकाजाचे अहवाल, कायदेमंडळाच्या कामकाजाचे अहवाल इत्यादी मूळ लिखित साधने अभिलेखागारात व्यवस्थितपणे एकत्र ठेवलेली असल्यामुळे त्यांचे परिशीलन सोपे होते. प्रकाशनाच्या सोयीमुळे मूळ कागदपत्रांचे संग्रह प्रकाशित झालेले आहेत. मराठयांच्या इतिहासाच्या अध्ययनासाठी शिवकालीन कागदपत्रे, पेशवे दप्तरातील कागदपत्रे, तसेच महत्वाच्या मराठा सरदारांची कागदपत्रे उपलब्ध आहेत. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामाबाबतचा कागदपत्रांचा प्रचंड संभार प्रकाशित आहे. या शिवाय सार्वजनिक जीवनातील पुढा-यांचे खाजगी पत्रव्यवहारही राजकीय इतिहासासाठी उत्तम साधन ठरते. हे सर्व दस्तऐवज शासकीय अभिलेखागारांत, तसेच काही खाजगी संस्थानांत, उदाहरणार्थ, पुण्याचे भारत इतिहास संशोधक मंडळ, नवी दिल्लीतील जवाहरलाल नेहरु मेमोरियल ग्रंथालय यांत जतन करुन ठेवलेले आढळतात. प्राचीन इतिहासाच्या अभ्यासासाठी लागणारी जुनी हस्तलिखिते, तसेच नाणी, शिलालेख, ताम्रपट इत्यादी साधने काही संस्थांतून जतन केलेली दिसतात. यामुळे राजकीय इतिहासाच्या संशोधकांचे कार्य सुकर झाले आहे, असे म्हणता येईल.[१]

पेशवेकालीन अहमदनगरचा राजकीय इतिहास अभ्यासत असताना आपणास शिवकाळ, मराठा राज्य म्हणजेच पेशवे काळाचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. रामचंद्र पंत अमात्य आपल्या आज्ञापत्रात असे लिहतात की, लोकांचे रक्षण करणे, देशाच्या रक्षणाकरिता लष्कर व मुलकी सेवा संघटित करणे व सामान्यपणे जनतेच्या कल्याणाचे संवर्धन करणे, ही या राज्याची, राजांची कर्तव्ये आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात सरंजामदारी पध्दतीवर नियंत्रण ठेवले गेले होते तर छत्रपती राजाराम महाराज आणि शाहू महाराजांच्या काळात त्या शक्तींनी पुन्हा आपला

प्रभाव दाखविल्याचे आपणास दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले व त्याचे पेशव्यांच्या काळात साम्राज्यात रुपांतर झाले. हे फक्त मराठयांचे स्वातंत्र्य प्रतीत होत नाही तर भारतीयांचे स्वातंत्र्य प्रतीत होते, असे अनेक इतिहास अभ्यासकांचे मत आहे.

मराठयांच्या राज्याच्या प्रगतीचे दोन टप्पे आपणास दिसून येतात. शिवाजीकालीन मराठा राज्यात राजा हा राज्याचा सर्वश्रेष्ठ प्रमुख होता. पेशवेकाळातही तो नामधारी प्रमुख बनला आणि सर्व सत्ता पेशव्यांच्या हातात केंद्रीत झाली. पहिल्या टप्प्यात राजा अष्टप्रधान मंडळाच्या सहाय्याने कारभार करीत असे. त्यात पेशवा किंवा मुख्य प्रधान, सुमंत, सरनोबत किंवा सेनापती, पंडीतराव आणि न्यायाधीश यांचा समावेश असे. या पध्दतीवर सहाजिकच शुक्रनीतिसाराचा प्रभाव पडलेला दिसतो. मराठयांच्या राज्याच्या पहिल्या टप्प्यात राजा हाच राज्याचा मुख्य होता. तोच राज्यकर्ता, न्यायाधीश व प्रशासक होता. पण पेशव्यांच्या काळात त्याची अवस्था फार वेगळी झाली. पण प्रत्यक्षात मात्र तो मुघल बादशहाचा मांडलिक होता व हा मुघल बादशहा नामधारीच होता. वस्तुत: मराठा राज्यातील सर्व सत्ता पेशव्यांच्या हातात एकवटली होती. त्याचाच एक भाग म्हणजे अहमदनगर परगणा होय. पेशवे कालीन अहमदनगरच्या बाहय स्वरुपावर मुस्लिम शासनसंस्थेचा प्रभाव दिसून येतो तर ज्या तत्त्वांवर ते अधिष्ठित होते व ज्या तत्त्वांकरिता ते अस्तित्वात आले होते, ती हिंदू धर्म व संस्कृती यांपासून घेतली होती. थोडक्यात त्याचा पाया हिंदू होता. पण इमारत मात्र मिश्र स्वरुपाची होती. भारतातील हिंदू व मुस्लिम संस्कृतींच्या संयोगाची एक विशिष्ठ अवस्था म्हणजे अहमदनगर होय .[२]

१.१ पेशवेकालीन अहमदनगरची राजकीय परिस्थिती

'नानासाहेब पेशवे आणि अहमदनगर'

अहमदनगरच्या पेशवेकालीन राजकीय व्यवस्थेला इ.स. १७५९ पासून सुरुवात होते. पण त्यापूर्वी बाळाजी विश्वनाथ इ.स. १७१३ ला पेशवे पदाची वस्त्रे घेऊन गादीवर आले. त्यानंतर बाजीराव बल्लाल [पहिला बाजीराव], बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे म्हणून मराठी राज्यात कारभारी झालेले होते . "ज्याचे हाती किल्ला त्याचेच राज्य" या

म्हणी प्रमाणे पेशव्यांनी अहमदनगरच्या किल्ल्यावर इ.स. १७५९ मध्ये स्वारी केली पेशव्यांच्या बखरीत असा उल्लेख येतो की, हा किल्ला सरकारांत घ्यावा असा मनसुभा करुन श्रीमंत [नानासाहेब पेशवे] नगराभोवती शह देऊन उतरले. महिना दोन महिने शह देऊन राहिले. पण अहमदनगरचा अभेध्य किल्ला काही केल्या हस्तगत होत नव्हता. नानासाहेबांनी योजना आखली आणि फितुरीशिवाय हा किल्ला मिळवता येणार नाही हे निश्चित झाले.[३] किल्ल्याचा मोगलांचा किल्लेदार कविजंग हा होता, त्याच्याशी बोलणे झाले की हा किल्ला आमचे स्वाधीन केला असता तुम्हांस [४०,०००] चाळीस हजारांची जहागिरी इनाम करुन दिली जाईल. किल्ला न घेता माघारी आम्ही फिरणारे नाही. कवीजंग त्यावेळी फितूर झाला. आणि पेशव्यांच्या आमीषाला बळी पडला. असा आदेश झाला की आपण किल्ल्यावर आक्रमण करावे कविजंग किल्ल्याची दरवाजे उघडे ठेवील. नानासाहेबांनी कोणत्याही विरोधा विना नगरचा किल्ला सर केला. कवीजंगास ठरल्याप्रमाणे चाळीस हजार जहागिरी लेखी दिली गेली.[४] याबाबत मोडी मधीलकाही दस्तऐवज हाती लागले आहेत, त्यातील पुढीलप्रमाणे उल्लेख सांगता येतील .

१. उदगीरच्या स्वारीच्या धामधुमींतही नगर हें महत्त्वाचे ठाणें होते. तें नगरच्या किल्लयाभोंवतीं चौक्या बसवून रसद बंद केल्याचें वर्तमान दत्ताजी शिंदे ता. २२ ऑगष्ट १७५७ रोजीच्या पेशव्यांच्या पत्रात लिहितात.

२. अखेर किल्ला पेशव्यांनी घेतला ते वर्तमान २१ डिसेंबर १७५९ च्या पत्रांत गोविंदपंत बुंदेले लिहितात की कार्तिक वद्य ५ श्रीमंत स्वामींनी [नानासाहेब पेशव्यांनी] अहमदनगरचा किल्ला घेतला .

३. कविजंगानें १० ऑक्टोबर १७५९ रोजी किल्ला पेशव्यांच्या हातीं दिला . अशा प्रकारे दोन वेगवेगळया तारखा अहमदनगर घेतल्याच्या संदर्भातील उल्लेख आपणास अस्सल कागदपत्रावरुन दिसून येतात. [५]

अहमदनगरचा किल्ला जरी इ.स. १७५९ ला घेतला असला तरी श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्याकडे अहमदनगरमधील महसूल गोळा करण्याचा अधिकार इ.स. १७४५ पासून

आढळतो, नानासाहेबांची रोजनिशी यामध्ये याबाबतच्या ब-याच नोंदी आढळतात. पेशवेकालीन अहमदनगरचा अभ्यासताना आपणांस निजाम - मराठे संबध, उत्तर मोगलाई, ब्रिटीशांची नीती, कारण याचवेळेस इ.स. १७५७च्या प्लासीच्या लढाईने ब्रिटीशांनी आपल्या साम्राज्य विस्ताराची मुहूर्तमेढ भारतात रोवली होती. या सर्वांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. जरीही संशोधनाचे साल सन १७५७ पासून घेतले असले, जरी नगरचा किल्ला पेशव्यांनी सन १७५९ साली घेतला असला, तरी नानासाहेब पेशव्यांच्या रोजनिशीतील सन १७५०,५१ सालचे पत्र अहमदनगरच्या आणि उदगीर लढाईवर प्रकाश टाकणारे ठरेल. त्याचा आशय पुढील प्रमाणे आहे.

मोगलाई सरदाराकडे वगैरे याजकडे जागीर होती त्याची जप्ती सरकारांतून केली होती ते हाली जप्ती उठविली, त्याविसी आमलदारांस ताकीद पत्रे दिल्ही .

माणको बल्लाळ यास की, मौजे अणगेर तर्फ राजंणगाव व्यंकटराव हरकारे याजकडे आहे त्याविसी

नारोबाबजी कामावीसदार पारनेर यास की खोजे हमिदखानयाजकडे गांव परगणे मजकुरचे १. करडी १. निंबळक १. डोंगरगण याविसी

राघो गोविंद यासी की, तुरुकतान याचे जागीरचे गाव परगणे नेवासे १. रुपपूर १. कुडगांव १. आकली १. गुणग १. बखतापूर १. बाभूळखेड १. हिंगोणी १. कांगोणी १. वडाळे १. वरखेड १. खरवंडी याविसी पत्रे

गोपाळ त्रिंबक यास की जागीर तुरकतान खान याची गांवगन्ना परगणे चांभारगोंदे [श्रीगोंदे] १. कसबे मजकुर १. मकरंदपूर १. देऊळगाव १. बाळवंडी [बेलवंडी] १. पारगांव १. मांडवगांव १. वेळू १. गणेगांव १. जलालपूर १. कसबे खेड १. भांबोरे १. कात्रज १. उंबरली १. सिंदे १. हलीकु वडगाव १. जरीगांव

भगवंतराव राम यास की तुरकतान खान याजकडील जागीरीचे गांवा विसी २०. परगणे पोडदेडीवगांव १. सावेडी १. गुपीत वडगांव १. नालेगाव १. चाहुरानेखुर्द १. पिंपळगाव गभी १. महलोरी १. शेतु १. मरसुदानगर १. शहापूर १. टाकळी १. नागापूर १. चास १. फर्याबाद १. चाहुराने बुद्रुक १. न्यामतवाडी १. कापुरवाडी १. बलायवाडी वरुळा १. निंबोडी १. बोल्हेगाव १. कोल्हेवाडी १२ परगणे कडेवळीत १. पेडगांव १. शेडगांव १. हलडगांव १ बालेवाडी १. सिध्दटेक १. अनजुन १. बाबुर्डी

१८ परगणे चांभारगोंदे गोपाळ त्रिंबक याच्या पत्राप्रमाणेयाविसी पत्र १. नरहर लक्ष्मणराव यांस पत्र १. रामाजी मल्हार यास १. भगवंतराव राम यास १. बाबुराव हरी १. जीवाजी माहादेव यास १. राघो गोविंद यास १. किल्ला रामजी मल्हार यास १. परगणे कोतुळे १. धांदरफळ १. परगणे वण १. परगणे चांदवड १. परगणे दिडोरी १. परगणे सिन्नर १. परगणे कुंभारी

१ पत्र शिवराम नरसी याजकडे मौजे इनामगाव तर्फ रांजणगांव मोगलाईतून आहे. त्यास तेथील जप्ती तुम्ही केली आहे ती उठवणे. आजपावेतो वसूल जाला तो जाला. या उपरी जप्ती उठवणे. वसुलाचा तगादा न लावणे. म्हणोन ताकीदपत्र माणको बल्लाळ यास.

बाबुराव हरी यास की ठाणेदार मोगलाकडील याची ठाणी याचे हवाला करणे म्हणोन संगमनेर, वावी, पुणतांबे येथील गढीया विठ्ठल सुंदर यांचे हवाला करणे म्हणोन. [६]

सदरचे पेशवाईतील आदेश पाहिले असता असे लक्षात येते सन १७५०, ५१ सालापासून अहमदनगरच्या काही परगण्यांची वसूल पेशवे करत होते. गावाचा महसूल गोळा करुन सरदार मंडळी सरकारात भरत होते. पण पेशवे सरकार आदेश काढून सांगतात. आत्तापर्यंत तुम्ही जी वसूली केली, ती यापूढे बंद करावी ही जप्ती सरकार उठवत आहे. या

पत्रातून असे समजते सर्व अहमदनगर भागातील व्यवस्था पेशव्यांनी सन १७५० पूर्वीच लावली होती. जवळपास नऊ ते दहा वर्षांनी पेशव्यांनी अहमदनगरचा किल्ला सन १७५९ साली घेतला.

पेशवेकालीन अहमदनगरच्या इतिहासास कलाटणी देणारी घटना म्हणजे 'उदगीरची लढाई' होय.

१.२ उदगीरची मोहिम

सन १७५९ साली पेशव्यांनी अहमदनगरचा किल्ला जिंकला. अहमदनगरचा किल्ला हा निजाम - पेशव्यांच्या आणखी एका संघर्षाचे निमित्त बनला. अहमदनगरचा किल्ला पेशव्यांनी घेतल्याचे समजताच सलाबतजंग, निजामअली व बसालतजंग हे बंधू पेटून उठले. खासा सलाबतजंग व निजामअली हे दोघे बिदरमधून सुसज्ज फौज घेऊन पेशव्यांवर चालून निघाले. बसालतजंग हा कर्नाटकातून आपल्या भावांच्या मदतीस फौज घेऊन येणार होता. वास्तविक निजामाचे हे डाव नानासाहेब पेशव्यांना माहितच होते. निजामाने काहीतरी चूक करावी, आणि मैदानात येऊन त्याचे पारिपत्य करावे, त्याच्या लष्करी सामर्थ्याचा नाश करावा अशी पेशव्यांची इच्छा होती. याबाबत जे काही संदर्भ साधने उपलब्ध झाली, त्यातील माहितीवरुन असे दिसून येते कि, सन १७५९च्या पावसाळयात किंवा तत्पूर्वीच या मोहिमेची आखणी पेशव्यानी आरंभली होती. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करण्याजोगी आहे, ती म्हणजे या मोहिमेचा नामधारी प्रमुख विश्वासराव जरी असला तरी स्वारीची सर्व सूत्र सदाशिव आणि रघुनाथ यांच्या हाती असून या सर्वांवर चाणाक्ष नानासाहेब पेशव्याची करडी नजर होती.

पेशव्यांनी आखलेल्या योजनेनुसार विसाजी कृष्ण बिनीवाले हा सरदार नगरच्या रोखाने रवाना झाला. या किल्ल्याचा किल्लेदार कविजंग हा असून त्याला फितूर करण्यास पेशवे यशस्वी झाले. कविजंग फितूर झाला याचा उल्लेख वरती केलेलाच आहे. या कविजंगाचा सूड घेण्यासाठी निजामबंधू बेदरमधून बाहेर निघाले. रियासतकार सरदेसाई यांच्या मते निजाम सुमारे बारा हजार सैन्य व दहा हजार गारदी आणि १०० तोफा घेऊन लढाईच्या उद्देशाने बाहेर पडला. तर पेशव्याची चाळीस हजार लष्कर या मोहिमेत सहभागी

झाले होते. शेजवलकर आपल्या पानिपत : १७६१ या ग्रंथात असे म्हणतात या मोहिमेत निजामाची फौज सर्व मिळून सुमारे वीस हजार असून त्यात दहा हजार गारद्यांचा भरणा होता. निजामाच्या पदरी असलेले कित्येक मराठा सरदार आपापल्या जमावासह धारुर येथे येऊन गोळा झाले.

उदगीर मोहिमेत एकूण किती पेशव्यांची फौज होती याची विश्वसनीय माहिती मिळत नाही. भाऊ परळी येथे आला तेव्हा त्याच्यासोबत पंचवीस हजार सैन्य असल्याचा उल्लेख शेजवलकर करतात. तर सरदेसाई, मराठा फौज चाळीस हजार होती असे सांगतात. उदगीर मोहिमेचे खरे नेतृत्व कोणाकडे होते याबाबत आजही अनेक अभ्यासकांमध्ये मतभेद आढळतात. त्यामुळे उदगीर मोहिमेचा खरा सेनापती कोण होता हा प्रश्न आजही अनुत्तरीत राहतो. नगरचा किल्ला ताब्यात येताच नानासाहेब पेशवे त्या ठिकाणी मुक्कामी गेले यावेळी रघुनाथराव, सदाशिवराव भाऊ व विश्वासराव भाऊ हे तिघेही एकमेकांच्या संर्पकात होते. या मोहिमेवर प्रकाश टाकणारे दोन पत्रे खूप महत्त्वाची आहेत, श्री. य.न. केळकर यांनी आपल्या 'मराठेशाहीतील वेचक वेधक' या पुस्तकात प्रसिध्द केली आहेत. त्यापैकी उदगीर मोहिमेची माहिती देणारे पत्र या ठिकाणी घेणे योग्य वाटते.

श्री *रामोजयति*

राजश्री हरबाजी बावा स्वामीस विनंती उपरी सांप्रत श्रीमंत नानांची मर्जी पाहाता शरीरी वेथा क्षीण फार जाहाले. लोकास पैसा द्यावा हे बुधी येकंदर नाही. रदबदली केली तर तोडून जाब संगतात. राजश्री भाऊ व राजश्री रघुनाथपंत मोगलास बुडवावे या उमेदीने गेले, ते गोस्ट राहिली. मोगल बलकट आहे आपले जो-याने उदगिरीस आला. तेथे बुनगे ठेऊन सडा झाला. त्यांची गाठ पडली. येक जुज मातवर जाहाले. इब्रामखा गाडदीयाचा भाचा पडला माणूसही फार पडली. येक जुज तीन चार कोश मोगल चालत चालत आवशावर आला. हे भोवते आहेत रोज झटपट होते परंतु याची सलाबत मोगलावर पडत नाही. येक इब्रामखान मात्र जुजतो वरकड मराठे

झटत नाही काठया घालितात त-ही निकड होत नाही माणूस बेदील . कोणास पैसा दिल्हा नाही रोजमुरे यावर चाकरी घेतात. यामुले मन कोणी घालीत नाही. राजश्री दमाजी गायेकवाड परलीवर राहिले होते त्याजवर खंडागले येऊन पडले. त्याणी सारे लस्कर लुटून पस्त केले. दमाजीस दोनतीस जखमा होऊन दोन च्यारसे रावतानसी पलोन श्रीमंताच्या लष्करात गेले. इतके दिवस मोगलापासी मराठे नव्हते सांप्रत जाधव खंडागले आटोले पांढरे बाके वगैरे दाहा हजार जमा जाले व अलीकडे घारुराजवळ मोगल आला असेल. हणवंतराव जानोजीची फौज तयार आहे. बसालतजंग करणाटकची फौज घेऊन आला. त्याची भेंट जाली असेल. अगर होईल याउपर मोगल भारी जाला याचा त्याचा तूर्त तह होत नाही. मोगलाचा मनोदये पंढरपुरास येऊन भीमेच्या पाण्याने वरते यावे दुसरे धारुरवरुन परांडे यासी येऊन सिनेच्या पाण्याने नगरास अगर पेडगावास यावे ऐसे आहे. या चिंतेत हे श्रीमंत फार हैराण आहेत आशामधे छ. १३ जमादिलाखरचे प्रहर रात्री सहा दिवसात उजनीहून कासीद आले. दिलीची पत्रे आली की आबदली फौज घेऊन आला तो व रोहिले जाट सुजायत दौला येकत्र होऊन दिलीवर आले. तेथे सिंद्याचे व त्याचे जुज जाहाले जनकोजी सिंदे यासी जखमा आहेत दत्ताजी सिंदे पाच हजार फौजेनसी मोगलाच्या फौजेत गर्क जाहाले. ते सारे लोक कापून ठार केले. दतबादा मुर्दा देखील सापडला नाही लस्कर सारे मोगलानी लुटून दिली घेऊन पातशाहा मारिला व वजरी मारिले. यांचा आमल तमास उठविला. दिलीची पातशाही आबदली करीत आहे हे विनंती. [७]

पत्र क्र. २ हे अपुरेच सापडले आहे.

डाव केलरे व लूट बहुत जाली आपले फौजेतील दीड हजारपर्यंत माणूस पडले नवसे हजार घोडे पडले व जखमी जाले. या प्रमाणें मोंगलांस जेहर करुन त्याच तलावर मुकाम जाला. या फौजा भोवत्या होऊन तोफांची

मारगीर फार केली यामुळे मोगल जेहर देऊन बोलीस वकील पाठविला. साठ लक्षांची जाहागीर व दौलताबाद, ब-हाणपूर, आसेरी व विजापूर च्यार ठिकाणे यांसी दिली. तह करार जाला याउपरी रविवारी अथवा सोमवारी द्वितीयेस श्रीमंत या तलावरुन कूच होऊन पैठणास जाणार. श्रीमंत भाऊसाहेब व दादा तेथे येऊन भेटी होणार. याची रवानगी फौजसुध्दा हिंदुस्थानात व आणखीही जागाजागा फौजाची रवानगी होणे ते होऊन उभयेता श्रीमंत फिरोन येतील. राजश्री जानोजी भोसले व मुधोजी भोसले श्रीमंत भाऊच्या लष्करात फौज सुध्दा आले आहेत. त्यास राजश्री लक्षुमणपंत येथून गेले त्यांस आम्ही आपले कर्जाविसी बहुत निरवण केली ते बोलिले की कर्जाची याद व येक कारकून आप्पाकडे पाठवून द्यावा. प्रस्तुत ते सारे मंडल गंगातीरी येणार यास्तव भोसल्याची हप्तेबंदी दप्तरी आहे त्याची नक्कल लेहून कृष्णाजी [पुढील बंद गहाळ आहे.][८]

पत्राच्या आशयावरुन हे स्पष्ट होते श्रीमंत नानासाहेब पेशवे हे नगर मुक्कामी होते. नानासाहेब पेशवे हे आजारी असल्याचा उल्लेख सदर पत्रात येतो. पत्र लेखन बहुतेक पथक्या किंवा दुय्यम दर्जाच्या लष्करी अंमलदाराने लिहिले असावे. कारण तो पत्रामध्ये नानासाहेब पेशव्यांनी लोकांना वेळेवर पगार न केल्याचा उल्लेख आहे. पुढे निजाम - पेशव्याच्या फौजा मुख्य संग्रामाच्या आधीच्या हालचालींची माहिती यात देण्यात आली आहे. त्यानुसार असे दिसून येते कि, निजामबंधू उदगीर येथे येऊन पोहोचले. त्यावेळी मराठी सैन्य अंगावर येत असल्याचे पाहून त्यांनी आपले बुणगे उदगीर येथे ठेवले आणि फौज, तोफखाना घेऊन ते शत्रूवर चालून गेले. तारीख १९ व २० जानेवारी १७६० या दोन दिवसांमध्ये दोन्ही पक्षांची लाढाई झाल्याचा उल्लेख आढळतो. या लढाईमध्ये इब्राहीमखानचा भाचा मारला गेल्याचा उल्लेख पत्रात आला आहे. ही लढाई बहुतेक उदगीरच्या आसपास झाली असावी कारण, या संग्रामानंतर निजामाची फौज औसाच्या दिशेने पुढे सरकल्याचा उल्लेख पत्रात आलेला आहे. निजामाच्या सैन्याभोवती मराठी फौजेचा धावता वेढा पडला असला तरी मराठी लष्कराला न

जुमानता निजाम औसा येथे येऊन पोहचल्याचे प्रस्तुत पत्रात लिहिले आहे. पत्रातील पुढील आशय "काठया घालितात त-ही निकड होत नाही माणूस बेदील कोणास पैसा दिल्हा नाही रोजमुरे यावर चाकरी घेतात यामुले मन कोणी घालीत नाही." ही वाक्ये अतिशय महत्वाची आहेत. वरवर पाहता असे दिसून येते की वेळेवर पगार मिळत नसल्यामुळे मराठी फौजांचे लढण्यात मन नव्हते. यापुढे पत्रातून असे समजते परळीवर असलेल्या दमाजी गायकवाडाचा, निजामाचा मराठा सरदार खंडागळे याने मोठा पराभव केल्याचा उल्लेख आहे. धारुर येथील निजामाच्या मराठा सरदारांवर नजर ठेवण्यासाठी व आपली पिछाडी सांभाळण्यासाठी पेशवेबंधुंनी दमाजी गायकवाडाची नियुक्ती केली. त्याचप्रमाणे धारुर येथे जमलेल्या निजामाच्या मराठा सरदारांमध्ये फितूर पेरण्याचे कार्य देखील जोरात चालू होते व त्यात पेशवेबंधूंना काहीसे यश देखील मिळाले. असे असले तरी, निजामाचा मराठा सरदार खंडागळेने दमाजी गायकवाडवर संधी साधून हल्ला चढवला. यावेळी दमाजी काहीसा खाफील असावा किंवा अती आत्मविश्वाच्या बळावर लढाईत उतरला असावा. परिणामी खंडागळेच्या पथकांनी गायकवाडी फौजेचा साफ धुव्वा उडवला. गायकवाडांची सेना लुटली गेली. खुद्द दमाजी जखमी होऊन मुख्य सैन्याच्या आश्रयास मागे धावला. निजामाच्या मराठा सरदारांनी यावेळी जी चमक दाखवली, त्यामुळे पेशवेबंधूंमध्ये काही प्रमाणात अस्वस्थता निर्माण झाली.

छ. १३ जमादिलाखरचे उज्जैनवरुन पेशव्यास नगर येथे पत्र मिळाले. त्यात बुराडी घाटाच्या संग्रामाची व दत्ताजीच्या मृत्युची बातमी आहे. ही गोष्ट पानिपत अभ्यासकांसाठी विशेष महत्वाची आहे. किंबहुना, अस्सल पत्रातील या एका ओळीने सबंध पानिपत मोहिमेवर बराचसा प्रकाश पडतो. पस्तुत पत्र उदगीर मोहिमेचा निर्णायक संग्राम घडण्यापूर्वीचे आहे हे उघड आहे. बुराडी घाटच्या लढाईचे वर्तमान नानासाहेब पेशव्यास नगरमुक्कामी समजते असे म्हणता येईल. दुस-या प्रसिध्द केलेल्या पत्रावरुन असे समजते १. पेशव्यांनी युध्दखर्च म्हणून निजामाकडून रोख खंडणी घेतली नाही. २. दौलताबाद, विजापूर, अशीरगड व ब-हाणपूर ही चार प्रमुख स्थळे पेशव्याला देण्याचे निजामाने मान्य केले. ३. निजामाने साठ लक्ष

उत्पन्नाचा भाग मराठयांना देण्याचे मान्य केले. एकंदर उदगीर मोहिम ही निजामाला धूळ चारणारी होती. या नंतर खडर्याच्या लढाईपर्यंत निजामाने डोकेवर काढले नाही.

१.३ पत्र क्र.३ सदाशिवराव भाऊ यांना नानासाहेब पेशव्यांनी लिहीलेले १६.१२.१७५९ चे अहमदनगर संग्रहालयातील पत्र मला येथे जसेचे तसे देणे महत्वाचे वाटते कारण हे पेशव्यांच्या कारकीर्दीवर प्रकाश टाकणारे आहे. नानांची युध्दनीती स्पष्ट करणारे आहे. त्याचा आशय खालील प्रमाणे आहे.

विनंति उपरी

जानोजी भोसले थोडे. त्यावर मुधोजी उलटन गेला. जूज होणार हे खबर आली आहे. येविसी पेशजी लिहिले. आज्ञा होईल तसे लेहून पाठऊ तोफखाना कडील नेमणुकेची दारु वगैरे किरकोल जिनस स्वारीचा राहिला , त्याविसी गोविदपंतास आज्ञा व्हावी की, सत्वर येऊन पावे व नगरचे ही नेमणुके प्राो लौकर यावे. ऐवज येथे तीन लाख आणविला तो यावा. खासा स्वारीबाा हि दोन लाख यावे. दीड लाख बाा आणिले. त्यांतला विजयनगरची खरीदी गाडदी, काही नालबंदी किरकोळ असेच जाले. रोजमराहि चालीस पंनास हजार आला. सिलक उडाली. तेव्हा पैठणाहून यैवज आणावा लागला. येथे फौजे खडीगणे ती गंगेवर येते दिसी घेतली. ते सा हजार जाली. बिनीची पथके हजारेक होते. अजून जमा होत. तेथे आलियावर नलवडे खतल, घाटगे वगैरे पांचसे पर्यंत आले. फिरुन पत्रे पाठविली आहेत. खासा स्वारी बाा हजार दोन हजार फौज नेमणे ते नेमुन त्यास आज्ञा व्हावी. आगदी लोक नाही हे उत्तम नाही. चौकीचा बंदोबस्त उत्तम प्रकारे आसवा. पुण्यासहि दोन तीनशे राऊत नेमूण ठेवावे.

आवरंगाबाजेत पाच सासे फौज हजार दोन हजार प्यादा आहे. तेथे ध्यावे तर फार करुन आपलेच लोक आहेत. फौज जमा वीस हजार असती तर सहजांत कांही तरी काम होते. प्रस्तुत घास दाणे घेतो. शहरास काही प्रकार

कराव की काय किंवा दौलताबाजचे होईल ते आपण करणे ते. येक .....[पुढे अपूर्ण पत्र] [९]

पत्र. क्र.४

नगरास येणे जालीयावर तेथील काम सर्व पाहून आज्ञा त्यास करावी. येथून सांगितले ते विनती करतील. हवालदार राणोजीराव खानवीलकर अगर तसाच कोणी ठेवावा. इमारत चाली लागली पाहिजे. फराबाग बहुत उतम आहे. तेथे जवळ राहणे यासहि स्थळ चांगले आहे.

स्वामींनी शरीरप्रकृत लिहिली त्यांत क्षीण आहे. त्यास बहुत प्रकारे पथ्य चांगले. करावे. जवळ मजल करावी याप्रमाणे महिनाभर करावे. पुण्याहून कूच जाले. भिवरेथडीचे व नगरचे पाणी मानेलसें वाटतें. प्रकृतीस पडेल तेव्हा खरे. आणाजी साटम याचा कांहीतरी निकाल काढून त्यास आम्हाकडे पाठऊ द्यावे घरीच राहिले आहेत. वतनाचे गाणे सेवटा न जाई, तरी उमेदवार करुन ठेवावे. त्यास घरी राहू ने द्यावे. रा छ. २५ राकर हे विनंती माझी प्रस्तुत बरीच आहे. दोहो तिही दिसांआड येकदां जेवतो. संभाळून जेवावे लागते. पथ्य अगदीं नाही. जड मात्र फार खात नाही. औषध पहिले चालते तेच आहे. जखमेचे कातडे अजून बळकट जाले नाही. शिरेवर म्हणून आंग दुखत थोडेसें असते. वरकड पहिलेहून सर्व प्रकारे बरें आहे. शक्त[शक्ती] अजून चांगली येत नाही. पाठीमुळे दंड नमस्कार नाही ते चाली लागल्या याहून बरे वाटेल. थोडाथोडा प्रारंभ आहे.

दादांची व रायाची शरीर प्रकृत बरीच आहे. बाबूजी नाईक विठलपंत बाबाचे वगैरे पथके आजून दोनही फौजातील कोणी जमा होत नाहींत. बहुधा एकदांच सारे येतील तर नकळे. गंगातीरी वैरण मिळत नाही. एके जागा दोन चार दिस जालीया कूच करावे लागते. येथून जावे तिकडे रोख पडतो ते तिवंधा [त्रेधा] आहे.[१०]

या पत्रावरुन नानांची युध्दकल्पना, यध्दनीती समजते. सैन्याची जमवा जमव, त्यासाठी लागणारा खर्च, खर्चाबरोबर नानांसाहेब पेशव्यांनी पुण्याची व्यवस्था कशा उत्तम प्रकारे केली त्याचे ही उदाहरण स्पष्ट होते. यात एक गोष्ट महत्वाची वाटते की नानासाहेब हे आजारी असल्याचा उल्लेख याही पत्रात येतो, दिवसाआड जेवन करतात असा ते उल्लेख करतात. उपचाराचे पथ्य कशा प्रकारे पाळतात ते ही सांगतात. काहीतरी कारणाने अंगावर जखम आहे तीही आता बरी होती आहे, असेही ते सांगतात. इथे दादा व रायांचा उल्लेख ते करतात. [दादा - राघोबादादा, राया कोण हे समजत नाही] या दोघांचीही प्रकृत्ती उत्तम आहे, आणि लवकरच ते नगरांस येऊन भेटतील असे ते सांगतात. अहमदनगरचे फरीयाबाग राहण्यास कसे उत्तम आहे, राहण्यायोग्य आहे हेही समजते. अहमदनगरचे वातावरण चांगले असून हवापाणी आपणांस मानवेल असेही ते पत्रात म्हणतात. सदाशिवराव भाऊ यांना स्वारीची कल्पना देताना सांगतात माझ्यासोबत तीन लाखांचा ऐवज बरोबर आणला आहे. आपणही येताना काही ऐवज आणावा असा ते वडीलकीचा सल्ला देताना दिसतात. नानांच्या जवळ म्हणजे अहमदनगर येथे नलवडे, खताळ, घाडगे या सरदारांच्या फौजा पाचशे पर्यंत आल्या आहेत , अजूनही काही सरदारांना पत्रे पाठवली आहेत. चौक्यांचा बंदोबस्त उत्तम असावा असे सांगतात. निजामाची फौज गंगातीरी[गोदावरी] आली आहे, तरी येथे जनावरांना चारा, वैरण मिळणे कठीण झाले आहे, असा उल्लेख वरील पत्रात आढळतो. उदगीरच्या मोहिमेवर प्रकाश टाकणारे हे पत्र महत्वाचे वाटते. [११]

अहमदनगरचा किल्ला घेतेवेळी पेशवे आणि निजाम यांनी केलेला करार पुढीलप्रमाणे

अहमदनगर किल्ला, गोळी न वाजतां महिना पंधरा दिवसांत सरकारचे लोक घेऊन स्वाधीन करावा, याप्रमाणे करावे. हे झाल्यावर कराराप्रमाणें बारा कलमें क्षेप निक्षेप चालवावीं पुढे अंतर न करावे. मशारनिल्हेनींही करार प्रमाणें करार करावें. लेकराचं लेकरी चालवावे. करार

१ पन्नास हजारांची जहागीर वसुलही पन्नास हजार, चौथ व सदरेशमुखी व बाबती सहेत, या चोही परगण्यांतून एक परगण्यांत आपणांस द्यावी. फडफर्मावीस, कमाविसदाराचा, सरकार कांही संबंध व अन्य उपद्रव न द्यावा.

१ तुरळापूर वगैरे हे गांव आम्हांकडे चौथाई व सरदेशमुखी व बाबतीदेखील पाटिलकी आपणांकडे इनाम लेंकराचें लेंकरी या प्रकारे चालतात. त्या गांवास कांही उपसर्ग मोगलाकडील लागूंन द्यावा. व दरोबस्त या गांवच्या सनदा स्वराज्यांतून इनाम लेकराचें लेकरी चालेल अशा चौथाई, सरदेशमुखी बाबती देखील करुन द्याव्या.

१ चाकरी सर्व प्रकारे आपणांस माफ असावी.

१ महंमद करीम, आपला लेक , जातीस दरमाहा माकूल करुन शंभर लोकांनिसी चाकर ठेवावे.

१ आपले भाऊ व भाचे वगैरे लोक व तपशील नेल्याचे जहागिरीस सरकारांतून उपसर्ग न लागावा. ते चित्तास आलीया मोंगलाईत चाकरी करतील. चित्तास आलीया सरकारांत राहतील. मोंगलाईंतून त्यास पेंच पडलीया त्यांचे साहित्य सर्व प्रकारें, त्यांच्या हवेल्या, बाग वगैरे नगरात आहेत, त्यांस उपसर्ग सरकाराचे लोकी न द्यावा. सुखवस्तीस मुजाहिमत नसावी.

१ सरकार चाकरी आम्ही अंगीरारल्याउपर मोंगलाई कडील आणखी पेंच आंम्हाकडे हजार पडतील व लोक लिहितील, ते खारतेस न आणावे. सर्व मतलब सदरी लिहिले ते, त्याजप्रमाणे लेकराचें लेकरीं चालवावें. त्या श्रीमंत नानासाहेब व भाऊसाहेब व दादासाहेब व विश्वासराव साहेब यांनी आपले बेलभंडार वेगवेगळे द्यावे. किल्ले करार लेंकराचे लेंकरी सदरहूप्रमणें चालू.

कित्ता पत्र छ १५ रबिलावल, सन सितैन, कवीजंग बहादर यांचे नांवे बाळाजी बाजीराव प्रधान व सदाशिव चिमणाजी यांही अहदनामा लिहिला असोन, तुमचे मतलबाची कलमें अलाहीदार करार करुन दिली. आहेत, की गोळी न वाजता किल्ला सरकारचे हवाली जाल्यावर, वंशपरंपरेने चालतील. हेबाबे वसवस न धरावा. राघो तुकदेव यांजबद्दल बेलभंडार

पाठविला आहे. हा घेऊन किल्ला वेवसवस [लगेच] सरकारचे लोकांचे हवाली करणे. सर्व गोष्टीने खातरजमा असूं देणे. तुमचे सर्व प्रकारे लेकरांचे लेंकरी चालवीले जाईल. तुमचे आमचे दरम्यान ईश्वर आहे. कराराप्रमाणे सरकारांतून चालेल. सत्वर स्थळ हवाला करणे. जाणिजे. छ १५ रबिलावल, सन सितैन, जादा काय लिहिणें म्हणोंन पत्र १

[इसवी. सन १७५९ - ६०][१२]

पत्र क्र. २

श्रीमंत पेशवे सरकारांस निजामतदौले बहादरजंग हयांनी दिलेली जहागीर

यादीदास्त जहागीर श्रीमंत बाळाजी बाजीराव पंतप्रधान यांसी निजमातदौले बहादरजंग बहादर यांनी दिली. सन ११६९ शके १६८१ युध्दा समयी ६२००००० रुपये [१३]

४५८१८०।।- सुभेवराड

१५८२८८८०- सुभे महमदाबाद

२००००० सुभे ब-हाणपूर

३७५०० विज्यापूर

३१९३४७८।।-।। खुजस्तेबुनियाद

५२९२०४७।।-।।। बाकी माफी वबैरे[वगैरे] किल्ले

१ माफी माहेर यात्रा महसूल माफ

५ किल्ले

१ अहमदनगर

१ बहादरखेंडे

१ दौलताबाद

१ असेर

१ मालेर

५

६२००००

१.४ किल्लेदार नारोबाबजी अभ्यंकर [नगरकर]

अहमदनगर घेतल्यानंतर अहमदनगरच्या किल्ल्याचा किल्लेदार म्हणून नारो बाबजी लकडे ऊर्फ नगरकर याची नेमणूक करण्यात आली. नारोबाबाजी नगरकर यांना कान्हूरची जहागिरी मिळाली सध्याची दादा चौधरी ही शाळा त्यांचे निवास स्थान होते.

नारोबाबजी पारनेर येथे असतां नानासाहेब पेशव्यांचे मनामध्ये अहमदनगरचा किल्ला किल्लेदार नबाब कविजंग यांजकडून घ्यावयाचे विचार चालू होते. निजामशाही दिल्लीच्या राज्यांत सामील झाल्यावर तेथील मुसलमान सरदारांत दिल्लीच्या राज्यांत सामील झाल्यावर तेथील मुसलमान सरदारांत दिल्लीच्या बादशहाचे जवळचा कविजंग सरदार असून त्याच्या ताब्यात अहमदनगर शहर व किल्ला होता. नबाब कविजंगशी संधान बांधल्याशिवाय पेशव्यास इलाज नव्हता. किल्ला प्रत्यक्ष ताब्यात येण्याचे पूर्वी नारोबाबजीनी धाडस करुन मेंढपाळाचे वेषाने किल्ल्यात प्रवेश करुन किल्ल्यासंबंधी सर्व बारीकसारीक तपशीलवार माहिती मिळविली. ज्या पत्रामध्ये नगरच्या किल्ल्याचे तपशीलवार वर्णन केलेले आहे. ते पत्र ९ सप्टेंबर १७५९ ला नानासाहेब पेशव्यांना नारोबाबजी यांनी लिहिलेले आहे.[१४]

अहमदनगरचा किल्ला नारोबाबींचे ताब्यांत आल्यावर त्यांना त्या किल्ल्याचे किल्लेदार म्हणून नेमण्यांत आले. यामुळे नारोबाबजीचे नगरचा किल्ला जिंकण्याचे वेळी पूर्वी चालू असलेले लकडे [अभ्यंकर] हे नाव लुप्त होऊन ते नगरकर असे झाले. नारोबाबजी नगरचे सुभेदार, किल्लेदार झाल्यावर त्यांनी अहमदनगर सुभ्यांतील जमिनीची मोजणी मापणी करुन जमीनधा-याच्या त्यावेळी विद्यमान असलेल्या पध्दतीत फार सुधारणा केली. त्यांनी जमिनीच्या मगदुरावरुन बिघ्याची मांडणी केली व त्यावर कराची आकारणी लावून दिली. मलिकंबरनंतर पेशव्यांचे नारोबाबजी यांनी अहमदनगर जिल्हयांत मोजणी केली होती. [१५]

नारो बाबजी नामजाद परगणें नेवासे वगैरे महाल यांस एक सनद आहे, ती वेदशास्त्र सपन्न राजश्री गोविंद दीक्षित पाटणकर यांस साल मजकुरी मोगलांची लंढाई फत्ते जाहालीयावरी एक गांव पांच हजार रुपयांचा इनाम द्यावा . असा करार आहे. ती लढाई फत्ते [यशस्वी झाल्याने] यासाठी त्यांना गाव इनाम दिल्हा पाहिजे, यासाठी दीक्षित बंधूनी

नानासाहेब पेशव्यांना पत्र पाठविले, तरी ती सनद तयार करुन, मौजे मजकुर येथील पांच हजार रुपयांचा तनखा व पांच हजार कुलबाब कुलकानु मिळोन वसूल या प्रमाणे असल्यास एक गाव दीक्षितांकडे नेमून द्यावा या आशयाचे आदेश नानासाहेब पेशवे नारोबाबजी नगर करांना देत आहेत. [१६]

इ.स. १७५७,५८ समान खमसेन मया व अलफ जमादिलाखर २२ हे पत्र पेशवेकालीन अहमदनगरवर प्रकाश टाकण्याकामी फार महत्वाचे ठरते . त्यात उल्लेख आहे नबाब सलाबतजंग याचे बिघाडामुळे मोंगलाई अंमलाची जाहागीरीची जप्ती करुन तुम्हांस कमावीस सांगितली होती ती हालीं मोकळी केली असे. तरी अंमल पेशजी चालत आल्याप्रमाणे चालों देणे म्हणून पत्र :

- *कवीजंग याजकडील जाहागीरीची पत्रे :*
- *भगवंतराव राम कडेकर १. मौजे महेकरी १ मौजे शेडी निसबत काजी विनायक १ मौजे धनगरवाडी परगणे नेवासें निसबत नारो बाबाजी १ कसबे रासीन निसबत त्रिंबक निराजी*
- *जानकोजी शिंदे याचे नांवे - १. मौजे नालेगांव १. मौजे सायवाडी १. मौजे माळीवाडा १. मौजे निबोडी १. मौजे कापूरवाडी १. मौजे गालफखानी १. मौजे मुर्तजापूर १. मौजे चौराने खुर्द १. कसबे भिंगार १. मौजे पाटेगाव ।। मौजे हेरवाडी निमे १. मौजे जौरानेबुद्रुक १. कसबे पेडगांव १. मौजे मांडवे १. मौजे हेलोडे १. मौजे वाकोडी .*
- *सीयादत खान याजकडील जागीरीची पत्रे.*
  - *१. मौजे खमद निसबत रामाजी मल्हार*
  - *२. निसबत भगवंतराव राम कडेकर १. मौजे जाटदेवळे १. मौजे डोणगांव*
  - *३. मौजे पाटोदें परगणे पांडे पेडगांव निसबत फिरंगोजी निंबाळकर, कसबे खेड जलालपूर निसबत सदाशीव बाबाजी*

४. हिस्सा नारायणडोहो निसबत निळकंठ नारायण[१७]

वरील पत्रावरुन असे स्पष्ट होते की पेशव्यांनी मोगलांचा अहमदनगरवरचा अंमल काढून घेऊन आपला अंमल प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. त्यात ते उल्लेख करतात नबाब सलाबतजंग याचे बिघाडामुळे मोगलांकडील जहागीरीची जप्ती करुन त्यावर अंमल प्रस्थापित करण्याचे आदेश ते भगवंतराव कडेकर, जनकोजी शिंदे, नारोबाबजी नगरकर यांना देत आहेत. बहूतेक उदगीरच्या लढाईचे कारण याबाबींशी, व पेशव्यांच्या हालचालींशी संबंधीत असावे असे स्पष्ट होते.

इ.स. १७७० पासून १७७३ पर्यंतच्या काळांत नारोबाबजी धारवाड येथे सरसुभेदार म्हणून असल्याचा उल्लेख आढळतो. ते बंकापूर किल्ल्याचे किल्लेदार होते. या वेळी अहमदनगर किल्ल्याची जबाबदारी त्यांचा जेष्ठ चिरंजीव माधवराव ऊर्फ महादजी नारायण यांच्या कडे आल्याचे दिसते. नारोबाबजी यांचे नगरमधील सामाजिक, आर्थिक, धार्मिक कार्य हे पुढील प्रकरणात सविस्तर पणे अभ्यासणार आहोत.

२.१ थोरले माधवराव आणि अहमदनगर

थोरले माधवराव पेशवे आणि अहमदनगरचा संबंध तसा थोडाच आहे, पण तो महत्वाचा आहे. राक्षसभुवनाची लढाई, विठ्ठल सुंदर, राजकीय घडामोडी या मध्ये थोरले बाजीरावांचे काही मोडीतील पत्रे सापडली आहेत. काही पेशवा माधवराव खंड १ यामध्ये के.एन. साने, [वाड डायरी]यांनी प्रकाशित केले आहेत. त्यामुळे अहमदनगर आणि थोरले माधवराव यांची राजकीय माहिती जाणून घेणे येथे महत्वाचे वाटते.

माधव बल्लाळ यांचा जन्म १६ फेब्रुवारी, सन १७४५ रोजी सावनूर येथे झाला. त्यावेळी थोरले नानासाहेब मोहिमेच्या वाटेवर सावनूरला होते. सावनूरच्या नावासंबंधी लिहिलेल्या 'दिलेरजंगी' या पुस्तकात माधवरावांच्या जन्मासंबंधी उल्लेख आढळतो. माधवरावांची मुंज १४ फेब्रुवारी सन १७५२ रोजी झाली. माधवरावांचा थोरला भाऊ विश्वासराव पानिपतच्या लढाईत वीरमरण पावला. वडील नानासाहेब पानिपतच्या पराभवामुळे

धक्का बसून अकस्मात निधन पावले. यामुळे काहिशा अनपेक्षित व अपरिहार्यपणे पेशवापदाची जबाबदारी माधवरावांकडे आली.

माधवरावांना पेशवाईची वस्त्रे २० जुलै सन १७६१ रोजी मिळाली. याच वेळी नीळकंठ महादेव ऊर्फ आबा पुरंदरे यानां मुताहिकीची व सखारामबापूंना दिवाणगिरीची वस्त्रे देण्यात आली . कमी वयात मोठया साम्राज्याचा भार त्यांच्या अंगावर पडला तरी माधवराव डगमगले नाहीत. माधवरावांच्या स्वा-यांची नोंद पुढील प्रमाणे आहे. १. जाने. सन १७६२ उरळी २. नोव्हे. सन १७६२ घोडनदी ३. ऑगस्ट सन १७६३ राक्षसभुवन . [१८]

थोरले माधवराव अहमदनगरचा किल्लेदार गणेश विठ्ठल यांचे नाव सनद पाठवुन सांगतात की, गुलराज आणि आनंदराव वकील दिमत अबदाली यांजकडील उंटे व घोडी व बैल किल्ले अहमदनगर येथे ठेवले आहेत, त्यांस दररोज लाकडें वजन पक्के .।।०, गवत पुले सुमारे २००, एकूण वजन पक्के अदमण व गवत पुले दोनशें याप्रमाणें दररोज दहा पंधरा दिवस रोज पर्यंत देणे .[१९]

किल्ले अहमदनगर येथे भद्रगज नावाचा हत्ती आहे, तो आब्दाली शहास देविला असे: तरि राजश्री पुरुषोत्तम महादेव वकील यांजकडील कारकून येईल त्याचे स्वाधीन करुन पावलियाचे कबज घेणे म्हणू सनद .[२०]

वरील दोन्ही पत्रावरुन असे स्पष्ट होते दिनांक १४ जानेवारी १७६१ रोजी पानीपतची तिसरी स्वारी झाली. मराठयांचा मोठा पराभव झाला. यानंतर थोरले माधवराव यांच्याकडे पेशवे पद आले. अब्दालीचे हत्ती, घोडे, उंट यांची व्यवस्था नगरच्या किल्ल्यात काही दिवसांपूर्ती का होईना पण करण्यात आली होती. दुस-या पत्रातून असे स्पष्ट होते की एवढा मराठयांचा दारुन पराभव झाला तरीही थोरल्या माधवरावांनी भद्रगज नावाचा शिकवलेला हत्ती अब्दालीला भेट म्हणून दिला. तो अहमदनगरच्या किल्ल्यात त्या वेळेस होता हे ही स्पष्ट होते.

थोरले माधवराव मीरखान ठोके यांना आदेश देतात सरकार संगमनेर व सरकार दौलताबाद येथील मोगलाई अमलाच्या जप्तीस तुम्हाबरोबर फौज देऊन रवाना केले आहे.

त्यासाठी तुम्ही कामाविसदार सरकारामधील पाठवून महालाची जप्ती करायची आहे. तुम्ही स्वत: ती जप्ती करायची नाही. प्रजेशी गैरवर्तन करायचे नाही. जी काही जप्ती होईल ती सरकारात सादर करायची आदेश ते देतात.[२१]

सन १७६३,६४ चे पत्र किल्ले दौलताबाद निसबत उधो वीरेश्वर यांजकडे किल्ल्याचे भरतीस माणूस पाहिजे, त्यास किल्ले अहमदनगर पैकी शिपाई लोक असामी ३०० तीनशे असामी समागमे शहाणा माणूस देऊन सनद पोहचताच किल्ल्याकडे रवानगी करणें. म्हणोन गणेश विठ्ठल याच्या नावाने सनद पाठवली आहे. [२२]

राक्षसभुवन जवळ झालेल्या १० ऑगस्ट सन १७६३ च्या युध्दात पेशव्यांनी निजामाचा अक्षरश: दारुण परावभव केला. युध्दानंतर निजाम - पेशवे यांच्यात २५ सप्टेंबरला पैठणला झालेल्या तहानुसार निजामाकडून उद्‌गीरच्या तहाचा ६० लाख रु. आणि नवीन २२ लाख रु. असा एकूण ८२ लाखांचा मुलूख पेशव्यांना मिळाला. या वेळी प्रचंड हानी होऊन निजामाने पेशव्यांची इतकी दहशत घेतली की, निजाम खडर्याच्या लढाईपर्यंत [सन १७९५] मराठयांच्या वाटेला गेला नाही. निजामाचा विख्यात मुत्सद्दी विठ्ठल सुंदर परशरामी याच युध्दात मारला गेला. विठ्ठल सुंदर परशरामी हा अहमदनगर जिल्हयातील संगमनेर तालुक्यात कोतूळ येथील राहणारा.[२३] संगमनेर भागाच्या मामलेदाराचें काम करीत असत पण पेशवाईत नाना फडणीस यांच्याशी वैर आल्याने तो हैद्राबादच्या निजामाच्या नोकरीस दाखल झाला होता. थोरल्या माधवराव पेशवे हयांच्या रोजनिशीत उल्लेख येतो 'निजामअलीची लढाई जाहली. विठ्ठल सुंदर याचें शीर कापून आणिले'. हया दिवशी पेशव्यांची छावणी मौजै धोंडराई तर्फ देवराई परगणा बीड येथे होती. [२४]

सन १७७१ - ७२ हा काळ थोरल्या माधवरावांचा आजारपणात गेल्याचे समजते. यावेळी ते सिध्दटेक, कटोरे येथे मुक्कामी होते. त्यांना आतडयाचा क्षय होता. त्यामुळे त्यांना पोटदुखीच्या असहय वेदना होत. कोपरगाव बेटावर कचेश्वर येथे चंद्रग्रहणाचे मुहूर्तावर २३ ऑक्टोबर १७७१ साली त्यांनी सुवर्ण तुला केली. पुन्हा ९ जानेवारी ते ५ फेब्रुवारी, सन १७७२ पर्यंत माधवरावांचा मुक्काम सिध्दटेकला होता. हे मोठे गणेश भक्त होते. १८

नोव्हेंबर सन १७७२ साली त्यांचे थेऊर येथे श्रीगणपतीचे मंदिरातील ओसरीत देहावसान झाले. सौ. रमाबाई त्यांच्या सोबत सती गेल्या असा उल्लेख अनेक दस्तऐवजात सापडतो. [२५]

पेशव्यांच्या विरोधात कोळयांचे बंड

इ.स. १७६० मध्यें कोळयांनी अहमदनगरच्या काही भागात उठाव केल्याचे उल्लेख आढळतात. बहामणी राज्याचे अमलापासून कोळयांना अत्यंत महत्व होते व अशाच महत्वाच्या पदावर संगमनेर भागातील हिरोजी नाईक हा कोळयांचा पुढारी होता. त्याचा पुत्र जावजी हा पेशव्यांचे सेवेत होता पण त्याचे वडिल हिरोजी नाईक वारल्यावर त्यास वारसा देण्याचे जुन्नरचे सुभेदारानें नाकारल्यामुळे जावजीने पेशव्यांच्या विरुध्द बंड पुकारले. त्यामुळे पेशव्यांनी त्याचे कुटुंबास प्रतिबंधात ठेवले. जावजी याने डोंगरद-यांचा आश्रय घेऊन दरोडे घालण्यास सुरुवात केली. तेव्हा जावजीचा प्रतिस्पर्धी रामजी सावंत यांस पेशव्याने हाती धरुन जावजीचा काटा काढण्याचे ठरवले होते. पण जावजीनेंच उलट त्याचा व त्याच्या मुलाचा काटा काढला व आपण स्वत: राघोबादादा यांस मिळाला. राघोबाच्या मदतीनें जावजीनें पेशव्यांचे किल्ले व कांही प्रांत घेतले. त्यामुळे पेशव्यांनी दाजी नामक एका कोळयास हाती धरले. दाजीने प्रथम जावजीशी स्नेहाची बतावणी केली. दाजीचें हे ढोंग ओळखून दाजीचे व त्याच्या तीन मुलांचे जावजीने परिपत्य केंले.[२६] त्यामुळे पेशवे चांगलेच आडचणीत सापडले. इकडे जावजीही पेशव्यांचा कुटील डाव ओळखून अधिकच बेछूट बनला. पण तुकोजी होळकरांनी मध्यस्ती करुन जावजी यास शांत केले. राजूरच्या जवळील साठ गावांची सुभेदारी त्यास दिली त्यामुळे जावजी व पेशव्यांचे संबंध पुन्हा सुधारले. इ.स. १७९८ मध्ये जावजी त्यांच्याच स्वबांधवाचे हातून मारला गेला व कोळयांनी परत बंड पुकारले. त्याचे पुढारी गोविंदजी, मनाजी, बालोजी भांगरे असे होते. त्यापैकी बालोजी भांगरे अतोनात पुंडावा माजवून देशांत, कोकणांत सशस्त्र लुटमार करु लागला. पण जावजीचा मुलगा हिराजी यानें त्यास पकडून राजूर येथे तोफेचे तोंडी दिले. तथापी हें बंड न शमता बालोजीचा पुतण्या रामजी यानें अधिक नेटाने उठाव केला त्यामुळे पेशव्यांना त्यांचे पुढे नमतें घ्यावे लागून त्याला एक मानाची जागा द्यावी लागली. रामजीनें यापुढे मात्र राजनिष्ठ

राहून चांगली कामगिरी केल्याचा उल्लेख आहे. हे सर्व घडले ते अहमदनगरच्या संगमनेर, अकोले, राजूर, कळसुबाईच्या पर्वतरांगेत त्यामुळे या भागास आजही ऐतिहासिक महत्व आहे.[२७] इंग्रजांच्या काळात याच भागातील कोळी व भिल्ल या आदिवासी लोकांनी ब्रिटिश सत्तेच्या विरोधात अनेक लढे उभारले होते. त्याचे कारण म्हणजे या आदिवासी जमातींना पेशव्यांनी जे हक्क व अधिकार दिलेले होते ते पुढे ब्रिटिशांनी काढून घेतले त्यामूळे त्यांनी आपल्या हक्कासाठी ब्रिटिशांच्या विरोधात या भागात लढे दिलेले होते.[२८]

३.१ नाना फडणवीस आणि अहमदनगर

खडर्याची लढाई ११ मार्च १७९५

मराठयांचा पानिपतच्या लढाईत दारुण पराभव झाला. त्याचा गैरफायदा अनेक सत्ताधिशांनी घेतला. त्यातील एक म्हणजे हैद्राबादचा निजाम होय. या निजामानी अनेक वर्षे मराठयांना चौथाई व सरदेशमुखी नाकारली मराठयांच्या वर्चस्वास नकार दिला. त्याचे पर्यावसान खडर्याच्या लढाईत झाले. नाना फडणवीस, तुकोजी होळकर, दौलतराव शिंदे, नागपूरकर भोसले अशा सगळया मराठयांनी मिळून निजामाला चांगलीच धूळ चारली. ती अहमदनगरच्या मातीतच. मराठयांनी ही शेवटची लढाई जिंकली. या नंतर मराठा सैन्य कधी जिंकलेच नाही. या लढाईचा तळ अहमदनगरमधील जामखेड तालुक्यातील रत्नापूर, आपटी, बावी, लोणी अशा अनेक गावात होता. तर लढाईची प्रत्यक्ष व्यूह रचना याच शहरात रचण्यात आली. निजामाची रसद तोडण्यात आली. निजामानी ज्या किल्ल्याचा आश्रय घेतला होता. तो खडर्याचा किल्ला अभेद्य उंच टेकडीवर होता, परंतु मराठयांनी चारही बाजूंनी निजामास वेढले. त्याचे अन्न, पाणी बंद केले, शेवटी निजामाने ११ मार्च १७९५ रोजी लढाईस प्रारंभ केला. अवघ्या ११ तासात लढाईचा निकाल लागला. निजाम रणांगण सोडून पळाला अशी अफवा शत्रू सैन्यात पसरवण्यात आली. शिंद्याच्या फौजा, होळकरांच्या तोफा आणि भोसल्यांच्या तिरंदाजांनी निजामाची दाणादाण उडवली. परशूराम भाऊ पटवर्धन हा मराठयांचा सेनापती होता. तर नाना फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ही लढाई लढली गेली. हा मराठे शाहीतील शेवटचा विजय होता.[२९] याबाबत अधिकची माहिती निजाम - पेशवे

संबंध १८ वें शतक, कै. न. चिं केळकर स्मारक व्याख्यानमाला यामध्ये दिलेले माहिती खूप महत्वपूर्ण वाटते ते पुढील प्रमाणे

खडर्याची लढाई

जीत राष्ट्राचा अपमान सहन न झाल्यामुळे सर्व मराठे सरदार अखेरीस एकत्र आलेले दिसले अशी लढाई खडर्याची (ता.१७ मार्च १७९५) होय. नाना फडणिसांच्या कारस्थानाचा तो परमोच्च बिंदु व मराठयांच्या इतिहासातील एक संस्मरणीय टप्पा होय. मराठयांचे सर्व गुण, तसेच हिंदुचे सर्व अवगुण या युध्दांत दृष्टीस पडतात. कोणत्या कारणांमुळे हिंदु-मुसलमानांचा प्रश्न आपणांस सोडवितां आला नाही त्याचाही बोध आपणांस या युध्दांच्या फलश्रुतीने होतो.

निजामाशी नानाचा जो संबंध आला त्यांत मुख्य मध्यस्थ व सल्लागार हरिपंत फडके हा होता. हरिपंत हा वस्तुत: फडांतील कारकून, पण फडणिसांतर्फे स्वारीचे हिशेब तपासण्यासाठी पेशव्यांच्या स्वा-यांवर जाऊन जाऊन तो कारकुनाचा शिलेदार झाला तरी अखेरपर्यंत त्याला पंत हेच नामाभिधान चिकटले. त्याला कोणी कधी राव म्हटले नाही. सन १७५५ पासून त्याचे नाव फडांत आढळते. १७६१ साली तो राघोबादादा बरोबर निजामाविरुध्द हालचालीत हजर होता. नंतर माधवरावांच्या भोसलेप्रभृतींविरुध्द झालेल्या युध्दांत तो प्रामुख्याने नानाकडे युध्दाचे वृत्त लिहून कळवितांना आढळतो. यांतच त्याचा रुक्नुद्यौल्याशी परिचय होऊन निजामाच्या राजकारणाची त्यास माहिती झाली. पुढे नारायणरावाचा खून झाला तेंव्हा हरिपंतासच नानाने हाताशी धरले, अर्थात सवाई माधवराव राखण्याची जबाबदारी मुख्यत: याच दोन पुरुषांवर येऊन पडली व ती त्यांनी इमाने इतबारे पार पाडली. ही जबाबदारी पार पाडण्याची मुख्य मदार त्यांनी पेशव-निजाम सलोख्यावर अवलंबून ठेवली होती. या उपक्रमास त्यांना सर्वस्वी जबाबदार धरतां येत नाही, कारण त्याचा आरंभ थोरल्या माधवरावानेच केला होता. पण माधवरावाला जसा रुक्नुद्यौल्यासारखा मोकळया मनाने धीर करुन स्वतंत्र पायंडा पाडणारा दिवाण निजामाजवळ लाभला, त्याप्रमाणे या दोघांना मिळाला नाही. त्यांना मुषीर हा कुटिल, बोलण्यांत बोलणे नसणारा, हरदमख्याली

मध्यस्थ, निजामाच्या गळयांतील ताईत झालेला असा आढळला. मुषीर मूळ रुक्नुद्यौल्याच्या हाताखालीच वाढलेला असून त्यास निजामाच्या राज्याची संपूर्ण माहिती होती. तसेच या धाकटया निजामाच्या स्वभावातील व्यंगे त्याने पूर्णपणे जाणून घेऊन त्यावर कसा ताबा ठेवावयाचा याचे तंत्र अनुभवाने आत्मसात केले होते. १७५० ते १७८२ येथपर्यंत निजाम स्वत:च आपला कारभार वाटेल तसा करीत असे. या काळांत तो कामसू, हिकमती व आपला मनांतील विचार दुस-याला कळू न देता वागणारा असा होता. पण वयोमानाप्रमाणे व कदाचित जनानखान्यांतील ऐषआरामी जीवनामुळे त्याची मन:शक्ति, हुरुप व कार्यप्रवणता यापुढे ढिली पडली. यावेळी त्याची पन्नाशी उलटली असून तो दक्षिणच्या रजकारणांत मुरलेला असा वडील पुरुष होता. नाना व हरिपंत हे दोघेही त्याहून वयाने लहान होते व त्यांचा अनुभवही निजामाइतका नव्हता. आरंभी बापाजवळ व नंतर वडील भाऊ जो नासिरजंग त्याबरोबर निजाम त्रिचनापल्लीपर्यंत स्वारी करुन आलेला होता. त्याने इंग्रज, फ्रेंचांचे संबंध जवळून पाहिले होते. मोगल पातशाहीतून फुटून बाहेर पडलेल्या बहुतेक सुभेदारांनी आपल्या स्वातंत्र्यरक्षणासाठी परक्यांची मदत घ्यावयाची हे आपल्या वागणुकीचे आद्य सूत्र ठरविले होते. हिंदूंना सर्वच बाहेरचे तेवढे यवन, त्यांबद्दल प्रेम किंवा विश्वास निर्माण होणे शक्य नव्हते. पण मुसलमानांना ख्रिस्ती हे हिंदूंपेक्षा नेहमीच जवळचे वाटत व ख्रिस्त्यांनाही तसेच वाटे, कारण दोघांचाही धर्म मूळ यहुदी धर्मावर अधिष्ठित होता. आचार-विचार, पोशाख-रिवाज यांतही ते एकमेकांना जवळ होते. १८व्या शतकांतील हिंदुस्थानात राहणा-या अनेक गो-यांनी एतद्देशीय स्त्रियांशी लग्ने केली होती. त्यापैकी ब-याच स्त्रिया धर्माने मुसलमान असत. खुद्द मॅलेट पुण्यांत अशी एक बिबी घेऊन राहात होता. १७९३ साली "मालिटाची कन्या मेली" म्हणून महादजीचा सल्लागार भाऊ बक्षी त्याला भेटून गेला असा उल्लेख मेणवली दप्तरांत सांपडतो.[२८] एवंढच इंग्रज-मुसलमान किंवा फ्रेंच-मुसलमान ऐक्य हे स्वाभावसिध्दच होते. यावर तोडगा म्हणजे एका गो-याविरुध्द दुसरा गोरा उठवावयाचा एवढेंच होते. पण कोणत्या वेळी कोणाची मदत घ्यावयाची हे ठरविण्यास धूर्तता आवश्यक होती. तशी ती पेशव्यांना साधली नाही, असे इतिहासावरुन दिसते. बुसीच्या भयाने नानासाहेबांने इंग्रजांशी जवळीक

साधली. त्याचा फायदा क्लाइव्हने घेऊन ब्रिटिश राज्याचा पाया हिंदुस्थानांत घातला. याचे कारण पेशव्यांना पाश्चात्य राजकारणाची माहिती नव्हती. युरोपांतील राजकारणाचे चढ-उतार इंग्रज-फ्रेंचांच्या वागणूकीत कसे अनुस्थूत होते याची कल्पना हिंदवासियांना नव्हती. महादजी शिंद्याने पहिल्या इंग्रज-मराठे युध्दांत अनुभव घेऊन आपले धोरण धूर्ततेने बदलले व इंग्रजांना शह म्हणून डिबॉईनसारखे फ्रेंच सेनानी नोकरीस ठेवून आपली बाजू मजबूत केली. या उलट नानाने महादजीला शह म्हणून इंग्रजांचा आश्रय घेतला; टिपूशी वैर घेतले. साहजिकच त्यांच्या विचारसरणीचा पगडा नानांवर बसला. या बाबतीत महादजी अधिक सावध होता. इंग्रज हे हिंदी राजकारणांत या आधीच एक प्रबळ सत्ताधीश होऊन बसले असल्यामुळे ते निष्कंटक होतील असे काहीही करु नये असे महादजीने ठरविले होते. केंव्हा तरी एकदा इंग्रजांशी मराठयांना निकराचा लढा करावाच लागेल असे ठरवून त्याने फ्रेंचांना जवळ केले होते. याचे कारण त्याला आपल्या फ्रेंच नोकरांकडून युरोपांतील राजकारणाची चांगली माहिती मिळाली असावी, की जी नानाला नव्हती. म्हणूनच महादजीचा बेत टिपूला राखून निजामाला बुडवावे असा असल्याचा दिसतो. ही गोष्ट हरिपंत किंवा नाना दोघांनाही कळत नव्हती असे वाटते.

नानाची निजामाशी चाललेली सर्व बोलणी हरिपंताच्या सल्ल्याने व गोविंद कृष्ण काळयाच्या मध्यस्थीने चालू होती. या काळयाच्या वास्तविक योग्यतेसंबंधानेही महाराष्ट्रांत चुकीचा समज रुढ झाला आहे. हा जितका पेशव्यांचा तितकाच निजामाचाही हितकर्ता होता. चौथाई सरदेशमुखी वसुली हा व याचा हस्तक पिंगळे मिळून करीत असल्यामुळे यांचा स्वार्थ या राजकारणांत गुंतलेला होता. काही अंशी यांच्या कमकुवतपणामुळेच मुषीर वाढला. हरिपंताचा गोडवेपणा व नानाचा सौम्यपणा हेंहि याला कारण होते, तरी अखेर दोघेहि विटले. मरणापूर्वी एक महिना हरिपंताने जे शेवटले पत्र नानाला निजामाबाबत लिहिले त्यांत "काही ताळ राहिला नाही, नवाबांनी थोरपण काय केले ? सारे कार्यवादू आहेत, दौलांनी (मुषीरने) विनंती केली, निषेध नवाबांनी केला, शेवटी दौला बोलिले की "करुन चुकलो." हे उगेच राहिले. तेथे थोरपणाची गोष्ट कोठे राहिली ? दौला फार चढी लागले. हेही फार दिवस

टिकणार नाही. इतक्या लिहिण्यांत नवाबाची जात समजली. बिघाडाची बोलणी आहेत. आपली सावधगिरी आजपासून असावी, होळकर आणावे. फौज भाद्रपदमासी जमा व्हावी. दौलासारखा चांडाल नाही. ईश्वर लवकरच समाचार घेईल. पट्टणचे स्वारीची नालबंदी अजून निम्मे देणें आहे ती द्यावी व फौज जमा करावी." हे पत्र मे १७९४ चे असून तेंव्हापासून नानांची पत्रे सर्व सरदारांना व पथक्यांना पुण्यास येण्याबद्दल गेली. मुषीराचे निजामाच्या दरबारांतील वैरी त्याला कंटाळलेलेच होते. त्यांतील अजीमुद्दौला हा ऑक्टोबर १७९४ च्या अखेरीस निजामापासून दूर झाला. इंग्रजांच्या मध्यस्थीच्या बोलण्यांस नानाने कळविले होते की, आम्ही निजामावर हल्ला करु इच्छित नाही, तर आमच्या पैशांच्या वसुलीसाठी प्रत्यक्ष मुलखावर स्वारी करुन प्रजेकडून व स्थानिक अधिका-यांकडून आम्ही आमचा पैसा वसूल करु इच्छितो. त्याला निजाम आड आला तर मग मात्र आमचा नाईलाज आहे. या पवित्र्यामुळे अखेरपर्यंत दोन्हीही बाजू आपणांस युध्द कर्तव्य नाही असे म्हणत राहिल्या. वकील गोविंदराव काळे कायम निजामाजवळच बेदरच्या छावणीतच राहिला. हरिपंत मेल्यानंतर जानेवारी १७९५ च्या आरंभी निजाम बेदर सोडून उत्तरेकडे कमठाण्यास सरकला. येथे उत्तम आंबराई होती. इंग्रज वकील कर्कपॅट्रिक या वेळी निजामाच्या छावणीतच होता. पुण्यास अखेरची वाटाघाट करण्यासाठी जुलै १७९४ च्या शेवटी येऊन राहिलेले मीर आलम, रायराया रेणुराव व रघोत्तमराव हे मुषीराच्या बाजंदीपणामुळे फिके पडले होते, कारण अखेरचा तह करण्याचा अधिकार मीरआलमाला त्याने दिलाच नव्हता. ता. ४ जानेवारी १७९५ रोजी निजाम कमठाणे सोडून पुढे अडीच मैल सिकंदरपुरास सरकला. आता लढाई खेरीज दुसरा मार्ग उरलेला नाही असे निजामाचेही मत झाले असे इंग्रज वकील म्हणतो पण ते निजामाच्या या वेळच्या मनोवृत्तीचे विश्लेशण करतां खरे मानतां येत नाही. त्याची वृत्ती आंधळया धृतराष्ट्राप्रमाणे झाली होती. त्याला मुषीराचा लोभ सुटत नव्हता व दुसरीकडे पेशव्याचा प्रेमा ओढीतच होता. अजुनही जर नाना व मुषीर यांची ख-या मोकळया मनाने भेट होऊन बोलणे होते, तर युध्द टळण्याची शक्यता आहे असे मुस्तकीमुद्दौला या मुत्सद्यांचे मत होते, पण याला ज्याप्रमाणे रुक्नुद्दौल्याने तीस वर्षामागे

मनाचा हिय्या करुन आधी निरोप न पाठवितां एकदम पेशव्यांच्या डे-यांत जाऊन माधवरावांची भेट घेतली व एका बैठकीत गेली तीस वर्षे टिकलेला तह घडवून आणला, तसा हिय्या मुषीराने करावा असे मुस्तकीमचे म्हणणे होते, आणि हीच गोष्ट घडणे दुरभिमानामुळे व कुटिलपणामुळे अशक्य होते. याचाच परिणाम निजाम पुढे सरकण्यांत झाला. तारीख २२ जानेवारी १७९५ रोजी त्याचा मुक्काम मांजरा नदीच्या तीरी बोलीगांव येथे बेदरच्या पश्चिमेस ६६ मैलांवर होता. निजामाचा वडील मुलगा अलिजाबहादर हा निजामाबरोबर नसून मागे हैदराबादेस होता व त्यावर निजामाची मर्जी नव्हती. दुसरा मुलगा पोलादजंग (सिकंदरजाह) हा मुषीराचा जावई असून निजामानंतर तोच गादीवर येईल अशी सामान्य समज होती. तोही या प्रकरणांत मध्यस्थी करु पाहात होता.[३१] मुषीराने त्याच्या मध्यस्थीने सला होत असेल तर जरुर होऊ दे, मला मान्य, असेही गोविंदरावाजवळ म्हटले. पण याबाबत नानाची परवानगी मिळाली नाही. गोविंदराव काळयाने गेल्या नोव्हेबरांतच, बीडास दोन हजार फौज पाठवून व तेथील गावोगावचे पाटील धरुन आणून नगरांत ठेवावे आणि मामूलप्रमाणे वसुली घ्यावी असा बेत सुचविला होता व त्यांत त्याचा हेतु ही बातमी निजामास आल्यावर तो पुढे कसा वागतो ते पाहण्याचा होता. पण ही गोष्टही नानाकडून घडली नाही. नानाने फौजा बोलावल्या होत्या त्या हळूहळू जमू लागल्या. निजामाचे सैन्य या वेळी सुमारे लाखांच्या घरांत असून त्यात घोडदळ व पायदळ यांची संख्या जवळ जवळ सारखीच होती तरी त्यांच्या लष्करात मुसलमान बहुसंख्य होते. जागीरदारांच्या माणसांत रावरंभा, कल्याणराव व भवानराव निंबाळकर, तेजसिंग, पद्मसिंग व जोधसिंग खंदारकर, दारकोजीराव पाटणकर, साबाजी घाटगे, चडचणकर शिंदे, रुस्तुमराव पांढरे, मानसिंगराव हाके, शंकरराव भोंग, विठ्ठल सुंदरचा नातू चिमणाराजे, रायरायां, रघोत्तमराव, त्रिमलराव, नारायणराव वैशंपायन व खुद्द गोविंदराव कृष्ण काळे, याखेरीज या युध्दासाठी नवीन म्हणून राजे रामचंद्रराव मुंगीकर, भारामल, शिवबाळा हजारी नागपूरकर हेही जमा झाले होते. पण यांच्या ताब्यांतील फौजेची संख्या पांच सात हजारांपेक्षा जास्त नव्हती.[३२] मुसा रेमू व मुसा पेरु यांच्या हाताखाली दहा हजार नवीन कवायती फौज असून ती जवळ जवळ शिंद्याच्या कवायती

फौजांप्रमाणे तयार होती. असे म्हणावयांस हरकत नाही. बाकी फौज अतिशय भोंगळ, शिस्त व हुरुपही नसलेली अशी होती. त्यांत अल्ली आसदअल्लीखान बैगणपल्लीवाला, सुभानखान, अलफखान करनूळवाला व अमीनखां अरन हे आघाडीचे व विशेष हिमतीचे समजले जात व त्यांच्यावरच निजामाची व मुषीराची मुख्य मदार होती. धौशाचा मुलगा येतेशामजंग, व-हाडांतील सलाबतजंग व वजीरखान हेही विशेष नामांकित समजले जात. यापैकी आसदअल्लीखान, सुभानखान, अलफखान, सुभानखान, अलफखां व अमीनखां यांना निजामाने डिसेंबरच्या आरंभीच नळदुर्गाकडे पाठविले होते. त्यांनी नळदुर्गापासून बार्शी-परंडयांपर्यंत धूम उठविली. ही टोळी मुख्य सैन्यापासून दुसरीकडे पाठविण्यांत निजामाचा हेतु असा होता की, आपण कोठे जात आहो व आपल्या सैन्याचा रोख खरा कोठे आहे याबद्दल मरांठयांचा गोंधळ व्हावा व त्याप्रमाणे पेशवे थोडे साशंक झालेच. तुकोजी होळकर इंदुराहून येत होत त्यास येतां येतां दिवाळी झाली तरी त्याचे तापीतीर सुटले नव्हते. तुकोजी हा बारभाईंच्या कारस्थानापासून नाना व हरिपंत यांनी महादजी शिंदयांस शह म्हणून सांभाळलेला सरदार होता. महादजी दक्षिणेंत आल्याबरोबर लाखेरीच्या लढाईला महादजीच्या सरदारांनी होळकरांचा पराभव करुन त्यांचा नक्षा पार उतरविला होता तरी अजून नानाचा पाठिंबा त्याला होता व म्हणूनच नानाने त्याला दक्षिणेत बोलाविले होते. त्याच्या बरोबर त्याचा वडील मुलगा काशीराव व सरदार बापू होळकर होते. त्यांच्याजवळ थोडी कवायती फौजही होती. पण तुकोजी अलीकडे वृध्दत्वामुळे व व्यसनांमुळे अगदी बेजार झाला होता असे दिसते. मनाचा निग्रह नसल्यामुळे त्याच्या कारभारांत एकसुत्रीपणा राहिलेला नसून त्याचा विश्वासही कोणावर नव्हता. तरी त्याला देवराव हिंगण्याने जरब दाखवून कोणतीही गोष्ट अवलंबून ठेवण्याची सोय नव्हती. दौलतरावाच्या हुकमाप्रमाणे जिवबादादा बक्षी उज्जयिनीहून निघून जानेवारीत पैठणापर्यंत आला. त्याच्याबरोबर पेरुच्या हाताखाली तेवीस पलटणे असून त्यांची तयारी अव्वल दर्जाची होती. देवजी गवळी याच्या हाताखाली १५००० स्वार असून तो या वेळी बीड जिल्हयांत धुमाकूळ घालीत होता. त्यांच्या बरोबर सुमारे दहा हजार पेंढारी मुद्दाम उत्तरेतून दक्षिणेंत नानाच्या हुकमाने आणविले होते. प्रत्यक्ष राज्यांचे युध्द जुंपले असे न

म्हणता विरुध्द बाजूला युध्दापूर्वीच हैराण करण्यास हया पेंढा-यांची पुंडाई उपयोगी पडे. या पेंढा-यात हिंदु-मुसलमान असा भेद नव्हता. त्यांना सरकारकडून थोडा पण नियमित पगारही ठरलेला असे. लुटीचा ठराविक हिस्सा त्यांना मिळून बाकीचा सरकारजमा होई. याखेरीज सरकारला त्यांना नियमित खंडणीही स्वत:च्या मजुरीबद्दल दयावी लागत असे. हे पेंढारी इतके बेभरवशे असत की, त्यांना आपले, परके असे काही नव्हतेच. खुद्द पेशव्यांचे जासूद हेर व प्रसंगविशेषी शिलेदार सरदारसुध्दा त्यांजकडून लुटले जात व त्यांच्या तक्रारी सदा चालू असत.[३३]

जिवबा ४ फेब्रुवारी १७९५ रोजी वांकीनजीक मिरजगांव येथे सीनातीरी दाखल झाला. त्याने ८ तारखेस दौलतरावाची व ११ तारखेस पेशव्याची भेट घेतली. याच वेळी रघुजी भोसलेही १५००० फौजेसह लष्करांत येऊन दाखल झाला. नानांच्या आज्ञेप्रमाणे दक्षिणेकडून पटवर्धन सरदार नोव्हेंबर महिन्यांत पुण्यांस दाखल झाले. त्यांच्याबरोबर चिंतामणराव सांगलीकर, रघुनाथराव कुरुंदवाडकर, जनोबा यादवाडकर, विठ्ठल मिरजकर, सदाशिवराव मंगळवेढेकर व इतर भाऊबंद हजर होते. तसेच खंडेराव विठ्ठल विंचूरकर, रंगराव त्रिंबक राजेबहाद्दर, गोपाळराव पागे हेही याच वेळी भांबवडयास डेरेदाखल झाले. पेशव्याकडे या वेळी इंग्रज सरदारांच्या हाताखाली कवायती पलटणे तयार होत होती, पण त्यांची कवाईत अजून पुरी झालेली नव्हती. दौलतराव शिंदे नोव्हेंबरच्या मध्यास डेरेदाखल झाला व बाबा फडके (हरिपंत तात्यांचा व्दितीय पुत्र) हा ता. १८ नोव्हेंबर रोजी सैन्यांत जाऊन तेथील कारभार त्याने स्वत:कडे घेतला. खडर्याच्या स्वारीत पेशव्यांच्या हुजरातीचा हा रामचंद्र बाबा फडके आजच्या भाषेत Adjutant General होता. त्याच्या हुकमाने व परवानगीने इतर फौजेने चालावयाचे होते. ८ डिसेंबर १७९४ रोजी नाना फडणीस गारपीरांच्या मुक्कामी तंबूत रहावयास आले. रंगराव राजेबहाद्दर यांचे घोडदळ व राघोपंत गोडबोल्याचे गारदी हे नानाच्या रक्षणास दिले होते. अखेर ता.१४ डिसेंबर रोजी पेशवे परशुरामभाऊसह सैन्यात हजर झाले. पेशव्यांची व तुकोजी होळकरांची भेट ता.१६ डिसेंबर रोजी झाली. यावेळी शेलूकर यास नव्याने सरदारी वस्त्रे देण्यांत येऊन तो पेशव्याच्या सैन्यांत

दाखल झाला. पेशवे प्रथम खडकीवर जाऊन तेथून येरवडयास व तेथून पुढे वडगावास व नंतर थेऊरास गेले. मराठयांची सैन्ये मुळामुठेच्या दक्षिण-उत्तर बाजूने ज्याच्या त्याच्या सोयीप्रमाणे पुढे चालली. या वेळी दररोज कूच मुक्काम होत नसून काही ठिकाणी बरेच दिवस तळ पडे. मकर संक्रांत थेऊरासच होऊन नंतर ता.१२ जानेवारी १७९५ रोजी पुढे कूच झाले. तेथून नांदेड व करवुंब व नंतर साळूमाळूचे पारगांव व वाळकी या वाटेने पूर्वेकडे चालले. परशुरामभाऊ पटवर्धन नदीच्या उत्तर बाजूने कोरेगांवावरुन पुढे चालला. नंतर भीमा ओलांडून मांडवगण येथे मुक्काम झाला. नंतर घोडनदी ओलांडून काष्टी तांदळी या मार्गे श्रीगोंदे तालुक्यात सैन्य चालले. पेशवे, शिंदे व होळकर हे जवळ जवळ राहून सैन्य पुढे सरकू लागले. या वेळी सैन्याचा तळ तीन कोस पडत असे. यावरुन लष्कराच्या मांडणीची कल्पना येईल.

यापूर्वीच पेशव्यांची हुजुरात सीन नदी ओलांडून जामखेड तालुक्यांत मुक्काम करुन राहिली होती. ता.३० जानेवारी १७९५ रोजी येथे महादजीपंत बेहरे व रास्ते आपल्या अडीच हजार फौजेसह येऊन मिळाले. दरेकरांचे पथक यानंतर आले. मोगलाईतून जयवंतराव देशमुख कळंबकर हा पांडुरंगराव बारामतीकरांच्या मध्यस्थीने पेशव्यास येऊन मिळाला. असेच भापकर, देवजी कोळी, विनायकपंत परांजपे हा गाडद्यांचा सरदार, हे येऊन मिळाले. या वेळीही सैन्याची रीत नेहमीचीच होती. हुजरातीचा मुख्य तळ घोडेगांव येथे खडर्याच्या पश्चिमेस आठ मैलावर पडला. शिंदे उत्तरेकडे सहा कोसांवर खांडवीमांडवी येथे ओढयाच्या पाण्यावर असून त्यांच्या सैन्याने तो गांव झाडून लुटला. घराची लाकडे लष्कराच्या लोकांनी जाळण्यास आणली. या वेळी हैबतराव चव्हाण बिडाकडून पेशव्याच्या छावणीकडे येत होता त्याला देवजी गवळयांच्या लोकांनी वाटेत लुटून त्याचे सोळा घोडे नेले. छावणीत हरभ-याची टंचाई झाल्यामुळे घोडयांची चंदी १ फेब्रुवारीपासून निम्मे करण्याची पाळी आली. सीनेच्या काठी घुमरी पिंपरी येथे सैन्याच्या हजि-या व गणत्या घेण्यात आल्या. बाबा फडक्याजवळ कारभारी परशुराम चक्रदेव, चिमणाजीपंत लेले व आपाजी गोपाळ फडतरे हे होते. हणमंतराव आटोळे व बळवंतराव सुबराव हे पथके येथे सैन्यात आले. सैन्याच्या

भयाने गांव पळाले. गांवची घरे मोडून लष्करांत आणण्याचा तडाखा चालला होता. होळकरांच्या पेंढा-यांनी सहा गांव लुटले. चार फेब्रुवारी रोजी ग्रहण होते त्यानिमित्त स्नानादी प्रकार छावणीत झाले. या वेळी या भागांत लष्कराबाहेर कोणीही निघू शकत नव्हता. बेदडयांचा उपद्रव चालूच होता. कृष्णाजीपंत लिमये त्यांनी लुटला. सिध्दटेकाहून येतांना पेंढा-यांनी शिलेदाराचा ओझ्याचा बैलच पळविला. अशा गोष्टी पेशव्यांच्या मुलखांतच घडत होत्या हे लक्षांत ठेवल्या पाहिजे, म्हणजे नानाच्या कारकीर्दीतही किती शिस्त राहू शकत होती याचा अंदाज येऊ शकतो.[३४] लष्करांतील हजेरीत व गणत्यांतही लबाडी चाले. एका पथकांतील सैन्याची हजेरी झाल्यावर तेच लोक दुस-या पथकात जाऊन उभे राहात व अशा रितीने त्याची भरगणती होण्यास मदत करीत. त्यामुळे चेहरेवार गणती घेण्याचा उपक्रम झाला, म्हणजे हजेरीच्या नावाप्रमाणे व्यक्तीच्या चेह-याची ओळख पटल्याखेरीज त्याची गणती मंजूर होत नसे. अशा प्रकरणामुळे नामत: दिलेली लष्करांतील पथक्यांची बेरीज किती बरोबर असेल हे सांगणे नेहमीच मुष्किलीचे होते. बाबा फडक्याजवळ या वेळी दुर्बीण आहे व तिचा उपयोग तो एक कोसाच्या टापूतील प्रदेश पाहण्यास करु शके असे वर्णनावरुन दिसते. पेशवे, नाना, फडके, शिंदे, भोसले, होळकर प्रभूती बडया लोकांसाठी पुण्यापासून दूरवरुन भाजी, द्राक्षे, अंजीर, पेढे, बर्फी वगैरे वेळोवेळी येत होती. लष्करांतही सरदारांचे देव बरोबर असत. त्यांचे पुजारी ब्राम्हणही असत व दौलतरावासारखा तरुण सरदारही देवपूजा करतांना आढळतो. मग पेशवे, नाना वगैरेचे सांगावयासच नको.[३५]

निजामाचा मुक्काम ४ फेब्रुवारीपर्यंत बुरगांव येथे असून त्याच्या सैन्याच्या तुकडया मांजरेच्या दक्षिणतीरी जरुरीप्रमाणे हालचाल करीत होत्या. त्यापैकी एका टोळीने जोगाईच्या आंब्यास जाऊन तो क्षेत्राचा गांव लुटला. "तेरा कुटुंबे ब्राम्हणांची यांनी आपल्या घरांत बसोन घरास आग लावून दिली. विसा ब्राम्हणांनी जिव्हा उपडोन मेले. काही बायका धरुन नेल्या त्या बाटविल्या. बार्शीची पेठ लुटली." असे पत्र बारामतीस आले. निजाम या वेळी दक्षिणेस धारुराजवळ पारगांवास मांजरातीरी होता. पेंढा-यांचा उपद्रव फारच झाल्यामुळे बीड, नगर व सोलापूर या भागांतील लोक गडबडून गेले. वरील बातमी खरी असावी असे थत्ते

सावकारांच्या नानास आलेल्या पत्रांवरुनही दिसते. या बातमीमुळे आता लढाई टळत नाही असे ठरुन त्या दिशेने हालचाली सुरु झाल्या. याच वेळी निजामाने ता.१६ फेब्रुवारी रोजी पारगांवच्या आपल्या छावणीत एक फौजेची पाहणी करुन आपल्या बलाढयपणाचा देखावा गोविंद कृष्ण काळयास दाखविला. काळे वकील व मुषीर दोघेही निजामामागे अंबारीत खवासीत बसले होते. इंग्रजांचा वकील कर्कपॅट्रिक याच्या मते या गोष्टीचा इष्ट तो परिणाम होऊन काळयाने नानास निजामाच्या तयारीबद्दल लिहिले. नानाने असे कळविले होते की, निजामाने पुढे येऊन मोहरीचा घाट उतरु नये, उतरल्यास ते लढाईस आव्हान असे समजण्यात येईल. म्हणून गोविंदरावाने एक नवीनच मार्ग काढला, त्याने निजामाला सुचविले की, निजामाने पश्चिमेस सीनानदीकडे न चालतां उत्तरेस गोदावरीच्या कांठास चालावे. तिकडून पेशवेही तसेच उत्तरेस सरकून मुंगी पैठणास येतील व निजाम शहागडास राहून चौदा कोसांवर असणा-या पेशव्याशी पाण्याचा तुटवडा न पडता बोलणी चालवू शकेल. या हालचालीमुळे निजाम परिंडयांच्या वाटेने पुण्याकडे जाईल ही भीती नाहीशी होऊन बोलाचालीही जास्त सुगमतेने होतील. या गोष्टीस मुषीरचीही आडकाठी नव्हती. कर्कपॅट्रिकला कळले होते की, मुषीराचा या वेळी परशुरामभाऊ व दुसरे मराठे सरदार यांच्याशी नानाखेरीज पत्रव्यवहार चालू होता. त्यातून काही वेगळे वळण बोलाचालीस लागून बरे निघेल अशी आशा काहीजणांस वाटत असावी. पण गोविंदरावाची ही सूचना अमलांत आलेली दिसत नाही. निजाम पारगावास १४ फेब्रुवारीपासून ३ मार्चपर्यंत राहिला. तोपर्यंत काय बोलाचाली झाल्या, याचा अंदाज नीटसा होत नाही, पण लढाईनंतरच्या हकीकतीत म्हटलेले आहे. त्याकडे पाहतां मुषीराचे वर्तन व त्याबद्दल अविश्वास हाच मुख्यत: लढाईस कारणीभूत होता असे म्हटले पाहिजे. मुषीराने मारेकरीही पाठविले. पुण्यात झेंडे लावण्याची बढाई ठोकली. पेशव्यांना नर्मदापार करु असे भर कचेरीत तो बोलू लागला. पेशवे नानांची सोंगेही तमाशांत आणण्यांत आली, अशा त-हेच्या ज्या वार्ता प्रचलित आहेत त्या पाहतां, असे आहे तर जाऊ दे एकदा होऊन, असे नानानेही मनांत आणलेले दिसते. त्याच्या सुदैवाने या वेळी सर्व मराठे सैन्य छावणीत एकत्र आलेले होते. शिंदे होळकर, भोसले, गायकवाड, प्रतिनिधि, घोरपडे, पटवर्धन प्रभूती

बहुतेक सर्व मराठे वेगवेगळया कारणांसाठी का होईना, एकत्र जमलेले होते. शिंद्याबद्दल सुरुवातीस खात्री नव्हती. पण तोही एक कंपू घेऊन आघाडीस येऊन राहिला होता. त्यामुळे निजामाकडील चेमूच्या गाडद्यांची भीती मराठयांत उरली नव्हती. जर शिंदे नसते तर लढाईचे स्वरुप काय झाले असते याबद्दल शंकाच आहे.[३६]

'युध्दस्य कथा रम्या' हे वचन कोणता हेतु मनांत धरुन मूळ लेखकाने लिहिले न कळे. पण युध्द होण्यापूर्वीच जे प्रकार या भागांत घडत होते ते पाहिले म्हणजे युध्दाचा हा प्रकार रामदासांनीसुध्दा तामसी गुणांत का घातला आहे याचा बोध होतो. जानेवारी आणि फेब्रुवारी या दोन महिन्यांत हा सर्व प्रदेश उजाड बनला होता. श्रीराम सदाशिव बातमीदार जानेवारीच्या अखेरीसच लिहितो की, "अष्टी, जामखेड, खर्डे व खेरीज लहान गांव उजाड जाले. डाक बसावयास वस्ती नाही. मधे मोगलांचे गांव उजाड जाले. आणखी उजाड होत जातात. कडेवळीतांत देवजी गवळी याचे पेंढारी यांणी बहुत उपद्रव केला. माणसे मारली, ब्राम्हण मारले, गांवचे बाजार लुटले. त्यांस ताकीद काडीमात्र नाही... रघोजी भोसले मानवतास येऊन लाख रुपये खंडणी येऊन पाथरीस वेढा घातला. येथील भागांतील लोकांची काय स्थिती झाली असेल याची यावरुन कल्पनाच करावी. निजामाच्या फौजेने जोगाई भ्रष्टविली म्हणावे तर तोच प्रकार शिंद्याच्या पेंढा-यांनी रायमोहो हा बीड परगण्यांतील गांव लुटताना केला. या पेंढा-यांत रोहिले मुसलमान बहुसंख्य असत आणि ही गोष्ट खडर्याच्या लढाईनंतर झालेली आहे हेही लक्षांत ठेवण्यासारखे आहे. म्हणजे शत्रुचा नायनाट करण्यासाठी म्हणून जे आपलाच मुलूख जाळण्यांचे युध्दतंत्र महाराष्ट्रांत एक शतकांपूर्वीच सुरु झाले होते, तो प्रकार पुढेही तसाच सतत चालू राहिला असे दिसते. मराठयांच्या स्वा-यांचे हिंदुस्थानावर काय दुष्परिणाम झाले व ठिकठिकाणच्या स्थानिक रहिवाश्यांचे मत मराठयांबद्दल अनुकूल कां राहिले नाही, याचा विचार करावा लागेल.

मार्चच्या आरंभी निजाम पारगांवास होता, त्याचे गारदी व स्वार पश्चिमेस मोहरीच्या घाटावर पेंढा-यांना तोंड देत पहा-यावर असता, सिद्दी इमाम हा निजामाचा दूत गोविंदराव काळयाकडे नेहमीच उभा असे. सल्ला करावा असे त्याचे बोलणे होते. लष्कराचा मुक्काम

पुढे हलवावयाचा की नाही याबद्दल पुण्याच्या पत्राची वाट निजाम पाहात होता, पण पत्र येण्यासारखे आता काही उरलेच नव्हते. गोविंदरावाने स्पष्ट सांगितले की, "कूच करणे किंवा मुक्काम याविषयी आम्ही काहीच म्हणत नाही आणि म्हणणारही नाही. जशी तुम्हांस सलाह वाटेल तसे करावे. आमचा प्रतिबंध किदापि तुम्हांस नाही. पत्रास जबाब तुम्हांस पावे तोपर्यंत नवाबाचा मुक्काम तेथेच असावा अशी खावंदाची आज्ञा आम्हास आली नाही. आमचे बोलण्याची प्रतीक्षा तुम्ही करु नये " तेंव्हा मग निजामाची फौज पुढे चालू लागली. ३ मार्च रोजी निजामचे लष्कर मोहरीचा घाट उतरु लागले व निजामाने स्वत: त्यामागोमाग जाण्याची तयारी केली. रुसून गेलेला निजामाचा सरदार अजीमुद्दौला याची भेट यापूर्वी नुकतीच पेशव्याने जाहीरपणे घेतली होती, व गोष्ट निजामाला साहजिकच सूचक वाटती. ता.४ रोजी निजाम मोहरीचा घाट उतरुन तेलंगसी व मोहरी या गावांमध्ये त्याने मुक्काम केला. त्याच्या आघाडीस तेजवंत भारामल तीन मैलांवर असून त्यांचे व शिंद्याचे लष्कर यामध्ये ९ मैलाहून जास्त अंतर उरले नव्हते, याच जागेहून परांडयाचा किल्ला दक्षिणेस २० मैलांवर असून खडर्याची गढी वाटेवर पांच मैल दूर होती. यावेळी इंग्रज वकिलाजवळ रेनेलचा १७९१ साली केलेला हिंदुस्थानचा नवा नकाशा असून त्यावरुन तो युध्दक्षेत्राची माहिती देतांना आढळतो.[३५] निजामाची समजूत पेशवे आपणावर ताबडतोब हल्ला करतील अशी होती. पण होळीचा दिवस असल्यामुळे मराठयांनी तारीख ५,६ मार्च रोजी काही हालचाल केली नाही. ता.७ रोजी निजाम स्वत: लाढाईच्या तयारीने उभा होता. या वेळी परशुरामभाऊ व बाबा फडके व जिवबादादाची एक तुकडी पुढे येऊन त्यांची निजामाच्या आघाडीशी झटपट झाली. मराठयांनी दुरुन तोफाही सोडल्या.

येथे खर्डे या गांवाची थोडी माहिती देणे आवश्यक आहे. हा गांव जामखेड तालुक्याच्या अगदी पश्चिम सीमेवर असून तेथे सुलतानजी निंबाळकराची एक जुनी गढी गांवाच्या उत्तरेला एका टेकाडावर आहे. ही गढी औरंगजेबच्या कारकीर्दीत मराठयांनी मोगलांचा मुलूख व्यापण्याचा जो पध्दतशीर उपक्रम केला होता असे खाफीखान वर्णितो त्या काळांत, कदाचित् सुलतानजीचा बाप हैबतराव याने, बांधली असावी. या गढीच्या उत्तरेस

पाऊण मैलावर नदीपलीकडे कान्होबाची टेकडी सुळक्यासारखी मधेच पठारावर उभी असून तिची उंची सुमारे दोनशे फुट आहे. तिच्या उत्तरेकडून मोहरीच्या घाटांतून येणारा रस्ता जातो व पलीकडच्या पांच मैलांवर तेलंगसी आहे. या डोंगरावर पूर्वीचे हेमांडपंती देऊळ असून त्याची मशीद बनविली आहे. खर्डे हा गांव तटाच्या आंत असून त्याला वेशी आहेत. गांवच्या दक्षिणेकडील पठारावर सुलतानजीने सन १७४३ मध्ये नवीन दगडी किल्ला बांधला. त्याला पूर्वी एक पडकोट व खंदक होता. आता तो बहुतेक पडला असून आंतील किल्ला तेवढा अजूनही शाबूत आहे. किल्ला आसमंतातील दहा मैलांत त्याच्या काळया भिंतीमुळे कोठूनही दिसू शकतो. निजाम ता.११ मार्चच्या चकमकीनंतर ज्याच्या रात्री आश्रयास गेला तो हाच किल्ला, गावातील गढी नव्हे. गॅझेटियरने या गढीची दखलही घेतलेली नाही, पण तीही मोठी उठावदार दिसते. मात्र आता तिच्या विटा लोक पळवीत असल्यामुळे ती पडीक झाली आहे. ताराबाईच्या कारकीर्दीत मराठयांनी व्यापलेला हा मुलूख पुन: कायम निजामाच्या राज्यांत गेला ही करुणकहाणी हे नवे-जुने अवशेष पाहिल्याने मनांत ठसते. खर्डे गांवच्या उत्तरेस जी नदी आहे म्हणून लिहिले ती खैरी नदी नसून तिला मिळणारा एक नाला आहे, पण त्यालाही पाणी असते. नदी व कान्होबाचा डोंगर यांच्यामध्ये ओंकारेश्वराचे भव्य देऊळ , त्यासमोर भव्य बारव व जवळच निंबाळकरांच्या छत्र्या आहेत. या सर्व गोष्टी आज शाबूत आहेत यावरुन या युध्दांत गांवाला उपसर्ग लागलेला नसावा. लढाईला खडर्याचे नांव मिळाले असले तरी युध्दांतील मुख्य चकमक खडर्याच्या नैर्ऋत्येस खर नदीपलीकडे असलेल्या सात मैलावरील एका टेकाडावर झाली. ही टेकडी आता रणटेकडी या नांवाने प्रख्यात असून सभोवतालच्या प्रदेशांत ती दूरवर उंच दिसते. मराठयांच्या आघाडीच्या फौजेचा तळ खडर्याच्या पश्चिमेस आठ मैलावर घोडेगांव व वाघे या दरम्यान कनारी नदीच्या वळणांत होता. याच्या इशान्येस दोन मैलावर पिंपळगांव आळवे येथे त्याच नदीच्या वरील पाण्यावर शिंद्यांच्या फौजेचा तळ होता. भोसल्यांचे सैन्य घोडेगांवच्या दक्षिणेस जवळके येथे पांच मैलांवर होते. ता.९ मार्च रोजी निजाम तेलंगसीहून कूच करुन खैरी नदीच्या पश्चिम काठाने खाली सरकून खर्डे व घोडेगांव यांच्या मध्यावर लोणी ते वाकी यांच्या दरम्यान येऊन उतरला. त्यावर पेशव्यांच्या

फौजा जाऊन थोडी लांबून गोळागोळी होऊन संध्याकाळी पेशव्यांच्या फौजा मागे मुक्कामावर परत आल्या. निजामाचा बेत खाली दक्षिणेस परंडयाच्या किल्ल्याच्या आश्रयास जाण्यास होता. त्याला तेथे पोचण्यापूर्वीच नेस्तनाबूत करण्याचा मराठयांचा डाव ठरला ता.११ मार्च रोजी पहाटे निजामांचे सैन्य लोणीहून कूच करुन पध्दतशीर दक्षिणेकडे चालले त्या वेळी सेनापती परशुरामभाऊ पटवर्धन तरडगांवच्या पश्चिमेस व आजच्या दोंडेवाडीच्या नैऋत्येस मैलाच्या आंत असलेल्या रणटेकडीच्या आडोशास निजामावर कसा हल्ला चढवावा याची टेहळणी करीत उभा होता. त्याला निजामाचे सैन्य दिसणे शक्य नव्हते, अशीच सखल ती जागा आहे. परशुराम भाऊचा बेत टेकडीवर तोफा चढवून पूर्वेकडे निजामाच्या चालल्या फौजेवर मारा करण्याचा होता पण यापूर्वीच निजामाला बातमी लागल्यामुळे की काय कोणास ठाऊक, त्यांचे आघाडीचे सैन्य त्वरेने उजवीकडे सरकून परशुरामभाऊच्या छोटया तुकडीवर येऊन त्याने अकस्मात हल्ला चढविला.[३८]

ता.१२ मार्च रोजी सकाळी निजाम खडर्यास परत गेला ही खात्री होतांच मराठे नदी ओलांडून पुढे सरले व त्यांनी बाजारबुणगे लुटले, तोफा व दारुचे छकडे तसेच घोडे, उंट व थोडे हत्ती हेही लुटीत आले. आता मराठयांची आघाडी खडर्यापासून एक मैल ते दोन मैल या दरम्यान मधील एका ओढयावर आली. खडर्याची रचनाच अशी आहे की, उत्तर, पूर्व व दक्षिण बाजूस टेकडया आहेत व पश्चिमेच्या बाजूस मराठयांनी अर्धचंद्राकृति रचना करुन त्यांचा बाहेरच्या जगाशी संबंध तोडला. या पहिल्या दिवशीच्या धक्क्यानेच तिसरा हिस्सा लोक सैन्यातून निघून गेले असावे. निजामाच्या बारा तोफा, सुमारे ८० दारुचे पेटारे व पांचशे छकडे मागे टाकलेले मराठयांस आढळले. मेलेल्या लोकांची संख्या दोनशेवर नसावी. जखमी हजार पांचशे,या युध्दांत लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट अशी की, खुद्द पेशवे व नाना फडणीस, तसेच दौलतराव शिंदे, तुकोजी होळकर व रघोजी भोसले हे सर्व रणांगणावर युध्द करण्यास कधीच पुढे आले नाहीत. मागील छावणीत दहा मैलांपलीकडे राहून ते नुसती बातमी ऐकत बसले होते. एवढा फरक यावेळी मराठेशाहीत पडला होता ! नानासाहेब पेशव्यापासून हा नवा पायंडा पडत गेला, तरी माधवरावाच्या कारकीर्दीत तो स्वत: आघाडीस राहिल्यामुळे इतरांसही

फारशी कुचराई करता आली नाही. पण सवाई माधवरावाच्या कारकीर्दीत हा प्रकार जरी झाला. त्याचा परिणाम बाबा फडके यासारखा पालखीतून फिरणारा माणूस यूध्दांत प्रमुख करण्यांत झाला. वास्तविक या लढाईचे स्वरुप इतके सौम्य होते की, खुद्द माधवराव व दौलतराव व रघूजी हे सैन्यात असते तरी त्यांच्या जीवास धोका नव्हता. पण आता हे सर्व मोठे संस्थानिकच झाले होते. जिवबादादा व परशुरामभाऊ यांसारखे सारी हयात सैन्यात घालविलेले जुने आणि जाणते नेते हजर असल्यामुळेच या लढाईचा विचका झाला नाही एवढेच. निजामाच्या बाजूचीही तशीच स्थिती असल्यामुळे मराठयांस फारसे श्रम न करता जय मिळाला. लढाईतील धोक्याचे स्वरुप नाहीसे होण्यांस आघाडीचा तोफखाना व त्यामागील गारदीकंपू ही नवीन रचना कारणीभूत होती. पण त्याबरोबरच जुन्या मराठे घोडदळांतील स्वत:च्या जबाबदारीवर लढाईचे स्वरुप हवे तसे पालटविण्याची अंत:स्फूर्ति समूळ नष्ट झालेली दृष्टीस पडते. निजामाच्या जागी वेलस्लीसारखे सेनापती जेंव्हा मराठयांसमोर उभे राहिले तेंव्हा मराठयांच्या युध्दरचनेत पडलेला महान फरक उघडा झाला. त्यांचे जणू छोटेसे प्रात्यक्षिकच खडर्याच्या लढाईत दिसले असे म्हणावयास हरकत नाही.

पाठीमागच्या छावणीतील पेशव्यांची दिनचर्या पाहण्यासारखी आहे. पेशवे, नाना फडणीस, इंग्रजांचा वकील मॅलेट व निजामाचा आठ महिन्यापूर्वी बोलाचालीस आलेला वकील मीर आलम, यांचे तंबू सुमारे पाव पाव मैलाच्या अंतराने विंचलनेच्या कांठावर ठोकलेले आहेत. त्यांच्या रक्षणार्थ दहा हजारांवर निवडक व विश्वासाची फौज खडी आहे. पेशव्याची निजण्याची कलंद्री, देवपूजेची राहुटी, तालीमखान्याची राहुटी, कचेरीचा मोठा डेरा या ठिकाणी त्याची छावणी शक्य ती राजविलासी सोय करण्यात आलेली आहे. त्याच्या दिमतीस दहावीस ब्राम्हण कारकून मुत्सद्दी असून खेरीज मराठे शिलेदार व सांडणीस्वार, जासूद, पालखी अंबारी वगैरे सर्व सरंजाम आहे. पेशवे प्रात:काली गजर वाजल्यावर उठून बाहेर येत तेथे रात्रीच्या चौकीच्या लोकांचे नमस्कार व रामराम घेऊन शौचास जात, नंतर देवपूजेच्या राहुटीत स्नानसंध्या करुन, तालीमखान्यात जाऊन पोशाख बदलून बाहेर येऊन बसत. बाहेर कडक ऊन व ओसाड माळ असल्याने तंबूभोवती दोन प्रहरी

भिस्त्याकडून पाणी शिंपडण्यात येई. १० वाजता पेशवे भोजन करीत, त्यांच्या पंक्तीस सुमारे वीस लोक आलटून पालटून खास बोलाविलेले असत. पेशवे स्वत: सोवळे नेसून आपल्या देवपूजेच्या राहुटीत स्वतंत्र जेवीत व नंतर बाहेर जेवीत असलेल्या लोकांचा परामर्श घेत. जेवणास दौलतराव निंबाळकरासारखे हुजरातीचे मानकरी असत. त्यांस सावकाश जेवावे म्हणून सांगून पेशवे उठून डे-यात बसत आणि मग जेऊन उठलेल्या सर्वांस विडे देत. नंतर पेशव्याने दिनकरपंतास आज्ञा केली की "छबिन्याचे पांच स्वार पाठवून पांचा कोसांवरुन तोफेचा आवाज ऐकू येतो की काय ते त्यांनी कानाने ऐकावे आणि माघारी यावे." याप्रमाणे सांगोन माधवराव ता.१२ मार्च रोजी दुपारी नंतर शौचास जाऊन गंजीफा खेळून निद्रेस गेले. सायंकाळी चारच्या सुमारास नाना फडणीस पेशव्याकडे आले ते आठ वाजपर्यंत तेथे होते. नंतर पेशवे तालीमखान्याच्या राहुटीत पोशाख उतरुन देवपूजेच्या राहुटीत भोजन करुन आपल्या कलंद्रीत बुद्बीबळे खेळून निद्रवश झाले. ता.१४ मार्च रोजी पेशव्याला लढाई समजावून देण्यासाठी पांडुरंगपंत गोडबोल्याने अघाडीस जाऊन नकाशा काढला होता, तो त्यास आणून दाखविला. (असा एक मोडी अक्षरांत लिहिलेला नकाशा मेणवली दप्तरांत सांपडला आहे तो पाहतां दिशा व अंतर ही मराठयांना किती प्रमाणांत चित्रित करतां येते याचा बोध होतो.) पेशव्यांच्या सहवासात या वेळी अप्पा बळवंत मेहेदळे, गोविंदराव पिंगळे, बाबूराव वैद्य, राघोपंत गोडबोले, विठ्ठलराव पोतनीस, आबा ठोसर प्रभूति मंडळी आहेत. नाना रोज सायंकाळी चार तास येऊन जात व मुद्याम बोलविल्यास इतर वेळीही येत. या दिवशीच्या बोलण्यांत निजामाची व पेशव्याची भेट व्हावयाची व नंतर परस्परांच्या मेजवान्या व्हावयाच्या, असे आहे. पण भेट होईलच अशी खात्री दिसत नाही. तहाच्या बोलाचालीचे बोलणे पेशव्यासमक्ष गोविंदराव काळे व नाना करीत. पेशवे स्वत: कोणास चिठ्ठया व पत्रे पाठवू शकत व स्वतंत्र बातमीही आणवीत. पेशव्याच्या देखत पत्रांवर शिक्के करुन ती पाठवीत. कुचाची नौबत दोन घटका रात्र उरली म्हणजे होत असे व तिला पेशव्यांची परवानगी घ्यावी लागे. पेशव्यांच्या देवांची पालखी नेण्यासाठी स्वतंत्र स्वार असत. ता.२७ रोजी मुषीर-उल्मुल्क पेशव्यांच्या छावणीत येऊन राहिल्यानंतर मग दोन दिवसांनी पेशवे, नाना वगैरे

मंडळी पुढे आघाडीस जाऊन कोसावरुन दुर्बिणीने खडर्याचा किल्ला पाहून व परशुरामभाऊ प्रभृति जखमी लोकांचा समाचार घेऊन परत मुक्कामास आली. हाच काय तो पेशव्यांचा लढाईतील स्वत:चा भाग !

ता.१२ मार्च ते २७ मार्चपर्यंत १५ दिवस तहाच्या वाटाघाटीत गेले. या अवधीत निजामाच्या सैन्याची हलाखी दरदिवस वाढत गेली. निजामाने दुस-याच दिवशी गोविंदराव काळयास युध्द तहकूब करण्याविषयी सांगितले व मोघम म्हटले की, सर्व काही तुमच्या इच्छेप्रमाणे होईल. जसा निजामाने ता.११ रोजी रात्री खडर्याकडे परत फिरण्याचा हूकूम सोडला तसा तहाच्या अटीब÷ल त्याचा निश्चय नव्हता. मुख्य अडचण म्हणजे त्याने मुषीराला दिलेल्या वचनाची, "मी तुला स्वत: होऊन कधी कारभारांतून काढणार नाही किंवा शत्रूच्या हवाली करणार नाही किंवा दगाफटका करुन तुझा कांटा परस्पर काढण्याची तजवीजही कधी करविणार नाही". असे निजामाचे वचन होते. अर्थात प्राप्त परिस्थितीत पुढे राज्याच्या व सैन्याच्या सुरक्षिततेसाठी जे काही करावयाचे ते मुषीरानेच स्वत: ठरवावयाचे होते. मराठयांनी प्रत्यक्ष मुषीराला कारभारातून काढा असे निजामाला कधी सांगितले नाही. पण वकिलांकडून परस्पर सतत एवढेच ऐकविले की, दोन दोस्तांत वितुष्ट यावयास हाच एक माणूस कारणीभूत आहे, तेंव्हा त्याचा बंदोबस्त निजामाने हवा तसा करावा. ज्या पांच इसमांनी निजामअल्लीला मदत करुन मसनदीवर आणले त्यांतील एक मुषीर होता. पण निजामअल्लीने पांचांतील दुसरा जो रुक्नु÷ौला त्याचा कांटा बारभाइंचे कारस्थान ऐन रंगात असता मारेकरी घालून अत्यंत क्रुरपणाने काढला होता, व म्हणूनच मुषीराने निजामाकडून वरीलप्रमाणे वचन घेतले होते असे दिसते. अर्थात निजाम भारतीय योध्दयांप्रमाणे कधीहि वचन मोडणारा नव्हता असे इतिहासावरुन म्हणणे कठीण आहे. पण या वेळी मात्र त्याने खरोखरीच मुग्ध राहण्यांचे धोरण स्वीकारले. युध्द आपणांला अशा पेचांत आणील अशी मुषीराची कल्पना नव्हती व म्हणूनच त्याने हे मोहरीचा घाट उरतण्याचे साहस केले होते. त्याचे मत मुसा रेमू मराठयांच्या तोफखान्याला व गारद्यांना आणि असदअल्ली वगैरेचे घोडदळ हुजरातीला पुरुन उरेल असे असावे. इंग्रज वकील कर्कपॅट्रिक यांचेही तसेच मत असल्यांचे वर सांगितलेच आहे. यात

एक तर त्याला शिंद्यांच्या कंपूची नीटशी कल्पना नव्हती व आपापसांत नेहमी वैमानस्य दाखविणारे मराठे सरदार एकत्र येतील वा एकोप्याने वागतील असेही वाटले नसावे असे दिसते. म्हणजे ज्या कारणांचा अंदाज न आल्यामुळे व मराठयांब÷ल चुकीची समजूत करुन घेतल्यामुळे जसा वॉरन हेस्टिग्ज पेचांत आला होता तसाच आता मुषीरही आला असे म्हटले पाहिजे. सतराव्या शतकांतील मराठयांनी तीन पिढया जो पराक्रम व प्रचार केला त्याचा एवढा ठसा महाराष्ट्रावर उठला आहे की, तो आता तीन शतकांनी परतंत्र्यानंतरही पुसला जाऊ शकत नाही. मग जेंव्हा स्वातंत्र्य गेले नव्हते तेंव्हाची गोष्ट कशाला बोलावयाची आहे ? आपण सर्व एक, शिवछत्रपतीनिर्मित आपले राज्य ही एक राष्ट्रीय अभिमानाची जतन करण्यासारखी वस्तु आहे, असे मत सर्व मराठयांत सारखेच जागृत होते. त्यामुळेच वेलस्लीकृत पराभवानंतरही पुन: यशवंतराव होळकर, दौलतराव शिंदे, रघूजी भोसले व बाजीराव हे अखेरपर्यंत कारस्थाने करीतच राहिले हेच काय, पण प्रत्यक्ष इंग्रजी राजवट झाल्यानंतरही शिंद्यांनी लॉर्ड एलनबरोबर युध्द पुकारले व राज्य गेलेले नानासाहेब व लक्ष्मीबाई यांनी उठाव केला. कल्पनेचा व अभिमानाचा इतिहासांतील परिणाम कसा असतो याचे हे उत्तम उदाहरण होय.[३९]

या पंधरा दिवसांतील प्रत्येक छावणीतील हकीकत सांगणारी वेगवेगळया बातमीदारांची शेकडो पत्रे मेणवली दप्तरांत उपलब्ध आहेत. त्यावरुन पाहतां या युध्दाला कठोरपणाचे स्वरुप कोठेच आलेले दिसत नाही. निजामाचे आरंभापासून असे मत होते की, मराठयाचे फौजेशी भांडून परिणाम नाही असा आपला अनुभव सांगतो. सारी खुमखुम मुषीराचीच होती. त्याने निजामाच्या राज्यांतील मराठे सरदार बहुतेक गुंडाळीत आणले होते. जुने पागेवाले मुसलमान संरजामदार मोडून त्या जागी आपल्या अनुयायांची पथके त्याने पुढे आणली होती. दर खेपेस मराठे जागिरदारांचा उणेपणा दाखविण्यास तो टपलेला असे आणि ती गोष्ट खरीच होती. नेमाजी शिंदे, चंद्रसेन जाधव, सुलतानजी निंबाळकर प्रभूती सारे मराठे सरदार पेशव्यांशी लढतांना कधीच मनापासून काम करीत नसत. अशा स्थितीमुळे निजामी राज्यातील अर्ध्याहून अधिक सैन्य मुषीराचा पाणउतारा कसा होईल याची मनांतून वाटच पहात होते. पूर्वायुष्यांत मुषीराने रणांगणावर काय बहादुरी दाखविली असेल ती असो,

पण गेल्या पंधरा वर्षात तो कारस्थानी मुत्सद्दीच बनला होता. त्याचे दुर्दैव असे की, याच वेळी मराठयाकंडे त्याच्या डावपेचास पुरुन उरणारा नाना फडणीस अधिकारावर होता. तसेच महादजी शिंदे या वेळी मरुन शिंद्यांच्या जागिरीचा प्रश्न सोडविण्याचा अधिकार त्याच्याच हातांत आला होता, यामुळे दौलतराव शिंदे व जिवबादादा यांना हवे तसे राबवून घेण्याची संधी त्याला प्राप्त झाली होती. या सर्व गोष्टी मुषीराच्या अंदाजाबाहेर घडल्या व आता लढाईला मिळालेल्या अनिष्ट कलाटणीमुळे आपला सर्व अभिमान गुंडाळून पेशव्यांच्या स्वाधीन होण्याखेरीज त्यास अन्य मार्ग उरला नाही.

लढाईपूर्वी दोन दिवस निजामाकडून दौलताबादी द्राक्षांच्या डाल्या मराठयांकडे भेट म्हणून पाठविल्या जात होत्या. यांत निजामाचा हेतु मराठे गाफील राहावे असा असण्याचा संभव आहे, असे कोणी म्हणेल तर ते उपलब्ध पत्रव्यवहारावरुन टिकणारे नाही. पेशव्यांचा वकील गोविंदराव काळेच काय, पण त्याचे व इतर प्रत्येक मराठे सरदारांचे वकील वा हस्तक निजामाच्या छावणीत होते, जासुदांची पथके घटकेघटकेची बातमी त्याच्या छावणीतून मराठयांच्या छावणीत कळवीत होती. बाबा फडके, परशुरामभाऊ पटवर्धन, रघुजी भोसले यांच्यामार्फत तहाच्या अटी सौम्य करुन घेऊ अशी आशा निजामाकडील सरदारांना व मुत्सद्यांना अखेरपर्यंत वाटत होती. निजाम मोडावयाचा नाही. राखवयाचा आहे अशी ताकीद श्रीमंतानी आपल्या फौजेस केली होती असे तत्कालीन यादीत स्पष्ट लिहिलेले आहे. हेच काय, पण निजामाची हलाखी ऐकून श्रीमंतानी पाण्याच्या पखाली व मिठाचे छकडे पाठविले अशीही वंदता या यादीत नमूद आहे. सवाई माधवरावाच्या दिनचर्येची माहिती देणा-या बातमीपत्रांत नबावाच्या भेटी होऊन परस्परांच्या मेजवान्या होतील असे बोलणे पेशवे व मोरोपंत भावे यामध्ये झाल्याचे नमूद आहे. अर्थात या वेळी मुषीर पेशव्यांच्या स्वाधीन होईल असा अंदाज नव्हता. पुढे ता.२७ रोजी मुषीर पेशव्यांच्या छावणीत आला तेंव्हा त्याच्या मानमरातबांत नाना व पेशवे व दोघांनी कोणतीही कमतरता दाखविली नाही. तो निजामाच्या कारभारांत नसावा हे आपले म्हणणे तडीस गेल्यानंतर त्याला जास्त काही शासन नानाने घडविलेले दिसत नाही. निजामाचा पाणउतारा आपला दिवाण शत्रुच्या स्वाधीन करावा लागला

यांत काय झाला असेल तो असो, पण एरवी त्यालाही कोणतीही अ÷ल मराठयांनी घडविलेली दिसत नाही. अखेर त्याची त्यालाच स्वत:च्या दोषाची जाणीव झाल्यामुळे तो पेशव्यांची भेट न घेता लाज वाटून तसाच परत गेला असा ध्वनी बातमीदाराच्या पत्रांत आहे. निजाम पेशवे भेट व्हावयाची तर ती कशी व्हावयाची, सर्व सरदारांसह एकदम व्हावयाची की अलग अलग एकमेकांची व्हावयाची, याची चर्चा मराठयांच्या छावणीत झालेली आढळते. दग्याफटक्याची भिती मराठयांना अखेरपर्यत वाटत होती, कारण मोगलांचा तसा जन्मस्वभाव असल्याचे मराठयांचे त्याबद्दल कायम मत होते. त्यामुळे शक्य ती काळजी घेणे हे युक्तच होते. पण भेटल्याशिवाय निजाम परत गेला ही बरी गोष्ट झाली असे आम्हांस ऐतिहासिक दृष्टया वाटत नाही. यात नानाचा फाजील शंकेखोरपणासुध्दा आड आला असण्याचा संभव आहे.

ता.१३ मार्च रोजी सायंकाळी बाबा फडक्याने रक्षणार्थ मराठे स्वार पाठवून, गोविंदराव काळयास खडर्याहून आपल्याकडे आणविले. वास्तविक ही गोष्ट नाना फडणिसाला कळविल्याशिवाय परशुरामभाऊ व जिवबादादा यांच्या विचारे त्याने केली. जयराम गोविंद हा जासूद कारकून प्रथम गोविंदरावाकडून बाबाकडे आला. त्याने सांगितले की, दौलतरावाने गोविंदरावास पत्र लिहून निजाम दक्षिणच्या सुभेदारीचा जाबसाल आमच्या मर्जीप्रमाणे करण्यास राजी असेल तर तुम्ही यावे, नाहीतर येण्याचे कारण नाही, असे कळविले होते. यावरुन दौलतरावाजवळच्या बाळोबा तात्या पागनीस प्रभृती मुत्सद्दयांचे मत दिग्दर्शित होते. महादजी शिंद्याला पेशव्याच्या वकील-इ-मुतकीची नायबी मिळाल्यानंतर त्याचा अधिकार वस्तूत: निजामासारख्या सुभेदाराला बडतर्फ करण्याचा होता. महादजीचा हेतु निजामाला आपल्या या अधिकाराची चुणूक दाखविण्याचा होता असे प्रसिध्द पत्रव्यवहारावरुन दिसते. पण शिंद्याच्या छावणीतील मुत्सद्दी अजून हा हेतु मनांत धरुन असले, तरी आतां खुद्द दौलतरावालाच महादजीचा वारस म्हणून मंजुरी द्यावयाची की नाही हा अधिकार पेशव्यातर्फे नानाकडे आला होता, त्यामुळे खडर्याच्या लढाईतील राजकारण अगदी वेगळे झाले. शिंदेशाही मुत्सद्दयांनी पेशव्यास कळविले होते की, निजामाची मोहीम आम्ही एकटेच स्वत:च्या बळावर तडीस नेतो. फक्त पेशव्याने दौलतरावाकडून नजराणा हबकण्याचा विचार

मनांत आणू नये. नानाने नजराण्याची माफी दिली, पण शिंद्यास मोहिमेच्या खर्चाबद्दल मग काही मिळणार नाही असेही बजाविले. मात्र मोहिमेचे यश व तदनंतरच्या तहाच्या वाटाघाटीची सुत्रे आपल्या हातून शिंद्याच्या हातांत जाऊ देण्यास नाना राजी नव्हता. कारण त्यामुळे पुण्याच्या ब्राम्हणकंपूचा अधिकार संपुष्टात आला असता. एकटया शिंद्याच्या हातून मोहीम तडीस जाणे अशक्य नव्हते, फक्त त्याला उत्तरेतून आणखी सैन्य बोलवावे लागले असते. या अंतस्थ फुटीचा फायदा निजामाला मिळून तो वांचला. एरवी बहुधा महाराष्ट्रांतून तरी त्याची हकालपट्टी त्यावेळीच व्हावयाची आणि तसे होते तर आजचा संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न त्या वेळीच कायम निकालांत निघाला असता. नानाने या वेळी सवाई माधवराव त्याच्या हातांत असल्यामुळे गप्प बसविलेले शिंदेशाही मुत्सद्दी व सेनानी पुढे संधि येतांच बाजीराव आपल्या हाती घेऊन नानाशी कसे वागले तो इतिहास सुविज्ञात आहे.

जसेजसे जास्त दिवस जाऊ लागले तसतशी निजामाच्या फौजेतील हलाखी वाढत गेली. त्यावेळी बाजाराची पध्दत असल्यामुळे इंग्रजांच्या पध्दतीप्रमाणे सर्वांना असलेले धान्य सारखे वाटून मिळणे शक्य नव्हते. एका बातमीपत्रांत निजामाच्या लमाणांत हजारो धान्य लादलेले बैल आहेत पण त्यांस हात लावला जात नाही, अशी टीका आहे. याचा अर्थ सैन्यातील दुष्काळ सर्वांना सारखा बाधत नव्हता असा होतो. पण पाण्याची टंचाई मात्र निजामासुध्दा सर्वांनाच बाधली. पखालभर पाण्याची किंमत पंधरा रुपये इतकी वाढण्यांत या टंचाईचा शेवट झाला. किल्यातील विहीर पहिले काही दिवस पुरली, पण मागाहून खोदखोदूनही तींत पाणी येईना इतके ते आटले. त्यांच्याजवळ पैसा नव्हता. असे दिनवाणे होऊन जिवबाच्या तोफांच्या टापूत येत व बंदूका खाली ठेवून पाणी पिण्यासाठी नदीवर येऊन गुरांप्रमाणे तोंडाणे पाणी पीत. त्यांना प्रतिबंध करणे म्हणजे ठार मारणेंच होते. तसे करण्याचा मराठयांस धीर झाला नाही. गोविंदराव काळे १३ मार्च रोजी मराठयांकडे येऊन प्रथम बाबा फडके, परशुरामभाऊ, दौलतराव व रघोजी यांची भेट घेऊन नानाकडे गेला व तेथून अटी ठरवून परत निजामाकडे गेला. तरीही निजाम मुख्य अट मुषीराची ती कबूल करीना. मध्यंतरी रावरंभा निंबाळकर याने बाबाला लिहून 'मला सांगाल तर मी निजामाला

एकटा भेटून व मुषीराला उखडून तह घडवून आणतो, मात्र गोविंदरावाला ही गोष्ट कळू नये' असे लिहिले होते. "नबाबाची दौलत राखवी, केवळ हाऊघाय पडू नये" एवढेच त्यांचे म्हणणे होते. ता.१८ मार्च रोजी सरवुलंदजंग याने फारसी खलिता लिहून कळविले की, खुद्द निजाम दोन-तीन हजार स्वार बरोबर घेऊन सडा येऊन नानाशी बोलून मराठयांच्या सर्व तक्रारीचा व हिशेबांचा एका बैठकीत निकाल करण्यास राजी आहे. पण यावर सर्व चर्चा होऊन ठरले की, असे झाल्यास मुषीराचा मुद्दा बाजूला पडतो व तो अलगद सुटून जातो, म्हणून त्याचे येणे इष्ट नाही. तेंव्हा नानाने कळविले की, आधी तह व मग भेट. त्यामुळे निजाम पेचांत पडला. तेंव्हा युध्दाची तहकुबी मोडून पुन: युध्द करावे असा पवित्रा घ्यावा लागला. त्यांतही अमावास्या म्हणून ता.२० ला युध्द करु नये, दुस-या ता.२२ ला युध्द करावे असे ठरले. पण ता.२१ रोजी निजामाने रावरंभास मराठयांच्या छावणीत पाठविले. दुस-या दिवशी बातमी आली की, व-हाडचा माजी सुभेदार सलाबतखान रघोजी भोसल्याचा परम स्नेही असल्यामुळे तो बोलणे करण्यास येणार. पण त्याऐवजी गोविंदरावच जाबसाल बनत नाही म्हणून माघारा आला. रावरंभा येऊन बाबा फडके, परशुरामभाऊ प्रभृतीस भेटून ता.२५ रोजी परत गेला. त्यास लाभ एवढाच झाला की, जातांना त्याचे शिपाई बरोबर पीठमीट घेऊन गेले. गोविंदराव उठून आल्यावर निजाम, त्याचा करकून कोनेरपंत याजवळ म्हणाला की, "आम्ही आपला हट्ट व अब्रू सोडली , तुम्ही म्हटले ते कबूल केले, असे असतांही तुम्ही ऐकत नाही तर आता युध्दास उभे रहाणेच प्राप्त. हयाती असे तरी दौलत कर- नाही तर खैर." पण हे नुसते बोलणेच ठरले. मुषीराने स्वत: आपला दिवाण हरी नारायण नेमीवंत यास भाऊकडे पाठवून बोलणे लावले. पण सर्वांनी आमच्याकडे काही नाही, नानांची समजूत पाडा, सात आग्रह धरिला तेंव्हा तो माघारा गेला. मुषीराने कारभारांतून निघून आपल्या औशाच्या किल्ल्यात जाऊन राहावे असा एक बूट त्याने काढला. पण ते काहीही कामास न येता पट्टराणी बक्षीबेगम व इतर मुत्सद्दी यांच्या विनंतीवरुन निजामाने इतरांस मुषीराबरोबर बोलणे करण्यास परवानगी दिली व मुषीरानेही अखेर सर्व खापर आपल्यावर फुटते, गरीबगुरीब व हत्ती-घोडे वगैर जनावरे अन्नपाण्यांवाचून मरुन अनर्थ होतो, असे

समजून अखेरचा हिय्या केला व स्वत: होऊन मराठयांकडे जाण्याचे ठरविले. निजामाने गोविंदराव काळयाशी बोलून व हा आमचा जिवाचा कलिजा ठेव म्हणून तुमच्या स्वाधीन करीत आहो, तो तुम्ही जतन करावा, त्याची हालअपेष्टा करु नये असे त्याकडून कबूल करवून मुषीरास निरोप दिला. तो दोनशे स्वार, सात हत्ती तसेच घोडे, उंट, तंबू, बाडबिछाईत व नोकर-चाकर सर्व सरंजाम घेऊन ता.२६ रोजी निजामाच्या छावणीतून निघाला. तो बाजारांतून चालला तेंव्हा तेथील लोक, वाणी, उदमी व शिपाई आदि करुन सर्वांनी त्यावर शिव्यांची वृष्टि केली व ते म्हणाले की, यानेच सारे लोक बुडविले व निजामासहित खराबीत आणले. मुषीर मराठयांकडील इतर कोणाची भेट न घेतां तडक सैन्याच्या पिछाडीस नानाच्या डे-यापुढे आला. नानाही त्यास कोसभर सामोरा येऊन सन्मानाने भेटला. नंतर पेशवाही डे-याबाहेर चार पावले येऊन त्यास भेटला. हे सर्व येथे विस्ताराने सांगण्याचे कारण एवढेंच की, महाराष्ट्रात अलीकडे याबाबत कित्येक उच्च व्यक्तींनी खोटे लिहून, गोविंदराव काळयाने त्याला धरुन आणून जणू त्याची धिंड काढली, असे भोळया वाचकांस भासविले आहे. तसा कोणताही प्रकार घडलेला नाही. [३८] हे सर्व होईपर्यंत मराठे व मोगल उभयतां लढाईच्या पवित्र्याने रोज उभे राहात व शंभर प्रकारच्या बातम्या लष्करांत उठत. मराठयांच्या छावणीतून काही लोक स्वत:च्या फायद्यासाठी गुपचूप धान्य, मीठ, पीठ आदी निजामाकडे पाठवून पैसा करीत. त्यांच्या तक्रारी एकमेकांविरुध्द सारख्या चालूच होत्या. पेंढारी तर दोन्ही बाजूचे एकटे दुकटे कोणी सांपडल्यांस लुटण्यास कमी करीत नसत. त्यामुळे निजामास फारच त्रास झाला. निजामाने बाहेर काहीसाठी फौज पाठवून दाणावैरण आणविली. हेच काय पण मराठयांची परत येणारी बैलगाडीही एकदा लुटली. कारण त्याची गरजच तेवढी तीव्र होती. मुषीर गेल्यानंतर निजामाने पेशव्यांच्या भेटीचा नाद सोडला असे दिसते. त्यामुळे त्याची भेट कशी व्हावयाची याबद्दल नानास वाटणारी अडचण आपोआपच निकालांत निघाली. तोपर्यंत निजामाचा चोपदार बरोबर मेव्याच्या व द्राक्षांच्या पेटया घेऊन मराठयांकडे येत होता. पण या भेटी फार महाग पडत. कारण वस्तूंच्या किंमतीपेक्षा जास्ती आहेर या चोपदारप्रभृतींना द्यावे लागत व खेरीज रोख रुपयांचे इनामही त्यांस मिळे. वस्तु जितक्या मोठयाकडून, तितका

तिचा मान घेणाराने ठेवला पाहिजे असा त्या काळचा दरबारी रिवाज. निजामाने एकदा केवळ कच्च्या कै-या एका पाटीत घालून व त्यावर शोभिवंत कापड शिवून आणि त्यावर शोभिवंत रुमाल घालून भेट म्हणून गोविंदरावाकडे ती पाठविली व त्याने ती माणसास पांच रुपये इनाम देऊन घेतली. जासुदाने सांगितले की, मजदेखतच फोडून आंतील जिन्नस पाहा ! तेंव्हा तसे करणे गोविंदरावास भाग पडले व तो पाहतो तो दोन पैशाच्या कै-या आंत ! हा विनोद की थट्टा याचा उलगडा करणे कठीण. अखेर उभयंता गोविंदरावांनी कै-याचे रायते करुन खाल्ले.

हिंदू आणि मुसलमान यांतील भेद सर्व गोष्टीत दिसतो. निजामाच्या छावणीत अन्न मिळेनासे झाले तेंव्हा तेथील मुसलमानांनी बैल व गुरे मारुन खाल्ली. त्यामुळे त्यांचा कसाबसा गुजारा झाला. पण हिंदु मात्र उपाशी मेले. मरांठयांच्या छावणीत मराठयांनाही या दिवसांत मांस मिळत होते असे दिसत नाही. त्यामुळे तहानंतर मराठी सैन्य घरची वाट चालू लागले तेंव्हा वाटेत कोठे शेळया-मेंढयाचे कळप दिसले तर त्यांवर ते तुटून पडत . खांस पेशवे, रघुजी भोसले, त्याचा सेनापती विठ्ठलपंत परांजपे, दौलतराव शिंदे, जिवबादादा, बाबा फडके, परशुरामभाऊ प्रभुती खाशांच्या तंबूत काही थोडी भाजी व फळफळावळ दुरुन येत असे व तो ते एकमेकांकडे पाठवीत, उत्तर हिंदुस्थानातून काबुली या काश्मिरी सफरचंद, डाळिंबे, अंगुर वगैरे दौलतरावाकडे येत व ती तो इतरांकडेही थोडीथोडी पाठवीत व ती पोचविणारास वर सांगितल्याप्रमाणे इनाम मिळत. मराठयांच्या छावणीत या वेळा बायका असल्यांचे दिसत नाही, तरी भोसल्यांच्या छावणीत लढाईनंतर नाच वगैरे झाल्याचे उल्लेख आहेत. मराठे आपली धार्मिक व कौटुंबिक कृत्ये छावणीतही शक्य त्या त-हेने पार पाडीत. जशी होळी व ग्रहण पाळली गेली त्याप्रमाणेच भोसल्यांचा रामनवमी उत्सव नऊ दिवस खाशांनी उपवास करुन यथासांग पार पाडला. त्यासाठी ब्राम्हणभोजन व अखेरच्या पारण्याच्या दिवशी हजार बाराशे ब्राम्हणांस दक्षिणा हे समारंभ सालाबादप्रमाणे झाले. त्यांत पुराण कीर्तन चालू असून त्याचे सालाबादचे हरदास मुद्दाम व-हाडातून बरोबर छावणीत आलेले होते. तसेच प्रत्येक सरदाराचे व संस्थानाचे सावकार त्यांच्या त्यांच्या छावणीत हजर होते. याहूनही

विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे भोसल्यांनी आपल्या ओडिसाच्या सुभ्यांतून तेथील जमेदाराकडून लष्करी मदत मागविली होती ती लढाई झाल्यानंतर काही दिवसांनी त्यांच्या छावणीत येऊन पोहोचली. त्यांना कटकहून निघून पांच महिने लोटले होते. पण हे सैन्य खंडाईत पायदळाचे असल्यामुळे त्यास इतका वेळ लागला. या संस्थानिकांचे नांव कृष्णमराज व दुस-यांचे चैतनसिंग बैरागी. त्याबरोबर पांचशे भालाईत, हजार बंदुकवाले व शेपन्नास स्वार व काही हत्ती, काही तीरकमठेवाले असे होते. तसेच मंडल्याच्या संस्थानिकाकडून सुध्दां थोडे सैन्य आले होते. भोसल्यांच्या सैन्यांत व त्याखालोखाल शिंदे व होळकर यांच्या सैन्यात मुसलमानांची संख्या जास्त होती. पण त्यांच्यात कोठे धर्मामुळे मनाची चलबिचल झालेली नमूद नाही. ता.१ एप्रिल रोजी निजाम खडर्याहून परत जाण्याच्या मार्गाला लागला, कारण दाणावैरण व पाणी यांची टंचाई पराकाष्ठेस पोहोचली. आधी तहाच्या अटी ठरण्यांत काही दिवस गेले या अटी मराठयांच्या इतिहासांत सर्वत्र दिलेल्याच आहेत. चौथाई सरदेशमुखीची बाकी व लढाईचा खर्च, तसेच दरबारखर्च म्हणजे तह ठरविणा-या मोठया माणसांची ज्याच्या त्याच्या अधिकाराप्रमाणे बिदागी, मिळून एकंदर तीनकोटी रुपये. तसेच चौतीस लक्षांचा मुलूख खेरीज दौलताबाद किल्ला असे मराठयांस मिळाले. पण तह उरकून त्याच्यावर सही शिक्के होण्यापूर्वीच खडर्याहून निघणे निजामास दुष्काळाच्या कहरामुळे भाग झाले. निजामाला आपण आपला किल्ला सोडून निघालो की, मराठे विश्वासघात करुन आपल्यावर हल्ला तर करणार नाहीत ना अशी भीती वाटत होती. म्हणून प्रथम मराठयांनी आपला मुक्काम हलवून दक्षिणेकडे सरकावे, व नंतर निजामाने आल्या वाटेने परत जावे असे ठरले. त्याप्रमाणे पेशवे, नाना फडणीस, मुषीर, मॅलेट प्रभृती विंचरना नदी सोडून सीनेच्या संगमावर गेले. शिंदे, फडके, पटवर्धन व भोसले,चिंचपूर व नान्नज इकडे सरकले. निजामाचा हेतु प्रथम मोहरीच्या घाटानेच जावयाचा होता, पण त्या वाटेने चारा व पाणी नाही म्हणून तो आग्नेयकडील नलीवडगांव मार्गाने वीटचा घाट चढून वर गेला. तेंव्हा बाबा फडक्यास वाटले की, हा मराठयांच्या हातावर तुरी देऊन पळून जातो, म्हणून त्याने त्याचा पाठलाग करण्याची तयारी केली. याच वेळी पेशव्यांच्या छावणीत जवळ असलेले निजामाचे

वकील मीर आलम, रायरायां रेणुराव व रघुत्तमराव हे निजामाकडे परत गेले. निजामाने कळविले की, मी कोणत्याही वाटेने गेलो तरी तह ठरविला आहे. त्यात आता बदल करणार नाही. गोविंदराव काळयास तुम्ही मजकडे पाठवून द्यावे म्हणजे सर्व तह ठरल्याप्रमाणे कलमवार लिहून काढून व त्यावर सहीशिक्के करुन मी परत पाठवितो व नंतरच बेदरास जाईन. त्याप्रमाणे निजाम जवळ जवळ आल्या वाटेनेच मांजरेच्या काठाने मुक्काम करीत परत गेला. निजामाला जाताना मुषीराच्या पक्षाच्या लोकांनी दंगा करु नये याबद्दल काळजी घ्यावी लागली. त्याचा सरदार असदअल्लीखान वल्गना करीतच होता. पारेनांदूर , पारगांव, अडळ बोरगांव, कळंब, सुरडी खडकी या वाटेने निजाम बेदराकडे परत गेला. ता.१३ एप्रिल रोजी सर्व कागदपत्र तयार होऊन गोविंदरावाच्या स्वाधीन करण्यांत आले. बरोबर पेशव्यास वस्त्रे व जवाहीर व गोविंदरावास त्याचे कुटुंब परत हैदराबादेस आणण्यासाठी जनान्याचा हत्ती व दिडशे स्वार निजामाने दिले. तसेच त्याबरोबर घासिमिया हा अनुभवी सरदार निजामाने पाठविला. ते ता.१५ एप्रिल रोजी पेशव्यांच्या छावणीत येऊन अखेर तहाचे कागद परस्परांच्या सहीशिक्याचे एकमेकांच्या स्वाधीन होऊन तह कायदेशीररित्या पुरा झाला.

निजाम परत फिरल्यावर पेशवे सीनेच्या पाण्याने संगमेश्वर येथे येऊन दाखल झाले. हुजरातीच्या फौजा खैरीनदीच्या काठाने चिंचपुराहून आव्हाटीस खाली सरकल्या. तेथे पेशवे येऊन सा-या फौजेची हजेरी झाली. या ठिकाणाहून खाशी मंडळी पूर्वेस सहा मैलांवरील परिंडयाचा किल्ला पाहून आली. तसेच सोनारीच्या देवीचे दर्शन घेऊन स्वारी दक्षिणेकडून पश्चिमेकडे पुण्याच्या वाटेला लागली. रुईदुधी, अंजनडोह, भीमेच्या काठावर सिध्दटेक, आलेगांव, खारेवाडी, नानगांव, हातवळण, देवलडी, खामगांवटेक व थेऊर कोलवडी या वाटेने पेशवे १ मे रोजी पुण्यास आले व त्यांनी थाटाने गृहप्रवेश केला. मधील छावण्यांत सरदारांना त्यांचे हिशेब करुन रजा देण्यांत आली. त्याप्रमाणे जिवबादादा दक्षिणेकडे पंढरपुरास यात्रेस गेले. भोसल्यांनी विठ्ठलपंतप्रभृती आपल्या सरदारांस व-हाडांत परत पाठविले व दौलतराव जामगांवास गेले. परत येतांना गारवंडेस पळून आलेले दिल्लीचे शहाजादे रहात होते म्हणून पेशव्यांची फौज त्यांना टाळून दक्षिणेकडून पुढे मुळा

नदीवर येऊन पोचली. कारण पेशवे दौंडावरुन येते तर शहाजाद्यांची भेट इतमानाने घेऊन त्यास कुर्निसात करुन मोठे अहेरही करावे लागले असते, हे सर्व टाळण्यासाठी सैन्याचा मार्गच बदलणे नानांनी युक्तीने घडविले. पण तरीहि त्या गांवावरुन जातांना पेशव्यांच्या नौबती नगारे बंद ठेवावे लागले होते. कारण बादशहाच्या परिसरांत इतरांनी वाद्य वाजवावयास मोकळीक नसे. बरोबर मुषीर- उल्मुल्क अंबारीतून प्रवास करीत होता. शनिवारवाडयांत शिरण्यांपूर्वी मात्र याची रवानगी खजिन्याच्या विहिरीजवळील बंगल्यांत करण्यांत आली. त्याला शनिवारवाडयांत जो पेशव्यांच्या नजराण्याचा समारंभ झाला तेथे आणण्यांत आले नाही. पण यानंतर दोन वर्षे मुषीराचा मुक्काम पुण्यांत होऊन त्याने पेशवाई खिळखिळी करण्याचा उद्योग पुरा केला. पेशव्यांना खंडणीपैकी बहुतेक रक्कम मिळाली नाही. 'धरले तर चावते व सोडले तर पळते' या म्हणीचा अनुभव येथे मुषीराच्या दंशाने पूर्णपणे मराठेशाहीच्या अनुभवास झाला.[४१]

अहमदनगर , नाना फडविसांचा कारागृहवास :

किल्ल्याच्या या राजकीय बंदिस्तांमध्ये पेशवाईचा सूत्रसंचालक व पडत्या पेशवाईतील शेवटचा आधारस्तंभ नाना फडणीस याची बंदिस्ती विशेष महत्वाची मानली जाते. नानास ३१ डिसेंबर १७९७ रोजी दौलतराव शिंद्याच्या लोकांत अडकून कैद होऊन त्यास नगरच्या किल्ल्यात बंदीवास भोगावा लागला. बंदिवान म्हणून ६ एप्रिल १७९८ पर्यंत रहावें लागले. नानाला बंदिवान करुन राजकारभारांतून दूर करण्यांत रावबाजींचा मोठा हात होताच. शिंद्याचा फ्रेंच सेनापती मायकेल फिलोज यानें नाना फडणीस यांना कैद करुन नगरच्या किल्ल्यात ठेवल्याचा उल्लेख आहे. पुढे दौलतराव शिंद्यानी नाना फडणीसास १५ जुलै १७९८ रोजी कैदेतून मुक्त केले [४२]

याबाबतचा अधिकचा उल्लेख नाना फडनविसांचे चरित्र यात सविस्तरपणे आलेले आहे. पेशवाईच्या अखेरच्या काळात नाना फडणविसांनी पेशवाई टिकवण्याचा आतोनात प्रयत्न केला पण त्याला म्हणावे तसे यश आले नाही, होळकरांसोबत नानांचे सलोख्याचे संबंध होते ते घाडगे, शिंदे यांना न पटणारे होते. त्यात दुसरा बाजीराव हाही नानांचा द्वेश

करीत, नाना कितीही नाही म्हटले तरी राजकारणातील हुकमी शिक्का होता, नानांची राजकारणाची पध्दत कमालिची होती. त्यामुळे नाना जोपर्यंत राजकारणात होते तो पर्यंत कोणाचेही काही चालण्याजोगे नव्हते. दौलतराव शिंदे हा राजकराणातील महत्वाचे व्यक्तीमत्व म्हणून सर्वांना माहित होते. त्यांच्याकडे पाच हजारांची फौज होती. सोबत कर्नल मिचेल फिलोज नांवाचा आठ फलटणींवरचा गोरा सरदार [फ्रेंच अधिकारी] शिंद्याकडे नोकरीस होता. त्याने नानांची मध्यस्थी केली. आपणांस दगा होणार नाही अशी बायबलवर हाथ ठेऊन शपथ घेतली. पण नानांना त्यांच्या हितचिंतकानी सांगितले आपणांस कैद करण्यांचा शिद्यांचा डाव आहे. नानांनी शिंद्यांचे भोजनाचे आमंत्रण स्विकारले शिद्यांचे लष्कर वानवडीस होते. नेहमीचे नानांचे रक्षक सुमारे एक हजार नानांच्या सोबत होते. पुढे पुण्यात भवानी पेठेपर्यंत जाताच कर्नल फिलोच नानांना येऊन मिळाला व नानांसोबत असणारे अरबी फौज यांनी मागे पाठवण्याची विनंती केली. पण अरबांचा सरदार अशी निवडक मंडळी यांना सोबत घेऊन नाना थोडे पुढे जात नाही तोच शिंद्याच्या सैन्याने नानांवर अकस्मात हल्ला केला. कित्तेकास ठार मारले कित्तेकास जखमी केले. कर्नल फिलोज याने नानांस कैद करुन शिद्यांच्या लष्करात नेले. नानांच्या सोबत आबा शेलूकर, बजाबा शिरवळकर, नारोपंत वैद्य, दुसरे मोठया पदवीचे कित्येक गृहस्थ गेले होते तेही कैदेंत सापडले.

नानांस पकडल्याबरोबर घाडग्यांनी शहरांत फौजेच्या टोळया पाठविल्या व नानांच्या पक्षाच्या लोकांची घरे लुटली. शिंद्याच्या मनांत नाना फडनविसांस नेहमी आपणाजवळ नजकर कैदेत ठेवावें असे होते, त्याप्रमाणे ते तीन महिने शिंद्यांच्या लष्करांत होते. यानंतर एकाएकी शिंद्यानी बेत ठरवला नानांस अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवावे त्याप्रमाणे चैत्र वद्य षष्ठी शुक्रवार या दिवशी नांनाची अहमदनगर किल्ल्यात बंदोबस्तात रवानगी केली. तेव्हां स्वार, शिपाई, कारकून, शागीर्द, व दुसरे चाकर नोकर वगैरे मिळून शे - दिडशें माणूस नानांचे बाहेर गांवच्या स्वारीसाठी नेमलेले असे, तें सर्व त्यांबरोबर नगरास गेले. नानांस कैद म्हटली तर किल्ल्याबाहे जाऊं नये एवढीच होती . पण थोर व अब्रुदार मनुष्यास यापेक्षा जास्त काय पाहिजे . किती झाली तरी ती कैदच ![४३]

पुढे नानांनी सुटकेसाठी दहा लक्षांची भरपाई शिद्यांना द्यावी असे ठरले. त्याप्रमाणे नानांनी रक्कम देऊन स्वत:ची सुटका करुन घेतली.

माधव नारायण [सवाई माधवराव] आणि अहमदनगर

खरे पाहता सन १७७४ साली जन्मलेल्या सवाई माधवराव आणि अहमदनगर यांचा फारसा काही संबंध नाही असे मला वाटते कारण त्यावेळी ख-या अर्थाने राज्यकारभार पाहत होते नाना फडणवीस. पण एक राज्यकर्ता, पेशवा म्हणून त्यांचा उल्लेख करणे मला येथे आवश्यक वाटते. माधवराव नारायण हे इतिहासात सवाई माधवराव या नावानेच विशेष परिचीत आहेत. यांचा जन्म पुरंदर किल्ल्यावर १८ एप्रिल सन १७७४ रोजी झाला. सवाई माधवराव सव्वातीन वर्षाचे असताना त्यांची आई वारली. नंतर त्यांचे पालनपोषण पार्वतीबाई , सगुणाबाई, नाना फडणवीस यांनी केले. नारायणरावांच्या हत्येनंतरचा पहिला मोठा गणेशोत्सव शनिवारवाडयात सन १७७८ साली साजरा करण्यात आला. [४४]

सवाई माधवरावांच्या कारकीर्दीत पेशव्यांना दिल्लीच्या बादशहाकडून वकील - ई - मुतालिक ही सनद मिळाली. महादजी शिंद्यांनी बादशाही कबजात घेतली. बादशहाला दरमहा ६५०००रु. तनखा देण्याचे मान्य करुन 'वकील - ई - मुतालीक ' व 'मीरबक्षी ' हया सनदा पेशव्यांच्या वतीने १७८४ साली मिळवल्या. सनदा घेऊन महादजी शिंदे १३ जानेवारी, सन १७९२ रोजी पुण्याजवळ वानवडी येथे दाखल झाले. ज्या दिवशी संध्याकाळी सवाई माधवराव लवाजम्यासह महादजींना गणेशखिंडीपर्यंत सामोरे गेले होते. सनदा पेशव्यांना २२ जून सन १७९२ रोजी शुक्रवारी पुण्याजवळ वानवडी येथे 'फर्मानवाडी'त समारंभाने अर्पण केल्या.[४५]

इंग्रजांशी यशस्वी युध्द व खडर्याच्या लढाईतील [सन १७९५] विजय, हया यांच्या कारकीर्दीतील महत्वाच्या गोष्टी होय. त्यातली महत्वाची गोष्ट म्हणजे अहमदनगर जिल्हयात खर्डा येथे झालेली लढाई होय. यामध्ये नाना फडणवीस यांचा महत्वाचा रोल होता. त्यामुळे याचे सविस्तर वर्णन नाना फडणविस यांच्या प्रकरणात आलेले आहे. यांच्या वेळी सन १७७५ -७६ साली संगमनेर प्रांतात कोळयांनी बंड केले. त्यासाठी दोनशेपर्यंत नवें माणूस

ठेवण्याची आज्ञा व्हावी, त्यासाठी तुम्ही चांगले तीनशे माणसे ठेवून बापूजी हरी कोळयांचे बंड शमवण्यासाठी गेले आहेत. त्यात तुम्ही सहभागी व्हा या आशयाचे पत्र सवाई माधवराव यांच्या रोजनिशीत आढळते.

राघोबादादाचे कोपरगाव येथे वास्तव्य :

रघुनाथ बाजीराव यांचा जन्म माहुली येथे १ ऑगस्ट १७३४ रोजी झाला. राघोभरारी, राघोबा, दादासाहेब या नावांनी हे इतिहासात प्रसिध्द आहेत. यांच्यामुळे पेशवाईला जे तणाव सहन करावे लागले त्यामुळे यांना रियासतकार सरदेसाई 'पेशवाईतील कलीपुरुष ' म्हणतात.

रघुनाथराव प्रथम नोव्हेंबर सन १७५० मध्ये उत्तरेकडे गेले होते. पुढे २० डिसेंबर, सन १७५२ ते जून सन १७५३ पर्यंत गुजराथमधील गोहदच्या स्वारीवर गेले होते. उत्तर हिंदुस्थानातील पहिल्या स्वारीवर ३० ऑगस्ट, सन १७५३ ते ऑक्टोबर सन १७५५ च्या दरम्यान गेले होते. जाटांविरध्द सन १७५४ च्या युध्दात त्यांनी कुंभेरीच्या किल्ल्याला वेढा घातला . विजय दृष्टिपथात आला, तोच जाटांशी तह केला. उत्तरेकडील दुस-या स्वारीत यांनी गाजवलेले शौर्य अतुलनीय होते. या स्वारीवर रघुनाथराव नोव्हेंबर, सन १७५६ ते ऑक्टोबर, सन १७५८ च्या दरम्यान गेले होते. याच स्वारीत जानेवारी सन १७५८ मध्ये कुंजपुरा जिंकले. लाहोर, अटक काबीज करुन हिंदुस्थानची पश्चिम सरहद्द निर्वेध केली. अब्दालीच्या फौजांना हिंदुस्थानाबाहेर पिटाळून दिल्ली काबीज केली. मथुरा, वृंदावन, गया, कुरुक्षेत्र, वगैरे पवित्र तीर्थक्षेत्रे मुसलमांचे अमलातून सोडवली. मोगल बादशहा अहमदशाहाला कैदेत टाकून अझिझुद्दिनला [दुसरा अलमगीर] बादशाह केले. सन १७५९ - ६० च्या निजामविरुध्दच्या उद्गीरच्या मोहिमेतही यांनी मोठा पराक्रम गाजवला होता. अंगी मोठे शौर्य, धडाडी असूनही मुत्सद्देगिरी व चोख हिशोबीपण यांच्या अभावामुळे रघुनाथरावांच्या बहुतेक मोहिमा विफल जात. रघुनाथरावांच्या कार्यपध्दतीबद्दल सखारामबापू म्हणतात. रघुनाथरावाचा कारभार सुस्त, लटका व वोढा, याच मुद्यांवरुन रघुनाथराव व सदाशिवराव भाऊ यांच्यात भर दरबारातही खटके उडत. थोरला नानासाहेबांच्या मृत्युनंतर

[सन १७६१] मात्र रघुनाथरावांना पेशवेपदाचा लोभ सुटून रघुनाथराव व थोरले माधवराव यांच्यात बेबनाव सुरु झाला. परिणमत: पेशवाईला विघातक वळण लागले.

यानंतर नारायण रावाचे खून प्रकरण, बारभाई व रघुनाथराव यांच्यामधील चकमकींच्या काळात आनंदीबाई गरोदर असल्यामुळे त्यांना रघुनाथरावांनी धारला खंडेराव पवारांच्या किल्ल्यात सुरक्षिततेसाठी ठेवले होते. तेथे आनंदीबाईच्या पोटी १० जानेवारी १७७५ रोजी मुलगा जन्मला हाच पुढे दुसरा बाजीराव म्हणून प्रसिध्द झाला. या काळात बारभाईचे वर्चस्व पुण्यात वाढले, राघोबादादाला जानीवपूर्वक राजकारणापासून दुर ठेवण्यात आले. बारभाईंनी, कोपरगाव, आनंदवल्ली, शिवनेरी, जुन्नर, येथे गेली. मार्च सन १७९५ मध्ये खडर्याच्या लढाईत नाना फडणीसांनी राघोबादादाला शिवनेरी येथे कैदेत ठेवले होते. [४६]

सन १७७९ पासून रघुनाथरावांची प्रकृत खूपच बिघडत गेली. बुध्दीला भ्रम होत गेला. अखेरीस नाना फडणीस व हरीपंत फडके यांनी २१ मे सन १७८३ ला इंग्रजांशी, रघुनाथरावांना पेशव्यांच्या स्वाधीन करण्याविषयी करार केला. त्यानुसार रघुनाथरावांना पेशव्यांच्या स्वाधीन केले गेले. नंतर गोदावरीच्या तीरावर कोपरगाव हे ठिकाण पसंत करुन रघुनाथरावांना तेथे परिवारासह जुलै १७८३ पासून सामान्य कैद्याप्रमाणे बंदीवासात रहावे लागले. या काळात नारायणरावांच्या हत्येबद्दल स्पष्ट कबूली देऊन त्यांनी धर्मशास्त्रानुसार प्रायश्चित घेण्याचे मान्य केले. नाशिक, पंचवटी, कोपरगाव, कचेश्वरचे शिष्ट ब्राम्हण व काही मातबर आसामी यांनी एकत्र येऊन प्रदीर्घ, विचारविनिमयानंतर प्रायाश्चित्त विधीचा मसुदा तयार केला. नंतर गोदावरी वारणा संगमावरील सांगवी या गावी ४ ऑगष्ट सन १७८३ रोजी, सोमवारी रघुनाथरावांनी प्रसन्न चित्ताने संकल्प सोडला व सक्षौर प्रायश्चित घेतले. कचेश्वरला गोदावरीच्या पलिकडे शुक्लेश्वर व विष्णु अशी दोन मंदिरे आहेत. त्याजवळ रघुनाथरावांचा भव्य वाडा होता. तेथेच ११ डिसेंबर सन १७८३ मध्ये तिथेच त्यांचे निधन झाले. [४७]

६.१ शिंदे घराणे आणि अहमदनगर

दुस-या बाजीरावाला पेशवाईचे गादीवर येण्याची फारच लालसा होती ती प्राप्त झाल्यानंतर ती टिकविण्याच्या बाबतींत शिंद्यानी रावबाजींना जी मदत केली तिचे बक्षीस म्हणून रावबाजीनी शिद्यांना अहमदनगरचा प्रांत बहाल केला होता. त्यामुळें इ.स.१७९७ ते इ.स.१८०३ या काळामध्यें अहमदनगर शिद्यांचे ताब्यांत होते. पेशवाईच्या शेवटच्या काळात होळकर, शिंदे या घराण्यांनी आपली या ठिकाणी ताकद दाखवण्यास सुरुवात केली होती. अहमदनगर प्रांत शिद्यांना बहाल केला हे होळकरांना न रुचणारे होते. यामुळे यशवंतराव होळकर, मल्हारराव शिंदे यांच्यात वितुष्ट आले त्याची परिणीती अंतर्गत कलहात झाली. शिंद्यांच्या जामगाव, श्रीगोंदे येथील वाडयाची नासधूस त्यावेळी करण्यात आलेली होती. भव्य इमारती जमीनदोस्त करण्यात आल्या. दुस-या बाजीराव पेशव्यांनी होळकरांना बोलावून समज देण्याचा प्रयत्न केला पण त्यास फारसे काही यश आले नाही. काही दस्तऐवजात तर असाही उल्लेख येतो की शिंदे यांच्या मदतीसाठी बाजीरावाने आपले दरबारातील सरदार सदाशिवराव भास्कर आणि ब्रिटीश अधिकारी ऑगस्टान यांच्या नेतृत्वाखाली काही फौजा नगराच्या दिशेने पाठवली. हे पत्र ८ ऑगस्ट १८०२ सालचे असल्याचे समजते यात या ब्रिटीशांच्या फौजा पैठण येथे पोहचल्याचा उल्लेख आहे. या फौजेंचा निष्कर्ष उलट झाला कारण आता होळकरांनी शिंदे यांना सोडून बाजीरावाकडे आपला मोर्चा वळवला . बाजीराव होळकरांच्या फौजा पाहून इंग्रजांना शरण गेला येथेच जगप्रसिध्द बेसीनचा करार झाल्याचा उल्लेख अनेक ठिकाणी आढळतो. शिंदयांनी कर्जत, शेवगाव परगण्याचा काही भाग रामभाऊ निंबाळकरांना दिल्याचे समजते. शिद्यांच्या अहमदनगरच्या काराकीर्दीत अहमदनगरचे किल्ल्याची फक्त राजबंद्याचा तुरुंग एवढीच ख्याती होती. शिद्यांचा दिवाण बाळोबा तात्या याचे शिंदयांशी वितुष्ट आल्याने तो अनेक वर्षे अहमदनगरच्या किल्ल्यात कैद होता . पेशवे व नानाफडणीसी वादांत नाना फडणीसांचा चुलत भाऊ मोरोबा दादा फडणीस हा स्वता: नाना फडणवीस दीर्घ काळापर्यंत अहमदनगरच्या किल्ल्यात बंदीजीवन जगत होते. सखाराम बापू बोकील हा ही नगरच्या किल्ल्यात बंदी असल्याचा उल्लेख आढळतो .[४८]

सन १७६५ -६६ सालचे थोरले माधवरावांचे पत्र याबाबत महत्वाची माहिती देते पेशव्यांचे निष्ठावाण असणारे शिंदे घराणे याची जप्ती करण्याचे आदेश अंताजी महादेव यांना थोरले माधवराव पेशवे देतात . यांच्यात काय बेबनाव झाला ते येथे स्पष्ट होत नाही पण चांभारगोंदे, सिंदखेड, पैठण, एदलाबाद, शेवगांव, अंबड,नेवासे, कर्डे, कडेवलीत, पेडगांव, पाटस या गावांचा महसूल जमा करुन सरकारात भरण्याचे आदेश थोरले माधवराव पेशवे देताना उल्लेख आढळतो, पण प्रत्यक्षात ताबा घेतल्याचा उल्लेख पत्रात सापडत नाही.[४९]

याच बरोबर भागीरथीबाई शिंदे व सगुणाबाई शिंदे या उभयतांचे संसाराच्या बेगमीस दिले. असा उल्लेख थोरले माधवराव यांच्या रोजनिशीत आढळतो. या बाबतची अधिक माहिती सांस्कृतीक स्त्रीयांच्या इतिहासात घेतलेली आहे.

६.२ होळकर [दिवाण पळशीकर] आणि अहमदनगर

अहमदनगर जिल्हा ऐतिहासिक वस्तु संग्रहालयास पळशीकर घराण्याचे दप्तर मिळाले. हा एक प्रकारचा अमूल्य ठेवा आहे. रामजी यादव यांना नेमणूक व जहागीर देऊन २५ जुलै १७५० मध्ये श्रीमंत बाळाजी पंडित पेशवे [नानासाहेब पेशवे] शसंपी मल्हारराव होळकरांचे मदतणीस म्हणून पाठवले. पुढे पळशीकरांच्या पाच पिढयांनी होळकरांची सेवा केली. दिवाण हा किताब मिळवला. होळकर घराण्यातील कर्ते पुरुष, पहिले सुभेदार मल्हारराव होळकर, अहिल्यादेवी, तुकोजीराव, काशीराव, यशवंतराव, हरीहरराव या सर्व राज्यांचा विश्वास दिवानांवर होता. रामराव अप्पाजी हे रामाजी यादवांचे नातु तुकोजी होळकरानंतर दुसरे बाजीरावांचे कारकिर्दीत होळकरांचे मुख्य दिवाण होते. त्यामुळे पेशवे काळातील सन १७९५ पासूनची माहिती यांच्या दप्तरात मिळते. सरदारांची पत्रे, वारंवार लुट, खंडण्या घेतल्या, गाव ओसाड पडली. असे अनेक उल्लेख या पत्रात आहेत. मुळात हे पळशी या ठिकाणी राहत. पण होळकरांच्या स्वा-या, उत्तरेतील, पुण्यातील राजकारण या बाबींचा उल्लेख वारंवार यामध्ये येतो . म्हणजेच हे होळकरांच्या मोहिमेसोबत असावेत. नाना फडणवीसांना शिंदेनी कैदेत टाकले खंडणी म्हणून एक कोटी रुपये मागितले असा उल्लेख पळशीकर संग्रहात येतो. आणि काही ठिकाणी दहा लाख रुपये घेऊन शिंद्यांनी नाना

फडणवीसांना सोडले असा उल्लेख येतो. माणिक दौंडी, पळशी असा उल्लेख या पत्रांमधून सारखा येतो. [५०]

वास्तविक सन १७९० पासून पळशीकर संग्रह हा पेशव्यांच्या इतिहासाची माहिती देण्याचे काम करतो. परिशिष्टात दिवाण पळशीकरांची वंशावळ सविस्तर पणे दिलेली आहे. भिल्ल पळशीचे उत्तम प्रकारे संरक्षण करतात, श्रीमंताचे राज्य राहणे कठीण आहे, इंग्रज मराठयांना डोईजड झाले, होळकर दरबारात द्रव्याची तीव्र टंचाई असे उल्लेख दिवाण पळशीकर खंड एकमध्ये आलेले आहेत. जो काही सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक बाबींच्या बाबतीत उल्लेख आलेला आहे तो पुढील प्रकरणांत उल्लेख केला आहे.

६.३ सरदार अंताजी माणकेश्वर

कामरगाव हे गांव श्रीमंत छत्रपती शाहू महाराज [थोरले] आज्ञेवरुन १६ व्या शतकाच्या अखेरीस छत्रपतींचे व मराठा साम्राज्याचे भारतातील [उत्तर भारत इंद्रप्रस्थ दिल्ली] प्रथम मुत्सद्दी, सरदार अंताजी माणकेश्वर गंधे यांनी स्थापन केले. गंधे हे नामाभिधानही थोरल्या शाहूंनी दिले. ही सर्व मंडळी भिक्षुक, गांवगाडा सांभाळणारे, मूळचे 'जोश कुलकर्णी' पदाधिकारी होत. पंडे पेडगांव परगणा हे यांचे कार्यक्षेत्र होते. हा परगणा शिवशाही व त्यांनतरच्या काळात किल्ले अहमदनगरच्या अधिकारी कक्षेत येते.

दुष्काळी परिस्थितीमुळे सन १६९० च्या दशकात या परगण्यातून अनेक जाती - धर्माचे लोक उदरनिर्वाहासाठी हा प्रांत सोडून इतरत्र गेले. वयाच्या पाचव्या वर्षी पितृछत्र हरपलेला अंताजी माणकेश्वर जोस - कुलकर्णी आपल्या चुलत्यांबरोबर इतरांप्रमाणेच उदरनिर्वाह व शिक्षणासाठी कनौजला उत्तरेत गेला. तेथे त्यांचे शिक्षण सुरु झाले. शास्त्र, शस्त्र व शाख्त [सुफी संगीत] हे तो रामचंद्रपंत भट्ट व हैखातीबाबा यांचेकडून शिकला. वयाच्या १५-१६ व्या वर्षी तो या तीनही शास्त्रांत पारंगत झाला. पुढे छत्रपती शाहू महाराज [थोरले] हे बादशाहचे मुक्त कैदेत असताना उत्तरेत रामचंद्रपंतांनी एकदा अंताजींची 'यह आपही का मरहठ्ठा है: इसे आजमाके देखो' म्हणून प्रशस्ती केली. महाराजांनी अंताजीचे सूफी गाणेही ऐकले, शास्त्राचा अभ्यासही जाणला आणि महत्वाचे म्हणजे युध्दनितीने

तलवारीचे दोन हात करुन शस्त्र पारंगतता ही जोखली. त्याचवेळी सातारा राजधानीचे निमंत्रणही दिले. वयाच्या ऐकोणीसाव्या वर्षी अंताजी पुन्हा पांडे पेडगांवास येऊन परंपरागत जोसपद [जोशीपद] सांभाळू लागला. छत्रपतीही मुक्त कैदेतून सुटल्यावर तेही सातारला आले व छत्रपती ताराराणी साहेबांशी त्यांचा कलह होऊन सातारा, कोल्हापूर गाद्या वेगळया झाल्या मराठयांच्या साम्राज्य विस्तारासाठी विविध सरदारांच्या नेमणूका थोरल्या शाहूंच्या आज्ञेने श्रीमंत पेशव्यांनी केल्या. शाहूंना हिन्दुस्थानात जम बसवायचा होता व म-हाठा राज्य अटकेपार न्यायचा संकल्प होता. त्यासाली हिन्दुस्थानची भाषा, लोक व व्यवहार ज्ञान असलेला योग्य माणूस त्यांना हवा होता. योग्य वेळी त्यांनी उत्तरेत पारखलेल्या अंताजींना बोलावून घेतले व पेशव्यांना आज्ञा करुन तशी व्यवस्था केली. प्रारंभी सुभेदारी कक्षेतील व पांडेपेडगांव परगण्यातील पारनेर, हंगे, अबदूब, नागापूर, अहमदनगर वगैरे गावांची जहागिरी त्यांचेवर सोपविली व स्वतंत्र जोश कुलकर्णी वस्ती वसवण्यास सांगितले. अंताजींनी आपल्या, आंधळे, साठे, गुरव, वाणी, खडसे, भुजबळ या बालपणीच्या सहका-यांसह वरील गावांवर पेशवेंसाठी अंमल सुरु केला. मोहितून परतताना कामक्षादेवीने [कामरगाव] दृष्टांत दिला अशी गंधे परिवाराची अख्यायीका आहे. म्हणून गावाचे नाव 'कामरगांव' ठेवून तशी नोंद केली गेली. कारभारासाठी मोठी गढी व गावाला तटबंदी बांधली. तटबंदीच्या आतमध्ये भाऊबंदांसह सर्व सहकारी व गांवगाडा सुरळीत पार पाडणा-या लोकांचे छोटे - मोठे वाडे, कामाक्षीचे मंदिर, आराध्य दैवत श्री महादेवाचे मंदीर बांधले. गावाच्या पाणी नियोजनाकरिता मातोश्री काशीबाई, उमाबाई यांचे नावाने बारव व इतर सहा विहीरी - आड बांधले.

अंताजींच्या कामगिरीवर त्यांना राज्याकडून सहा, मग बारा व त्यानंतर चोवीस गावांची जहागिरी प्राप्त झाली. त्याचबरोबर कामरगांवच्या गढी किल्ल्यातून हिन्दुस्थानच्या कारभाराचेही पडघम वाजत होतेच. श्रीमंत पेशवेंनी अंताजी माणकेश्वर गंधे यांची नियुक्ती सरदारकीचा मुकूट चढवून राजाज्ञेने हिन्दुस्थानात दिल्लीत म-हाठयांचे मुत्सद्दी म्हणून केली. अनेक मोहिमात अंताजींना म-हाठयांना विजय मिळवून दिला तसा पराभवही पचवला. परंतु योध्दा म्हणून व म-हाठा राज्याचे पहिले दिल्लीश्वर म्हणून त्यांनी देशाबरोबरच कामरगावचे

[अहमदनगर] नांव इतिहासात उज्ज्वल केले. त्यांच्या कर्तबगारीचे शेकडो कागदपत्रे आज अनेक दप्तरखान्यात अप्रकाशित आहेत. १७ जानेवारी १७६१ रोजी पानिपत युध्दावरुन दिल्लीस परतांना त्यांचेवर हल्ला झाला अन् फारुखाबाद [उत्तर प्रदेश] येथे ते धारातीर्थी पडले. कंपणी सरकारच्या काळात अंताजींच्या पुढील पीढीतील बांधवांनी विविध मंडळींनी गावगाडा व सरकार मध्ये प्रांत, जिल्हाधिकारी पद संभाळले.

अंताजी माणकेश्वर गंधे यांचे व एकूणच पेशवेकाळात कामरगांवचा गांव गाडा, हिशेब, व्यवहार यांच्या नोंदी विविध दप्तरात पहावयास मिळतात. डॉ. भा. य. तिखे त्यावर अधिक संशोधन करत आहेत. [५१]

६.४ पेशवेकालीन अहमदनगरमधील महत्वाची घराणी

इ.स. १७५९ मध्ये किल्ला जेव्हा पेशव्यांच्या ताबात आला, त्या सालापासून नारोबाबाजी नगरकर, गणेश विठ्ठल, माधवराव नारायण नगरकर, व यशवंतराव महादेव नगरकर हे सुभेदार असत. ही सर्व मंडळी पारनेर तालुक्यातील कान्हूर या गावची होय. या शिवाय नगर जिल्हयातील महत्वाची घराणी म्हणजे, कर्जत तालुक्यातील राशीनचे भोसले, भांबो-याचे भांबोरकर भोसले, जामखेड तालुक्यातील खडर्याचे निंबाळकर , सुप्याचे पवार डोणगावचे यादव, कडयाचे देशमुख, जोर्वेचे थोरात, पळशीचे पळशीकर [कांबळे], श्रीगोंद्याचे शिंदे अशा अनेक घराण्यांचा उल्लेख समोर आलेला आहे. यांच्याकडे देशमुखी, पाटीलकी तर होतीच त्याचबरोबर कुलकर्णी, शेटे, महाजन, सारा वसूल करणे सरकारात भरणे अशी ही कामे ही मंडळी करत होती. प्रामुख्याने नगर जिल्हयाचा राजकीय विचार केला तर असे स्पष्ट होते की पेशव्यांबरोबर या मंडळींचा कमी संबंध येत असे पण शिंदे, होळकर, भोसले यांच्या मार्फत ही प्रतिष्ठित मंडळी आपला महसूल जमा करत व राजकीय मदत करत.

६.५ पेशवाईतील शेवटचा काळ :

अहमदनगर ज्यावेळी शिंद्याच्या अधिपत्याखाली होते, त्यावेळेस इंग्रजांनी मराठेशाहीस चोहोबाजूंनी सुरुंग पेरुन ठेवलेले होते. गव्हर्नर जनरलचे जागी लॉर्ड वेलस्ली

त्यावेळी होता. हाच वेलस्ली पुढे इंग्लंडमध्ये डयूक ऑफ वेलिंग्टन या नावांने ओळखला गेला. जनरल वेलस्ली भारतात आल्यावर त्याचे लक्ष अर्थातच मराठयांचे राज्यावर गेले. बाजीरावानें वसईचा तह केला, त्याचे पालन शिंदे करीत नाहीत ही सबब काढून वेलस्लीनें शिंद्यांचे अंमलाखालील अहमदनगरवर स्वारी केली. वेलस्ली ता. ८ ऑगस्ट १८०३ या दिवशीं वाळकी मार्गे तळ हलवून नगरमध्ये आला. अहमदनगर शहरांत पाऊल टाकतांच त्याने नगरवासीयांना उद्येशून एक जाहीरनामा काढला. की, ब्रिटीशांशी जो शांततामय सहकार्य करील त्यास उपद्रव होणार नाही . जे मराठेशाहीमधील अधिकारी त्यांचे आज्ञापालन करतील त्यांचा मान राखला जाईल. कोणींही आपले घरदार सोडून पळून जाऊ नये, शांततेने रहावे. जो घबराट निर्माण करुन पळापळ करील अगर इंग्रजांच्या आज्ञेचे पालन करणार नाही तो इंग्रजांचा शत्रू असें मानण्यात येईल. त्यामुळे नगरमधील बरीच जनता गप्प राहिली. शिंद्याची त्यावेळी अरब सेना जय्यत तयारीत होती, त्याच प्रमाणें त्यांचे पायदळ बरेंच होतें. वेलस्लीने अहमदनगर शहरावर तीन बाजूंनी मारा केला व या तिहेरी मा-यांचे नेतृत्व त्याने हारनेस व्हलेस व व्हिसी या सेनानीकडे दिंले होते. शहराच्या गांवकोसाच्या भिंती उंच होत्या व त्यास असलेल्या बुरुजावरुन अरब मारा करीत होते. तथापि इंग्रजांचे संघटित मा-यामुळे अरबांचा टिकाव न लागून ते घरामधून दडले व तेथून त्यांनी इंग्रंजावर मारा करण्यास सुरुवात केली. ब्रिटीश सेना शहरात घुसली व थोडयाशा चकमकी नंतर अहमदनगर शहर ताब्यात आले. या चकमकीत इंग्रजांचे चार अधिकारी मारले गेले. त्यापैकी काही अधिका-यांची नांवे आज माळीवाडा वेशीच्या ठिकाणी लावण्यात आली आहेत. त्यानंतर वेलस्लीने आपला मोर्चा किल्ल्यावर वळवून किल्ल्यास वेढा दिला. किल्ल्याच्या कणखर तटानें व अभेद्य बुरुजांनी इंग्रजांस दाद दिली नाही. आंतूनहि मारा होत होतांच त्यामुळे वेलस्ली विवंचनेंत पडला व किल्ल्यांत प्रवेश करण्याचे तो अन्य मार्ग शोधू लागला.[५२]

६.६ ब्रिटिशांचा एकतर्फी विजय

वेलस्लीनें भिंगारचा रघुराव बाबा देशमुख याला चार हजारांची लांच देऊन किल्ल्याची मा-याचे दृष्टीने योग्य अशी जागा त्यांजकडून शोधून घेतली व या जागेवरुन

वेलस्लीनें आपल्या तोफा रोखल्या. वेलस्लीच्या तोफखान्याच्या अचूक मा-यामुळे किल्ल्यामध्यें असलेला शिंद्यांचा किल्लेदार मल्हारराव कुलकर्णी श्रीगोंदेकर हा पांढरे निशाण दाखवून शरण गेला. शिंद्यांच्या पदरी असलेले युरोपियन अधिकारी अगोदरच इंग्रजांना मिळाले होते. बाजीराव पेशव्याने ही अगोदरच इंग्रजांशी तह केला होता. त्याचे चिथावणीवरुन इंग्रजांनी हा किल्ला शिंद्याकडून घेण्याचे ठरविले होते. व इंग्रजांनी त्यावेळी पाय जे रोवले ते कायमचेच या दिवसापासून वेलस्लीने पुन्हा काही अटीवर हा किल्ला शिंद्याच्या ताब्यात दिला तो सन १८१८ पर्यंत त्यानंतर आपला स्वत:चा कलेक्टर [पॉन्टीजर] नेमून मुलकी व लष्करी व्यवस्था हातात घेतली.

७.१ पेशवाईतील अहमदनगरमधील परगणे

अहमदनगर प्रांताचे पेशवाईच्या काळात एकंदर दहा परगणे होते.

१. परगणे हवेली अहमदनगर

२. परगणे पांडे पेडगाव

३. परगणे नेवासे

४. परगणे शेवगांव

५. परगणे चांभारगोंदे [श्रीगोंदे]

६. परगणे जामखेड

७. परगणे आष्टी

८. परगणे बारागाव नांदूर

९. परगणे कडेवळीत

१०. परगणे राशीन

पूर्वीच्या व हल्लीच्या नगर जिल्हयात बराच फरक आहे. पूर्वी हा जिल्हा पूर्वेकडे व दक्षिणेकडे जास्त पसरला होता. संगमनेर, अकोले, कोपरगाव व पारनेरचा बराच भाग सध्याच्या जिल्हयात नव्हते. परंतु जामखेड व नगर तालुक्यामधील मोगलाईचा सर्व भाग,

सोलापूर जिल्हयातील करमाळे हा तालुका पेशवेकालीन नगर जिल्हयात होता. पूर्वीच्या दहा परगण्यांपैकी पाच परगण्यांसंबधी माहिती उपलब्ध आहे. त्या माहितीमध्ये पेशवेकालीन राजकीय व्यवस्थेची बरीचशी साक्ष आपल्या समोर येते. पेशव्यांनी या दहा परगण्यांवरुन जी राजकीय व्यवस्था चालवली त्याचे केंद्र तर पुणे हेच होते. परंतु त्याचे उपविभाग हे परगणे होते. या परगण्यांच्या ठिकाणी राजकीय घराणी म्हणजेच श्रीगोंद्याचे शिंदे हे घराणे होय . पुढे तर नगरमधील मोठा भाग व्यापून त्यांनी आपल्या वर्चस्वाखाली आणला होता, तर सुपा, पारनेर, जामखेडमधील काही भागावर होळकर घराण्यांचे वर्चस्व असल्याचे दिसून येते, भोसले घराण्यांचे नगरमध्ये दोन भाग झाल्याचे आढळून येतात. एक शहाजी राजांच्या वंशावळीतील भोसले आणि दुसरे शरीफजी राजे यांच्या घराण्यातील भोसले. प्रामुख्याने नगर जिल्हयातील भोसले हे शरीफजी राजे यांच्या वंशवेलीतील असल्याचे अनेक पुरावे अहमदनगरच्या ऐतिहासिक वस्तू संग्रहालयात आहेत . खर्डा, करमाळा या भागावर निंबाळकरांमार्फत कारभार चालवला जायचा. या भागातील जहागिर गोळा करणे, न्यायदान, महसूल विषयक कार्य या साठी या घराण्यांमध्ये देशमुख, देशपांडे, कुलकर्णी यांच्यामार्फत जमा महसूल गोळा करुन गावची शांतता, ऐक्य, व गावावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. सुभा, परगण्यांमार्फत येथे नियंत्रण प्रस्थापित केले जायचे.[५३]

७.२ पेशवेकालीन अहमदनगरचे प्रांतीय प्रशासन

प्रशासनाच्या सोयीसाठी पेशवेकाळात पुढील भाग पाडून त्यावर अधिकारी वर्ग नियुक्त केला जाई.

राज्याचा विभाग	अधिका-याचे नाव
१. प्रांत [सुभा सरकार]	सुभेदार
२. परगणा [मामला, तालुका]	मामलेदार
३. महाल [तरफ, तपे, कार्यात]	महालकरी
४. गाव [कसबा, मौजे मजरे]	मोकदम

प्रांत किंवा सभा हा प्रशासकीय सर्वात मोठा घटक होता. सुभेदार हा प्रांत प्रमुख होता. त्याचा पगार किती होता, त्याचा संदर्भ मिळत नाहीत. पेशवाकाळात ते अधिकारी जनतेचे मित्र व हितकर्ते म्हणून ओळखले जाऊ लागले. पेशवे काळात काही देशमुख, देशपांडे जनतेची गा-हाणी पेशव्यांकडे मांडताना दिसतात. मामलेदार देखरेख ठेवण्याचे काम तसेच वतन, इनाम देणगी दाखल दिलेल्या जमिनी कागदपत्रांची नोंद ठेवणे ही कामे करत असत . देशमुख देशपांडे यांना प्रमुख अधिकार असल्याचा उल्लेख अनेक तत्कालिन कागदपत्रातून स्पष्ट होतो.

प्रांताच्या छोटया विभागावर कामवीसदार यांची नेमणूक केलेली असे. कमावीसदारापेक्षा मोठा अधिकारी मामलेदार होता. मामलेदाराची नेमणूक पेशवा करी मामलेदार हे प्रत्यक्ष केंद्रीय प्रशासनात जबाबदार असत. प्रांतातील सर्व हिशोब केंद्रीय सरकारला सादर करण्याचे काम मामलेदारांना करावे लागे. मामलेदार व कमावीसदारांना राजकीय सामाजिक आर्थिक हिताची सर्व कामे पहावी लागत.

७.३ पेशवेकालीन घोडदलांची संख्या व त्यासाठी दिलेल्या जाहागि-या

काव्येतिहास संग्रहात एका अस्सल पत्रानुसार पेशवे कालखंडात सरदारांना घोडेस्वारांनी फौज ठेवण्यासाठी जाहागि-या मिळाल्या होत्या.

सरदार	स्वार	जहागीर [लाख]
मल्हारराव होळकर	२२,०००	९५ लाख
पवार	१५,०००	४५ लाख
पटवर्धन	३,०००	११ लाख
नाना फडणवीस	७००	४.५ लाख
सदाशिवराय माणकेश्वर	५००	१.५

७.४ पेशवेकालिन अहमदनगरमधील अधिका-याची नावे व वार्षिक वेतन रुपये

दिवाण	५००
खासनीस	५००

फडणीस ४५०

सबनीस ४००

दप्तरदार ५००

चिटणीस ४००

पारसनीस २५०

जामदार ३००

पोतनीस ४००

इ.स. १७११-१२ मध्ये शिंदे , भोसले, होळकर वगळता ६० सरंजामदारांची यादी पाहावयास मिळते. मराठे सरदार हे प्रामुख्याने घोडदळ बाळगत. त्यांना पायदळात काम नको असे. सरदारांना त्यांच्या सुचविलेल्या संख्येप्रमाणे घोडदळ घेऊन युध्दभूमीवर जावे लागे. प्रशासकीय कारभार व संरक्षण ही जबाबदारी राजाने सरंजामदाराकडे सोपविली होती.

महिपतराव काकडे यांनी २५०० स्वारांचा सरंजाम होता. प्रत्येक स्वाराला वार्षिक २५० रुपयांचा तनखा होता. महिपराव काकडे यांनी आपल्या जहागिरीच्या उत्पन्नातून आपल्या पदरी असलेल्या प्रशासकीय अधिका-यांना वार्षिक तनखा दिली होती. अहमदनगर मधील जामगाव, श्रीगोंदे, राशीन, भांबोरा, शेवगाव या ठिकाणच्या सरदार लोकांचा यात समावेश असल्याचे समजते. हे सरदार लोक कमीच घोडे बाळगत. घोडेही चांगल्या दर्जाचे नसत. तिस-या दर्जाचे घोडे सरदार लोक युध्दभूमीवर आणत असत. घोडेस्वारांना पगारही कमीच दिला जाई. काही उपलब्ध संदर्भानुसार असे समजते की आर्थिक अडचणीमुळे होळकरांनी आपले सैन्य कमी केले होते. आर्थिक दिवाळे निघाल्यामुळे एखादा सरदार जर लष्करी सेवा देऊ शकत नसेल तर त्याची जहागीर जप्त केली जाई. इ.स.१७६८ मध्ये मुधोळचे मालोजी घोरपडे यांची जहागीर जप्त केली होती. पेशव्यांच्या व्यक्तिगत सेनेत अरब व इतर परकीयांचा अधिक भरणा होता. होळकरांच्या सैन्यात पेंढारी होते, तर महादजी शिंद्यांच्या सेनेत औंधच्या पूर्वीच्या सैन्याची संख्या अधिक होती.[५३]

७.५ पेशवेकालीन अहमदनगरमधील प्रमुख वतनदार व त्यांचे हक्क व कर्तव्ये

पाटील :-

पाटीलच्या जबाबदा-या व कामे पाटील हा गावचा वंशपरंपरागत राजा होता. गावाचे संरक्षण करणे, गावात शांतता ठेवणे, गुन्हयाचा तपास करणे, पडीक जमीन लागवडीखाली आणण्यास प्रोत्साहन देणे, वस्ती करण्यास आलेल्या लोकांची सोय करुन खेडयांचा विकास करणे, शेतसारा वसूल करणे, त्या मोबदल्यात २२ टक्के शेतसारा पाटलास मिळे, गावातील खटल्यांचा न्यायनिवाडा करणे हे पाटलाचे मुख्य काम होते पाटील हा गौतसभेचा प्रमुख असे. गाव वसविणारा पुढारी हा गावचा पाटील झाला. पाटील हा गावचा प्रमुख कार्यवाह किंवा राजाच होय. रयत व राजा यामधील पाटील हा दुवाच होता. गावचा कारभार पाहण्यासाठी पाटलास कुलकर्णी, चौगुला व महार हे वतनदार मदत करत. पाटलाकडे असणा-या जमिनीवर सारा नव्हता. पोळयाच्या दिवशी पाटलाचा बैल वेशीतून प्रथम नेण्याचा मान होता. सर्वसाधारणपणे पाटील पद हे मराठयांकडे असे. पण काही वेळा तो ब्राम्हण, जैन, लिंगायत वा इतर जातीचाही पाटील असे. गावात पाटलास मोठा मान होता. पाटलास सणासुदीच्या दिवशी गावक-यांकडून अनेक वस्तू मिळत. गावातील विविध कारागिरांकडून मोफत सेवा मिळे. वाणी - व्यांपा-यांकडून नारळ, सुपारी व तेल मिळे. पाटलाने जर गैरवर्तन केले तर त्याचे वतन काढून घेतले जाई. पाटीलकीच्या वतनाला फारच महत्व होते. "उतरंडीला नसे ना का दाणा: पण दादला असावा पाटील राणा" ही म्हण पाटीलकीचे महत्व दर्शविते. पेशव्यांच्या अंमलामध्ये पाटलांचे उल्लेख अहमदनगरमधील प्रत्येक सुभ्यात, परगण्यात येतात. काही ठिकाणी तर पाटील हे केवळ पाटील न राहता यांच्याकडे देशमुख, देशपांडे असे मानाचे किताब होते. त्याच बरोबर पाटीलकीही होतीच. यासाठी राशीनचे भोसले, भांबोरकर भोसले, डोणगावचे तुकाराम पाटील यादव यांचा प्रामुख्याने उल्लेख या ठिकाणी करता येईल. आजही या घराण्यांकडे काही सनदा, मोडी दस्तऐवज, जाहगि-या आहेत. जे आपणास शिवकाळापासून, पेशवे काळापासूनची माहिती देतात. पळशीचे पळशीकर तर अनेक वर्षे पेशव्यांचा मुलुख सांभाळत होते. त्याचे दप्तर ऐतिहासिक वस्तु संग्रहालयात

आजही जमा आहे. यातून पारनेर तालुक्यातील महत्वपूर्ण माहिती समोर येण्यास मदत होते. ही जाहागिरी पारनेर तालुक्यातील पळशी, सुपा, कान्हूर, जामगाव इ. गावासंबंधीची आहे.

कुलकर्णी :

कुलकर्णी हा गावचा दुसरा महत्वाचा पण पाटलापेक्षा दुय्यम स्थान असलेला अधिकारी होता. गावातील प्रत्येक शेतक-याकडे असलेल्या जमिनीची नोंद ठेवणे हे त्याचे काम होते. तो पाटलाचा सहाय्यक होता. एकच कुलकर्णी एकापेक्षा अधिक गावांच्या जमिनीची नोंद ठेवत असे. कुलकर्णी जादा रक्कम वसूल करणे व वसूल केलेल्या जमिनीची नोंद दप्तरात न करणे या मार्गाने भ्रष्टाचार करत. अशा गैरवर्तन करणा-या कुलकर्ण्यावर कारवाई केली जाई. त्याचे वतन काढून घेत.[५५]

चौगुला :

चौगुला म्हणजे चार कुळे बाळगणारा. पण डॉ. एस.एन.सेन यांनी म्हटले आहे की, "मराठे अजूनही असे मानतात की, चौगुला हे पाटलाच्या रखेलीपासून झालेल्या मुलाचे वारसदार होते." ब्राम्हण वगळता इतर वर्गातील वारसदारास तुच्छ न समजता त्यास पद व प्रतिष्ठा दिली जाई. चौगुला हा पाटलास शेतसा-याच्या वसुलीत, शेतसा-याची रक्कम सरकारी खजिन्यात पोहोचविण्याच्या कामी मदत करी. सामान्यपणे चौगुला पदावर पाटलाप्रमाणेच मराठा जातीतील लोकांनाच प्राधान्य देण्याचे शिवाजीचे धोरण होते. पण काही ठिकाणी ब्राम्हण, शिंपी, लिंगायत, जैन, माळी व मुसलमान चौगुले आढळतात. ग्रामव्यसस्थेत चौगुला पदावर काम करणा-या व्यक्तीला महत्वाचे स्थान होते. त्याचा गावात दबाव असे. पण प्रत्येक गावात चौगुला होताच असे नव्हे.

शेटे - महाजन :

हे दोघेही वतनदारच होते. गावात पेठे वसविणे हे काम शेटे करत तर पेठेचा हिशेब ठेवण्याचे काम महाजन करी. शेटे-महाजन हे गावच्या व्यवस्थेमधील वंशपरंपरागत वतनदारच होते. शेटे व महाजन यांना सरकारपासून जमीन व गावक-यांकडून काही हक्क मिळत. गोतसभेच्या कामात ते अधिकृतपणे भाग घेत असत. त्यांना घरपट्टी माफ असे.

देशमुख - सरदेशमुख :

हे प्रामुख्याने मराठा जातीतील असत. काही ठिकाणी धर्मांतर केल्यामुळे मुसलमानही देशमुख होते. हे उल्लेख नगर जामखेड तालुक्यातील अभिलेख कक्षातील नोंदी वरुन स्पष्ट होतात. शिवपूर्वकाळातील इस्लामी राजवटीत देशमुख - सरदेशमुखांना शेतसारा वसुलीचे अधिकार होते. पण ते सरकारने ठरवून दिलेल्या रकमेपेक्षा जास्त शेतसारा वसूल करत व त्यामुळे शेतक-यांचे आर्थिक शोषण होई. महाराष्ट्रातील देशमुख हे प्रामुख्याने मराठा असत. डॉ.शं.ना.जोशी यांच्या मते, देशमुखी वतन हे सर्व वतनांमध्ये श्रेष्ठ आहे. एखाद्या गावचा पाटील कामात दिरंगाई व कामचुकारपणा करीत असेल तर देशमुख पाटलांचा बंदोबस्त करत. देशमुखांना अनेक वस्तू गावक-यांकडून मिळत. देशमुखांना विविध जातीच्या लोकांकडून विविध स्वरुपात सेवा घेण्याचा वतनी हक्क होता. उदा. माळयाकडून भाजीपाला, धनगराकडून दही, तूप जीवनाश्यक वस्तू, अन्नधान्य, पैसा यांच्या स्वरुपात देशमुखी वतनास प्रचंड उत्पन्न होते. देशमुख वतनाची व्याप्ती फारच मोठी होती. ते स्वत:ला राजेच समजत. देशमुखांना जसे हक्क होते तसेच काही कर्तव्येही होती. ज्या गावात पाटील नाही. तेथील पाटीलकीचे काम त्यांना करावे लागे. आपल्या परगण्यातील वसाहत वाढविणे, परगण्यातून दरवर्षी दौरे काढून रयतेची पाहणी करणे, पडीक जमिनी गरजूंना कसण्यासाठी देणे ही कामे देशमुखांना करावी लागत. प्रत्येक गावातील अबकारी उत्पन्नापैकी शेकडा २ रु. देशमुखांना मिळत.[५६]

देशपांडे - सरदेशपांडे :

देशपांडे हा देशमुखानंतरचा प्रांतिक प्रशासनातील महत्वाचा वतनी अधिकारी होता. देशमुखांप्रमाणेच देशपांडेलासुध्दा अनेक हक्क व मानपान होते. देशमुखाला असलेले हक्क व मानापानांपैकी अर्धे हक्क व मानपान देशपांडेना असत. देशमुखांच्या अनुपस्थितीत देशपांडे आपले अधिकार गाजवत.

बारा बलुतेदार :

प्रारंभिक मराठा कालखंडातही राजकीय सामाजिक जीवनात पुढील १२ बलुतेदार होते. त्यांना त्यांच्या सेवेचा मोबदला धान्याच्या रुपात शेतका-यांकडून मिळत होता. हे १२ बलुतेदार म्हणजे सुतार, लोहार, महार, चांभार , मांग, कुंभार ,गुरव, जोशी, न्हावी, मुलाण, धोबी इत्यादी आजही अहमदनगर जिल्हयातील अनेक बाजारपेठांच्या ठिकाणी बलुतेदार मोठया प्रमाणावर आढळतात. काही तर आपला वंशपरांपरागत पिढीजात व्यवसाय सोडण्यास आजही तयार नाहीत. बलुतेदारीचे आगळे वेगळे वैशिष्टय अनेक सुभ्यात पहावयास मिळते. बलुतेदारी हा शब्द प्रयोग जाऊन आज त्यांना व्यावसायीक शब्द प्रयोग आला. या व्यावसायिकांनी आपल्या पिढीजात व्यवसायास आधुनिकतेची जोड दिल्याचे समजते. तंत्रज्ञानाचा योग्य वापर करुन आजही हा व्यवसाय मोठया प्रमाणात सफल केल्याचे समजते. यावर पूर्वीच्या नगर जिल्हयातील जामखेड तालुक्यातील खडकत या गावी मोची, विणकर हे मुस्लीम धर्मीय आहेत. आजही आपला पिढीजात व्यवसाय योग्य पध्दतीने ते सांभाळतात. त्रि. ना. आत्रे लिखीत गावगाडयामध्ये बलुतेदारांचे सविस्तर वर्णन पाहावयास मिळते. ग्रामीण समुदायाचे वैशिष्टयपूर्ण उल्लेख गावगाडयात आहे.

आलुतेदारः

ग्रॅड डफने मराठा काळातील आलुतेदारांची संख्या १२ एवढी दिलेली आहे. त्यात सोनार, जंगम, शिंपी, कोळी, येसकर, माळी, डवरी गोसावी,रामोशी, तांबोळी, तेली, गोंधळी,घडसी, इ. आलुतेदारांच्या प्रत्येक जातीत अनेक पोटजाती होत्या. शिंप्यांमध्ये नामदेव शिंपी, भावसार शिंपी, मराठा शिंपी, अहिर या पोटजाती होत्या. त्या कोणत्या ना कोणत्या कारणाने पेशवाईत राजकीय बाबीत हस्तक्षेप वर्णीत केलेला आहे, आलुतेदार अहमदनगरमधील ग्रामीण जीवनाचे अविभाज्य घटक बनले होते. कृषी प्रधान संस्कृतीचे दर्शन ग्रामीण भागातून स्पष्ट होते. स्वयंपूर्ण खेडी ही बलुतेदार, आलुतेदार यांच्याशिवाय पूर्णच होऊ शकणार नाहीत. पेशवे काळात तर या समुदायाचा उपयोग फक्त शेती कामासाठी

न राहता तो देशमुख, देशपांडे, सरदार मंडळींच्या सोबत जोडला गेला. युध्दाच्या कामी, मोहिमेच्या कामी या समुदायाने आपला सहभाग नोंदवला.[५६]

वरील प्रमाणे पेशवेकालीन अहमदनगरचा राजकिय अभ्यास आपण अभ्यासला, पुढील प्रकरणात पेशव्यांची सामाजिक परिस्थिती कशा प्रकारे होती हे पाहणार आहोत.

संदर्भ :

१. डॉ. कोठेकर शांता, इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती - २०११ पृ. १७

२. ढेरे, रा.चि. संपा. आज्ञापत्र, पुणे १९६० पृ. ७९

३. सरदार मिरीकर ना.य. , अहमदनगरचा इतिहास, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, तिसरी आवृत्ती २०१६ पृ. १४

४. कित्ता पृ. क्र.३३

५. कित्ता पृ. ३७

६. साने काशिनाथ नारायण, पेशवा बाळाजी बाजीराव खंड २ , गर्व्हनमेंट ऑफ मुंबई प्रकाशन , १९११ पत्र नं. १५ पृ.१०

७. केळकर य.न., मराठेशाहीतील वेचक वेधक , डायमंड प्रकाशन , प्रथम आवृत्ती : मे २००८ पृ. १८५

८. कित्ता पृ. १८७

९. अहमदनगर संग्रहालय, मोडी पत्र , शोकेश नं. १५

१०. कित्ता, शोकेश नंबर. १५

११. कित्ता, शोकेश नंबर. १५

१२. पारसनीस द.ब. , इतिहास संग्रह, निर्णसागर प्रकाशन डिसेंबर १९१४ पृ. ४१, ४२

१३. कित्ता पृ. ४३

१४. नगर पालिका, नगर शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथ, आमचे वैभवशाली नगर पृ. ४६

१५. कित्ता पृ. ४७

१६. नगरकर चिंतामण लक्ष्मण, नारो बाबजी नगरकर यांचे चरित्र, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, १९६८ पृ.३

१७. साने काशिनाथ नारायण, पेशवा माधवराव खंड १, गर्व्हनमेंट ऑफ मुंबई प्रकाशन , १९११ पत्र नं. ६ पृ.५

१८. ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९८५ पृ. १०३,१०४

१९. साने काशिनाथ नारायण, पेशवा माधवराव खंड १, गर्व्हनमेंट ऑफ मुंबई प्रकाशन , १९११ पत्र नं. ८

२०. कित्ता : पृ. ५

२१. कित्ता : पृ. ९

२२. कित्ता : पृ. २३

२३. नगर पालिका, नगर शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथ, आमचे वैभवशाली नगर पृ. ३२

२४. साने काशिनाथ नारायण, पेशवा माधवराव खंड १, गर्व्हनमेंट ऑफ मुंबई प्रकाशन , १९११ पत्र नं. ८

२५. ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन , पुणे १९८५ पृ. १०३,१०४

२६. नगर पालिका, नगर शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथ, आमचे वैभवशाली नगर १९९० पृ.५१

२७. कित्ता : पृ. ५२

२८. कित्ता : पृ. ५३

२९. कित्ता : पृ. ४७

३०. शेजवलकर त्र्यं. शं. , निजाम पेशवे संबंध, रचना मुद्रणालय पुणे १९६३, पृ. १०८

३१. कित्ता पृ. ११०

३२. कित्ता पृ. ११२

३३. कित्ता पृ. ११४

३४. कित्ता पृ. ११७

३५. कित्ता पृ. १२३

३६. कित्ता पृ. १२४

३७. कित्ता पृ. १२७

३८. कित्ता पृ. १३०

३९. कित्ता पृ. १३२

४०. कित्ता पृ. १३५

४१. कित्ता पृ. १३९

४२. नगर पालिका, नगर शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथ, आमचे वैभवशाली नगर - १९९० पृ.४७

४३. खरे वासुदेव वामन शास्त्री, नाना फडणवीसाचे चरित्र, महाराष्ट्र बुक डेपो पुणे, १९०२ पृ. २०३

४४. ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास , कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९८५ पृ. १३२

४५. कित्ता : पृ. ९७

४६. कित्ता : पृ. १२५

४७. कित्ता : पृ. १३०,१३१

४८. नगर पालिका ,नगर शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथ, आमचे वैभवशाली नगर - १९९० पृ.९७,९८

४९. साने काशिनाथ नारायण, पेशवा माधवराव खंड १ , गर्व्हनमेंट ऑफ मुंबई प्रकाशन , १९११ पत्र नं. १६५ पृ. १५०

५०. निसळ साहेबराव तथा सदाशिव शिवराम , दिवाण पळशीकर दप्तर खंड, एक ,अहमदनगर जि. ऐ. व. संग्रहालय प्रकाशन सन १९७३ पृ.१९

५१. कित्ता : पृ.२३

५२. नगर पालिका, नगर शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथ, आमचे वैभवशाली नगर - १९९० पृ. ५०

५३. सरदार मिरीकर ना.य. , अहमदनगरचा इतिहास, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, तिसरी आवृत्ती २०१६ पृ. १६

५४. चिटणीस कृ.ना., मध्ययुगीन भारतीय संस्था आणि संकल्पना, भाग ३ समर्थ मुद्रणालय, मुंबई पृ. १११

५५. कित्ता : पृ. ३५

५६. कित्ता : पृ. ४०

प्रकरण ४ भाग २

सामाजिक परिस्थिती

• पेशवेकालीन अहमदनगरची सामाजिक परिस्थिती

प्रस्ताविक :

१.१ आर्थिक इतिहासाप्रमाणे सामाजिक इतिहास लेखनाचा प्रवाह ही प्रामुख्याने एकोणिसाव्या शतकात रुढ झाला. 'इतिहास म्हणजे गतकालीन मानवी जीवनाची नोद' ही व्याख्या मान्य केली की मानवी समाजाचा इतिहास हा इतिासाचा महत्त्वाचा प्रकार मानणे ओघानेच येते. मात्र सामाजिक जीवनाची विविध अंगे असल्यामुळे सामाजिक इतिहासात कशाचा अंतर्भाव करावयाचा, राजकीय, व आर्थिक व्यवहाराचां त्यात समावेश करायचा की नाही, हा प्रश्न अनेकदा उपस्थित केला जातो. इंग्लंडचा सहा शतकांचा सामाजिक इतिहास लिहिणा-या प्रा. जी.एम. ट्रिव्हेलियन यांनी ग्रंथाच्या प्रस्तावनेत, 'राजकीय अंगाला फाटा देऊन लिहिलेला समाजाचा इतिहास म्हणजे सामाजिक इतिहास होय '. {'Social history might be defined as the history of a people with politics left out'} अशी सामाजिक इतिहासाची व्याख्या केलेली आढळते, इतकेच नव्हे तर सामाजिक इतिहासाचे महत्व प्रतिपादन करताना सामाजिक इतिहासाशिवाय आर्थिक इतिहास निष्फळ व राजकीय इतिहास अनाकलनीय ठरतो. {Without social history economic history is barren and political history is unintelligible} असेही ठाम विधान त्यांनी केले आहे. प्रो. रेडफोर्ड हे 'सामाजिक इतिहास म्हणजे सामाजिक दृष्टिकोणातून ' लिहिलेला इतिहास, {Social hstory is all history from a social point of view} असे मत मांडतात, तर 'सामाजिक अंगांशी संबध्द असलेल्या सर्व मानवी व्यवहारांचा समावेश सामाजिक इतिहासात असे नेमिअर यांचे मत आहे. {All human pursuits and disciplines in their social aspect enter into it} म्हणजे राजकिय घटनांचा समाज जीवनावर होणारा परिणाम हा सामाजिक इतिहासात समाविष्ट होतो. लक्षात घेण्याचा मुद्दा असा की समाज हा सामाजिक इतिहासाचा केंद्रबिंदू असावा लागतो.

सामाजिक इतिहासाचा मुख्य वर्ण्यविषय समाज असल्यामुळे तो व्यक्तिनिष्ठ नाही. सामाजाची घडण, समाजाची जीवनप्रणाली, त्याच्या चालीरीती, रुढी, परंपरा, संस्कृती, धार्मिक निष्ठा समाजातील भिन्न घटकांचे परस्परसंबंध, कुटुंबसंस्था, त्याचे स्वरुप, निर्वाहाची साधने, उद्योग करमणुकीची साधने, कलाभिव्यक्तीचे प्रकार, विचारप्रणाली, सामाजिक संस्था, तसेच सामाजिक स्थित्यंतरे अशा अगणित विषयांचा विचार सामाजिक इतिहास लेखकाला करावा लागतो. सामाजिक परिवर्तनाच्या अध्ययनासाठी दीर्घकाळाचा अभ्यास अपरिहार्य ठरतो. त्या व्यवहारांचे स्वरुप समजून घेण्यासाठी करावयाचे नसून त्यातून व्यक्त होणा-या जीवन पध्दतीसाठी करावयाचे असते. तसेच राजकीय घडामोडींना सामाजिक इतिहासात स्थान नसले तरी राजकीय स्थित्यंतरांचे किंवा घटनांचे समाजावरील परिणाम सामाजिक इतिहास अभ्यासकाला अभ्यासावे लागते. सामाजिक संस्थांची निर्मिती व त्यांचा विकास, तसेच सामाजिक समस्या सामाजिक सुधारणा हे विषय सामाजिक इतिहासात मोडतात.

सामाजिक इतिहासाचे स्वरुप व्यापक असल्यामुळे त्याचे पोटविभाग देखील अनेक आहेत. त्यात धार्मिक चळवळींचा इतिहास, समाजसुधारणा चळवळींचा इतिहास, समाजातील भिन्न घटकांचे, जाती, जमाती, स्त्रीजीवन, कला, स्थापत्य यांसारखे अनेक विषय सामाजिक इतिहासाचे पोटविभाग आहेत.

सामाजिक इतिहासासाठी वापरावयाच्या स्त्रोत साधनांचा विचार केल्यास लिखित साधनांप्रमाणे अलिखित साधनेही उपयुक्त ठरतात असे दिसते. अभिलेखागारांतील कागदपत्रे, सामाजिक विषयासंबंधीचे शासकीय व खाजगी अहवाल, समकालीन व्यक्तीचा खाजगी पत्रव्यवहार, याबरोबरच साहित्यकृतींतून समाजजीवनासंबंधी मिळणारी माहिती, जनगणना अहवाल, मंदिरे रंगचित्रे, स्थापत्य, वस्त्रे, भांडी इत्यादी बाबी सामाजिक जीवनावर प्रकाश टाकतात. तसेच लोककथा, लोकगीते, पुराणकथा यांचाही वापर अलीकडे सामाजिक इतिहासाची स्त्रोतसाधने म्हणून केला जात आहे. सांख्यिकीशास्त्राचा उपयोग सामाजिक इतिहासलेखनासाठी ब-याच प्रमाणात केला जातो.

सामाजिक इतिहासलेखनाची बीजे मेकॉलेच्या इंग्लंडच्या इतिहासात कांही अंशी आढळतात. मात्र ट्रिव्हेलियनचा 'इंग्लिश सोशल हिस्ट्री' हा ग्रंथ विशेष वाचनीय व लोकप्रिय ठरला, भारतातही हया दृष्टिकोणातून प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक भारताचे सामाजिक इतिहास लिहिले जात आहेत. पेशवेकालीन समाजजीवन, आधुनिक भारतातील स्त्रीजीवन, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांचा 'भारतीय विवाह संस्थेचा इतिहास ', नटराजन यांचा 'आधुनिक भारतातील समाजसुधारणांचा इतिहास' ही सामाजिक इतिहासाची उदाहरणे होत. अर्नाल्ड टॉयन्बी तसेच विल डयूरंट यांनी लिहिलेले संस्कृतींचे इतिहास गतकालीन समाजजीवनाचे चिकित्सक दर्शन घडवितात. [२]

मानवी समाजाची निर्मिती झाल्यानंतर विविध सामाजिक संस्थांचा उदय झाला. या सामाजिक संस्थांचा हेतू समाजाच्या विभिन्न गरजांची पूर्तता करणे होता. मध्ययुगीन महाराष्ट्राचा विशेषत: अहमदनगरचा पेशवेकालीन परिस्थितीचा विचार करत असताना तत्कालीन सामाजिक जीवनावर जातीसंस्था विविध धार्मिक संप्रदाय, विवाहसंस्था, कुटुंब व्यवस्था रुढी परंपरा अनिष्ठ प्रथा अंधश्रध्दा, कर्मठपणा यांचे मोठया प्रमाणात प्राबल्य असल्याचे दिसून येते. या काळातील या सामाजिक व्यवस्था ही सदोषपूर्ण असलेल्या दिसून येतात. समाजाची जातीच्या दृष्टीने वेगवेगळया स्तरामध्ये विभागणी झालेली दिसून येते. उत्तर वैदिक काळानंतर ताठर झालेली जातीव्यवस्था ही मध्ययुगातही तशीच असल्याचे दिसून येते. जाती अंतर्गत व जातीजातींमधील संघर्ष हे या जातीसंस्थेचे वैशिष्टये दिसून येते. तर या काळात विविध धार्मिक संप्रदायांचा उदय झालेला दिसतो आणि विवाहसंस्था आणि कुटुंब संस्था या वरील दोन संस्थाच्या प्रभावाखाली आल्याचे दिसून येते. त्यामुळे पेशवेकालीन अहमदनगरमध्येही सामाजिक जीवनाचा अभ्यास करताना या संस्थांचा वेगवेगळा विचार करणे आवश्यक आहे.[३]

" जुने मोडू नये व नवे करु नये " अशीच पेशवे कालीन अहमदनगरची सामाजिक धारणा असल्याचे दिसून येते. पेशवाईत धर्मांतराची प्रक्रिया थंडावलेली असली तरी

वर्णव्यवस्था समाजात चांगलीच रुजलेली होती. यातूनच जातीसंस्थेचा वृक्ष फोफावलेला आपणास दिसून येतो.

सामाजिक इतिहासाची माहिती लिहीताना जी.एम. ट्रॅव्हेलियन म्हणतो "राजकीय अंगाचा विचार न करता लिहिलेला समाजाचा इतिहास म्हणजे सामाजिक इतिहास होय ".

प्रा. नेमियर म्हणतात "सामाजिक अंगाशी संबंध असलेल्या सर्व मानवी व्यवहारांचा समावेश सामाजिक इतिहासात होतो ".

१.२ मराठाकालीन समाजरचना :

ब्राम्हण :

पेशवेकालीन अहमदनगर मध्ये समाजात ब्राम्हणवर्ग अस्तित्वात होता. नगरच्या शहरी, तालुक्याच्या, बाजारपेठांच्या ठिकाणी या वर्गाचे प्राबल्य मोठया प्रमाणावर होते. प्राचीन काळापासून ब्राम्हणांची षटकर्मे धर्मशास्त्राने नेमून दिलेली आहेत. या षटकर्मात अध्ययन, यज्ञ, यज्ञकर्म करणारा याजक, अध्यापन, दान व प्रतिग्रह यांचा समावेश होता. ब्राम्हण हा स्वत: वेदशास्त्र शिकून दुस-यांना शिकवित असे. मराठाकाळात अध्ययन, अध्यापन, दान प्रतिग्रह यांना विशेष महत्व प्राप्त झाले होते. लिहिण्या वाचण्याच्या कामात ब्राम्हण वर्ग तज्ज्ञ म्हणून काम करत होता. एक तर शासक म्हणूनही या वर्गाचे सर्व समाजावर वर्चस्व असल्याचे दिसते. कारकुनापासुन ते अधिकारपदापर्यंत शासन व्यवस्थेत ब्राम्हण समाजाने आपले विशेष अधिकार निर्माण केले होते. पुण्यातील पेशव्यांच्या कामगिरीचे पडसाद नगरच्या राजकारणावरही पडत होते. पटवर्धन,रामदासी, मुळे, कुलकर्णी, पुरोहित, देशमुख, भट, कांबळे, काटे अशा अनेक अडनावाची ब्राम्हण मंडळी अहमदनगरच्या ग्रामीण, शहरी वस्त्यांमध्ये आढळतात. त्यातही पुरोहित पूजाअर्चा करणारे वेगळे, शासकीय नोकरी करणारे वेगळे असेही त्यांच्यात गट आढळतात. [४]

बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशवे यांच्या समईचा पुणतांबे [कोपरगावचा] उल्लेख करणे गरजेचे आहे. राघो गोविंद यांस नानासाहेबांनी सनद दिली, आप्पाजी चिमणाजी देहडाराय यजुर्वेदी ब्राम्हण वस्ती कसबे पुणतांबे उमर वर्षे २० यास कांही

भ्रम झाल्यामुळे तो सातारीयास गेला. तेथें बनसीपुरीयाजकडील गोसावी यांजवळ गेला. त्यांनी डोकें बोडून गोसावी केला. त्यास १५ दिवस झाले. उपरांतिक भ्रम गेला तेव्हा गोसावी याजवळ भांडो लागला. ही हकीगत त्याने पुणे मुक्कामी श्रीमंताजवळ सांगितली, हिच हकिगत पुण्याच्या थोर शिष्ट ब्राम्हण यांजकडे सांगितली त्याप्रमाणे, त्यांनी निर्णय दिला की, तुम्ही पुणतांबे, टोकें व प्रवरासंगम या क्षेत्रांचे ब्राम्हणांचे विद्यमाने व पुणें यांतील ब्राम्हणांने लिहून दिल्हे, त्याप्रमाणे प्रायश्चित्त द्यावे. प्रायश्चित्तासाठी रुपये २०० दोनशेंपर्यंत तुम्ही आपले विद्यमाने खर्च लावून उत्तम प्रकारें यांचे साहित्य करणें.[५]

वरील घटणेवरुन असे लक्षात येती की, परत स्वधर्मात येण्याकरीता अनेक जाचक निर्णयातून जावे लागत असे. त्यासाठी ब्राम्हण समाजालाही प्रायचित्त करावे लागत असत.

१.३ मराठा :

ब्राम्हणांनंतर दुसरी महत्वाची जात म्हणजे मराठे होय. ब्राम्हणांनंतर पेशवे कालीन अहमदनगरमधील समाजात मराठयांना स्थान होते. ९६ कुळी मराठे हे स्वत:ला क्षत्रिय समजत असत. अहमदनगरच्या इतिहासात मराठा समाजात मराठे व कुणबी अशा दोन प्रमुख शाखा होत्या. या दोन्ही शाखांमध्ये कमालीची सामाजिक तफावत होती. या दोन्ही शाखांत क्वचित प्रसंगी रोटी - बेटी व्यवहार होत असत. कारण मराठे स्वत:ला कुणब्यांपेक्षा श्रेष्ठ मानीत. मराठे राज्यकर्ते उत्तर पेशवाईत वतनदार होते. त्यांनाच देशमुख, पाटील, चौगुला अशा विविध नावांनी ओळखले जात होते जाधव, घाटगे, देशमुख, शिंदे, यादव, काळे, पवार, भोसले या आणि इतर घराण्यांचा मान अहमदनगरच्या भागात विशेष अढळतो. कुणबी हे गरीब शेतकरी होते. त्यांच्यातही कोकणातून आलेले कुणबी देशावरील कुणबी असे नगरमधील काही भागात दोन गट होते. तसेच तरोळे, मन्वा असे अकोले संगमनेर भागात पोटभेद आढळतात. शेती हा कुणब्यांचा प्रमुख व्यवसाय होता. शेतीप्रमाणेच सैन्यात काम करणे, गो-पालन करणे, शेतमजुरी करणे असे विविध व्यवसाय उदरनिर्वाहासाठी या समाजाला करावे लागत. पेशवेकालिन अहमदनगरचा विचार केला तर या भागात बाजारपेठा,

तालुक्याच्या, परगण्याच्या ठिकाणी मराठा समुदायाचा विशेष दरारा पहावयास मिळतो. देशमुखी, देशपांडे, पाटिल याच समुदायातील असल्याचे समजते. [६]

१.४ इतर जाती जमाती बलुतेदार आणि आलुतेदार :

पेशवे कालिन अहमदनगरमधील समाजात ब्राम्हण व मराठे यांच्या व्यतिरिक्त इतर जाती - जमाती होत्या. त्यात कुंभार, सोनार, सुतार, शिंपी, धनगर, न्हावी, माळी, गोंधळी व गुरव या प्रमुख जाती होत्या. या जातींपैकी काही बलुतेदार असल्यामुळे त्यांना विशेष हक्क प्राप्त झालेले होते. तसेच या मुख्य जाती - जमातीं मध्ये काही उपजातीही समाजात निर्माण झाल्या होत्या. काही जमातींना सरकारने [पेशव्यांनी] जमीन ईनाम दिल्याचे उल्लेख तत्कालीन कागदपत्रांमध्ये आढळतात.[७]

१.५ कुंभार :

अहमदनगरमधील कुंभार जातीमध्ये मराठे कुंभार, गुजराती कुंभार, कोकणी राजा, थोर चाके कुंभार, लहान चाके कुंभार, लिंगायत कुंभार अशा पोट जाती होत्या. या कुंभारांची कामे म्हणजे कुणबी, शेतक-यांना वर्षभर मदत करणे. सुगीच्या दिवशी आपल्या कष्टाचा मोबदला धान्य रुपाने घ्यायचा. अहमदनगर शहरात सीना नदी किनारी नालेगाव भागात कुभांरांच्या वस्त्या आजही आढळतात. त्या भागास कुंभारवाडे असे म्हणतात. आजही याठिकाणी कुंभार वस्त्या आहेत. [८]

१.६ सुतार :

सुतार या जातीमध्ये दोन प्रमुख पोटजाती असून ग्रामव्यवस्थेत सुतारांना अधिक महत्व होते. त्यामुळे काही ठिकाणी नगरमध्ये त्यांना राजे या नावाने संबोधण्याची प्रथा होती. सुतार हा ग्रामीण भागाचा अविभाज्य घटक होता. सुगीच्या काळी शेतक-यांना शेतीची औजारे तो पुरवत असे.

सन १७५५-५६ सालचा संगमनेर सरकारचा एक सुतारकीचा निर्णय येथे नमूद करावासा वाटतो, ते पत्र पुढील प्रमाणे : समस्त सुतार सरकार जुन्नर व सरकार संगमनेर व सरकार बालगाण व दौलताबाद सुरु सन सीत खमसेन मया व अलफ यांस पत्र की, खंडोजी

बाणराव सुतार मौजे रेडगांव व सिरवडे परगणे चांदवड याणे हुजूर येऊन विदित केले की, आपल्या दोघी बायका लग्नाच्या आहेत. त्यांचे पोटी संतान नव्हते. त्यास तिसरी बायको जातीची सुतारीण, तिशी शास्त्रविवाह करुन केली आहे. तिचे पोटी पुत्र जाहला आहे. त्याचें नांव हैबती. त्याची गोत पतकरुन जातींत घ्यावयाची गोतास आज्ञा दिल्ही पाहिजे म्हणोन, त्याजवरुन हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी तुम्ही समस्त गोत मिळोन हैबती मजकुराची गोत पतकरुन जातींत घेणे म्हणोन पत्र .

येणे प्रमाणें पत्र देऊन खंडोजी बाणराव याजकडे सरकारची नजर करार केली. बरहुकूम करारी यादी रुपये १००१ एक हजार एक रुपया करार केला असे. तूर्त घ्यावे असा करार.[९]

वरील पत्रातून असे स्पष्ट होते सामाजिक जीवन जगत असताना सुतारासारख्या मानसाला पेशव्यांच्या व्यवस्थेत परत जातीत येण्यासाठी १००० पर्यंत रक्कम भरावी लागत होती.

१.७ न्हावी :

या जातीत वाजंत्री वाजवणारे व मशालजी असे दोन गट अहमदनगरमध्ये दिसतात. यांचे मुख्य काम लोकांच्या हजामती करुन आपली उपजीविका भागवणे हे होते. काही ठिकाणी तर न्हावी हे सालकरी म्हणून काम करत होते.

अन्य जाती व पोटजाती :

खेडयात किंवा शहरात पुजा-यांचे काम गुरव हे करत होते. गुरव या जातीत देखील पोटजाती नगरमध्ये आढळतात. तेल्यामध्ये एक बैल तेली, दोन बैल तेली ही घराणे बाजारपेठेच्या ठिकाणी दिसत. शिंप्यांत नामदेव शिंपी, भावसार शिंपी, मराठा शिंपी, आहेर शिंपी अशा पोटजाती होत्या. सोनार स्वत:ला इतर पांचाळ जमातींपेक्षा श्रेष्ठ समजत होते. माळी समाज पेशवे कालीन नगरच्या सामाजिक जीवनात मोठया प्रमाणात पहावयास मिळतो. त्यात फुलमाळी, जिरेमाळी, हळदेमाळी असे विविध पोटभेद होते. धनगरात हटकर व खुटकर असे पोटविभाग होते. अशा विविध जाती उपजाती व्यतिरिक्त लोहार, कोळी साळी,

सनगर, तांबोळी ठाकूर गोसावी, कोष्ठी, कलावंत या जाती पेशवे कालीन नगरमध्ये आढळून येतात. [१०]

१.८ भटक्या जाती - जमाती

पेशवेकालीन अहमदनगरमध्ये अनेक भटक्या विमुक्त जाती - जमाती होत्या. यात वडार, बेलदार, कैकाडी, बुरुड, पारधी, भिल्ल, या भटक्या जाती गावाबाहेर वस्ती करुन राहत असत. शक्यतो सुगीच्या दिवसात शेतकरी वर्गाला लागणा-या वस्तू घेऊन ठराविक गावांना भेटी देत असत. यास घिसाडी, बेलदार, वंजारी, लमाण, वैदू, गोंड, मांग, गारुडी, वासुदेव, दरवेशी, माकडवाले, चित्रकथी, बहुरुपी, रायनंद, भोई, भगत, भुत्ये, आराध्ये, वाघ्या - मुरळी इत्यादींचा समावेश होता. यातील काही जमाती शेतक-यास मदत करीत असत तर काही शेतकरी वर्गांचे मनोरंजन करीत व उदर निर्वाहासाठी शेतक-याकडून धान्य मागत असत. तत्कालिन समाजव्यवस्थेत हा सर्व व्यवहार परस्पर समजुतीने होत होता. राज्यकर्त्याचा दृष्टिकोन देखील जातिव्यवस्थेला पोषक असाच होता.

अस्पृश्य जाती :

१.९ महार

गाव तेथे महारवाडा असा वाकप्रचार अस्तित्वात होता. यावरुन पेशवेकालीन अहमदनगरमध्ये महार समाजाला कोणते स्थान असे हे स्पष्ट होते. गावगाडयातील सर्वसाक्षी महत्वाचा बलुतेदार म्हणजे महार होय. गावकीचा शेतसारा वसूल करण्यापासून झाडलोटीपर्यंतची सर्व कार्ये करणे हे महाराचे प्रमुख कर्तव्य मानले जात होते. नगरमध्ये महार या जातीत सोमवंशी, लाडवन, आदवन, बावने, विनकर या पोटजाती होत्या. त्यांच्यातही मानापानावरुन संघर्ष होत असत. पेशवाईच्या शेवटच्या काळात हा समुदाय ब्रिटीशांना एकनिष्ठ राहिल्याचे समजते त्यामुळे पुढे ब्रिटिशांनी त्यांना महार वतने दिली. आजही ही वतने तशीच त्यांच्या कडे असल्याचे समजते.[११]

१.१० मांग :

गावगाडयातील महारानंतरचे दुसरे स्थान मांग या समाजाला होते. मांगाला गावातील हीन दर्जाची कामे करावी लागत असत. कामाच्या दर्जावरुन या जातीत अनेक उपजाती पडलेल्या होत्या. उदा. घोडयांची देखभाल करणारे घोडके, डफ किंवा हलगी तयार करणारे डफडे, चामडे वहाणारे होला, सापाचे खेळ करणारे गारुडी अशा विविध उपजाती मांग जातीत होत्या.[१२]

१.११ चांभार :

जनावरांच्या कातडीपासून भिन्न वस्तू तयार करणे हा चांभाराचा मुख्य उद्योग होता. यांच्या पैकीच कातडी कमविणारे म्हणजे ढोर होय. विहिरीवर मोट बांधणे हे ढोरांचे मुख्य कार्य होते. याशिवाय मोची व टिनगर या चांभाराच्या दोन पोटजाती होत्या. मोची जोडा, चपला तयार करीत असत तर टिनगर जोडे व खोगीर तयार करीत असत. [१३]

इतर धर्म - पंथातील जाती - जमाती :

शिवकाळात व पेशवेकाळात हिंदू समाजाबरोबरच मुस्लीम, जैन, महानुभाव इत्यादी धर्म - पंथाचे लोक खेडयापाडयातून राहत होते.

१.१२ मुस्लीम :

विशेषत: मुस्लीम समाज हा तत्कालीन समाजाचा अविभाज्य भाग बनलेला होता. त्यामुळेच भांड, मुलाणी, फकीर, सिंधी, आतार, दरवेशी, यांना अलुते व बलुतेदारात स्थान प्राप्त झालेले होते. मुस्लीम समाजाच्या सणात हिंदू व हिंदू समाजाच्या सणात मुसलमान आनंदाने सहभागी होत असत. अहमदनगरमध्ये मुस्लीम समाजाचे वर्चस्व हे मोठया प्रमाणात होते. येथे बराच मोठा समाज हा शिया पंथीय होता. तर काही समाज हा सुन्नी धर्माचा कट्टर भोक्ता होता. येथील मिरावली बाबा, शाहशरीफ दर्गा, कोठला इमाम या धार्मिक ठिकाणी मोठया प्रमाणात उरुस, संदली भरत तर श्रीगोंदा [चांभारगोंद्याच्या] शेख बाबा संतास विशेष महत्व होते. त्याच प्रमाणे अहमदनगरमधील खर्डा या ठिकाणी मुस्लीमांच्या अनेक जाती उपजाती अढळून येतात. त्यात खान, बागवान, मुजावर, वाघबकरे, आतार, खाटीक, मुलाणे असत.[१४]

इ.स. १७६५-६६ सालचे अहमदनगर मधील पत्र केदारजी शिंदे यांचे नांवे पत्र की, हुसेन शहा पीरजादे निजामशाही वस्ती अहमदनगर यांनी विदित केले की गांव पेशजी अलमगीर व बहादूरशहा पातशा यांनी आपले वडिलास ईनाम देऊन फरामीन [फरमान] करुन दिलें आणि चालविला व येविशीं राजपत्रे व श्रीमंत कैलासवासी थोरले नाना व रावसाहेब व नानासाहेब यांची पत्रें आहेत. त्यास दरोबस्त गांव आपणाकडे चालत असता आपण मक्केस गेलों याजमुळे अलीकडे आठ वर्षे चालला नाही. शिंद्यानी लावणी केली. त्यापासोन आमल तेंच करितात. आपणाकडे चालत नाही म्हणोन, त्यावरुन मनास आणितां प्राचीन गांव पीरजादे यांचा त्यास यांजवळ फरामीन अलमगीर बहादूरशहा यांचे व राजपत्रें व कैलासवासी थोरले नानासाहेब व रावसाहेब व नानासाहेब यांची पत्रें आहेत: त्याजकरितां पूर्ववत् प्रमाणे गांव यांचा यांजकडे करार केला असे. दरम्यान तुम्ही लावण करुन गांव खाता ही गोष्ट उत्तम नाही. हल्ली पत्र लिहिलें असे तरी बहुत दिवसांचा भोगवटा फकिराचा आहे. याजकरिता गांव सोडून देणें. अमल हे करितील. याजउपरी मौजे मजकूरची दखलगिरी करावयास तुम्हांस प्रयोजन नाही, येविशी तुम्ही आपले उमलदारांस ताकीद करुन पूर्ववत्प्रमाणे गांव पीरजाद्याकडे चालवणे. दिकत न करणे. फिरोन बोभाट येऊ न देणें. म्हणोन चिटणिसी. रोघो विठ्ठल किल्ले अहमदनगर यासी पत्र.[१५]

वरील पत्रातून हे स्पष्ट होते की, आलमगीर [भिंगार] ची ईनाम दिलेला होता. तो नंतर शिंद्यांकडे आला पण थोरले माधवराव पेशवे यांच्यासमोर ही बाब आल्याने त्यांनी पुन्हा तो गाव आहे त्यांच्याकडे देण्याचे आदेश दिले आहेत.

१.१३ जैन :

गावातील कापड दुकानदार व किराणा भुसारवाले बहुतेक जैन असल्याचे आढळून येते. त्यामुळे जैन धर्मीय हे तत्कालीन समाजाचा एक भाग असल्याचे दिसून येते. व्यापार हा जैन समुदायाचा मुख्य व्यवसाय होता. महत्वाच्या बाजार पेठा, शहरी भागात, नागरी भागात जैनांचे वास्तव्य मोठया प्रमाणावर होते. या बाबत एक म्हणही रुढ झाली. जहॉ ना पौछे

बैलगाडी वहॉ पौछे मारवाडी. याचाच अर्थ जैन समाज हा खेडो पाडी बाजारपेठे पर्यंत पोहचला होता. [१६]

१.१४ महानुभाव :

पेशवेकालीन समाजव्यवसस्थेत महानुभाव समाजातील लोक स्वत:ला मात्र इतरांपेक्षा वेगळे समजत असल्यामुळे त्यांचे व उर्वरित समाजाचे फारसे जमले नाही. तरीही नगरमधील वांबोरी, पिंपळगाव माळवी, करंजी या भागात महानुभाव यांचे विशेष आश्रम होते. त्यांचा मोठया प्रमाणात नगरमध्ये व बाहेरही प्रचार व प्रसार झाला.[१७]

१.१५ लिंगायत :

लिंगायत समाज हा हिंदू समाजाचा एक घटक होता. त्यामुळेच लिंगायत समाजातील गुरु जंगम याला बलुतेदारात पेशव्यांकडे विशेष महत्वाचे स्थान प्राप्त झालेले होते. लिंगायत समाजात कर्नाटकातून आलेले व बसवेश्वर महाराजांना मानणारा वर्ग होता. त्यांचीच भक्ती भावे तो पूजा अर्चा करीत. त्यांना गुरुंचा दर्जा दिला होता.

२.१ पेशवे कालीन अहमदनगरमधील सण आणि उत्सव

समाजामध्ये सण, समारंभ, उत्सव यांना अतिशय मानाचे व महत्वाचे स्थान असते. सण-समारंभाच्या निमित्ताने समाजातील भिन्न-भिन्न स्तरातील व्यक्ती एका पातळीवर येण्यास मदत होते. अशा प्रकारच्या मेळाव्यातून सामाजिक जाणीवांची अभिव्यक्ती होते. धार्मिक परंपरांचे जतन करण्याच्या दृष्टीने सण व उत्सव अत्यंत महत्वाचे आहेत. नवसमाजनिर्मिती करण्यासाठी सण - समारंभ आवश्यक ती भूमिका बजावतात. सण - उत्सवांमुळे सांस्कृतिक जीवनात नव चैतन्य निर्माण होते. सुदृढ समाजाच्या निर्मितीत सण - उत्सव मोलाची भर घालतात . मराठेकालीन सण व समारंभ यांची माहिती आपण घेऊ.

२.२ पेशवे कालीन नगरमधील सण व उत्सवांचे महत्व :

लोकांचे एकत्रीकरण :

सण, समारंभ उत्सव यांच्या निमित्ताने लोक एकत्र येत असत यामुळे विचारांचे, परंपरांचे अदान - प्रदान होऊन लोकांमध्ये एकात्मतेची भावना निर्माण हेण्यासाठी तत्कालीन सण - उत्सव उपयोगी पडत होते.

२.३ समाजामध्ये चैतन्य निर्मिती :

सण - उत्सव यात्रा यांसारख्या गोष्टीमुळे परस्परातील श्रेष्ठत्व - कनिष्ठत्वाच्या कल्पना विसरुन लोक एकत्र येत असत त्याचप्रमाणे सण - समारंभ उत्सव साजरे करताना आपापली सुख - दु:खे विसरुन लोक ते साजरे करत. पर्यायाने समाजामध्ये आनंदाचे, उत्साहचे वातावरण निर्माण होत असे. त्यामुळे प्रत्येकात सकारात्मक दृष्टीकोनाची निर्मिती होऊन समाजामध्ये चैतन्य निर्माण होत असे.

२.४ युध्द - लढयातून मुक्तता :

मराठयांचा प्रदीर्ध काळ सततच्या लढायांनी भरलेला दिसून येतो. सतत चालणा-या लढाया, त्या लढायांनी होणारे नुकसान या सगळयांपासून मनाला आनंद मिळण्याचे, मनोरंजनाचे माध्यम हे समाजात साजरे केले जाणारे सण होते. सततच्या धामधुमीतून एकत्र येऊन सण - उत्सव साजरे होणे यातून सांस्कृतिक वातावरणाची निर्मिती होत असे.

२.५ धार्मिक परंपरांचे जतन :

पूर्वीपासून चालत आलेल्या रुढी - परंपरा यांचे पालन तसेच विविध धार्मिक परंपरांचे पालन या सणांमुळे होत असे त्यामुळे लोकांचे सामाजिक तसेच धार्मिक जीवन ही संपन्न होत असे. विविध सण - उत्सव, यात्रा यांसारख्या प्रसंगी विविध मनोरंजनाचे तसेच समाज प्रबोधनाचे विविध कार्यक्रम होत असत. ज्यातून लोकांपर्यंत विविध विचार पोहोचविले जात व त्यातून धार्मिक जागरणाबरोबरच समाजाचेही प्रबोधन होत असे. आषाढी - कार्तिकी या पंढरपूरच्या वारी मध्ये महाराष्ट्राच्या कानाकोप-यातून लोक येत असत त्यातून संतांचे विचार - उपदेश लोकांपर्यंत पोहोचत असत यातूनच समाजाचे प्रबोधन होत असे.

२.६ सुदृढ समाजाची निर्मिती :

विविध सण - उत्सव , यात्रा यांसारख्या वेळी अनेक लोक एकत्र येऊन एकमेकांमध्ये विचार - आचारांची देवाण घेवाण होऊन वैचारिक व भावनिक दृष्टया लोक संपन्न होत त्याच बरोबर एकात्मतेच्या भावनेतून राष्ट्रीय भावनेचीही जागृती व प्रसार यातून होत असल्याने सुदृढ समाजाची निर्मिती होत असे.

एकूणच पेशवे कालिन नगरमध्ये विविध सण, उत्सव, समारंभ साजरे केले जात असल्याने समाजाचे मनोरंजना बरोबर प्रबोधनही होत होते. त्यामुळे या काळात साजरे होणारे सण व उत्सव हे समाजात महत्वाची भूमिका निभावताना दिसतात.

२.७ दसरा :

दसरा साजरा करण्याची प्रथा फार पुरातन होती. समाजातील सर्व थरातून हा सण कटाक्षाने साजरा केला जात असल्याने त्याला पेशवेकालीन नगरमध्ये मोठया सणाच्या स्वरुपात पाहिले जाई. दसरा हा ३।। मुहूर्तापैकी एक असल्याने प्रत्येक जण दस-याची जणू वाटच पाहात असे. कोणत्याही शुभकार्याचा आरंभ या दिवशी केला जात असे.

या काळात पांडवांनी शस्त्र पूजन केले होते. म्हणून मराठे लोक हत्यारे साफसूफ करुन त्याची समारंभ पूर्वक पूजा करत असत. त्या दिवशी घोडा शृंगारुन त्यावरुन सीमोल्लंघन करीत असत. गावोगावी सीमोल्लंघन थाटामाटात वाजत गाजत आणि अबाल वृध्दांसह उंची वस्त्रे परिधान करुन साजरे करीत. गावाच्या सीमेलगत असणा-या शमी वृक्षाची पूजा केली जात असे. शमीची पाने [आपटयाची] सोने म्हणून लुटून आणून परस्परांना देत असत. अशा प्रकारची खेळातील मर्दुमकी गाजवून परतल्यानंतर घरी औक्षणाचा कार्यक्रम होत असे. त्यावेळी हे लुटून आणलेले सोनेच स्त्रियांना ओवाळणी म्हणून दिले जात असे. सोने लहानांनी मोठयांना देण्याची पध्दत होती.

दुसरा बाजीराव हा सण कशा प्रकारे साजरा करीत असे याचे सर माल्कम याने वर्णन केलेले आहे. सीमोल्लंघनाहून परतल्याने पेशवा दरबार भरवत असे व मानाप्रमाणे सर्वांना पोषाख वाटण्यात येत असे. यासाठी मोठया प्रमाणात खर्च केला जाई. इ.स.१७९० मध्ये २,२०,१४४ रुपये पोषाखासाठी खर्च झाला होता. यानंतर मराठे माहिमेवर निघत असत

पेशवेकाळात सुरुवातीला दसरा शाहू महाराजांच्या दरबारी सातारा येथे साजरा केला जात होता. नंतर पुणे येथे साजरा केला जात होता.

पाटील वेशीवर दस-याच्या दिवशी बकरे कापतो तरी ही प्रथा बंद करावी या आशयाचे पत्र पुण्यातील पेशव्यांना पाठवले आहेत.

२.८ दिवाळी :

दिवाळी हा सण पेशवेकालीन अहमदनगर मध्ये अत्यंत महत्वाचा मानला जात असे . पण या सणाला दरबारी प्रतिष्ठा मिळाली नव्हती. परंतु सामाजिक प्रतिष्ठा मात्र भरपूर होती. दिवाळी हा सण खेडयात घरोघरी साजरा केला जात असे. या सणास देखील धार्मिक परंपरा होती. बलिप्रतिपदा, लक्ष्मीपूजन व भाऊबीज मोठया उत्साहाने साजरी केली जात असे. प्रसंगी घरोघरी यथाशक्ती पंचपक्वाने तयार होत असत आणि दिपोत्सव व अतिषबाजी करुन आनंद साजरा केला जात असे. आतिषबाजीमध्ये बाण, पाणकोंबडी, हातनळे कोठयाचे नळे, फुलबाज्या, महताफा वगैरे दारुकामाचे अनेक प्रकार होते. यांचाही वापर केला जात असे. जो तो ज्याच्या त्याच्या परिस्थितीनुसार हा सण साजरा करत. वर्षातून एकदा येणा-या सणाचे महत्व खूप होते. समाजातील सर्व थरातील व्यक्ती हा सण मोठया भक्ती भावाने साजरा करत.

२.९ मकरसंक्रांत

दिवाळी नंतरचा महत्वाचा सण म्हणजे संक्रांत होय. या प्रसंगी तिळगुळ दिला जात असे. तिळगुळ मोठयांनी लहानास देण्याची प्रथा होती. एकमेकांच्या घरी जाऊन तिळगुळ घेतला जात असे. एकमेकांतील स्नेहवृध्दिंगत व्हावा हा उद्देश तिळगुळ देण्याघेण्याचा असे. मकरसंक्रांतेच्या दिवसापासून अनेक नव्या आघाडयांवर [मोहिमेवर] जाण्यास पेशवे निघत.[१८]

२.१० वसंत पंचमी :

माघशुध्द पंचमी म्हणजे वसंतपंचमी होय. ही वसंतऋतुच्या आगमनाची पूर्वसूचना होय. या दिवशी रंग खेळला जात असे. या दिवशी विद्वान ब्राम्हणाची सन्मानपूर्वक पूजा केली जात असे. वसंत पंचमीलाही रंग खेळण्यात येत असे. वसंतपंचमी साजरी करण्याच्या संदर्भात पेशवेकालीन कागदपत्रात अनेक उल्लेख येतात.

२.११ होळी शिमगा :

सुगीला लागून येणारा लोकप्रिय सण म्हणजे शिमगा किंवा होळी होय. फाल्गुन पौर्णिमेस खेडयापाडयातून हा सण मोठया प्रमाणावर साजरा केला जात असे. सुगी संपल्याने समाजात एक प्रकारची सुबत्ता व शांतता नांदत असते म्हणून थोडी हौस - मौज व करमणूक व्हावी हा सर्वांचा हेतू असतो. म्हणून शिमग्याची तयारी बरीच आधीपासून सुरु असे. खेडयापाडयांच्या यात्रा हा शिमगा ते पाडवा या दरम्यानच भरविण्याचा प्रघात होता. शिमग्यासाठी खेडयातून बरीच सोंगे आणली जात असत. त्या शिवाय नाच - गाणे, कुस्त्यांची दंगल, डफगाणी इत्यादी कार्यक्रम मोठया उत्याहाने होत असत. गावोगावी सार्वजनिक व वैयक्तिक होळी पेटविण्यात येत असे. होळीला पुरणपोळीचा नैवेद्य असे, त्यानंतर होळी भोवती फेर धरुन शिवीगाळ करण्याची पध्दत रुढ होती. राज्यकर्तेही यामध्ये भाग घेत असत.[१९]

२.१२ रंगपंचमी :

धुळवडीपासून रंगपंचमी पर्यंत हा खेळ खेळला जात असे. रात्री करमणुकीचे कार्यक्रम व दिवसा रंग असा धुमधडाका होत असे. पेशवेही यामध्ये सहभागी होत असत. पेशव्यांनी रंगपंचमीमध्ये कसा भाग घेतला याची हकीकत मेणवली दप्तरात एक पत्रात सांगितलेली आहे. या पत्रात सांगितल्याप्रमाणे, श्रीमंतांनी [पेशवे] आपले हाते चिरकांडीने [पिचकारी] कार्याकरण यांचे अंगावर रंग टाकला तद्नंतर रंगाची व गुलालाची रेलचेल झाली. अंग व पोशाख भिजून चिंब झाला. नंतर रात्री खेळ करावयास सांगितले. खेळ डफगाणे व पोरांचा नाच, गोविंदाची सोंगे सहा घटिकापर्यंत खेळ चालला. पाच दिवस खेळ झाला. रंग सोहळा दहा घटका चालला होता. सारे पुणे शहर रंगाने माखले जाऊन रंगाचे पाट नदीस मिळाले. असे वर्णन पेशवे बखरीत आढळते.

२.१३ वर्षप्रतिपदा किंवा गुढीपाडवा :

चैत्र महिन्यातील पहिला दिवस नव्या वर्षाची सुरुवात या दिवसापासून होत असे. म्हणून गुढया, तोरणे उभारुन हा सण साजरा केला जात असे. साडेतीन मुहूर्तापैकी हा एक

असल्याने या दिवशी अनेक मंगलकार्यांचा आरंभ होत असे. मोहिमेवरील सरदार व सैन्य या दिवसाकरीता शक्य असल्यास घरी परतत असत. या दिवशी खेडयापाडयात पंचांग वर्तवण्याचा सामूहिक कार्यक्रम एखाद्या देवळात होत असे.

२.१४ पोळा :

कृषीप्रधान समाज असल्याने शेतक-यांचा हा प्रमुख सण होता. पोळयाचा दिवशी शेतकरी आपल्या बैलांना धुवून रंगवित असत. झुली अंगावर टाकून त्यांना सजवित असत आणि गावातून मिरवणुकीने बैलांची वाजत - गाजत फेरी काढत असत. पोळयाच्या दिवशी पाटलाची बैले सर्वप्रथम मिरवणुकीने निघत व नंतर इतरांची.

वरील प्रमुख सणांशिवाय अक्षय्य तृतीया, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, कोजागिरी, चंपाषष्टी यांसारखे सणही कमीअधिक प्रमाणात साजरे केले जात असत.

२.१५ रमजान :

मुस्लीमांचा पवित्र सण म्हणजे रमजान मोठया भक्ती भावाने हा सण या शहरात साजरा केला जात असे. अहमदशहा बादशहाने या शहराची स्थापना केली. तेव्हा पासून मोगल कालखंडापर्यत येथे मुस्लीम समाजाचे नागरिक मोठया संख्येने शहरात होते. त्यात दोन गट दिसून येतात म्हणजेच शिया, आणि सुन्नी, पण या दोघांनाही बरोबर घेऊन जाणारे शहर म्हणजे अहमदनगर होय. पेशवे काळातही या समाजाच्या बांधवाकडे पेशव्यांनी आपली इनामे पूर्वीपार पध्दतीत ठेवल्याचे उल्लेख आढळतात.

२.१६ डोले :

आशिया खंडात हसेन आणि हुसेन यांच्या डोल्यांना एक इलाहाबाद उत्तर प्रदेश आणि दोन अहमदनगर मध्ये मोठी मान्यता होती. नगरमधील कोठला बारा ईमाम येथून या डोलयांना सुरुवात होते तर बालिकाश्रम रोडवर याची समाप्ती होते. या मध्ये शहरातील तसेच बाहेरुन आलेले भावीक मोठया भक्ती भावाने सहभागी होत. आजही तीच प्रथा पुढे चालू आहे. याच प्रमाणे बकरी ईद, उरुस, संदल असे अनेक उत्सव नगरमध्ये होत होते. आणि आजही ते आपणास पहावयास मिळतात.[२०]

३.१ पेशवेकालीन अहमदनगरमधील देवी - देवतांचे उत्सव :

तुळजाभवानी उत्सव :

महाराष्ट्रातील अनेक घराण्यांची तुळजाभवानी ही कुलदेवता आहे. शिवकाळापासून तुळजाभवानीचे महात्म्य अधिक वाढले. श्री शिवछत्रपती, पेशवे यांनी तुळजाभवानीचे उत्सव मोठया प्रमाणात सुरु केले. खास करुन बु-हाणनगरची देवी हे तुळजा भवानीचे विशेष ठाणे मानले जाई. त्याच प्रमाणे राशीनची देवी ही भांबोरकर भोसले, राशीनचे भोसले यांचे आराध्य दैवत म्हणून प्रसिध्द आहे. कळसूबाई अकोले या देवीचे माहात्म्यही पेशवे कालीन नगरमध्ये बरेच होते. अहमदनगर जिल्हयालगतच्या करमाळयाची कमालाई देवी, येरमाळयाची येडाई देवी, सप्तश्रृंगी देवी वणी अशा अनेक देवींचा उत्सव साजरा केला जात असे.

३.२ शिवोपासना :

पेशवेकालीन अहमदनगरमध्ये प्राचीन काळापासून शिवपूजा लिंग स्वरुपात मोठया प्रमाणावर प्रचलित असल्याचे दिसते. नगरमधील अनेक भागांमध्ये प्रत्येक गावात शिवमंदीरे आहेत. वृध्देश्वर मंदीर प्राचीन काळापासून असल्याची साक्ष देत आहे. अमृतेश्वर मंदीर भिंगारचा जिर्नोध्दार केल्याचे उल्लेख पेशवे दप्तरात आढळतात. या मंदिराची दुरुस्ती देखभाली साठी विशेष लक्ष दिल्याचे उल्लेख पेशवे दप्तरात आहेत तर नेवासा तालुक्यातील टोके हे गाव पेशवेकाळात धार्मिक ठिकाण म्हणून विशेष प्रसिदध होते.[२१]

३.३ रामनवमी हनुमान जयंती :

संत एकनाथांनी १६ व्या शतकात भावार्थ रामायण हा ग्रंथ लिहून रामाचा महिमा महाराष्ट्रात वाढविला होता. शिवकाळात रामदासांनी रामभक्तीचा पुरस्कार तर केलाच पण त्याच बरोबर बलोपासनेचे महत्व पटविण्यासाठी रामाचा सेवक हनुमान यालाही मानाचे स्थान दिले. पेशवे कालीन अहमदनगर मध्ये श्रीरामपूर येथे रामनवमी विशेष उत्साहात साजरी केली जात असे . आजही तिथे मोठया भक्ती भावाने ही प्रथा आजही चालू आहे.

३.४ आषाढी - कार्तिकीच्या पंढरपूरच्या वा-या:

श्री विठ्ठल हे दैवत महाराष्ट्रात अत्यंत लोकप्रिय आहे. उत्तर पेशवे काळात सोलापूर मधील मोठा भाग नगर जिल्हयात समावलेला होता. दरवर्षी आषाढी -कार्तिकीला संताचा आणि भाविकांचा मोठा मेळावा पंढरपूरला भरत असे. ज्ञानदेव, मुक्ताबाई, सोपान देव यांसारख्या प्रसिध्द संतांच्या पालख्या वारीच्या निमित्ताने पंढरपूरला येत असत. या पालख्यात १८ पगड जातीतील लोक सामील होत. पंढरपूरच्या विठोबाजवळ भेदाभेद मानला जात नसे. आषाढी - कार्तिकीला लाख - दोन लाखापर्यंत भाविकांची यात्रा भरत असे

३.५ गणेशोत्सव :

शिवाप्रमाणे गणपतीची उपासना सातवाहन काळापासून महाराष्ट्रात रुढ झाली होती. सातवाहन काळापासून गणेशाच्या मूर्ती तयार केल्या जात असत. अष्टविनायकांची सर्वस्थाने महाराष्ट्रात आहेत. त्यातील अहमदनगर जिल्हयात सिध्दटेक हे प्रसिध्द ठाणे आहे. थोरले माधवराव पेशवे हे गणेश भक्त सिध्दटेक या ठिकाणी मुक्काम केल्याचा, मंदिराचा जिर्नोध्दार केल्याचा उल्लेख माधवराव यांच्या रोजनिशी मध्ये येतो.[२२] पेशवे काळात गणेशोत्सवाला सार्वजनिक गणपतीची पूजा -अर्चा आणि उत्सव मोठया थाटात चालू असे. पेशवेकाळात गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरुप प्राप्त होऊन श्री स्थापना व विसर्जन अत्यंत धुमधडाक्याने साजरे केले जाऊ लागले. श्रीस्थापना व विसर्जनादरम्यान १० दिवसात मनोरंजनाच्या कार्यक्रमांची रेलचेल असे.

३.६ गौरी :

गणपती समवेतच गौरींचे आगमन होत असे. गौरी किंवा महालक्ष्मी हा उत्सव स्त्रियांकरीताच मर्यादीत असला तरी यात सर्वधर्मिय सहभागी होत असत जैन, मुस्लीम यांच्याही घरी गौरी स्थापना होत असे. त्यामध्ये सारा समाज गढून गेल्याचे दिसते .

३.७ गावोगावच्या यात्रा:

पेशवाईत गावोगावच्या यात्रांना विशेष महत्व व आदराचे स्थान होते. वाहतूकीच्या सोईंचा अभाव असला तरी गावोगावच्या यात्रांना एक मानाचे स्थान दिले जाई. विशेष करुन नगरमध्ये मढी यात्रा ही विशेष प्रसिध्द होती या यात्रेकरीता शेजारील राज्यातील लोकांनी

येऊन व्यापार केल्यांचा उल्लेख अनेक दस्तऐवजात आढळतो. नाथांचे महत्व हे महाराष्ट्र तसेच शेजारील राज्यात मोठया प्रमाणात होते. येथे नंदीवाले, गाढवांचा व्यापार, मेंढयाचा व्यापार मोठया प्रमाणात असल्याचे अनेक उल्लेख सापडतात. प्रत्येक गावात धार्मिक उत्सव व यात्रा भरत असत व त्या निमित्तने अनेक करमणुकीचे कार्यक्रम होत असत. या यात्रांना विदूषक, नर्तकी, सापवाले, गारुडी, जादूगार असे लोक येऊन आपली कला दाखवून लोकांची करमणूक करीत असत. यात्रेचे आणखी महत्वाचे आकर्षण म्हणजे तेथील बाजार या बाजारात अनेक प्रकारची खेळणी, कपडे, मेवा मिठाई व इतर अनेक वस्तू विकण्यासाठी येत असत. अशा नगरमधील यात्रा ग्रामदैवताच्या नावाने भरत असत. पारनेर, भाळवणी, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड पंचमी, नगर मध्ये पचंबा, या विशेष प्रसिध्द यात्रा होत्या.

४.१ पेशवेकालीन अहमदनगर मधील शिक्षण व्यवस्था :

मध्ययुगीन कालखंडात संपूर्ण भारतात विशेषकरुन महाराष्ट्रात शिक्षण हे काही वर्गापुरतेच मर्यादित होते. अधुनिक काळाप्रमाणे सर्व समाजाला शिक्षण मिळत नव्हते. त्याचप्रमाणे समाजाला शिक्षण देणे ही शासनसंस्थेची जबाबदारी समजली जात नव्हती किंवा वर्तमान कालीन शैक्षणिक संस्थांप्रमाणे शिक्षण संस्था अस्तित्त्वात नव्हत्या. मराठा काळात पारंपारिक भारतीय पध्दतीने शिक्षण दिले जात होते. या शिक्षण पध्दतीमध्ये उदारमतवादाचा त्याचप्रमाणे सामूहिक शिक्षण तत्त्वाचा प्रकर्षाने अभाव होता. मराठाकालीन शिक्षण पध्दतीसंबंधी महिती देणारी कागदपत्रे फारच थोडी आहेत. ब्रिटिश काळातील सरकारी कागदपत्रे परकीय प्रवाश्यांचे प्रवास वृतान्त व बखरी या साधनांमधून जी काही माहिती मिळते त्यावरच आपणाला अवलंबून राहावे लागते. मराठा कालीन समाजाला महाराष्ट्रात शिक्षणामध्ये मल्लविद्या, लष्करी शिक्षण, व्यावहारिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण, धार्मिक शिक्षण या प्रकारांचे शिक्षण दिले जात असे.

४.२ पेशवेकालीन अहमदनगरमधील शिक्षण संस्था

पाठशाळा:

उच्च शिक्षणाची उपलब्धता विविध ठिकाणी असणा-या पाठशाळांमधून होती. या पाठशाळा याच विद्याकेंद्र झालेल्या होत्या. अशा उच्च शिक्षण केंद्रातून विद्यार्थ्यांना भोजन व निवासाच्या सोयी मोफत पुरविल्या जात. अशा शिक्षण संस्थांना सरकारकडून व खासगी लोकांकडूनही मदत दिली जात असे.

शाळा :

पेशवेकालीन नगरमध्ये शाळेच्या इमारती अत्यंत साध्या होत्या. जेम्स फोर्बस हा युरोपियन प्रवासी म्हणतो की, या शाळा साध्या छप्परात भरत असत. या छप्पराच्या तिन्ही बाजू मोकळया असत. जमीन मातीचीच असे. या मातीवरच विद्यार्थी अक्षर गिरवित असत व अंकगणिताचे प्राथमिक धडे ते तेथेच घेत असत. ही इमारत स्वत:ची क्वचितच असे. सर्वसाधरणपणे अशा पाठशाळा स्थानिक मंदिरात किंवा श्रीमंताच्या घरातील एखाद्या खोलीत किंवा शिक्षकाच्या घरी भरत असत. बाजारपेठेच्या ठिकाणी शाळा होत्या. नगरमध्ये जेऊर, पिंपळगाव माळवी, रुईछत्तीशी, देऊळगाव सिध्दी तालुक्याच्या ठिकाणच्या शाळा हया प्राचीन होत्या.

खासगी माध्यमे :

उच्चवर्णीय स्त्रिया तसेच सरदार राज्यकर्ते यांच्या मुलांना खासगी शिक्षणाची सोय उपलब्ध होत असे. ब-याचदा या मुलांना शिकविण्यासाठी श्रीमंत लोक पगारी शिक्षक ठेवत असत. अध्यापक यजमानाच्या घरीच राहून शिकवत असे. अशा वेळी शेजा-यांची किंवा यजमानाच्या नातेवाईकांचीही मुले तेथे शिक्षणासाठी येत. सरदार राजघराण्यामधील मुलांच्या शिक्षणाची विशेष काळजी घेतली जात असे. वतनदार, जमीनदार, पाटील, देशमुख, देशपांडयांच्या घरी खाजगी शिकवण्या घेतल्या जात.

मदरसे किंवा यतीमखाना :

पेशवेकालीन नगरमध्ये मुस्लिम विद्यार्थ्यांची विशेष व्यवस्था असल्याचा उल्लेख अनेक ठिकाणी येतो. त्यापैकी कोठला बारा ईमाम, किंवा त्यास कोठला विद्यापीठ नावाने प्रसिध्द होती. त्यात अनेक विद्यार्थ्यी सहभागी होते. राहण्याची, भोजनाची विशेष व्यवस्था

तिथे करण्यात आली होती. विद्यार्जनाबरोबरच व्यावसायीक, शिक्षणाची सोय असल्याचा उल्लेख आढळतो.

४.३ पेशव्यांचे शिक्षणविषयक धोरण :

पेशवे विव्दत्तेचे मोठे आश्रयदाते होते. त्यांच्या कारकिर्दीत वेदान्ती, वैय्यकरणी, मिमांसक, ज्योतिषी, यासारख्या भारतातल्या विविध भागातील अनेक पंडितांचा गौरव करुन त्यांना आश्रय दिला जात असे. या पंडितांमध्ये श्रृंगेरी मठाचे शंकराचार्य, काशीचे मथुराभट व उग्रदेव, नगरमधील ब्राम्हण यांसारख्या विविध विव्दानांचा समावेश होता.[२३]

४.४ विद्येच्या प्रसारासाठी विविध योजना :

पेशव्यांनी विद्येच्या प्रसाराकरिता दक्षिणा वाटण्यास सुरवात केली. त्यामुळे दक्षिणा मिळण्याच्या आशेने तरुण लोक विद्या शिकू लागले, म्हणून जुन्या पाठशाळा भरभराटीला आल्या व नव्या पाठशाळा स्थापन करण्यासाठी विव्दानांना उत्तेजन मिळाले. गोदावरी, भीमा यांच्या काठी नवीन क्षेत्रे विव्दानांनी निर्माण केली. विद्येच्या या प्रसाराबरोबर नवीन कवी व ग्रंथकार महाराष्ट्रात निर्माण झाले. त्यांचा कुठेना कुठे नगरशी संपर्क आला. त्यात निरंजन महादेव, अनंत फंदी, सगन भाऊ, मोरोपंत, परशुराम, राम जोशी यांनी पेशवे काळात अध्ययन करुन काव्य निर्मिती व ग्रंथ निर्मिती केली. पेशव्यांच्या दक्षिणेची किर्ती संपूर्ण भारतभर पसरली त्यामुळे मराठी साम्राज्याच्या बाहेरचे विव्दानही येवू लागले. त्यामुळे पारंपारीक शिक्षणपध्दतीतही प्राचीन विद्येला नवी पालवी फुटली. पेशव्यांचाच हा कित्ता इतर मराठा सरदारांनी उचलला व मराठी साम्राज्यात विद्याभिवृध्दी झाली.

४.५ ग्रंथांचे पुनर्लेखन व विद्येचा प्रसार :

पेशवेकाळात ग्रंथाचे पुनर्लेखन करुन विद्येच्या प्रसारासाठी मोठी चालना मिळाल्याचे दिसते. जुन्या व नाश पावत चाललेल्या हस्त लिखितांचे व ग्रंथांचे पुनर्लेखन करणे किंवा ग्रंथांच्या नवीन प्रती दुस-याकडून खरेदी करुन त्यांचे आपल्या ग्रंथालयात जतन करणे, अशा प्रकारे पेशवेकाळात विद्यासंवर्धन केले जात असे. पद्मपुराण, योगवासिष्ठ, रामायण, महाभारत इत्यादी ग्रंथांचे पुनर्लेखन स्वत: पेशव्यांनी करुन घेतले होते. पेशव्यांच्या १८

खात्यांपैकी ग्रंथालय हे एक महत्वाचे खाते होते. ग्रंथांच्या पुनर्लेखनाची कायमची व्यवस्था आनंदवल्ली [नाती] केल्याचे दिसून येते. कारण तेथे कायम स्वरुपाचा एक लेखनिक वर्ग निर्माण केलेला होता.

४.६ पेशवे कालीन नगरमधील स्त्रियांची स्थिती

स्त्रियांना पेशवेकालीन नगरमध्ये अनेक घराण्यात मानाचे स्थान होते. त्यात आहिल्याबाई होळकर, आनंदी बाई पेशवे, शिंदे घराणे, नगरकर, देशमुख इ. घराण्यांचा नामोल्लेख करता येईल. पण सर्वसामान्य स्त्रिंयांची परिस्थिती नाजूक होती. चूल आणि मूल येवढच त्यांचे जीवन असल्याचे समजते. सतीची चाल प्रतिष्ठित घराण्यांमध्ये चालू होती. या बाबत नाशिकचे एक उदारहण देता येईल. सती जाण्याचा अर्ज ती महीला पॉन्टीजरला करते आहे. पॉन्टीजर हाच अहवाल मुंबईला एलिफिस्टन यास पाठवतो. इलिफिस्टन त्या महिलेस सती जाण्यापासून परावृत्त करण्याचे आदेश देतात. आणि सती जाण्याचे कारणे शोधण्यास सांगतात. व महीन्याला ७ रुपये महिण्यास देण्यास सांगतात. यावरुन असे समजते सतीची चाल मोठया प्रमाणावर नगर सुभ्यात प्रचलीत होती. गरीब कुटूंबातील स्त्रियांचे हालाखीचे जीवन होते. चूल आणि मूल येवढया पर्यंतच तीचे जीवन होते.

सती चालीबाबत आणखी काही उदाहरणे :

पेशवेकालीन सती प्रथा

पेशवेकाळात सती प्रथेचे काही उल्लेख वाड डायरीत सापडले आहेत ते पुढील प्रमाणे,

१. *सती प्रथेवर प्रकाश टाकणारे महत्वाचे पत्र सन १७४९-५० सालचे आहे आणि हे खुद छत्रपती शाहु महाराजांच्या विषयी आहे. बद्दल प्रसाद छत्रपती स्वामी यांस देवाज्ञा झाली त्याज बद्दल मातुश्री सकवारबाई सहगमनइ [सती] गेली. त्यांनीं राजश्रीचे कानची कुडक्याची जोडी दिली ते जमा समेत सोनें, ४ मोत्ये दाणे थोर, २ लाल, कुडक्या सुमार २*[#२४]

२. *आप्पा [चीमाजी आपा] यांचे देहविर्सजनास खर्च: आणि त्यांच्या सोबत अन्नपूर्णाबाई सहगमन गेली. यावेळी तीच्या समागमनेचा खर्च, ब्राम्हण भोजन, बादली, शालू किनारदार, चोळीखण, २ जायफळ, ४ लवंगा, २ पत्री, २ रेशीम, न्हावी खर्च, बापुभट यास दक्षणा आदी सतीच्या जाण्याचा उल्लेख पत्रामध्ये आलेला आहे. पेशवे कालिन धार्मिक प्रकरणात यावर सविस्तर पणे झालेला खर्च लिहिलेला आहे.* [२५]

४.७ विवाह पध्दती :

मध्ययुगीन भारतातील इतर ठिकाणांप्रमाणे महाराष्ट्रातही [नगरमध्ये] वयाच्या ८ व्या वर्षीच विवाह होणा-या लहान मुलींचे विवाह समाजात प्रचलीत होते. यात मोठया घराण्यात तर पाच सहा विवाह झाल्याचे दिसून येते. राजकिय घराण्यात सर्रास ही पध्दत प्रचलीत होती. समाजात सर्वसामान्य कुटूंबात एक पत्नी विवाह अस्तित्वात होता. साधारण पण सामाजीक सलोखा पाळण्यासाठी विवाह पध्दती अस्तित्वात असल्याचे समजते. तरीही काही घरण्यांमध्ये विवाह पध्दतीत स्त्रियांना कुटूंबात मानाचे स्थान होते. राजकारणात त्या सक्रीय होत्या. आहिल्याबाई होळकर याचे चांगले उदाहरण देता येईल.

४.८ स्त्रीयांचे शिक्षण :

स्त्री - शिक्षणाबाबत गैरसमज :

मध्ययुगात भारतातील इतर भागांप्रमाणेच महाराष्ट्रात पूर्णपणे स्त्री शिक्षणाची अबाळ झालेली होती. स्त्रीयांनी शिकूच नये अशी लोकांची समजूत होती. धर्मातील अनेक संकल्पनांचा आधार घेवून स्त्री शिक्षण पूर्णत: बंद केलेले होते.

४.९ उच्च वर्गातील व राजकुळातील स्त्री - शिक्षण :

पेशवेकालीन उच्चवर्णीय स्त्रियांना अक्षर ओळख असल्याचे दिसून येते. त्यामुळे काही प्रमाणात या स्त्रिया याला अपवाद असल्याचे दिसून येते. पेशवे, शिंदे, होळकर, दाभाडे, पटवर्धन, भोसले, गायकवाड यांच्या घराण्यातील स्त्रियांना परंपरागत पध्दतीने शिक्षण मिळाले होते. पण हे शिक्षण लिहिणे, वाचणे यापुरतेच मर्यादित होते. अशा स्त्रीयांचे

शिक्षण हे घरातील वडीलधा-या माणसाच्या देखरेखीखाली एखादा शिक्षक नेमून दिले जात असे. स्त्रियांसाठी स्वतंत्र पाठशाळा अस्तित्त्वात नव्हत्या. बहुजन समाजातील स्त्रियांना शिक्षण उपलब्ध नव्हते.

४.१० स्त्री - शिक्षण व प्रशासकीय व लष्करी शिक्षण:

राजघराण्यातील काही स्त्रियांना युध्दकला व प्रशासनाचे शिक्षण मिळत असे. संधी मिळताच स्त्रिया या कलेतही प्राविण्य मिळवत. ताराबाई, अहिल्याबाई, उमाबाई, लक्ष्मीबाई व इतर काही स्त्रियांनी युध्दकलेत व प्रशासनात लौकिक प्राप्त केला होता.

ब्रौटन म्हणतो की, पेशवाईच्या काळात पुरुषांनी शरीर उत्कृष्ट कमवावे यात नवल नाही. कारण कित्येक स्त्रियाही या कलेत प्राविण्य मिळवून व पुरुषांप्रमाणे तंदुरुस्ती ठेवून कुस्त्या खेळत. गावोगावी हिंडत असून त्यांना हरवणे पट्टीच्या पैलवानालाही जड जात होते. स्त्रिया पुरुषांची बरोबरीने कुस्ती करतील अशा कलेतही पुरुषांच्या पावलावरही पाऊल टाकण्याची स्त्रियांची तयारी असे. यशवंतराव होळकरांची कन्या भीमाबाईही घोडयावर बसण्यात व भाला फेक करण्यात पटाईत असून त्या नैपुण्याबद्यल तिची सर जॉन मालकन यानेही शिफारस केली होती.

नगरमधील शिंदे, होळकर, नगरकर, पळशीकर घराण्यातील स्त्रिया उच्चशिक्षीत असल्याचे मोडी दस्तऐवज आजही उपलब्ध आहेत. परंतू सर्वसामान्य स्त्रियांमध्ये शिक्षणाचा अभाव दिसतो. नगरमधील पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे वतनदार घराण्यांनी आपल्या मुलींना दुस-या तिस-या इयत्तेपर्यंत शिक्षण दिल्याचे उल्लेख आहेत. यातील काही वतनदार घराण्यातील स्त्रिया आपल्या वडिलोपार्जीत व्यावसायात सहभागी होत्या. त्याच हिशोब ठेवत . आर्थिक व्यवहार त्यांच्या मार्फत चालत असत.

सर्वसामान्य घरातील स्त्रिया या चूल व मूल या म्हणी प्रमाणे आपले जीवन जगत होत्या. त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचा प्रयत्न फारसा कोणी केल्याचे उल्लेख आढळत नाही. तरीही व्यावहारात उपयोगी ज्ञान अनेक जणींना होते. तर काही घराण्यात स्त्रिंया

या पुरुषांच्या बरोबरीने निर्णय घेत. तर काही भागात अकोले संगमनेर या आदिवासी पट्टयात मातृसत्ताक कुटुंब पध्दती जाणवते.

५ पेशवे कालीन नगरमधील कुटुंब व्यवस्था :

मानवी जीवनामध्ये धर्म, अर्थ, काम, मोक्ष याला खूप मानाचे स्थान आहे. त्यात गृहस्थ आश्रमात मानव हा सामाजिक रुढी, परंपरा नुसार आपले जीवन व्यतीत करतो, त्यात कुटुंब हा तर समाज व्यवस्थेचा कणाच मानला गेला आहे. पेशवे काळात ग्रामीण समुदाय मोठया प्रमाणावर होता. त्यात एकत्र कुटुंब पध्दती ही मोठया प्रमाणावर आढळते. ग्रामीण भागात देशमुख, देशपांडे, जमीनदार, पाटील, सावकार अशा मोठया घराण्यांमध्ये एकत्र कुटुंबाबरोबरच बहूपत्नीत्वाची मोठी प्रथा आढळते. काही घराण्यात चार पत्नी बरोबर विवाह केल्याचे अनेक उल्लेख आढळतात. तर काही कुटुंबात बहुपत्नी ही प्रथा मोठया प्रमाणात असल्याचे समजते. बहुपत्नीकत्व हे राजकीय कारकीर्दीत मोठे पणाचे स्थान समजले जात. या मधून विविध घराण्यांशी नाते संबंध प्रस्थापित करण्यावर भर देण्यात आला होता. हा विवाह पाटील, देशमुख, देशपांडे,जमीनदार यांच्यात मोठया प्रमाणावर दिसून येतो.

सर्व सामान्य जनतेत एकपत्नी पध्दती अस्तीत्वात होती. साथीचे आजार, भूक बळी, यामुळे अनेक अपत्य कुटुंबात दिसतात. महसूल विभागातील मोडी दस्तावरुन असे समजते बारा - चौदा आपत्य अनेक घराण्यात जन्माला आल्याचे दिसून येतात. मुस्लीम कायदयानुसार अनेक घराण्यात बहु पत्नीत्वाची प्रथा रुढ असल्याचे दिसते. यामध्ये मुलाने, खान, आतार, बागवान, शेख या मोठया घराण्यात ही प्रथा मोठया प्रमाणात दिसते.

५.१ धार्मिक संस्कार :

जन्मापासून मृत्यु पर्यंत अनेक संस्कारांचा उल्लेख अनेक हिंदू साहित्यात आढळतो. गर्भधारणेपासून मृत्यु पर्यंत सोळा संस्कारांचा उल्लेख आहे. पेशवे काळात काही ठिकाणी सती जाण्याचे उल्लेख पण आढळतात. त्यात असे जाणवते स्त्री ही पूर्ण पणे पुरुषावर विसंबून होती. कमवत्या पुरुषानंतर तिची आवस्था मोठी कठीण होती. समाजातील रोषाला सामोरे जाण्यापेक्षा ती मृत्युला जवळ करत होती. चौदा वर्षाखालील बालकाला मृत्युनंतर

जमीनीत पुरण्याची प्रथा रुढ असल्याचे समजते. नगरमधील नाथ पंथीयांमध्ये अनेक ठिकाणी मृत्यु नंतर जमीनीत समाधीचे अनेक उल्लेख आहेत. त्यानंतर त्यावर थडगे बांधले जात. नगरमधील कायगाव टोके, नेवासे, प्रवरासंगम, पुणतांबे या धार्मिक तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी मृत व्यक्तीच्या अस्थी विसर्जन केल्या जात. किंवा दशक्रिया विधी या ठिकाणी मोठया प्रमाणावर होत. कायगाव टोके हे पेशव्यांचे मुख्य धार्मिक केंद्र होते. येथे ब्राम्हण मुलांच्या मुंजी मोठया प्रमाणावर होत. नगर मधील ब्राम्हण पंडितांना देशभर मोठा मान सन्मान होता. अनेक ठिकाणी पूजा अर्चा, होम - हवन या साठी या पंडितांना बोलावले जात असे.

६ पेशवेकालिन न्यायदान पध्दती.

पेशवेकालिन अहमदनगरच्या न्यायदानाच्या पध्दतीत मुस्लिम छाप पडलेला दिसतो. या न्याय संस्थेमध्ये हिंदू आणि मुसलमान परंपरांचे मिश्रण झालेले आढळते.

या कायद्यांचे उगमस्थान हिंदू धर्मशास्त्र, मनुस्मृती, मिताक्षरा, व्यवहारमयूख, दानकमलाकर, पराशरमाधवीयम् चर्तुवर्गचिंतामणी ही मध्यमयुगीन महाराष्ट्रातील विधिनियमांची उत्पत्तिस्थाने होती. शिवाय जातीय तंटे सोडविण्यासाठी जातीय तंटयाशी संबंधित यातीनिर्णय स्मृतिग्रंथाचा उपयोग होई. परंपरागत चालीरीती हे सुध्दा विधिनियमांचे एक उगमस्थान मानण्यात येई.[२६]

६.१. पेशवेकाळात आढळणारे न्यायखाते

- दिवाणी
- फौजदारी
- काम चालविण्याच्या पध्दतीबद्यल हुकूम
- गुन्हे
    १. फंदफितुरी व राजद्रोह
    २. खुन व आत्महत्या
    ३. दुखापत

४. चो-या व दरवडे

५. गुलमास फुस लावून नेणे

६. चोरीचा माल घेणे

७. खोटी साक्ष

८. खोटी फिर्याद

९. बनावट दस्तऐंवज

१०. खोटें नाणे

११. बदकर्म

१२. फूसलावून नेणे

१३. एक नवरा जिवंत असतां दुसरा करणें

१४. भूमिगत द्रव्य

१५. जादुगिरी

- न्यायखात्यातील कामगार
- पोलीस
- तुरुंग आदी न्यायव्यवस्था व त्यासंबंधी कामाबद्दल उल्लेख नानासाहेब पेशवे, पहिले माधवराव, सवाई माधवराव यांच्या रोजनीशी मध्ये आढळतात. [२७]

६.२ पेशवेकालिन अहमदनगर मध्ये आढळणारे काही न्याय निवाडे

दिवाणी दावे

बाळाजी बाजीराव, थोरले माधवराव, सवाई माधवराव यांचे समई झालेले दिवाणी दाव्येचे निवाडे पेशवा डायरी मध्ये जसेचे तसे छापलेले आहेत त्यातील काही पत्र पुढील प्रमाणे

६२९ लग्नास लागले मागील देणे

३५० सालमजकूरचे खर्चास

१०० पोटास पुण्यांत

.....

१०७९

एकूण एक हजार एकूणऐंशी रुपये त्यास दिल्हे . बाकी.

मोहरा नाणे ७४७ नगद रुपये २४७१

एकूण मोहरा सातशे सत्तेचाळीस व रुपये दोन हजार चारशे एकाहत्तर राहिले. त्यास आबाजी गोविंद लहान मूल आहे व थोर होई तोंपावेतों माहेरा व रुपये आम्हांजवळ स्वामीनी ठेवावयास दिल्हे ते आम्ही आपणाजवळ ठेविले. ज्या समयी आबाजी गोविंद थोर होईल तेव्हां सदरहु मोहरा व रुपये द्यावयाची आज्ञा होईल, तेव्हां मोहरा व रुपये सरकारची परवानगी घेऊन त्यास देऊं. पेस्तर सालापासून आबाजी गोविंद यास दरसाल खर्चास रुपये ३५० साडे तीनशे प्रमाणें देत जाऊ. बाकी ऐवज राहील तो सरकारचे विद्यमानें आज्ञा होईल. तेव्हां आबाजी गोविंद यास देऊं. यास अंतर झाले तरी आपले हरदु गांवचे कुळकरण सरकारांत द्यावें व आबाजी गोविंद याचा पैकाही देऊ. म्हणोन सरकारांत कतबा घेतला असे.

नानाजी गोविंद व भानाजी गोविंद कुळकर्णी मौजे आणे तर्फ बेल्हे व मौजे राहुरी तर्फ आले. प्रांत जुन्नर यांस सरकारचें आज्ञापत्र दिल्हें कीं आबाजी गोविंद कुलकर्णी मौजे फाटकें तर्फ पाबल प्रांत जुन्नर हा लहान आहे. याची ठेवी तुम्हाजवळ मोहरा ७४७ सातशे सत्तेचाळीस व रुपये २४७१ चोवीसशे

एकाहत्तर. पैकी दरसाल पेस्तर सालापासून रुपये ३५० साडेतीनशे देत जाणें. बाकी ऐवज राहील तो सरकारची आज्ञा होईल तेव्हां देणं म्हणोंन पत्र [२८]

६.३ निवाडा पत्र [संगमनेर]

शंकरराव देशमुख परगणे संगमनेर याचे नांवे निवाडपत्र लिहून दिलें की, सटवोजी दिघा तळेगांवकर चाकर सरकार यानें हुजूर विदित केलें की परगणे मजकूरची देशमुखी कदीम आमच्या वडिलांची आहे. याविषयीं सनद पत्रही आहे. म्हणोन त्यावरुन तुम्हास तलब करुन हुजूर आणिले. दिघा मजकूराची तहकीकात मनास आणितां चारशें वर्षे पर्यंत कोठे दखलगिरी अगर नांवही नाही. कागदपत्र दाखविला तो गलुफी दिसून आला. तुम्ही पहिल्यापासून आहां. दिघा मजकुराचा लाझ्या नाहीं असे जाणून तूम्हांवर कृपाळू होऊन हे निवाडपत्र सादर केले असे. तरी परगणे मजकुरची देशमुखी सुदामत प्रमाणें करुन परगणे मजकूरची आबादी व कामकाज करीत जाणें म्हणून निवाडपत्र लिहून देऊन शेरणी करार केली. ते जमा....[२९]

६.४ कजिया

कसबे पुणतांबे परगणे संगमनेर यांस पत्र की त्रिंबकजी बिन जाखोजी उगले व कोनाजी बिन कृष्णाजी ठुपके यांचा व दमाजी बिन जगदेवराव धनवले व धुलाणी बिन देवाजी वाहाडणे यांचा कसबे मजकूर येथील पाटिलकीचा कजिया आहे. याजकरितां हरदु बादे हुजूर फिर्याद आले. त्याजवरुन दोघांचे जामीन तकरीरा घेऊन पेस्तर इनसाफ करुन खरा खोटा निवाडा होई तोपर्यंत मोकदमी अमानत केली असे. मोकदमीच्या कामकाजास रा. चतुरभुज मल्हार पाठविले आहेत. तरी तुम्ही याजपाशी रुजू होऊन पाटिलकीचे हकदक, मानपान, शेतें, कुल असेल तें मशारनिल्हेस रुजू

करुन देणे. मोकदमीचा कारभार हे करतील. पट्टी, पासोडी, लावणी हे करतील म्हणोन गावास सनद [३०]

६.५ कजियापत्र [संगमनेर]

अछाराम रघबनशी वस्ती कसबें संगमनेर याणें हुजूर विदित केंले की, आपला आजा मीरचंद याणें पदाजी न्हावी यास चाळीस रुपये कर्ज देऊन घर गहाण ठेविलें होतें. आमचे रुपयांस व्याज नाही. त्याचे घरास भाडें नाही. याप्रमाणे पांच वर्षींचा करार करुन खत लिहून घेतले. पांच वर्षे जाहल्यावर रुपये मागों लागला. तेव्हां दोन महिन्यांचा वायदा केला. दोन महिन्यांनी रुपये न दिले तरी घर डुलेल याप्रमाणे करार केला होता. रुपये मागितले, वसूल न होत. दोन वर्षे जाहाली. न्हावी मरोन गेला. मागें त्याचें गोतें. मायाजी व कानोजी कजिया करितात. येविषयींचा इनसाफ मनास आणावा म्हणोन . त्याजवरुन मनसुबी मनास आणितां अछाराम खरा जाहला. व न्हावी खोटा झाला. सबब वाडा लांब हात ३४ व रुंद हात १५ पंधरा याप्रमाणे मिरास करुन दिल्हा असे. तरी याचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेनें चालवणें म्हणोन मोलाचंद कसबें संगमनेर यास सनद १ अछाराम रघबनशशी याचे नावें पत्र की, तुला वरील निवाडा करार करुन दिल्हा असे. तरी सुखरुप नांदणे म्हणून सनद १. येणें प्रमाणे सनदा करुन देऊन अछारामकडे शेरणीं स्वराज्य मोंगलाई कुलबाब कुलकानू देखील सरदेशमुखी करार रुपये १०. [३१]

६.६ मनाई हुकूम

गणेश विठ्ठल यांचे नावे सनद की मालोजी गाडेकर खिजमतगार यानें हुजूर येऊन अर्ज केला की, आपले शेत अहमदनगरचे किल्ल्यासन्निध आहे. त्यास श्रीमंत राजेश्री दादासाहेब[राघोबादादा] यांची स्वारी नगरचे किल्ल्याजवळून गेली

ते समयीं राजश्री नारो बाबजी यांनी शेत लुटून किल्ल्यांत नेले, आणि हल्ली शेतचा पैका मागतात, त्यास साहेबी मनाचिठी दिली पाहिजे म्हणोन: त्याजवरुन तुम्हांस पत्र लिहिलें आहे, तरी याची चौकशी करुन शेत लुटून नेलें असल्यास शेताचा आकार होईल तो माफ करणें पैक्याचा तगादा न करणें म्हणोन .[३२]

६.७ दादासाहेबांच्या रोजकीर्दीपैकी महसूली न्यायनिवाडा

गोविंद संभाजी गोगले वस्ती अहमदनगर यांनी हुजूर विदित केलें की, भवानी रघुनाथ गोगले आपले चुलत बंधू व आपले तीर्थरुप एकेठायी नांदत होते, त्यास आपले तीर्थरुप निवर्तले. तदोत्तर भवानी रघुनाथ विभक्त जाहले. घरचे वित्तविषय वास्तवानी सर्व त्यांनी घेतली आहे. आपल्यास वाटा देत नाही. याजकरितां ताकीद जाहली पाहिजे म्हणोन: त्याजवरुन हें पत्र सादर केलें असे. तरी याचें त्याचे वर्तमान वाजवी मनास आणून गोविंद संभाजी याचा विभाग जो पोहोंचेल तो देणे, आणि तीनशें रुपयेपर्यंत वांटा आला तर सरकारांत कांही न घेणें जाजती वांटा आल्यास वांटयांपैकी दहक घेऊन सरकार हिशेबी जमा करणें म्हणोन, गणेश विठ्ठल तर्फ अहमदनगर यांचे नावे चिटणिशी पत्र. [३३]

६.८ न्यायनिवाडा

नारो कृष्ण यांचे नांवे पत्र की, मंगु जाट यानें हुजूर येऊन विदित केलें की, आपला सासरा धीरा भारा जाट वस्ती बडापूर याचे पोटी तिघी लेकी, तिघांस दिल्या, वडील हिरी, मधली सुजान व धाकटी मजला दिली, आणि तिघां जावयांस घरी ठेविले. सासरा हेातो तों आम्ही तिघे साडू एकजागी सार-यांचे घरी धंदा करुन भोजनखर्च वांटणीप्रमाणे देऊन ज्यास जो पोटखर्चाशिवाय खर्च लागेल तो घ्यावा बाकी अखेरसाली कमज्यादा पावतीचा हिशेब करुन बरोबर एकशी पावती करावी, याप्रमाणे चालत होते. त्याजउपर हिरा जाट मयत जाहला, त्यावर कांही दिवस चालत होतें. असे असतां आपल्या बायकोने तया उभयतां मेहुण्यांस म्हटलें की आपला हिशेब

करुन घेणें तेव्हा त्यानी कजिया केला. म्हणोन आपल्या बायकोनें जीव दिला उपरांतिक या दोघींनी आपला जांवई मारिला. दोन खून जाहले. त्यांनी केले. त्यांचा माझा कज्या भारी झाला. दोहों चौ ठिकाणी पंचाईत पाहिजे म्हणोन : त्याजवरुन हें पत्र तुम्हांस सादर केले असे, तरी यांचे वर्तमान वाजवी मनास आणून वाजबी असेल तें करणे. हिरी व सुजान दोघीजणी मंगु मजकुराचे वादे जहानाबादेंत आहेत, तेथील अंमल राजश्री माधवराव शिवदेव यांजकडे आहे, सबब राजश्री त्रिंबकराव शिवदेव यांसही पत्र सादर केलें आहे, तरी ते व तुम्ही वाजबी न्याय करुन तुम्ही व त्यांनी कोणाची रुरयास एकंदर न करिता रास्ती करुन यथाविभागे वाटा करुन ज्याचा त्यास देणें, आणि सरकारांत चौथाई घेऊन हिशेबी जमा करणें. कोणचा पक्ष कोणी परिच्छिन्न न करणें म्हणोन चिटणिसी. [३४]

६.९ लोणीखुर्द सोनारकीचा वाद

लक्ष्मण सोनार वलद विश्वनाथ सोनार लाड आडनांव मैड मौजे लोणीबुद्रुक व मौजे लोणीखुर्द व मौजे हसनापूर तर्फ हवेली संगमनेर यानें हुजूर मौजे चावडस परगणें नाशिक गंगातीर येथील मुक्कामी येऊन अर्ज केला की, देहाय मजकूरचें सोनारकीचें वतन आपलें पुरातन आहे, त्यास आपण कांही कसाल्यामुळे गांवावरुन परागंदा जाहलों. येमाजी सोनार आपला आप्तविषयी यानें देहायचें कामकाज चालविलें, त्याजवर मौजे लोणीखुर्द येथील गावकरी यांनी उपरी सोनार दुसरा आणून त्याचे हातें सोनारकीचें काम कांही दिवस घेतलें. मग सदाशिव वल्लद मल्हारी सोनार मौजे वाडेगव्हाण परगणे कर्डे याचा आजा सिदु सोनार वाडेगव्हाणाहून मौजे लोणीखुर्द येथें येऊन राहिला. सोनारकीचे बलुतें खाऊन गांवची चाकरकरी केली, त्याजवर सदाशिवाचे बापानेंही चालविलें व हसनापूर येथील वतन अनुभवूं लागलो, आणि लोणीखुर्द येथील सोनारकीचें वतन पूर्ववतप्रमाणे

करावें तों सादाशिव मजकूर कजियास उभा राहिला, आणि त्यांने धटाई करुन आपले चालों न दिल्हे, परंतु आपण वतनाचा वारसा करीतच आलों, त्यास अलीकडे कैलासवासी श्रीमंत नानासाहेबे यांजपाशी फिर्याद जाहलो, ते वेळेस सरकारांतून मनसुबी राजश्री नारोबाबजी यांजवर नेमून दिली, त्यांनी मनास आणून निवाडा केला. आपण खरा जाहलो सदाशिव मजकूर खोटा जाहला. तेव्हां त्यानें नारो बाबजी याचे विद्यमानें सन १७६१ मध्ये यजितखत लिहून दिले. त्या उपर सरकारचें निवाडपत्र करुन घ्यावें तरी आपली नातवानी बहुत, निवाडपत्र सरकारांतून करुन घ्यावयासी तयार नाहीं याजमुळे राहिले. मग वतनवार जाऊन लोणीखुर्द तेथील सोनारकीचें कामकाज करु लागलों, त्याजपासून आपण वतन अनुभवित आलो. ऐसें असतां साल गुदस्तां सदाशिव सोनार सरकारांत फिर्याद जाहला, त्याजवरुन सरकारांतून राजश्री बाळाजी महादेव याजकडे मनसबीविशी पत्र दिल्हे त्यांनी आपल्यास मसाला करुन आणिले, आणि आपलें व त्याचें वर्तमान पेशजी सदाशिव यानें येजितखत नारोबाबजी यांचे विद्यमाने करुन दिलें तें मनास आणिता आपण खरा जाहलों. सदाशिव खोटा जाहला. वतन आपल्याकडे चालत आहे. ऐसेयास साहेबी कृपाळू होऊन यजितखत आपल्याजवळ आहे तें पाहून निवाडपत्र भोगवटीयांस करुन दिलें पाहिजे म्हणोन विनंती केली, व यजितखत आणून दाखविलें त्याचा मजकूर बितपशील.

यजितपत्र शके १६७९ ईश्वरनाम संवत्सरे चैत्र वद्य १३ ते दिवशी लक्ष्मण सोनार वल्लद विसाजी सोनार ईबन रामजी सोनार मौजे लोणीबुद्रुक व मौजे लोणी खुर्द व मौजे हसनापूर तर्फ हवेली संगमनेर यांसी सदाशिव सोनार वल्लद मल्हारी सोनार बीन सिदू सोनार मौजे वाडेगव्हाण तर्फ कर्डे सुरु सन १७६६ कारणें यजितपत्र लेहून दिलें ऐसीजे आमचा व तुमचा कजिया लोणीखुर्दच्या सोनारकीबद्दल होता, सबब तुझे पुरातन वतन

लोणीबुद्रुक एक गांव होता, तेव्हांपासून आहे, त्याजवर एक्या गांवची जमीन तोडून लोणीखुर्द व हसनापूर जाहले ते वेळेस तुमचा पूर्वज सेटयाजी सोनार पणजा मयत जाहला त्याचे बायकोनें दुसरा घरोबा भेरडपुरच्या सोनाराशी केला. तुमचा आजा रामशेंट लहान होता तो पोटाखाली भेरडपुरास गेला. मागें गांव चालवावयासी कोणी नाही. तेव्हा लोणीखुर्द येथील पाटलांनी पाथरकर सोनार दहा वीस वर्षे कामावर लाविला. त्याजवर चारणकर सोनार कामास लाविला. त्योनें काम दोन तीन वर्षे लोणीखुर्दचे केले. त्याजउपरांतिक आपला आजा सिदूजी सोनार वाडेगव्हाणाहून लोणीखुर्द येथें आला, गांवची चाकरी करुन सोनारकी बलुतें खाऊन राहिला, त्यामागें मल्हार सोनार आपला बाप यानें सोनारकीचें काम चालविलें, त्याजवर अलीकडे आपणही चालवित आलें, तुम्ही वतनाचा वारसा करीतच गेलेत परंतु निवाडपत्र करुन कोणा हकमाशीं जाऊन निवाडा केला नव्हता. अलीकडे तुम्ही राजश्री नरहरपंत कमावीसदार परगणे संगमनेर याजपाशीं फिर्याद गेला, त्याजवर त्यांनी निर्मळपिंपरीचें गोत नेमून दिलें. मग निर्मळपिंपरीकरांनी तुम्हांस व आपणांस जामीन फर्माविले. ते समयीं आपण पंधरा रोजांचा वायदा करुन गैरहाजीर होऊन पुणियास गेलों. राजश्री बाबूराव दीक्षिताचा हुकूम नरहरपंत कमावीसदारास आणिला, आणि नरहरपंतांनी लोणीखुर्दची पांढरी समाकूळ संगमनेरास नेऊन तहकीकांत करितां तुमचें वतन ऐसें जाणोन तुमचे हवालां केले, त्याजवरुन आपण माणसें घेऊन राळेगव्हाणास गेलों, मग आपण श्रीमंत पंतप्रधान स्वामी याशी फिर्याद जाऊन हुजूरचा हुकूम मनसुबी करावयाविशीं राजश्री नारोपंत सुभेदार यांजवर आणिला, मग सुभेदारसाहेबांनी तुम्हांस व आपणांस जामीन व तकरीरा फर्माविल्या, त्याजवरुन आपण व तुम्ही तकरीरा दिल्या. बितपशील-

तकरीर कर्दे बेशमी	तकरीर कर्दे बेशमी
लक्ष्मण सोनार वलद विसाजी सोनार ईबन रामजी सोनार मैड मौजे लोणी परगणे संगमनेर सन १७६६ कारणें साहेबांचे सवेशी तकरीर लेहून दिली ऐसेजे, सदाशिव वलद मल्हारी सोनार मिसाळ याचा व आपला मौजे लोणीखुर्द परगणे संगमनेर येथील सोनारकीच्या वतनाचा कजिया लागला आहे, त्याबद्दल उभयतांची मनसुबी हुजूर साहेबाकडे सांगितली. साहेबी आपल्यास कान्हूरच्या मुक्कामीं पुरसीस केली कीं सदाशिव मजकूरच्या मुक्कामी पुरसीस केली कीं सदाशिव मजकूर म्हणतो की, वतन सोनारकीचें मौजे लोणीखुर्द येथील पूर्वीपासून आपलें आहे, आपण वतन अनभवीत असतां दीड वर्ष जाहलें लक्ष्मण मजकूर हा राजश्री नरहरपंत कमावीसदार परगणें मजकूर यांजपाशीं फिर्याद होऊन त्यांजकडुन आपणांस रुपये सोळा १६ मसाला करुन वतनापासून बेदखल करविलें, आणि लक्ष्मण मजकुर मौजे मजकूरचे वतन सोनारकी करीत आहे म्हणोन सदाशिव मजकूर म्हणतो आणि तुम्ही मौजे मजकूर	सदाशिव वलद मल्हारी सोनार ईबन शिदू सोनार मिसाळ मौजे लोणीखुर्द परगणे हवेली संगमनेर सुरु सन १७६६ कारणें. साहेबांचे सेवेशी तकरीर लेहून दिली ऐसीजे, लक्ष्मण सोनार मौजे लोणीबुद्रुक परगणे मजकर हा राजश्री नरहरपंत कमावीसदार परगणे मजकूर यांजपाशी फिर्याद होऊन रुपये १६ सोळा मसाला करुन आपलें वतन मौजे मजकूरचें सोनारकीचें वतन आपलें आपण पूर्वीपासून करीत असतां आपणांस सोनारकी वतनापासून बेदखल केले. आणि वतन सोनारकीचें लक्ष्मण मजकूर वर्ष दीडवर्ष जाहलें [अनुभवितो] याजकरितां आपण फिर्याद हुजूर जाहलों त्याजवरुन उभयतांची मनसुबी करावयासी साहेबांकडे सांगितला. साहेबी आपणांस पुरसीरस केली की, मौजे

सोनारकी वतन आपले म्हणोन म्हणता तर येविशी काय हकीकत आहे ते बयादवार लेहून देणें म्हणोन आना केली, त्यास मौजे मजकूरचे वतन सोनारकी आपलें पूर्वीपासून आहे, मौजे लोणी हा गांव पूर्वी एकच होता, त्यास शिवाजी पद्मनाभ याचे अमलांत एक लोणी होता, त्याचा मौजा तुटून दोन लोणीबुद्रुक व लोणीखुर्द दोन गांव जाहले, त्याजवर लोणी बुद्रुक येथील फिरोन दुसरा मौजा तुडून हसनापुरगांव जाहला, एकूण एक्या लोणीचे तीन गांव जाहले. मौजे तुटले तेसमयी आपला पणजा शेटया सोनार होत, त्याने तिनही गांवचे वतन सोनारकी केली, त्याजवर शेटयाजी मजकूर मयत जाहला, त्याचा पुत्र आपला आजा रामजी सोनार लहान होता, त्यास आपली पणजी रखमाई इनें मौजे भेरडपूर परगणे मजकूर येथील सोनारासी दुसरा घरोबा केला तिच्या पोटाखाली रामजी मजकूर गेला. गांवचे सोनारकीचे काम काज चालवावयासी कोणी नाही याजवर यमाजी सोनार मौजे पाथरें परगणे मजकूर हा आपला शरीसंबंधी होता, सबब त्याने तीन गांव चालविलें, ज्याजवर यमाजी मेलियावर त्याचा	मजकूरचें बतन सोनारकी कशी आहे, भोगवटा कागदपत्र काय आहेत ते बयादवार लेहून देणें म्हणून आज्ञा केली. त्यास मौजे मजकूर व लोणीबुद्रुक हा एक गांव होता दीडशे वर्षे जाहली, शिवाजी पद्नाम ब्राम्हण होता त्यानें तीनशे धनवटचे गांव होते त्याचे मौजे आलाहिदा करुन साठ गांव जाजती केले,त्यासमयीं लोणीबुद्रुक या गांवचा तनखा तोडून लोणी बुद्रुक व लोणीखुर्द केले. लोणीबुद्रुक विखराची, व लोणी खुर्द अहिराची व घोग-याची. जेसमयी लोणीखुर्द दुसरा जाहला त्यासमयीं जागाजागांचे कुणबी व बलुतें येऊन मौजे मजकूरची वस्ती केली. तेव्हा वतनी मिरास भाऊ होऊन अनुभवतात. येणेंप्रमाणे बितपशील. १. लोणीखुर्दचे पाटील अहिर निमे व घोगरे निमे त्यास

पुत्र काळोजीनें तिन्ही गांव चालविलें. सदाशिव मजकूर याचा आजा शिदू सोनार वाडेगव्हाणकर हा मौजे लोणीखुर्द येथें आला. गांवकरी यमाजी मजकूर पाथरकरास म्हणाले की, तूं लोणी बुद्रुक येथें रहातोस. आणि गांवचा बोभाट होतो तेथें हमेशा असले पाहिजे. हे आपल्यास पुरवत नाहीं आतां शिदू सोनार वाडेगव्हाणकर कामकाज चालविल. म्हणोन शिदू सोनार मजकूर यांस मौजे लोणीखुर्द येथें गांवकरी यांनी ठेविले. मग यमाजी सोनार पाथरकर यानें आपला आजा रामजी सोनार यास भेरडपुरी सांगोन पाठविलें वाडेगव्हानकर सोनार आला आहे तो लोणीखुर्द येथील सोनारकीचें कामकाज चालवितो, तर तुम्ही गांवावर येऊन आपलें वतन करणें, त्याजवरुन आपले आजानें आपला चुलता मोरशेट यास व आपणांस मौजे मजकूरास पाठविलें. आपला बाप रामजी सोनारापाशीं भेरडपुरीं राहिला. मोरशेट व आपण गांवावर येऊन वतन चालविलें. सदाशिव मजकुर याचा आजा शिदू सोनार येथून पिटोन काढून आचलगांवी लाविला तो तेथेच राहिला. मोरशेट व आपण	अहिर मौजे आपटे येथून आले व घोगरे दाडचणे गांवचे तेथून आले, आणि मौजे मजकूरचें वतन अनुभवितात. १. तळेगांवाहून दिघा कुलकर्णी आला आहे, आपल्या घराशेजारी आहे तो वतन अनुभवित आहे. १.परीट हेल्हाऊन आहे तो परीटकीचें वतन अनुभवितो. १. न्हावी सिंगावेंनजीक पारगांव तर्फ अवसरी येथून आला आहे. १.सुतार मौजे आरवी पिंपळगांव तर्फ नारायणगांव येथू आला आहे. १. चांभार हा राजुरीमहमदपुरीहून आला आहे. १. तेली मौजे महमदपूर येथून आला आहे तो हें वतन

लोणीखुर्द लोणीबुद्रुक व हसनापूर या तीन्ही गांवचे वतन सोनारकीचें कामकाज करुं लागलो. चुलत्याने व आपण पांच सात वर्षे चालविले. त्याजवर न-होजी सोनार वासदेकर लोणीखुर्द येथें येऊन राहिला. न-होजी मजकूर बखतवार होतो लोणीस येऊन मळेदळे करुं लागला त्याच्या आंगे शिदूजीचा पुत्र व शिदूजी दोघे येऊन लोणीखुर्द येथे जबरदस्तीने सोनारकीचें वतन करुं लागले. त्याजमुळें आपण पुण्यास फिर्याद व्हावें, त्यांस शंकरराव देशमुख यांनी गांवकरी यांस पत्र लिहिलें की, लक्ष्मण मजकूर मसाला रुपये २०० दोनशें करीत होता, आपण फिरावून तुम्हांकडे लाविला. तर याचें वतन याजला देणें म्हणोन पत्र दिलें ते पत्र बजिन्नस आपल्या जवळ आहे, त्या पत्रास गांवकरी यांनी मनास आणिलें नाही, त्याजवर राजश्री नरहरपंत कमावीसदार यांजपाशी आपण फिर्याद जाहलों, त्यांनी सदाशिव मजकूराव मसाला रुपये १५ पंधरा केला व राउतास रुपया १ एकूण रुपये सोळा घेऊन कमावीसदाराजवळ आणिले त्यांनी आपलें वतन आपले हवाला केलें त्यास वर्षदीडवर्ष	अनुभवितो. सदरहू सातजण जागाजागाहून येऊन मोजे मजकूरची वतनें अनुभवून आपलाली सदरहू लिहिल्याप्रमाणें पाटील कुलकर्णी व बलुते मौजे मजकूर मौजे तुटला आहे तेव्हांपासून अनुभवतात. तेसमयीं आपला आजा शिदूजी सोनार वाडेगव्हाणाहून मौजे मजकूर वस्तीचे वेळेस दखल जाहला, मग आपल्या आपण गेला की, गांवकरी यांनी नेला हें आपणांस कळलें नाही. शिदूजी सोनार आपला आजा, त्यापासून वतन अनुभवितो शिदोजी सोनार याचा पुत्र मल्हारी सोनार त्याचे पुत्र आपण वतन करीत आलों. परंतु लक्ष्मण सोनारानें पेशजी कधीं सोनारकीबद्दल कजिया केला नाही. गतवर्षापासून

जाहले. त्याजवर रामजी सोनार पाथरकर याजला माझ्या वर्ती घातलें. तो दरम्यान पडला कीं सोळा रुपये हकमांनी घेतले ते फिराऊन सदाशिवास देणें आणि सदाशिव मजकूर तुम्हांस लिहून देतो की, आपण आजपावेतों तुमचें वतन जतन केलें आणि हल्ली तुमचे हवाला केले. असे, तुम्ही वतन सुखें घेणें म्हणोन, सदाशिव मजकूराचे करारवरन रामजी दरम्यान पडोन तुकोपंत कुळकर्णी यांचे घरी कागद ल्याहावयासी सदाशिव, त्याचा भाऊ सुलबाजी व सोनार पाथरकर असे गेले. तुकोपंत म्हणाला कीं आपण पारावर कागद लिहू तूं जेऊन येणें. म्हणोन जेवावयासी आपले घरास गेला आणि सदाशिव पळोन गेला. तुकोपंताचे घरास कागद लिहावयासी गेला हें. तुकोपंत कुळकर्णी व रामजी सोनार पाथरकर हल्ली वर्तमान आहेत यांच्या मुखें खरें करुन देऊं न करुं तर खोटें. याजवर राजश्री बाबूराव दीक्षिताकडे उभयतां गेले त्यांनी मोजे निर्मळपिंपरी परगणे मजकूर येथे[पत्र] दिले. तेथे आपण उभयतां जाऊन आपली हकीकत जाहीर केली. बापुजी पाटील पिंपरीकर आपला बाप मेला म्हणून कजिया केला. मौजे मजकुरी लक्ष्मण सोनाराचें घर व खोंपट कांही नाही. मौजे लोणीबुद्रुक येथें राहतो. साहेबीं कागदाची हकीगत पुसिली त्यास मौजे मजकूर गांव बाकीदार जाहला याबद्दल हा कामाजवळ लोणीखुर्दकरांनी जामीन सदाशिव मियाजी पाटील मौजे हसनापूर परगणे मजकूर यांस जामीन देऊन गांव परागंदा जाहला. हसनापूरकर यांनी मौजे मजकुरचीं घरे उकलून नेऊन नगरामध्यें विकून बाकी वारिली, तेव्हां आपले घरामध्ये कागद होते ते गेले ते सावकाराचे गेले कीं कोणते गेले हें आपणास कळलें नाही. परंतु आपले बापानें सांगितले होतें की, कागदांचे सिंगट होतें तें घरें उकलून नेली तेव्हां गेले. महमदपुरी मिर्जाबेग

म्हणाला की, तुजजवळ कागदपत्र नाहीं तर पांडरी बलुतें यांस बलावून आणूं त्यांच्या माथां मसीदीची उदी घालून मिरासदार सोनार असल्यास पांढरी हाती धरील येविशीं उभयंताही जामीन देणें मग आपण सातल येथील जामीन नेला. सदाशिव जामीन आणावयासी गेला तो गैरहाजीर जाहला, त्याजवर राजश्री नरसिंगराव पागा हुजूर राजश्री बाबुराव दीक्षित याजकडे गेलों. त्यांनी पुणतांबे येथील गोत दिले. गोतांनी उभयतांचे जामीन व तकरीरा घेऊन करार केला की, याजपाशी कागद नाहीं पांढरी बलुतें बोलावून आणून श्रीगंगेत घालून पांढरी सोनार मिरासदार असेल तो हातीं धरील. याजवर सदाशिव मजकूर म्हणाला कीं, लेंकास बरें वाटत नाही. म्हणोन गोताजवळ सांगोन घरास गेला. मागें पांढरी गोताचे सेवेशी गेले, त्यास सदाशिव सोनार नाही, याजबद्दल पांढरी गोतास रजा मागून घरास गेले. सदाशिव सोनार यास ताहाराबादेस आपण सांपडवून गोताजवळ नेले. गोतानें पांढरीस आणावायासी पत्र देऊन उभयतांस पाठविले. गांवास गेलियावर सदाशिव गैरहजर जाहला. होता, त्याची बाकी गांवावर रुपये ३०० तीनशें होती, त्याजवर मौजे मजकूरची पाटिलकी मिर्जानें गहाण ठेविली. त्या बाकीचे रुपयाबद्दल आपला आजा शिदोजीनें रुपये १०० शंभर दिले व बाळोजी परटानें रुपये शंभर दिले व रामजी यानें शंभर रुपये दिले. येकूण रुपये तीनशें देऊन मिर्जापासून पाटीलकी सोडविली येणें प्रमाणे आपले वडिलांनी गांवासंबंधानें रुपये भरले. आपले वतन मौजे मजकूरची सोनारकी आहे, यावर तीन वर्षे जाहलीं काशिबा व खंडोजी सोनार मलठणकर यांचे मार्फतीनें मलठणीं लक्ष्मण सोनार आपणांस म्हणाला की, तुजला दोनशें रुपये आपण देतो वतन आपणांस देणें, त्यांस आपण लक्ष्मणांस वतन

याजवर साहेबी पुरसीस केली कीं, उभयंता गोतांतील हाजिर गैरहाजीर म्हणून कागद आहे कीं काय त्यांस पिंपरीचे गोताचा कागद सदाशिव गैरहाजीर जाहला म्हणून आहे पुणतांब्याचा कागद नाही. सदाशिव सोनाराचा वडील जबरदस्तीनें वतन खात होता म्हणोन पूर्वीही त्यास भांडत आले. आतांची मनसुबी साहेबाकडे आणली आहे. मौजे लोणीखुर्द व लोणीबुद्रुक व हसनापूर तीन्ही गांवांस कुळकर्णी व भट व लोहार कुंभार व महार व मांग येणेंप्रमाणें येकंदरच बलुते मिरासदार कदीम आहेत तीन्ही गांवचे पांढरीचे मुखें खरें करुन देऊं. खरें न करुं तर दिवाणचे गुन्हेगार व गोताचे खोटे हे तकरीर लेहून दिली सही.	न देऊ. याजकरितां गतवर्षीपासून आपणाशीं कजिया करितो. सदरहूप्रमाणे मौजे मजकूरचें वतन सोनारकी आपली आहे. आपले आजापासून आपण अनुभवीत आलों आहो. हें जमींदार व भवरगांव पांढरीच्या मुखें शाबूत खरें करु. खरें न करुं तर सरकाचे गुन्हेगार व खोटे हे तकरीत लेहून दिली सही, निशाणी हातोडा. बिलकम विसाजी महादेव चिटणीस सरकार जुन्नर तेरीख छ. ६ रबिलावल

निशाणी हातोडा

बिकलम विसाजी महादेव चिटणीस सरकार जुन्नर

तेरीख छ.६ रबिलावल

सदरहूप्रमाणे तुम्ही व आम्ही तकरीरा लेहून दिल्या त्यावर वर्तणुकीचे जामीन मागविले, मग आपण तिमाजी दाबले मौजे राजुरी परगणे संगमनेर यास जामीन दिले तुम्ही कृष्णाजी सोनार मौजे वणकुटे परगणे पारनेर यांस जामीन दिले. ऐसे उभयतांनी

जामीन दिले. यावर राजश्री सुभेदार साहेबांनी मौजे लोणीबुद्रुक व लोणीखुर्द व मौजे हसनापूर या तिही गांवचे पाटील व कुलकर्णी व बलुते कसबे शिन्नरचे मुक्कामी आणिले. बितपशील.

	मौजे लोणीबुद्रुक		**मौजे लोणीखुर्द**
१	भवानजी पाटील व सुलतानजी पाटील	१	रघोजी पाटील व गोंदजी पाटील अहीर.
१	लालशेट वाणी	१	सटवाजी पाटील घोगरे
१	जोगोजी म्हसके	१	सटवाजी पाटील घोगरे
१	देवजी म्हसके	१	साखरोजी घोगरे
१	येसू परीट	१	रघु अहिर चौगुला
१	केसोजी भोर	१	म्हालू अहिर चौगुला
१	आबाजी तेली	१	विश्वनाथ भगवंत
१	देवाजी चांभार	१	संभाजी दिघे
		१	कचोजी अहीर
२	मौजे हसनापूर	१	देवजी परीट
	१ सिदोजी पाटील	१	विठा वल्लद खंडू न्हावी
	१ दावलजी पाटील	१	तुळा चांभार
	२	३	समस्त माहार लोणीबुद्रुक व लोणीखुर्द व हसनापूर
१	तुको गोविंद कुलकर्णी		
१	कोन्हेर अंबादास कुलकर्णी	१	राया खंडू माहार
१	गोविंद केशवभट	१	लक्षु वल्लद भिका

१	जनार्दन गोविंदभट	१	विठा वल्लद नारु
१	सटवा वल्द जिजू लोहार	३	
१	जावजी व राणु कुंभार		
१६			

येणेप्रमाणे आणून सर्वांस राजश्री सुभेदार साहेबी नरककुंड ओढून हाती वेलभंडार देऊन पुरसीस केली की, लक्ष्मण सोनार व सदाशिव सोनार लोणी-खुर्दच्या सोनारकीबाबत भांडतात, यात पुरातन मिरासदार कोण म्हणून पुशिले त्याजवरुन सर्वांनी तकरीर लिहून दिली. बितपशील.

तकरीर कर्दे बेशमी भवानजी पाटील वल्लद रघोजी पाटील विवे मौजे लोणीबुद्रुक परगणे संगमनेर सन ११६६ कारणे तकरीर लिहून दिली ऐसीजे :- साहेबी हुजूर बलावून पुरसीस केली की लक्ष्मण सोनार व सदाशिव सोनार हे लोणीखुर्दचे सोनारकीबद्दल भांडतात. त्यास पुरातन सोनार मिरासदार कोण म्हणून पुसिले, त्यास लोणीबुद्रुक एक गांव होता तेंव्हा लक्ष्मण सोनाराचा वडील सोनारकी करीत होता. त्याजवर लोणीबुद्रुक येथील मोजे तुटोन	तकरीर कर्दे बेशमी रघोजी वल्लद राणोजी पाटील व गोंदजी वल्लद रघोजी पाटील अहीर, सटवोजी पाटील वल्लद विठोजी पाटील घोगरे मौजे लोणीखुर्द परगणे संगमनेर सन ११६६ कारणे तकरीर लिहून दिली ऐसीजे. लक्ष्मण सोनार लोणीखुर्दचे सोनारकीब÷ल भांडतात. त्यास मिरासदार पुरातन सोनार कोण याची हकीकत कशी आहे, ते सांगणे म्हणून पुरसीस केली. त्यास लोणीबुद्रुक पैकी लोणी खुर्द नवे गांव जाहले तेंव्हा पाथरकर सोनार याने लोणीखुर्दची सोनारकी दहावीस वर्षे केली. लक्ष्मण सोनाराचा वडील लोणीबुद्रुक येथे होता. व तो मेला तेंव्हा त्याचे बायकोने दादीया भेरडपूरचा सोनार केला. तीजबरोबर लक्ष्मण सोनाराचा वडील (आजा)

मौजे लोणीखुर्द व हसनापूर ऐसे तीन गांव जाहले. तेसमयी लक्ष्मण सोनाराचे वडिलांनी तिन्ही गांवची सोनारकीचे वतन कामकाज दहावीस वर्षे केले मग तो मयत जाहला त्याचे बायकोने भेरडपूरचा सोनार भर्तार केला तेंव्हा लक्ष्मण सोनाराचा आजा लहान होता तो पाटाखाली गेला. भेरडपुरास गेली मग मागे दोन्ही गांवची सोनारकी पाथरचा सोनार करीत होता. त्याजवर लोणीखुर्दकरांनी दुसरा सोनार चार गाहून आला होता, तो दोन वर्षे गांवात ठेऊन त्याचे होते सोनारकीचे कामकाज घेतले. मग शिदू सोनार वाडेगव्हाण येथील पळोन इकडे आला तेंव्हा लोणीखुर्दकरांस भेठोन तेथेच राहिला. तो शिदू सोनार आपण पाहिला होता. त्याचा पुत्र मल्हारी सोनार त्याचा पुत्र सदाशिव सोनार त्याजवर आपले सोनार मोठाले वडील सोनार घेऊन भेरडपुरीहून	होता तो पोटाखाली गेला. याजकरिंता पाथरकर सोनाराने लोणीखुर्दचे कामकाज केले, मग चारणकर सोनार आला. त्यानेही दोन तीन वर्षे आपले गांवची सोनारकी केली, याजवर वाडेगव्हाणाहून शिदू सोनार आला. लोणीखुर्द येथे राहिला. शिदू सोनाराचा पुत्र मल्हारी सोनार त्याचा पुत्र सदाशिव सोनार यांस म्हटले की, आमच्या वडिलाचे हातचे काही लिहिले असेल ते काढणे. त्याने त्याचा जबाब केला की, पुरातन मिरासदार सोनार तगादा करतो, त्यास सोनारकी देणे ऐसे दोन वर्षे सांगतो. त्यास सदाशिव सोनाराने आपली मुले माणसे वाडेगव्हाणी नेली, आणि वाद सांगत फिरतो, त्यास लक्ष्मण सोनार पुरातन मिरासदार खरा, सदाशिव नवा उपरी खरा. हे खरे करुन देऊ. हे तकरीर सही. तकरीर कर्दे बेशमी साकरोजी वल्लद मल्हारजी घोगरे पाटील मौजे लोणीखुर्द पारगणे संगमनेर सन ११६६ कारणे लिहून दिले ऐसीजे. साहेबी रुबरु बोलोवून पुरसीस केला की, लक्ष्मण सोनार व सदाशिव सोनार लोणीखुर्दचे सोनारकीबद्दल भांडतात याची हकीकत कशी आहे ती सांगणे म्हणून पुशिले, त्यास लक्ष्मण सोनाराचा वडील एका गांवचे तीन

लोणीबुद्रुक येथे आले, तो पाथरकर सोनार सोनारकीचे कामकाज करीत होता. मग पाथरकर आपले गांवास गेला. लोणीबुद्रुक येथील सोनारकी लक्ष्मणाचा बाप विसाजी सोनार व चुलता मोरशेट सोनार करु लागले. लोणीखुर्द येथील सोनारकीबद्दल खटपट करीत होता. परंतु गांवकरी यांनी दिले नाही. त्यास विसाजीचा पुत्र लक्ष्मण सोनार व मोरशेटीचा नातू रघू सोनार हे लक्ष्मण व रोघो सोनार आपले पुरातन मिरासदार वतनी खरे हे तकरीर लिहीली सही.

तकरीर कर्दे बेशमी सदोजी वल्लद बाजी पाटील व दावलजी वल्लद मलीकजी पाटील मौजे हसनापूर परगणे संगमनेर सन ११६६ साहेबांचे सेवेसी तकरीर लेहून दिली ऐसेजे साहेबी रुबरु बोलावून पुरसीस केली की, गांव जाहले तेंव्हा लोणी खुर्दच्या कामास न ये, मग पाथरच्या सोनाराने सोनारकी दहापांच वर्षे चालविली त्यामागे चारणांतील सोनार आला. त्याने दोन तीन वर्षे सोनारकी केली, त्यावर सदाशिव सोनाराचा आजा शिदू सोनार वाडेगव्हाणीहून आला. त्यास गांवकरी समस्तांनी गांवाचे कामास ठेविला. तो सोनारकी करु लागला. बलुते खाऊन चाकरी केली. त्यावर आपला चुलता कानोजी घोगरा याने आपले घर व दळे व घरठाण शिदू सोनारास विकिला किंमत रुपये किती हे ठाऊके नाही. सोनाराने राहून दरवाजा लाविला. मग पेटियाहून स्वारी आली. त्यांनी बांध धरुन गेले त्याची खंडणी करुन पट्टी गांवांत करुन रुपये घेतले, किती हे आपणांस ठाऊक नाही. त्याजबःल सोनारापासून रुपये घेतले. त्याजवर कुराडा हाकीम संगमनेरांत होता. त्याने खंडणी भारी केली तेंव्हा गांवकरी यांनी हसनापूर पाटिलास जामीन देऊन गांवास आले, आपण पळोन गेलो , गांव बेचिराख जाहला, मग हसनापूरकरांनी कोन्होरचे गाडेभाडे गांवातील घरे साईली होती ती उकलून अमदानगरी विकावयासी नेली तेंव्हा सोनाराची पडसाळही नेली. त्याजवर आपाजी देशपांडे व

लक्ष्मण सोनार व सदाशिव सोनार हे लोणी खुर्दचे सोनारकीब÷ल भांडतात. तर यांची हकीगत अशी आहे ते सांगणे. त्यास लक्ष्मण सोनार आपला पुरातन मिरासदार वतन भाऊ खरा आहे. सदाशिव सोनार लोणी खुर्दच्या पाटलांनी नवा केला, तो कसा केला आपणास ठाऊक नाही. लक्ष्मण सोनाराचा वडील एका गांवचे तीन गांव जाहले तेव्हा पोटाखाली भेरडपुरास गेला. तेथून विसाजी सोनार व मोरशेट सोनार लोणीबुद्रुक येथे आले मग आपणांस भेटले आमच्या वडिलांनी सांगितले की, हे मिरासदार वतन भाऊ खरे म्हणून आमचे गांवचेही सोनारकीचे कामकाज करावयासी लागले. सदरहू लक्ष्मण सोनार पुरातन मिरासदार खरा. हे शाबूत करुन देऊ. न देऊ तरी दिवाणाचे गुन्हेगार.	तुकोपंत टेकाडे देशमुख यांचा वकील यांनी गांव इजारा केला. जमाबंदी भारी केली, त्याजमुळे गांवास तोटा आला. तेव्हा गांवांत बंदीखान कौलाजी अहिराच्या वाडयांत केले,मग तमाम लोकांस मार दिले आणि घरास खाणत्या लाविल्या परिटाच्या घरांत खाणतां रुपयाचा गोलया लागला. ते रुपये ५०० पांचशे होते ते हकीमानी घेतले. वरकडांनीही रुपये दिले त्यासमयी सोनारापासून रुपये वीस घेतले. त्याजवर गांवची बाकी रुपये तीनशे राहिले होते तेंव्हा सोनारापासून रुपये ५० पन्नास घेतले त्याजवर मखमाल आल्यावर फिर्याद गांवचा पाटील गेला. तो घरुन आणून किल्ले शिवनेरीवर बंदीस दिला. तेथे नागवण पडली, त्याची पटी गांवांत करुन त्याची उंबरपटी उंबरे तीन दर उंब-यास रुपये १२ बारा प्रमाणे रुपये ३६ छत्तीस सोनारापासून घेतले. हे खरे करुन देऊ, न देऊ तर दिवाणचे गुन्हेगांर व गोताचे खोटे. सदरहू लक्ष्मण सोनार मिरासदार पुरातन वतनी खरा व सदाशिव सोनार नवा उपरी खरा, सदाशिव सोनारास गांवमिरास करुन दिल्हा हे आपणांस ठाऊक नाही. हे तकरीर लेहून दिली सही.

येणेप्रमाणे पाटलांनी तकरीरा लेहून दिल्या, त्याजवर बलुत्यास व कुलकर्णी यांस पुरसीस केली त्यांची नांवे बितपशील.

१ कुलकर्णी तुको गोविंद आंबादास	१ येसू परीट वल्लद अंताजी
१ गोविंद केशवभट व जनार्दन केशवभट	१ सटवा लोहार वल्लद जिवा.
१ लालशेट वाणी व कुसाजी वाणी	१ जावजी कुंभार वल्लद राणू.
१ नागोजी व देवजी म्हसके	१ म्हाळोजी वल्लद त्रिंबकजी अहिर चौगुजले व नागू वल्लद कान्होजी.
१ विश्वनाथ भगवंत	१ रामा माहार वल्लद लक्षू व विठा माहार मौजे लोणीखुर्द व बुद्रुक हसनापूर
५	५

सदरहू दहाजणांनी तकरीर लेहून दिली ऐसीजे साहेबी रुबरु पुरसीस केली की, लक्ष्मण सोनार व सदाशिव सोनार लोणीखुर्दच्या सोनारकीब÷ल भांडतात, त्यास मिरासदार कोण हे सांगणे. त्यास लक्ष्मण सोनाराची हकीकत लोणीबुद्रुक एक जागा होत, तेंव्हा पासून पुरातन मिरासदार खरा, त्याजवर लोणीखुर्द मोजा तुटल्यावर लक्ष्मणाचा वडील मृत्यू पावला, त्याचे पोटी पुत्र एक लहान होता. मग त्याचे बायकोने भेरडपुरच्या सोनाराशी घरोबा केला तिच्या पोटाखाली लक्ष्मण सोनाराचा वडील भेरडपुरास गेला, त्याजमागे लोणी खुर्द सोनारकीचे काम पाथरकराने सोनारकी काम दहावीस वर्षे चालविले, त्याजवर शिदू सोनार वाडेगव्हाणीहून लोणीखूर्द येथे येऊन राहिला, तो सोनारकीचे काजकाम गांवचे करु लागला. बलुते खाऊ लागला. त्याचा पुत्र मल्हारी त्याचा लेख सदाशिव सोनार याप्रमाणे नवा उपरी येऊन राहिला.

त्यास मिरासीचा कागदपत्र करुन दिला नाही आणि लक्ष्मण सोनार पुरातन मिरासदार वतनी खरा हे तकरीर लेहून दिली सही.

सदरहूप्रमाणे तकरीरा सर्वांनी लिहून निरनिराळ्या दिधल्या. तिन्ही पांढरीयाच्या मुखे पुरातन मिरासदार तुम्ही व तुमचे वतन शाबूत जाहले. ज्याप्रमाणे लोणीबुद्रुक व हसनापुरचे वतन खात आला त्याप्रमाणे लोणीखुर्दचे वतन तुम्ही खाणे. आपण तकरीर दिली होती की पांढरीच्या मुखे आपले वतन लोणी खुर्दचे खरे करुन देऊ, त्यास आपण पांढरीच्या मुखे खोटे जाहलो आपण व आपले भाऊबंद अगर आपले वंशीचा कोणी लोणीखुर्दच्या सोनारकीबद्दल दावा करतील तर बातल असे, आपणास वतनासी संबंध नाही, तुम्ही तिन्ही गांवचे वतन खाणे याउपर नौदिगर करुन वतनाचा दावा करु तर हकमाचे गुन्हेगार व गोताचे खोटे. सदाशिव वल्लद इबन सिदूजी सोनार वर लिहिले सही.

निशाणी हातोडा +

गोही.

दावलजीराव देशमुख व मोकदम माने कसबे मजकूर.	भिकाजी देशमुख परगणे सिन्नर व मोकदम परगणे मजकूर.
दत्ताजी यशवंत देशपांडे व कुलकणी कसबे सिन्नर परगणे मजकुर.	वेंकाजी विश्वनाथ देशपांडे व कुलकर्णी परगणे सिन्नर.
कुष्णाजी वल्लद जिवाजी पाटील व महादजी वल्लद नागोजी पाटील उगले मोकदम व रोघो कुलकर्णी मौजे पिंपरी परगणे शिन्नर.	आबाजी अनाजी देशपांडे व कुलकर्णी परगणे सिन्नर.
इरजी वल्लद केरोजी पाटील व सटवाजी पाटील मौजे विहीरगोली परगणे शिन्नर.	खंडोजी वल्लद दावजी पाटील सोनवणी मौजे मनेगाडी सिन्नर.
	कान्होजी वल्लद तुकोजी पाटील खोडके, बचाजी वल्लद चापाजी पाटील

मुकुंद भास्कर देशपांडे व कुलकर्णी परगणे शिन्नर.	खोडके मौजे जांबगांव परगणे शिन्नर. भागोजी वल्लद मोत्याजी पाटील अलवड सदू वल्लद यमाजी पाटील अलवड मौजे पाष्टे परगणे सिन्नर.

येणेप्रमाणे यजितखताचा मजमून आहे तो मनास आणिता मौजे लोणीखुर्द येथील सोनारकीचे वतन तुझे खरी आहे. सदाशिव मजकूर खोटा हे जाणून तुजवर कुपाळू होऊन निवाडपत्र करुन दिले असे. तर देहायचे वतन आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभवून गांवचे बलुते खाऊन सुखरुप राहणे म्हणोन निवाडपत्र १.[३५]

६.१०

पौ छ २७ जमा दिलावल

२४/०८/१७७२

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी,

विनंती सेवक महादजी नारायण साा नमस्कार विज्ञापना. ताा घ २४ जमा दिलावल पावे (तो) स्वामीचे कृपावलोकनेकरुन सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर हुजूरचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा की, नरहरि रनाळेकर याजला येवनानी पानपथातून धरुन नेऊन भ्रष्ट केले. तो दहाबारा वर्षे त्यांतच राहून येवनमय जाहला असतां त्याजला पैठणास काही ब्राम्हणानी शुध केला. येविसाचा कजिया हुजूर पडला होता तेंव्हा वैदिक व पंडित यांची सभा दहाबारा वर्षे येवनमय जाला त्याजला शुध्ध करावयाची अर्हता नाही, शुध्द केला हे अयोग्य, याप्रमाणे ठराव होऊन ज्यानी शुध केले त्या ब्राम्हणास बहिष्कार पडला होता. त्यापैकी बहुतेकांनी प्रायश्चित्त घेउन सुध जाले. बाकी चालीस पनास आसामी अत्याग्रहे प्रायश्चित न घेत यामुळे बहिष्कृत राहिले होते ते हली पैठणी मोगलाकडील

कमाविसदाराची हिमायत करुन जबदरस्तीने आपली व शुध ब्राम्हणाची पंक्ति करुन येकाकार केला आहे म्हणोन हुजूर विदित जाहाले त्यावरुन हे पत्र सादर केले असे. तरी पैठणकर ब्राम्हण असल्यास त्याजला ताा अमदानगर येथे पंक्तीस न घ्यावे याप्रमाणे सर्व ब्राम्हणाचे घरी ताकीद करणे म्हणोन आज्ञा. त्यास हुजूरचे आज्ञेप्रमाणे तालुके मजकुरी सर्व ब्राम्हणांस पैठणकर ब्राम्ह पंक्तीस न घेणे म्हणोन ताकीद केली. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

६.११ न्यायरचना :-

पेशव्याकडे सर्वोच्च न्यायालयीन अधिकार होते. तथापी न्यायाधीश हाच राज्याचा प्रमुख न्यायदंडाधिकारी होता. त्याच्याकडे दिवाणी आणि फौजदारी या दोन्ही प्रकारच्या खटल्यांचा न्यायनिवाडा करण्याचा अधिकार असे. ज्यांना मुतालिकी शिक्का मिळलेला होता अशा सुभेदारांना प्राथमिक सुनावणीचा अधिकार होता. तो नगरच्या पेशवाई काळात शिंदे, निंबाळकर, नारो बाबजी नगरकर, भोसल्यांना मिळाल्याचे दिसते. सुभेदार जरी वेगवेगळया सुभ्यावर असली तरी मुख्य न्याय प्रसंगी ते नगरच्या किल्ल्यात उपस्थित राहत. किरकोळ खटल्यांचा न्यायनिवाडा मुत्सद्दी अधिकारी करीत. परगणे कार्यात आणि खेडयांत गरजेप्रमाणे न्यायालये बोलाविण्यात येत. परंतू महत्वाचे अभियोग सामान्यत: मुख्य ठिकाणीच होत. पेशवेकालिन अहमदनगरचा मुख्य न्यायाधिश म्हणून नाना फडणविसांचा उल्लेख अनेक पत्रांमधून समोर येतो.

६.१२ न्यायदानाची प्रक्रिया :-

न्यायालयाला "मजलिस" म्हणत. वादीने खटला भरल्यानंतर त्याच्या अभियोगाच्या तपासणीसाठी मजलिसला बोलाविण्यात येई. मजलिसच्या अध्यक्षाला सभानायक म्हणत. परगण्याच्या मजलिसमध्ये देशमुख हा अध्यक्ष असे. जामखेड तालुक्यातील डोणगाव येथील यादव [देशमुख] यांच्या कडील मोडी पत्र व्यवहारात न्यायदानाचा उल्लेख आढळतो. तर खेडयातील मजलिसमध्ये मोकादम, कसब्याच्या मजलिसमध्ये शेटे आणि ब्रम्हसभेमध्ये धर्माधिकारी हे अध्यक्ष असत.

एखाद्या अभियोगाचा न्यायनिवाडा करण्याकरिता न्यायालय एकत्र आल्यानंतर अग्रवादी पहिल्याने आपली बाजू मांडून त्याबद्यलचे एक लेखी निवेदन देई. हयाला तकरीर म्हणत. मग पश्चिमवादीला बोलाविण्यात येई. तो पण आपली स्वत:ची बाजू मांडून एक तकरीर न्यायालयाला सादर करी. दोघांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर दोन्ही पक्षकारांना एकमेकांच्या निवेदनाला उत्तर देण्यास सांगण्यात येत असे. अग्रवादीचे उत्तर आणि पश्चिमवादीचे उत्तर दोन्हीना पुरसीस म्हणत. त्यानंतर न्यायालयाचे सर्व सभासद दोन्ही पक्षांनी हजर केलेल्या पुराव्याचे निरीक्षण करुन त्यांच्या अभियोगाबद्यल निर्णय घेत. हा निर्णय एका महजर च्या स्वरुपात देण्यात येऊन त्यावर मजलिसच्या सभासदांची नावे व हुद्दे लिहिण्यात येत.

मजलिसने दिलेल्या निर्णयाने किंवा तेथील कामकाजाने पक्षकारांचे समाधान झाले नाही तर वरच्या न्यायालयात दाद मागण्याचा त्यांना हक्क होता. ज्या गावातून पहिल्याने खटला भरला जाई आणि इतर ज्या गावात मजलिस असत त्याना नुसते थल म्हणत. थलाच्या मजलिसने दिलेल्या निर्णयाला थलपत्र म्हणत. हे थलपत्र मायथलच्या मजलिसला सादर केल्यानंतर ते महजरच्या स्वरुपात तोच निर्णय देत असे. इ.स. १७५० नंतर मजलिसने न्यायनिवाडा करण्याच्या पध्दतीऐवजी पंचायती न्यायनिवाडा पध्दत हळूहळू रुढ होऊ लागली. किरकोळ फेरफार वगळता पंचायतीतील न्यायादानाची प्रक्रिया मजलिसमधील न्यायदानाच्या प्रक्रियेसारखीच होती. मुख्य म्हणजे न्यायालयीन पारिभाषिक शब्दात बदल घडून आला. पंचायतीने दिलेल्या निर्णयाला सारांश आणि शेवटी विजयी पक्षाला देण्यात येणा-या निर्णयपत्राला निवाडपत्र म्हणण्यात येऊ लागले. असे निवाडपत्रे नगरमधील कडेकर देशमुख, मिरीकर, पळशीचे पळशीकर घराण्याकडे आजही चांगल्या स्थितीत आहेत. मुख्य न्यायधीशाच्या मदतीस अमीन आणि काही दप्तरदार किंवा कारकून असत.[३६]

अहमदनगर मधील न्यायपध्दत ही फार गुंतागुंतीची व दीर्घसूत्री दिसते. कारण या ठिकाणी मुस्लिम समूदाय मोठया प्रमाणात होता. त्यामूळे इस्लामच्या कायद्यानुसार बरीच रचना अहमदनगरमध्ये आढळते. इनाम जमिनीचा वारसा, सीमाप्रश्न, देशपांडे व देशमुखी

वतन या संबंधीचा न्यायनिवाडा वेळेवर होत नसे. प्रकरणांचा निकाल क्वचितच दोन वर्षात लागत असे. नाहीतर पक्षकारांना आपले अभियोग एका न्यायालयातून दुस-या न्यायालयात नेता नेता बराच काळ थांबावे लागे. नाना फडणीसाच्या काळात या प्रकरणांचा निकाल साधारणपणे पाच वर्षात लागल्याचा उल्लेख आढळतो.

६.१३ पेशवेकालीन न्यायव्यवस्थेची ठळक वैशिष्टये :-

मराठेकालीन न्यायव्यवस्थेवर डॉ. व्ही.टी.गुणे यांनी The Judical System oF the Marathas हा संशोधनात्मक ग्रंथ लिहिला आहे. तसेच डॉ.एस.एन.सेन यांनी आपले याच विषयावरचे संशोधन Administrative of the Maratha या ग्रंथाव्दारे मांडले आहे. इ.स. १७०७ -१८१८ हा पेशवाईचा कालखंड होय. या कालखंडात छत्रपती व पेशवा ही दोन सत्ताकेंद्रे होती. इ.स.१७०७ ते १७५० पर्यंत सातारचा राजा हा मराठी राज्याचा सार्वभौम सत्ताधीश होता. इ.स. १७५० नंतर मात्र राजा दुबळा होऊन राजाचे महत्व कमी झाले व पेशव्यांचे वाढले. न्यायसंस्थेचे काम करणारी धर्मसभा नामशेष झाली व लष्करी, मुलकी, दिवाणी अधिकार पेशव्याच्या हाती एकवटले होते. पहिल्या तीन पेशव्यांनी त्याऐवजी पंचायत पध्दती आणली.

६.१४ पेशवेकालीन न्यायव्यवस्थेचे घटक:-

पंचायती पध्दती: स्थानिक न्याय प्रशासन चालविण्यासाठी पेशव्यांनी सरसुभेदार, मामलेदार व कामावीसदार हे अधिकारी नेमले होते. या अधिका-यांच्या श्रेयाबद्यल फारशी माहिती मिळत नाही. हे अधिकारी जागच्या जागीच वादी प्रतिवादीचे म्हणणे ऐकून खटल्याचा निकाल देत असत. खटल्याचा निकाल अमान्य असेल तर वरिष्ठाकडे तक्रार करता येत असे. पेशव्यांच्या जुन्या सरदारांच्या नेतृत्वाखाली फडणवीस, पांडे पटेल या अधिका-यांच्या मदतीनेही न्यायदानाचे काम चाले: पण त्यासाठीही पंचायतीचा सल्ला घेतला जात असे. अत्यंत महत्त्वाचा खटला असेल तर तो निर्णयासाठी पेशव्यांकडे पाठविला जात असे. पंचायत न्यायदान करणारी महत्वाची संस्था होती. गावातील प्रतिष्ठित वयोवृध्द त्यात असत.

पंचायतमधील सदस्यांची संख्या निश्चित नसे. पेशवाईत पंचायत पध्दतीचे महत्व खूप वाढले होते. छत्रपती शाहूंच्या व पेशव्यांच्या काळात न्यायसंस्थेचे सरंजामशाहीकरण झाले होते असे म्हणावे लागेल. कारण मराठा मंडळातील सरदार हे आपापल्या प्रदेशात न्यायदान करण्याचे काम करीत असत. इ.स.१७५० नंतर मजलीसचे महत्व कमी झाले. पंचायत ही गावच्या वडाच्या किंवा पिंपळाच्या पारावर भरे. निवाडापत्र देणा-या अधिका-याची सही - शिक्का निवाडापत्रावर असे. निवाडापत्रावर राजाची सही व शिक्काही असे. या निवाडापत्राची स्थानिक अधिकारा-यांमार्फत अंमलबजावणी करण्यात येई. वारंवार सूचना देऊनही जर एखादा पक्षकार गैरहजर राहिला तर त्याच्या गैरहजेरीत निर्णय दिला जात असे. वरील निर्णय पेशवे कालिन अहमदनगर मध्ये दिवाण पळशीकरांच्या मोडी संग्रहात अधिक प्रमाणात अढळतात.

६.१५ गोतसभा :

शाहूच्या काळात गोतसभेला महत्व होते: पण १७५० नंतर गोतसभेचे महत्व कमी झाले. गोतसभेचे काम पंचायत करु लागली. गोतसभेचे ३ प्रकार होते.

१ परगाणा गोतसभा

२ कसबा [पेठ] गोतसभा

३ खेडेगावची गोतसभा

परगण्यातील एक वजनदार न्यायसंस्था म्हणजे परगणा गोतसभा होय. त्यात देशमुख, देशपांडे,शेटे, महाजन , पाटील , सरकारी अधिकारी , प्रजा यांचा समावेश असे. देशमुख हे परगणा गोतसभेचे प्रमुख होते. देशपांडे हा देशमुखाला साहाय्य करी. काही वेळा दिवाण हा परगणा गोतसभेत निकाल देण्याचे काम करी. अशीच यंत्रणा कसबा [पेठ] गोतसभेसाठी होती. पेठ गोतसभेचा दिवाण न्यायदानाचे काम पाही. या गोतसभेचे सर्व सदस्य निकाल पत्रावर आपापल्या खुणा करीत असत.

खेडेगावच्या गोतसभेत सर्व वतनदार, १२ बलुतेदार,अलुतेदार, उपरे असत. गाव गोतसभेचा प्रमुख पाटील होता व त्याच्या मदतीला कुलकर्णी व चौगुले असत. ग्राम

गोतसभेतील सर्व सभासद एकत्र बसून न्यायदानाचे काम करीत. गोतसभेचा निर्णय राजाही बदलू शकत नसे. न्यायनिवाडा पत्रावर गावातला बलुतेदार आपापल्या खुणा-चिन्हे उटवीत.

गोतसभेपुढे वतन व वारसा हक्काविषयक तंटे , गावाच्या सीमेसंबंधीचे तंटे, विवाहविषयक वेतन हक्कासंबंधीचे तंटे येत. धार्मिक स्वरुपाचेही तंटे येत. गोतसभेची बैठक खेडयातील देवळात, वृक्षाखाली, धर्मक्षेत्राच्या संगमावर, नदीच्या काठावर भरे. दोन व्यक्तीमध्ये तंटा निर्माण झाला की, त्याची तक्रार केली जात असे. तंटा समोपचाराने मिटवण्याचा प्रयत्न होई. पण त्यात अपयश आले की, गोतसभेकडे तक्रार करताना कागदोपत्री व तोंडी पुरावे द्यावे लागत. पुरावे व साक्षी तपासल्या जात असत. दत्तक विधानासंबंधी गोतसभेचे अधिकार अंतिम होते.

गोतसभा ही लोकाभिमुख संस्था होती. तिचा -हास पंचायत पध्दतीमुळे झाला.

६.१६ ब्रम्हसभा :

ब्रम्हसभा म्हणजे विव्दान ब्राम्हणांची सभा होय. या सभा चांभारगोंदे, नेवासे, पळसी, इ.ठिकाणी होत्या. या सभेत फक्त स्थानिक वैदिक, पंडीत , ज्योतिषी, पुराणिक , मीमांसक असत. त्यांच्या नेमणुका सरकार करी. ब्रम्हसभेचे सभासद धर्मशास्त्राचे उत्तम जाणकार होते. भारतीय कायदा त्यांना माहिती होता. ब्रम्हसभा ही न्यायदानाचे काम करी. तिच्या प्रमुखाला धर्माधिकारी असत. ब्राम्हणसभेचा निर्णय अमान्य केल्यास त्याचे वतन नष्ट होई.

६.१७ जातसभा:-

जातसभेत त्या त्या जातीतील काहीशी पुढारलेली माणसे असत. जातीची बंधने व्यसस्थित पाळली जातात की नाही हे पाहणे जातसभेचे काम होते. जातीसभेचा निकाल अमान्य असेल तर ब्रम्हसभेकडे प्रकरण पाठविले जाई. पण तेथील निकाल मात्र बंधनकारक होता.

६.१८ मजलिस :-

ही प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज ते छत्रपती शाहूच्या काळात काम करत होती. राजाला न्यायविषयक कार्यात सल्ला देणारी, मदत करणारी अशी ती एक राजाश्रित संस्था होती. तीच पध्दती थोडया फार फरकाने पेशवे काळात रुढ झाल्याची दिसते. त्यात विव्दान , रुढी परंपरा व धार्मिक नीतिनियम जाणणा-या समाजातील प्रमुख लोकांचा समावेश होता.

६.१९ पेशवेकालीन दिव्य पध्दत :-

पंचायत पध्दतीच्या न्यायव्यवस्थेत साक्षी, पुरावा व दिव्य या गोष्टीना महत्व होते. पंचायत पध्दतीत कागदपत्रांचा पुरावा म्हणून उपयोग होई. न्यायनिवाडा करणारे अधिकारी ही कागदपत्रे अस्सल आहेत का हे बारकाईने पाहत असत. ज्या प्रकरणात कागदोपत्री पुरावा नाही तेथे साक्ष महत्त्वाची मानली जाई. साक्षीदार हे गावातील प्रतिष्ठित, गावच्या परंपरा व इतिहास जाणणारे तसेच वतनदार, बलुतेदार असत. पेशवेकाळात साक्षी पुराव्याच्या जोडीलाच दिव्य करण्याची पध्दत वापरली जाई. दिव्याचे पुढील प्रकार होते.

१. **विषदिव्य**
२. **अग्निदिव्य - तप्त लोखंडाचा दिवा हातात घेऊन मंदिरा भोवती ७ प्रदक्षिणा घालणे.**
३. **ऐरणी दिव्य - हे दिव्य गावाच्या तंटयात वापरत.**
४. **कोष दिव्य.**
५. **खा दिव्य - एखाद्या भांडयात तेल व तूप याचे मिश्रण करुन उकळणे.**

गुन्हेगाराने त्यातील लोखंडयाचा तुकडा हाताने काढणे. गुन्हेगार जर निर्दोष असेल तर त्याच्या हातावर जखम होत नाही. तो निर्दोष आहे असे समजले जाई. वरील दिव्याशिवाय इतरही दिव्ये होती.

६.२० वातीची क्रिया :- श्रावणतील १५ दिवसांत ज्योतीने ज्योत पाजळली जात असे. ज्याची ज्योत विझेल तो गुन्हेगार ठरविला जाई.

६.२१ सत्य व बेल भंडार :- हिंदू धर्मात बेल व भंडारा हा पवित्र मानला जाई. गुन्हेगाराने बेल व भंडारा उचलला व त्यास १५ दिवसांत काही दगाफटका बसला नाही तर ती व्यक्ती निर्दोष समजली जाई.

६.२२ शपथ :- गुन्हयाची सत्य असत्यता शोधण्याची ही एक पध्दत होती. तुळशीचे पान हातात घेऊन शपथ, गाईला हात लावून शपथ, कुराणावर हात ठेवून शपथ , ज्ञानेश्वरी, गीता या ग्रंथांवर हात ठेवून शपथ घेणे. काही वेळेस महाराष्ट्र धर्म या शब्दाचीही शपथ दिली जाई.

दिव्य हे सरकारी अधिका-याच्या उपस्थितीत त्याच्या साक्षीनेच झाले पाहिजे असा दंडक होता.

६.२३ पेशवेकालीन नगर मधील गुन्हे व शिक्षा यांचे स्वरूप :-

दोन गावच्या सरहद्दीबद्दल जर तंटा निर्माण झाला तर गावच्या पाटलामार्फत हा तंटा सोडविला जाई. सरहद्द तंटयातही पंचायतीचा आधार घेत असत. पेशवेकाळात राजदंड देण्याचे काम स्वत: पेशवे व त्यांचे सरदार करत. सरन्यायाधीश हा पेशव्यानंतरचा सर्व दिवाणी व फौजदारी खटले चालविणारा अधिकारी मानला जात असे. स्थानिक न्यायदान पध्दतीत सरसुभेदार,सुभेदार,कमावीसदार व पाटील यांचा समावेश होत असे. स्मृतिग्रंथ व हिंदूंचे कायदाविषयक ग्रंथ हे न्यायदानाचे आधार मानले जात.

एखाद्या गुन्हेगाराने आपणास गुन्हा केल्याचा पश्चात्ताप होतो अशी कबुली दिल्यास त्यास माफ करण्याची पध्दत होती. अर्थात हे गुन्हयाच्या स्वरुपावर ठरे. सक्तीच्या इस्लामधर्म

प्रवेशानंतर संबंधित व्यक्तीला पुन्हा हिंदू धर्मात यावयाचे असेल तर त्याला परत हिंदू धर्मात प्रवेश दिला जाई.

मालमत्ता, वारसाहक्क, दत्तकविधान, आर्थिक व्यवहारासंबंधीचे वाद हे सर्व दिवाणी स्वरुपाचे गुन्हे होते. सर्वसाधारणपणे समाजाने नीतीनियमांचे पालन करावे ही एकूण अपेक्षा असे. वडिलोपार्जित मालमत्तेत सर्व मुलांना समान वाटा मिळे. पण स्वकष्टार्जित या पध्दतीतून झालेल्या संततीस मालमत्तेचा हक्क मिळत नसे. दत्तक विधानास प्रथम गोतसभेची व सरकारची मंजुरी आवश्यक असे. नंतरच दत्तकविधानांची सनद मिळे. राजद्रोह , खून, चो-या दरोडे, फसवणूक, बदकर्म, जबरीचे लग्न , भूमिगत द्रव्ये मिळणे, चोरीच्या मालाची खरेदी इ. फौजदारी स्वरुपाचे गुन्हे समजले जात.

फौजदारी गुन्हा सिध्द झाल्यानंतर त्याला फाशीची शिक्षा दिली जात नसे. पण हात्तीच्या पायाखाली देणे, मुंडके छाटणे, तोफेच्या तोंडी देणे या शिक्षा दिल्या जात. गुन्हेगाराचे पाय तोडण्याचीही शिक्षा दिली जाई.[३७]

६.२४ न्यायदानाबाबत एलफिन्स्टन म्हणतो:-

मराठयांची न्याय प्रशासन पध्दती ही अतिशय अपरिपूर्ण होती. दैनंदिन न्याय प्रशासन असे नव्हतेच. फिर्याद दाखल करुन घेण्याची अशी व्यवस्थाच नव्हती आणि ती दाखल करुन घेतल्यानंतर त्याच्या कार्यवाही विषयी निश्चित नियम नव्हते. ज्या सरकारी अधिका-याकडे ती तक्रार दिली असेल ती स्वीकारण्याचे अथवा त्याकडे दुर्लक्ष करण्याचे सर्वस्वी त्याच्या मर्जीवर अवलंबून होते.

पेशवे दरवर्षी राज्यात दौरे काढत व फिर्यादी नोंदवून घेत. बाळाजी बाजीराव, दुसरा बाजीराव यांनी दौरे काढल्याची नोंद आहे.

पेशवे काळात ग्रंथनिविष्ठ कायदा नव्हता. न्यायालयीन कायदापध्दतीचे निश्चित स्वरुप नव्हते. प्राचीन हिंदू धर्मशास्त्र कायदेपंडितात एकवाक्यता नव्हती. शाहू छत्रपती व बाळाजी बाजीराव यांच्या काळात फाशीची शिक्षा नसावी. खून व फितुरीचा दंड म्हणून मालमत्तेवर जप्ती व तुरुंगवास या शिक्षा होत्या. दंड हा उपजीविकेपेक्षा जास्त असू नये याची

काळजी घेतली जाई. एवढेच नव्हे तर दंडाची रक्कम हप्ता पध्दतीने भरण्याची परवानगी होती. एखाद्या माणसावर करणी किंवा चेटूक करुन दुस-याला इजा केल्यास साधारणपणे दंड होत असे. करणी व भूतबाधा याचा तपास करण्यासाठी १७७४-७५ मध्ये दोन अधिका-यांची नियुक्ती केल्याचे उल्लेख आहेत.

व्याभिचार करणा-या स्त्रीची भावी सदवर्तनाची हमी तिच्या कोणी जवळच्या नातेवाइकाने घेतली तर तिची सुटका होई.

दुस-या बाजीरावाने ब्राम्हणांनी कन्याविक्रय करु नये, ९ वर्षांच्या आत मुलीचे लग्न करावे असे आदेश काढले होते. हा नियम तोडणे गुन्हा समजले जाई. सक्तीने लावलेले लग्न बेकायदेशीर ठरविले जाई.

पेशवेकाळत तुरुंगाची अशी व्यवस्थाच [जागा] नव्हती. किल्ल्यातील काही खोल्यांचा वापर त्यासाठी केला जाई. नाना फडणवीस नगरच्या किल्ल्यात कैदेत असल्याबाबतचा उल्लेख आढळतो. तुरंगातील कैद्यांचा दर्जा लक्षात घेऊन जेवणाच्या थाळीचे स्वरुप ठरत असे. कैद्यांच्या आरोग्याचाही विचार केला जाई. कैद्यांची प्रकृती बरी नसल्यास त्याची काळजी घेण्यासाठी त्याची बायको किंवा नातेवाईकास तरुंगात राहण्याची परवानगी होती. कैद्यांना आईवडिलांचे श्राध्द, उपवर मुलींची लग्ने, मुलांच्या मुंजी इ. कार्यासाठी घरी जाण्यास परवानगी होती. कैदी तुरुंगात असताना बायको मृत्यू पावली तरी अंत्यविधीसाठी परवानगी दिली जाई. कैद्यांना झालेल्या शिक्षेत सूट मागण्याचा कोणताही हक्क नव्हता. त्यांना पूर्णपणे तेथील अधिका-यांच्याच मर्जीवर अवलंबून राहावे लागे.

७. गुलाम

पत्र क्र. १ पेशवेकालीन अहमदनगर मध्ये मोडी कागदपत्रांच्या नोंदीवरुन काही गुलाम प्रथेबाबत नोंदी आढळल्या आहेत त्या पेशवेकालीन सामाजिक जीवनावर प्रकाश टाकण्याचे काम करतात. नारो बाबजी नगरकर यांच्या मोडी पत्रातील उल्लेख आहे. अहमदनगरच्या किल्ल्यातील पिराणी कुणबीन सरकारची शहरास पळोण गेली आहे. ती परशराम महादेव यांना सापडली आहे. तीला पुन्हा सन्मानाने वाट खर्च देऊन आपल्याकडे पाठवली आहे. [३८]

पत्र क्र. २ पेशव्यांनी कृष्णाजी विश्वनाथ यांना सन १७६०-६१ च्या दरम्यान पत्र पाठवले आणि त्या पत्रात ते नमुद करतात. सरकारांत कुणबीणीचें प्रयोजन आहे, पाय उतारास धावण्यास योग्य, काळया, उंच, बळकट सडसडीत या खरेदी करुन दहा आणून ठेवणे. आणि श्रीमंतांची स्वारी आल्यावर त्यांना देशी पाठऊन देणे. [३९]

पत्र क्र. ३ शिवाजी पंताजी कमाविसदार मामले कोहज यांसी सनद की दुबली कुणबीण हुजरुन पाठविली आहे तरी कोहजचे किल्ल्यावर ठेऊन दारु वाढवयास लावणे. पोटास दररोज नागली केली.। एक शेर देविल्या असेत. किल्लेमजकूरचे कोठीपैकी देत जाणे म्हणोन पेशव्यांनी सनद पाठवली आहे.[४०]

थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी मध्ये गुलामांचे उल्लेख पुढील प्रमाणे आलेले आहेत.

पत्र क्र.४ बंदी कुणबीण सरकारची हिने अर्ज केला की. आपण सरकारीची कुणबीण आहोत . मला मुक्तता पाहिजे, पेशव्यांनी तिच्या अर्जावरुन तिला सोडून दिले. आणि सांगितले कोणाविषयी राग मनात धरु नकोस, तुला जेथे राहायचे असेल तेथे रहा. म्हणून सोडचिठ्ठी दिली आहे. [४१]

पेशवेकाळात गुलाम हे जास्तीत जास्त समुद्रमार्गे प्रांतात आल्याचे उल्लेख सापडतात. काही गुलाम कल्याण, पेण, वाजें, पंचमाहाल या ठिकाणी मिठागारावर कामास असल्याचे उल्लेख सापडतात. एकंदर गुलाम प्रथा पेशवेकाळातही मोठया प्रमाणावर होती हे यावरुन स्पष्ट होते.

८. पेशवेकालीन अहमदनगरचा पाणीपुरवठा

अहमदनगर शहर हे इ.स. १४९० साली अहमदशहा बादशहाने वसविले होते. साहजिकच येथे सर्व प्रकारच्या सोई सोवीधा होत्या त्यात शहराला जो पाणीपुरवठा केला जायचा तो खापरी नळ योजनेव्दारे केला जात असे. *त्याबाबतची नोंद वाड डायरी मध्ये नानासाहेब पेशव्यांच्या काळी आलेली आहे. मौजे वडगाव येथून अहमदनगरात नहर बांधोन पाणी नेले म्हणोन अहमदशा पातशाह तक्त निशान अहमदनगर यांनी मेहरबान होऊन*

कारागिरीस पसंत करुन मौजे निंबळक परगणें मजकुर हा गाव वंशपरंपरेने कुलबाब कुलकानु आपल्या वडिलांस इनाम दिल्हा तो पुन्हा तसाच देण्याबाबत वतन पत्र. [४२]

वरील पत्र खापरी नळयोजना अहमदनगरशी आहे. अहमदशहा बादशहाने उत्कृष्ट पाणी योजना केली म्हणून निंबळक गाव ईनाम दिला होता. पेशव्यांनी तो पुन्हा तसाच पुढे सुरु ठेवला.

९. विहिरी व तलाव

नारो त्रिंबक यांस सनद कीं श्री धनवी येथें पाणी नाही. जन यात्रा विशष मिळत्ये. लोक उदकासाठी हैराण होतात. याजकरिता. देवाजवळ विहीर अगर तळें बांधावयाशी आज्ञा केली असे. तरी दोन तीन चार हजार रुपये खर्च होऊन विहीर अगर तळें बांधले असेल तेथें काम लावून तयार करणें. पैका सरकारांतून दिल्हा. जाईल म्हणोन सनद .

देशमूख देशपांडे परगणें कर्डे यांस सनद कीं कसबें कर्डे येथे अगस्ती तीर्थ आहे. त्याची एक भूज ढासळली आहे. तो बांधावयाशी बाबुराव माणकेश्वर सुभेदार यांशी आज्ञा केली असे. तर तुम्ही परगणें मजकुरीं पट्टी करुन रुपये ७०० सातशें सरकारच्या ऐवजा खेरीज मशारनिल्हेकडे देणें म्हणोन पत्र

१०. वैद्यकी व शस्त्रक्रिया बाबत

वेदमूर्ति राजश्री बाळकृष्ण वैद्य बिन चिंतामण वैद्य, गोत्र धारण , शाखा वाजश्री, वास्तव्य अहमदनगर, यांनी हुजूर कसबे पुण्याचे मुक्कामी येऊन विनंती केली की, आपण वैद्यक उपाय कैलासवासी महाराज स्वामी सन्निध बहुत केले, त्यावरुन महाराज कृपाळू होऊन मौजे सुभे खुजस्ते बुनीयाद येथील मुकासबाब देखील बाबती नूतन इनाम देऊन राजपत्रें करुन दिलीं आहेत, तीं मनास आणून त्याप्रमाणे सरकारची इनामपत्रें करुन दिली पाहिजेत म्हणून. त्याजवरुन मनास आणून, तुम्ही थोर सत्पात्र वैद्यकक्रियेमध्यें निपूण, तुमचें चालवणें आवश्यक जाणून तुम्हावर कृपाळू होऊन तुम्हाजवळ राजपत्रें आहेत तीं मनास आणून, तुम्हास मौजे मजकूर येथील मुकासबाबदेखील बाबती कुलबाब हल्ली पट्टी व पेस्तर पट्टी खेरीज हक्कदार व इनामदार करुन राजपत्राप्रमाणें इनाम करार करुन दिला असे. तरी मौजे मजकूर

येथील मुकासबाब देखील बाबती तुम्ही आपले दुमाला करुन घेऊन तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेनें अनुभवून सुखरुप राहणें, म्हणून रसानगी चिट्टी पत्र येविशी,

मोकादम मौजे मजकूर याशीं पत्र

चिटणिशीं पत्रे

१. देशाधिकारी व लेखक वर्तमानभावी यांस परगणे कडेवलीत.

१. जमीनदार तर्फ कडे प्रांत कडेवलीत यांस [४३]

संदर्भ :

१. डॉ. शांता कोठेकर , इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर , तिसरी आवृत्ती - २०११ पृ. २०

२. कित्ता पृ. २२

३. कित्ता पृ. २४

४. चिटणीस कृ.णा., मध्ययुगीन भारतीय संकल्पना आणि संस्था, समाज व संस्कृती भाग २ समर्थ मुद्रणालय नवी मुंबई, तृतीय आवृत्ती,प्रकाशन २००८ पृ. १०५

५. पारसनिस डि. बी. बाळाजी बाजीराव पेशवा खंड २ , गव्हर्रमेंट ऑफ बॉम्बे सन १९०६ पृ. २०३

६. अहमदनगर संग्रहालय कात्रण विभाग, रुमाल नंबर १३

७. कित्ता १४

८. कित्ता १५

९. कित्ता १६

१०. कित्ता १६

११. कित्ता १७

१२. कित्ता १८

१३. अहमदनगर संग्रहालय पेपर कात्रण विभाग, ग्रंथालय विभाग रुमाल १

१४. तहसिल कार्यालय जामखेड, रेकॉर्ड रुम , गाव नमुना नंबर १४ खर्डा रुमाल

१५. वाड रावबाहादुर गणेश चिमणाजी, माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे, खंड २ मुंबई सरकार इ.स. १९११ पृ . ३३०

१६. सरदार मिरीकर य.ना., अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, अहमदनगर शहराचा इतिहास पृष्ठ . २२

१७. निसळ श्री.वि. अहमदनगर नगरपालिका, शतसांवत्सरिक स्मारकग्रंथ , मुद्रक चिंचोरकर लं.शं. सन १९९० पृ. ५

१८. ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन , पुणे १९८५ पृ. ८५,८६

१९. शेजवलकर त्र्यं. शं. , निजाम पेशवे संबंध , रचना मुद्रणालय पुणे १९६३, पृ. ११०

२०. निसळ श्री. वि. अहमदनगर नगरपालिका, शतसांवत्सरिक स्मारकग्रंथ , मुद्रक चिंचोरकर लं.शं. सन १९९० पृ. ७

२१. पुणे पुरालेखागार, नगर जमाव, किल्ले अहमदनगर पत्र .२३

२२. ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे १९८५ पृ. १०२

२३. चिटणीस कृ.णा., मध्ययुगीन भारतीय संकल्पना आणि संस्था, समाज व संस्कृती भाग २ समर्थ मुद्रणालय नवी मुंबई, तृतीय आवृत्ती, प्रकाशन २००८ पृ. १६४

२४. पारसनिस डि. बी. बाळाजी बाजीराव पेशवा खंड २, गव्हर्रमेंट ऑफ बॉम्बे सन १९०६ पृ.८९

२५. कित्ता पृ. १००

२६. चिटणीस कृ.णा., मध्ययुगीन भारतीय संकल्पना आणि संस्था, समाज व संस्कृती भाग २ समर्थ मुद्रणालय नवी मुंबई, तृतीय आवृत्ती,प्रकाशन २००८ पृ. १७३

२७. पारसनिस डि. बी. बाळाजी बाजीराव पेशवा खंड २, गव्हर्रमेंट ऑफ बॉम्बे सन १९०६ पृ.१,२

२८. कित्ता . ५

२९. कित्ता. १५

३०. कित्ता. १७

३१. कित्ता ४५

३२. वाड रावबाहादुर गणेश चिमणाजी, माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे, खंड २ मुंबई सरकार इ.स. १९११ पृ . १३

३३. कित्ता पृ. १४,१५

३४. कित्ता पृ. १४६

३५. कित्ता पृ. १५१ ते १६२

३६. चिटणीस कृ.णा., मध्ययुगीन भारतीय संकल्पना आणि संस्था, समाज व संस्कृती भाग २ समर्थ मुद्रणालय नवी मुंबई , तृतीय आवृत्ती, प्रकाशन २००८ पृ. १७४

३७. किता पृ. १७६

३८. पारसनिस डि. बी. बाळाजी बाजीराव पेशवा खंड २ , गव्हर्रमेंट ऑफ बॉम्बे सन १९०६ पृ.१९१


३९. कित्ता पृ. ६३

४०. कित्ता पृ. १९२

४१. वाड रावबाहादुर गणेश चिमणाजी, माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे, खंड २ मुंबई सरकार इ.स. १९११ पृ . ३१८

४२. पारसनिस डि. बी. बाळाजी बाजीराव पेशवा खंड २ , गव्हर्रमेंट ऑफ बॉम्बे सन १९०६ पृ.११६

४३. कित्ता पृ. १३१



प्रकरण ४ भाग २

आर्थिक परिस्थिती

• पेशवेकालीन अहमदनगरची आर्थिक परिस्थिती

प्रास्ताविक :

आर्थिक व्यवहार हे माणसाच्या व समाजाच्या दैनंदिन जीवनाचे महत्त्वाचे अंग आहे. मानवी जीवन भौतिक दृष्टया अधिकाधिक सुखकर करण्याचा प्रयत्न करणे ही नैसर्गिक प्रवृत्ती आहे आणि त्यातूनच आर्थिक व्यवहार सुरु होतात. रानटी अवस्थेत पोटाची खळगी भरण्यासाठी निसर्गात जे मिळेल ते गोळा करणारा मानव क्रमाक्रमाने बुध्दिकौशल्याचा वापर करुन निसर्गात मात करु लागला. त्यातून नवेनवे आर्थिक व्यवहारांचे प्रयोग करु लागला. शेती सुरु झाली. दैनंदिन जीवनाला लागणा-या वस्तूंचे उत्पादन होऊ लागले. वस्तूंच्या देवघेवीसाठी व्यापार सुरु झाला. तंत्रज्ञानाच्या विकासाबरोबर उत्पादनाच्या नवनव्या प्रक्रिया व नव्या वितरण पध्दती रुढ होऊ लागल्या. हया सर्व आर्थिक व्यवहारांचा परिणाम समाजाच्या रचनेवर, समाजातील भिन्न गटांच्या परस्पर संबंधावर झाला. राष्ट्राराष्ट्रांच्या आर्थिक स्पर्धेतून वसाहतवाद, साम्राज्यवाद निर्माण झाले. आर्थिक भरभराटीच्या काळात देशात शांतता नांदून कलांना प्रोत्साहन मिळाले, तर आर्थिक हलाखीने हिंसक उठावांना व भीषण संघर्षांना जन्म दिला.

अशा मानवी जीवनाच्या महत्त्वपूर्ण अंगाकडे इतिहासकारांचे लक्ष जाणे स्वाभाविकच आहे. हा इतिहासप्रकार विशेषत: एकोणिसाव्या शतकापासून रुढ झाला. 'आर्थिक इतिहास म्हणजे माणसाच्या आर्थिक व्यवहारांचा इतिहास' अशी व्यापक व्याख्या केल्यास वस्तूंची उत्पादन व वितरण व्यवस्था, ते करणा-या संस्था, बाजार व्यवस्था, हया आर्थिक व्यवस्थेशी निगडित असलेले नानाविध घटक, बॅंका, शेअर बाजार, औद्योगिक व व्यापारी कंपन्या सेवा कंपन्या [Service Agencies], कृषिसंस्था, जमीन महसूल व करपध्दती, श्रमिकवर्ग इत्यादी अनेक घटकांचा अंतर्भाव आर्थिक इतिहासाच्या क्षेत्रात होतो.

एकोणिसाव्या शतकात उद्योग, व्यापार, उत्पादनवृध्दीसाठी नवनव्या तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागल्यामुळे आर्थिक इतिहासलेखनाला चालना मिळाली. वसाहतवादाच्या विकासाबरोबर आर्थिक व्यवहारांचा अभ्यास आवश्यक वाटू लागला. तशात कार्ल मार्क्सने

मानवी समाजाच्या विकासाचे भौतिकवादी भाष्य करुन आर्थिक व्यवहारांकडे पाहण्याची एक नवी दृष्टी दिली. 'माणसाच्या सर्व कृतींचा उगम आर्थिक व्यवहारात असतो' हया मार्क्सने मांडलेल्या आर्थिक हेतुमूलकतेच्या सिध्दांताचे काही विचारवंत खंड करीत असले, तरी तो एक मूलगामी दृष्टिकोण आहे. त्याशिवाय आर्थिक व्यवहारांचे भिन्न पैलू, आर्थिक क्षेत्रात भिन्न कालखंडात झालेले बदल. त्यामागील कारणे व परिणाम हे विषय देखील हया क्षेत्रात मोडतात. कृषिक्षेत्राचा विचार करताना सरंजामदारी, लहान शेतकरी, सधन शेतकरी, त्यांचे परस्परविरोधी हितसंबंध, कृषिविषयक कायदे, शेतमजूरांची स्थिती, तर औद्योगिक क्षेत्रात भांडवलदार - कारखानदार व मजूर यांचा संघर्ष, दळणवळणाच्या साधणात बदल, मुक्त व्यापार, नियंत्रित उद्योग इत्यादी नानाविध विषयांचा अंतर्भाव हया प्रकारात होतो. अलीकडे आर्थिक व्यवहार जागतिक पातळीवर मोठया प्रमाणात होत असल्यामुळे जागतिक बँक, आंतराष्ट्रीय नाणेनिधी हे व्यापक विषयही आर्थिक इतिहासकाराच्या अभ्यासाचे विषय आहेत. हे सर्व विषय मानवी जीवनाशी निगडित असल्यामुळे आर्थिक इतिहासाचा राजकीय व सामाजिक इतिहासाशी निकटचा संबंध आहे. आर्थिक इतिहास लिहिणा-याला राजकीय व सामाजिक इतिहासाशी निकटचा संबंध आहे. आर्थिक इतिहास लिहिणा-याला राजकीय इतिहास विचारात घ्यावा लागतो, तसेच सामाजिक इतिहासाचीही दखल घ्यावी लागते.

आर्थिक इतिहास लिहिण्यासाठी शासकीय कागदपत्रे, भिन्न व्यवहारांची माहिती देणारे अहवाल, आर्थिक व्यवहारांबाबतचे कायदे, जनगणना अहवाल, तंत्रज्ञानाच्या विकासाची माहिती देणारे अहवाल अशा विभिन्न मूळसाधनांचा वापर करावा लागतो. सांख्यिकीशास्त्रही आर्थिक इतिहासलेखनासाठी उपयुक्त ठरते.[१]

१९ व्या शतकात उद्योग, व्यापार, उत्पादन वाढीसाठी नवनवीन तंत्रांचा वापर केला गेल्यामुळे आर्थिक इतिहासाला चालना मिळाली. रानटी अवस्थेत उदरनिर्वाहासाठी निसर्गात जे मिळेल ते गोळा करण्याचा प्रयत्न मानवाने केला. कालांतराने बुध्दिकौशल्याचा वापर करुन निसर्गावर मात केली व नवीन आर्थिक प्रयोग सुरु झाले. जमिनीचा वापर शेतीसाठी केला गेला. दैनंदिन जीवनासाठी लागणा-या वस्तूंचे उत्पादन होवू लागले, वस्तूंच्या देवघेवीसाठी

व्यापार सुरु झाला. या सर्व आर्थिक व्यवहारांचा परिणाम समाजरचनेवर झाला. परिणामी, मानवी जीवनाच्या अशा महत्वपूर्ण अंगाकडे इतिहासकारांनी लक्ष दिले . आर्थिक इतिहास हा विविध अर्थव्यवस्था अथवा विविध आर्थिक घटनांचा ज्या भूतकाळात घडून गेल्या आहेत पण ज्यांचे परिणाम दीर्घकालीन आहेत. अशा घटनांचा इतिहासाच्या दृष्टीकोनातून संख्याशास्त्रीय माहितीच्या आधारे केलेला अभ्यास होय. आर्थिक सिध्दान्ताच्या साहाय्याने विश्लेषण करणारी व मानवी आर्थिक कृतींचा व व्यवहारांचा अभ्यास करणारी अशी शाखा होय. म्हणजेच आर्थिक इतिहास म्हणजे माणसाच्या आर्थिक व्यवहाराचा इतिहास होय.[२]

मानवाने प्रगतीच्या विभिन्न टप्प्यांवर असताना विविध उद्योगधंद्याचा विकास केला. हे उद्योगधंदे त्यातून निर्माण झालेला व्यापार, चलन व्यवस्था, विनिमय व्यवस्था या सर्व आर्थिक व्यवहाराच्या विभिन्न पैलूंचा अभ्यास पेशवेकालीन अहमदनगरच्या आर्थिक इतिहासात करणार आहोत.

बाळाजी बाजीराव पेशवे यांनी नारो बाबाजी परगणें नेवासें याना सन १७५४ - ५५ मध्ये एक सदन पत्र पाठवले त्या पत्रात मौजे पिंपळगाव परगणें वैजापूर येथे ब्राम्हणची बायको रतनगज हत्तीनें जीवे मारिली होती. त्याची चौकशी करण्यासाठी सरकारच्या हुकूमावरुन गोदजी वागळा आणि खिजमतगार व दोघे राऊत पाठवले होते. त्यांनी पाटलाला घेऊन चौकशी केली. त्याप्रमाणे रतनगज हत्तीनें ब्राम्हणाची बायको मारल्याचे खरे ठरले. त्यानुसार तिची क्रिया [अंत्यविधी] तिचा पुतण्या त्याच्याकडून करुन घेतली. त्यास खर्च १२५ रुपये आला. व सनदेनुसार त्यांना अजून पावणे चारशें रुपये राहिले ते तिचा पुतण्या म्हणतो, या अस्ती घेऊन काशींस जातों, रुपये माझ्याकडे द्या. त्यासाठी सरकारची आज्ञा व्हावी म्हणून पत्र पाठविले . सरकार आदेशानुसार त्याचा जामीन घेऊन तो जर भागीरथीस जात असेल तर त्यास चारशे रुपये द्यावे, म्हणून नारोबाबजी यांस सनद दिली आहे. [३]

आर्थिक इतिहास लेखनशास्त्राचा अर्थ :

सामाजिक इतिहासानंतर आर्थिक इतिहास ही इतिहासाची एक महत्त्वाची सहाय्यकारी किंवा उपशाखा मानली जाते. या शाखेचा उदय १९ व्या शतकात झालेला आहे. प्रामुख्याने

व्यापार वादाच्या उदयानंतर माणसाच्या आर्थिक कृतींचा विस्तार होत गेला आणि या आर्थिक कृती माणसाच्या प्रगतीचे मोजमाप बनल्या.

थोडक्यात आर्थिक इतिहास लेखनशास्त्राचा अर्थ सांगताना असे म्हणता येईल की, माणसाने प्रगतीच्या प्रथमिक अवस्थेपासून ते आधुनिक काळापर्यंत चांगल्या प्रकारे जीवन जगता यावे म्हणून ज्या विविध आर्थिक कृती केल्या किंवा आर्थिक क्षेत्रात प्रयोगाधारित बदल केले यातून ज्या दीर्घकालीन परिणाम करणा-या घटना मानवाच्या आर्थिक क्षेत्रात घडल्या या सर्वांचे केवळ आर्थिक दृष्टिनेच नाही तर ऐतिहासिक चिकित्सात्मक दृष्टिने, संख्याशास्त्राच्या आधारे साधनांच्या आधारे आर्थिक प्रगतीचे शास्त्रशुध्द व पूर्वग्रह न बाळगता चिकित्सक पध्दतीने केलेले लेखन म्हणजे आर्थिक इतिहास लेखन शास्त्र होय.

यामध्ये प्रामुख्याने आर्थिक संरचनेचा अभ्यास, व्यापार व व्यापारी संबंधांचा अभ्यास, चलन व्यवस्था व विनिमय पध्दतींचा अभ्यास, उद्योगधंद्यांचे बदलते स्वरुप, अर्थव्यवस्थेतील बदलांचा विकासाचा अभ्यास आदी विभागांवर प्रामुख्याने प्रकाश टाकला जाणार आहे .

पेशवेकालीन नगरचा सर्वसाधरणपणे अभ्यास करत असताना विविध टप्प्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. कारण निजामशाही, मोगल, आणि नंतर पेशवे यामध्ये अनेक व्यवसाय जसेच्या तसे आले तर अनेक व्यवसायांत बदल होत गेले. म्हणजेच कालखंडानुसार उद्योगधंदे विनिमय व्यवस्था यामध्ये जे बदल झाले त्यांचा अभ्यास यात केला जाणार आहे.

उद्योग व्यवसायातील जी विविध मानवी संसाधने आहेत त्या विविध मानवी संसाधनांमधील संबंधांचा अभ्यास या आर्थिक इतिहासात केला जातो. उदा. जमीनदार - मजूर यांच्यातील संबंध, संघर्ष तसेच उद्योगातील मनुष्यबळाची आवश्यकता यांचा अभ्यास या संशोधनात केला जाणार आहे.

कृषी क्षेत्रापासून सुरु झालेल्या या आर्थिक क्षेत्राचा महत्त्वपूर्ण भाग म्हणजे दळणवळणाची साधने. फार प्राचीन काळापासून व्यापार या संकल्पनेचा उदय झाला आणि जसजसे उद्योगधंद्यात वाढ झाली, व्यवसायांमध्ये वाढ झाली, तस तसा व्यापार वाढला व पर्यायाने दळणवळणाच्या साधनांमध्ये वाढ झाली. त्यात अनेक बदल पेशवे काळातही झाले.

१. पेशवेकालीन अहमदनगरमधील शेती व शेती पुरक उद्योग धंदे :

पेशवेकालीन अहमदनगरमधील मुळा, प्रवरा, घोड, भीमा, गोदावरी या नदी किना-यावरील जमीन ही सुपीक व बागायती होती. या भागात नेहमी शेतीतुन उत्पन्न मोठया प्रमाणावर घेतले जात. त्यानंतर याच भागात अनेक नागरी वस्त्या उदयास आल्याचे समजते. प्रवरा, टोके, लोणी, कोपरगाव, नेवासे, सिध्दटेक ही ठाणी विशेष व्यापारी केंद्र म्हणून प्रसिध्द झाली. तर टोके गावाला तर पेशव्यांनी नियोजित शहराचा दर्जा दिला. अनेक घाट त्या ठिकाणी बांधण्यात आले. शेती सोबतच व्यापारही या ठिकाणी होऊ लागला. अहमदनगर मधील बरीच जमीन ही कोरडवाहू होती. कर्जत, पारनेर, जामखेड, पाथर्डी या भागात शेती पावसावर अवलंबून होती . पाऊस झाला तरच शेतीत उत्पन्न पिकत होते. जमीनीत या भागास काळी, पांढरी असे नाव होते. रानात पिकणारी शेतीला काळी म्हणत तर गावठाणातील जमीनीला पांढरी असे नाव होते. पेशव्यांनी अनेक जमीनी शिंद्यांना इनाम म्हणून दिल्या . त्यामुळे त्यावर अप्रत्यक्ष पणे नियंत्रण हे शिंदे या घराण्याचे होते. त्यांनीच आपल्या मर्जीतल्या देशमुखांना, देशपांडयांना जमीनी सारा वसूल करण्याच्या कामी दिल्या होत्या. त्यामुळे हा कर देशमुख देशपांडे यांच्या मार्फत घेतला जात असे. पावसाचे कमी जास्त प्रमाण झाले तर महसूलही त्या प्रमाणे कमी जास्त होत असे. शेतसारा, जमीन महसूल याबाबतीत अहमदनगरच्या निजामशाहीचा, शिवकालीन महसूल व्यवस्थेचा तंतोतंत उपयोग पेशवेकालीन अहमदनगर मध्ये केल्याचे आढळतो.

२.१ पेशवेकालीन अहमदनगरमधील उद्योगधंदे

मध्ययुगीन महाराष्ट्रातील उद्योग-धंद्यासंबंधीच्या उल्लेखांमध्ये आपणास सुती कापडाचा उद्योग, रेशीम वस्त्रांचा उद्योग, लोकरीची पांघरुणे [घोंगडया], विविध प्रकारच्या धातूंची भांडी, रत्ने, कागद, साखर, नीळ, मीठ, कातडयांच्या वस्तू , लाकूडकाम , आणि इतर अनेक वस्तूंच्या निर्मितीसंबंधीचे उल्लेख आढळतात. या वस्तूंचे उत्पादन बहुधा स्थानिक स्वरुपाचे असे. परंतु काही वस्तू भारताच्या इतर भागातून आणलेल्या असत. अगर परदेशाहून

मागविलेल्या असत.[२] याउलट महाराष्ट्रात तयार झालेल्या काही वस्तू देशाच्या इतर भागातील बाजारपेठात पाठविल्या जात अगर परदेशातील पेठात निर्यात केल्या जात असत.

२.२ कापड उद्योग

मध्ययुगीन महाराष्ट्रात कापसापासून तयार केलेल्या विविध वस्तू दिसून येतात. त्यांचे वर्गीकरण करताना पुरुष व स्त्रिया यांनी वापरण्याचे पोशाख, चादरी व ब्लॅकेट व इतर अनेक प्रकारांची वस्त्रे यांचा समावेश होतो. पुरुषांची वापरण्याची वस्त्रे म्हणजे धोतरे, रुंदे तुमानी, पायजमे, अंगरखे, शाली, लांब झगे, विशेषत: उच्च वर्गातील लोकांना वारण्यासाठी लांब कोट, पागोटी, पगडया यांसारखी विविध प्रकारची शिरोभूषणे, आणि बाहेरील वस्त्रे होत. स्त्रिया वापरत असलेली वस्त्रे म्हणजे साडया, सकलात [तलम लोकरीची वस्त्रे], शरीराच्या वरच्या भागासाठी वस्त्रे, दुपट्टे आणि शाली होत्या. तुंबे अथवा पायजमे पुष्कळदा सुती व रेशमी धागे यांच्या मिश्रणाने केलेल्या कापडाचे [मशरु] असत. काही वस्त्रे कमरेभोवती नीट बांधण्यासाठी वापरण्यात येणारे बंद [दो-या] रेशमाचे असत. धोतरे सासवड, सुपे, टाकळी व इतर केंद्रात तयार होत. सासवड येथे तयार होणा-या एक धोतरजोडीला नगरमध्ये ६ रुपये ८ आणे पडत. काही धोतरजोडया खूप भारी किंमतीला म्हणजे २४२ रुपये याप्रमाणे विकल्या जात. कापडाच्या दर्जाप्रमाणे त्यांच्या किंमती कमीअधिक असत. रेशमी धोतरांची मागणी साष्टी येथून होत असे.[४]

उपरण्याची वस्त्रे, चिट, रेशीम अगर किनखापी [जरीचे कापड, चांदी व सोने यांची फुले असलेले रेशमी कापड] असत. लांब अंगरखे चिटाचे, अगर महमुदीचे म्हणजे एक प्रकारच्या नाजूक धाग्याच्या सुती कापडाचे अगर तीसा म्हणजे रेशमी व किनखापी असत.[४]

डोक्याला बांधायचे वस्त्र म्हणजे मुख्यत: एक पागोटे असे. त्याला रुप, आकार व पोत यानुसार पोगोटे, तिवट, मंदील आणि फेटा असे म्हटले जाई. कधी कधी रुमाल किंवा टोपीसुध्दा या उद्देशाने वापरली जात असे. एक प्रकारचे पट्टे असलेले कापड पागोटे तयार करण्यासाठी वापरले जाई. चिटाचे कापड तिवटासाठी वापरण्यात येत असे. एका विटाची किंमत जास्तीत जास्त ३३ रुपये इतकी असे. पागोटी आणि तिवट यांच्या उत्पादनाची मुख्य

केंद्रे फैझपूर, माहेश्वर, चांदवड होती. सोलापूर येथील तलम धोतरे प्रसिध्द होती. धनाबाद आणि वानापूर येथे मुख्यत्वेकरुन फेटे तयार होत असत.

१७५१ च्या सुमारास असलेले कापडांचे भाव खालील प्रमाणे होते असे आपणास तत्कालीन कागदपत्रावरुन दिसून येते.

कापडाचा प्रकार	सर्वोतम दर्जाच्या कापडांचा भाव रुपये
१. **किनखाप**	**१७५**
२. **पटका**	**४०**
३. **हमरु**	**२०**
४. **गजनी**	**२५**
५. **पैठणी**	**५०**
६. **मखमल**	**२५**
७. **पाटाव**	**३०**
८. **लेहंगा**	**७५**
९. **इलाचा**	**१२५**
१०. **पारचा**	**७५**
११. **बाप्ता**	**५०**

या किंमतीकडे एक दृष्टिक्षेप टाकला असता असे समजते की किनखाप हे सर्वात महाग असे कापड होते. त्या खालोखाल इलाच्याची किंमत असे. हमरु, गझनी आणि पाटाव यांची किंमत साधारणपणे सर्वसामान्य माणसाला परवडेल अशी असे.[५]

सोन्याचांदीच्या धाग्यांचे काम केलेल्या कापडासाठी आणि तेथील पागोटयासाठी महाराष्ट्र विशेष प्रसिध्द होता. पैठणप्रमाणे जालनापूर हे सुती कापड आणि रेशमी कापड यांच्या उत्पादनाचे केंद्र होते. चांदीच्या धाग्याचे उत्पादन हे तेथील वैशिष्टय होते. इ.स. १७९६ मधील एका कागदपत्रावरुन चांदीचा धागा बनविण्याची पध्दत समजून येते. चांदीचे रुपये

वितळवून त्यापासून चांदी मिळविण्यात येत असे. वितळलेल्या चांदीपासून नाजूक धागा तयार करण्यात येत असे. हे धागे रेशमी कापडामध्ये वापले जात. यात चांदीचे प्रमाण कमी असे आणि ती चांदी कमी प्रतीची असे. त्यामुळे जालनापूर येथील कारागीर जेव्हा या चांदीपासून धागा बनवत असत तेव्हा त्या धाग्याचा दर्जाही कमी होत असे.[६] पेशवे सरकार अशा वस्तूंच्या उत्पादनावर मुकादमी देखरेख करत असे.

संगमनेर परगण्यामधील तर्फ राहुरीच्या कसबा वामोरी [वांबोरी] मध्ये कापसाचा धागा पासोडया शाली, रेशीम, जाडयाभरडया आणि रुंद कापडाच्या पट्ट्या [नवार] देणगी दाखल द्यावयाची मुंडाशी आणि पागोटी इत्यादीचे उत्पादन होत असे. इ.स१७६७ मध्ये रेशीम आणि भरतकाम यातील दहा प्रकारच्या कलाकारांना पुण्यामध्ये स्थायीक होण्यासाठी उत्तेजन देण्यात आले यामध्ये तार तयार करणे [तारकशी], सोन्याने अथवा चांदीने वेढलेला रेशमी धागा तयार करणारे [कलाबतूकार], अरुंद रंगीत, रेशमी काठांचे कपडे तयार करणारे किनारी व गोठ तयार करणारे, किनखाप आणि मशरु कापड विणणारे, सोन्याच्या अथवा चांदीच्या तारेचे कापड विणणारे आणि सोन्याच्या अथवा चांदीच्या धाग्यांनी बांधलेल्या रेशमी धागे विनणारे यांचा समावेश होत असे. विशेषत: सोने, चांदी आणि रेशमी धागे उत्पादन करण्याचा कारखाना चालू करण्यासाठी कारागिरांना सांगण्यात येत असे. जाफरखानी आणि महमूदी यांचा समावेश महत्वाच्या लोकांना दिल्या जाणा-या देणग्यांमध्ये होत असे.[७] इ.स. १७७२ मध्ये पेशव्यांच्या येसू नावाच्या सेवीकेच्या बाबूसिंग नावाच्या मुलाच्या लग्नामध्ये चोवीस पेक्षा जास्त प्रकारच्या कपडयांची खरेदी करण्यात आली होती.[६]

फरासखान्यामध्ये स्थानिक कामगारांनी तयार केलेले अनेक तंबू होते. तंबू तयार करण्यासाठी जाडे भरडे कापड [खादी], **खारवा** नावाचे दुस-या प्रकारचे कापड [कनाती म्हणजे तंबूच्या भिंती आणि **सायवान** म्हणजे उतरत्या भिंती तयार करण्यासाठी], जाडया भरडया आणि रुंद पटटया किंवा दोर [नवार], **घायपाताच्या** फुलातला मध किंवा रस [चरसे], शिवण्यासाठी दोरा, पारा, तेल, पाण्यामध्ये मळून तयार केलेला कणकेचा गोळा [याचा उपयेाग डिंकासारखा केला जात असे], आणि यासारखे अन्य पदार्थ यांची

आवश्यकता असे. लोकरीची ब्लॅकेंट अनेक ठिकाणी, विशेष: जुन्नर प्रांतात तयार होत असत.[८]

२.३ जडजवाहीर

सर्वोत्तम प्रकारच्या जडजवाहीराला पेशव्यांचा दरबार आणि उच्चभ्रुवर्ण यामध्ये मागणी असे. राजपुत्र आणि पेशवे यांचे विवाह समारंभ, उपनयन समारंभ, महात्वाच्या लोकांच्या भेटी, महत्वाचे उत्सव इत्यादी समारंभ, या महत्वपूर्ण प्रसंगामध्ये साधारणत: जडजावहीर, सोन्याचे दागिने आणि मौल्यवान कापड अशा भारी वस्तू देणगी दाखल दिल्या जात. जडजवाहीरांमध्ये निरनिराळया प्रकारांचा उदा. सर [मोत्याचा गळयात घालण्याचा कंठा] माणिक, हिरा, पाचू आणि पोवळे इत्यादीचा समावेश होत असे. पेशव्यांच्या प्रदेशात तीन ठिकाणी हि-यांच्या खाणी होत्या. बुंदेलखंड, चंदेरी आणि थसरे परगण्यातील डाकोर. या खाणी सरकारच्या ताब्यात असत. बुंदेलखंड प्रांताच्या गोविंद बल्लाळाला पेशव्यांना १०००, २०००, ५०००, १०००० अथवा १०,००० रुपयांपेक्षा जास्त किमतीचे हिरे देण्यास सांगण्यात आले होते. त्याला २०० रुपयांवर किंमत असलेले हिरे देण्यासही सांगण्यात आले होते. पंरतु या हि-यांना पॉलिश करणे आवश्यक होते. लालू [एक लाल माणिक] मोठया वर्तुळामध्ये मागणी असलेले होते आणि त्याची किंमत ५ ते २५ रुपये होती. इ.स.१७८३ मधील खाजगी वाल्यांच्या यादीतील जडजवाहिरांमध्ये अनेक विध किंमतवान दागिन्यांचा समावेश होता. यादीवरुन हे स्पष्ट होते की हिरे, रत्ने, माणिक, सोन्यामध्ये जडविलेली रत्ने, पाचू आणि मोती यांचा वापर पाटली, कंगण, कंठी, अंगठी, पोहची, कर्णभूषणे आणि तत्सम वस्तू बनविण्यासाठी होत असे. मोती आणि पोवळे यांचा उपयोग औषधे तयार करण्यासाठी होत असे. [७]

२.४ धातूकाम

नित्य उपयोगी वस्तू बनविण्यासाठी सोने, चांदी, तांबे पितळ आणि लोखंड या मुख्य धातूंचा वापर केला जात असे. सोन, चांदी आणि तांबे यांना नाणी पाडण्यासाठी मागणी होती. सोने व चांदी यांना दागिने बनविण्यासाठी विशेष मागणी होती तत्कालीन कागदपत्रामध्ये

सोन्याच्या आणि चांदीच्या दागिन्यांचे अनेक उल्लेख आढळतात. यामध्ये कडी [सोन्याची हस्तकाभूषण] आणि तत्सम दागिने यांचा समावेश होत असे. इ.स १७४१ मध्ये चिमाजी अप्पाच्या अंत्यसंस्काराच्या दिलेल्या देणग्यांमध्ये चौदा तोळे वजनाची सोन्याची शिंगे आणि चांदीचे खूर यांचा समावेश होता. तांब्याचा वापर देवळांमध्ये रथाचे वरचे भाग [शिखर] बनविण्यासाठी केला जात असे, तांबे आणि जस्त यांचा कांस नावाचा मिस्त्र धातू आणि लोखंड या दोन्हीचा उपयोग निरनिराळी भांडी, औजारे आणि शस्त्रे बनविण्यासाठी केला जात असे. इ.स १७५० मधील एका नोंदी वरुन तांब्याची, पितळेची, तांबे आणि जस्त यांच्या मिस्त्र धातूची भांडी, जाड लोखंडी तवे, कोयत्या, भाज्या वगैरे चिरण्यासाठी वापरत असलेली विळी, कु-हाड, लोखंडी पळी यांचा उल्लेख आढळतो. इ.स१७५१ मध्ये तळेगाव, नारायणगाव, वडगाव, सुपे, सासवड आणि बेलसार येथील लोहारांना खिळे आणि घोडयांच्या खोगीरासाठी लागणारे लोखंडी तुकडे करुन देण्याचा आदेश देण्यात आला होता. पेशवा सरकारने साष्टी येथून शस्त्रे बनविण्यासाठी नऊ खंडी लोखंड आणले होते. बहुतांशी तोफ गोळे स्थानिक कारखान्यात बनवले जात. इ.स१७७२ मध्ये तर्फ नागोठणे येथे सात तांबट तोफा तयार करत असत. इ.स१७७१ मध्ये स्थानिक कारखान्यात तयार झालेली तांबे आणि पितळेची तपेली, पातेली, वेळणी आणि परात वगैरे भांडी खरेदी करण्यात आली होती. तोफांचे उत्पादन पुण्यामध्ये केले जात असे.[८] त्याच तोफा नगर व इतर प्रांतात वापरल्या जात. इ.स१७७३ मध्ये तोफांचे उत्पादन करणा-या एका कारागिराने शुक्रवार पेठे मध्ये तोफखान्याजवळ घर बांधले होते. घरावरील करामध्ये माफी देऊन सरकारने त्याला तोफा ओतण्याच्या व्यावसायास उत्तेजन दिले असल्याचे तत्कालिन कागदपत्रावरुन समजते.

२.५ साखर उत्पादन

साखरेचे उत्पादन बहुतांशी त्या त्या भागातच होत असे. नगर सुभ्यात किंवा प्रांतात हे उत्पादन मुळा, प्रवरा, गोदावरी, भीमा नदी काठी मोठया प्रमाणात होते. यात साखरेच्या

उत्पादनाबरोबर गुळाचा व्यापारही नगर मधून अनेक भागांमध्ये केला जात होता. साखरेचे तीन प्रकार होते. पांढरी साखर, खडी साखर आणि तपकिरी कच्ची साखर [गुळ].

२.६ लाकूडकाम व कागदउद्योग

नगरमध्ये वापरात येणारे इमारत लाकूड वसई मध्ये तयार होत असे. निरनिराळ्या आकाराची आणि लांबीचे तेराशे एकोणतीस तुकडे बारा हात लांबीच्या तुळया, मध्यम आकाराच्या खांड तुळया [साधारण: नऊ हात लांब], दहा हात लांबीच्या मोळाच्या तुळया, खांब, छपराच्या वाश्यांसाठी लांब सरळ सोट जाड तुकडे, माळवदासाठी कडया, तक्ते करावायास सोटे, १५ हात लांबीचे गोल व सरळ सागवानी वासे. खास करुन पेशवे कालीन अहमदनगर भागात जास्त प्रमाणात वापरले जात असे. त्यातही घरांमध्ये अनेक प्रकार नगर प्रांतात पहावयास मिळतात. जमीनदार, संस्थानिक, सेनापती, पाटील यांच्या गढींना, वाडयांना विशिष्ट प्रकारचे सागवानी लाकूड वापरले जात असे. वाडयावरुन, गढीवरुन त्या भागातील जमीनदारांची प्रतिष्ठा समजली जाई. [९]

पेशवे कालीन अहमदनगरमध्ये कागदाचा वापर ब-याच प्रमाणात होत असे. मराठा साम्राज्य दूरवर पसरलेले होते. शिंदे, होळकर, गायकवाड, पटवर्धन, आंग्रे वगैरे लहान मोठे सरदार सर्वत्र विखूरलेले होते. कितीतरी जाहिगीरदार होते, इनामदार होते. पेशवे सरकारचा या सर्वांच्या बरोबर पत्रव्यवहार होत असे. पेशव्यांच्या तसेच त्यांच्या सरदारांच्या शासन पध्दतीत ताळेबंद, जामीन झाडा, इनामपत्रे, हुकूमनामा वगैरे असंख्य सरकारी पत्रे असायची. ही कागदपत्रे अजूनदेखील मुंबई, पुणे, कोल्हापूर, तंजावर वगैरे सरकारी दप्तरखान्यात आजही बघायला मिळतात. याशिवाय समकालीन इतर स्वतंत्र राजवटीत किंवा राजसत्ता यांच्या बरोबर सचिवालयीन पत्रव्यवहार व्हायचा. या सरकारी कागदपत्रांच्या कितीतरी प्रती देखील असायच्या. या सर्व गोष्टींसाठी कागदांची प्रचंड निर्मीती आवश्यक असे. जुन्नर, औरंगाबाद आणि इतर ठिकाणी कागदाचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असे.

३.१ पेशवेकालीन चलनव्यवस्था :

पेशव्यांच्या काळातील नाण्यांचा इतिहास म्हणजे एकंदरीत नाणेपध्दतीच्या -हासांचा इतिहास होय. त्याचप्रमाणे तो भेसळीचा व अधोगतीचा इतिहास होता. चलनव्यवस्थेतील गोंधळ अधिकच वाढून संभ्रम निर्माण करणारा तो होत गेला. खाजगी व्यक्तींना नाणी पाडण्याचे परवाने देण्याचे प्रमाण अधिकच वाढले बेकायदेशीरपणे नाणी पाडणे सुध्दा चालू झाले. कायदेशीर व बेकायदेशीर अशा दोन्ही प्रकारच्या टांकसाळीतून प्रमाणभूत नाणी न पाडता त्यात फरक होऊ लागले व अशुध्द प्रतीचे व कमी दर्जाच्या कसबाची नाणी तयार होऊ लागली. पेशवे सरकार टांकसाळीतून चालणा-या गैरव्यवहारांना आळा घालण्याचा प्रयत्न करुन सुध्दा टांकसाळीवर म्हणावा तितक्या प्रमाणात नियंत्रण राखू शकले नाही. शिवाजी महाराजांनी सुरु केलेले चलनाचे परिणाम **होन** याचा त्याग करण्यात येऊन प्रमाणभूत नाणे म्हणून त्याजागी **रुपया** या नाण्याची निवड करण्यात आली. पेशव्यांची स्वत:ची अशी नाव घेण्यासारखी चलन पध्दती नव्हती. चलन व त्यांची चांदीची नाणी म्हणजे अर्काट ते दिल्ली पर्यंतच्या भागातील इतर राज्यातील चलनात प्रचलित असलेल्या नाण्यांची केवळ नक्कल असल्याने, त्यांना महाराष्ट्रा बाहेरुन येणा-या इतर राज्यातील नाणी स्वीकारावी लागत. सततच्या चलनातील वापरामुळे ती नाणी झिजलेली असल्याने त्यांची किंमत कमी झालेली होती.[१०] त्यामूळे ती नाणी स्वीकारण्याआधी प्रत्येक वेळी त्यांचा विनीमय दर निश्चित करुन घ्यावा लागत असे. वारंवार झालेल्या हस्तांतरामुळे वापरुन जीर्ण नाण्यांच्या कमी झालेल्या किंमतीची भरपाई मागावी लागत असे. समकालीन उल्लेखांवरुन महाराष्ट्रात त्या काळी चलनात असलेल्या पण इतरत्र टांकसाळीत पाडलेल्या व इतर राज्यांनी प्रचलीत केलेल्या नाण्यांच्या मोठया संख्येचा अंदाज करता येतो. अशा नाण्यांमध्ये रहीमतपूरी, मलकापूरी, चांदवड, चिंचवड, सुरती, इंग्लीश, बागलकोटी, महमदशाही, जुन्या पंच मेल, जुनी - औरंगाबादी, अमदाबादी, लातूरी, अजमेर, औरंगाबाद, गंजी कोट, अर्काट, मीटे, आतीचे जुने, मल्हार शाही, हालीसिका, कोरेफरशी, चतरसिंगी, सारोळी, त्रिशूळी, गजापूरी, बावडी, भूंडे, मुंबई, भातोडी, शाहू -शिक्का, वाई - शिक्का, अर्काट - फुलचरी, मोहरा, आमदशाही, महंमदशाही मोहर, अर्काट - गंजी कोट, जोगीनी वज्र, अलमगीरी, जुना -

शिवराई, मिरजी मलकापूरी, निळकंठी, इटाव, भडोची, कल्याण - चोल, दौलताबादी, होकेरी, तळेगावी, पुणे - चलन, पुणे - शिक्का, कल्याण शिक्का, जरी - पटका, वगैरे नाणी होती. तरीही पेशव्यांच्या काळात महाराष्ट्रातील चलनात असलेल्या नाण्यांची यादी येथेच पूर्ण होत नाही. रुपयाच्या नाण्यांशी अशी गोंधळ निर्माण करणारी सरमिसळ जरी असली तरी त्यापैकी फारच थोडी नाणी पेशव्यांच्या टांकसाळीत पाडली जात होती. व ती नाणी केवळ नक्कल असत. या नाण्यांचे व्यवस्थित वर्गीकरण करणे, त्यांची ओळख पटवणे, व त्यांची बरोबर किंमत ठरवणे सोपे नाही. त्या नाण्यांपैकी पुष्कळशी नाणी त्यांच्या टांकसाळीच्या नावानेच ओळखली जात. उदा. रहिमतपूरी, मलकापूरी, चांदवड, बागलकोटी, इ. काही नाणी त्यांच्या राज्यकर्त्यांच्या नावाने ओळखली जात. महम्मदशाही, शिवराई, मल्हारशाही नाणी अनुक्रमे महमंद अदिलशाहा, शिवाजी महाराज, मल्हारराव होळकर यांच्या नावाने ओळखली जात. काही नाण्यांची नावे त्यांच्या मुख्य बाजू वरील चिन्हांवरुन पडलेली असत. त्रिशूली नाण्यांवर त्रिशूलाचे चिन्ह, फरशी नाण्यांच्या मुख्य बाजूस फरशी, कु-हाडीचे चिन्ह परशू असे. आणि तु-याचा रुपया या नाण्यांवर पिसाचे चिन्ह असे. चलनातील काही नावे सरकारी चलन म्हणून ओळखले जात ते म्हणजे वसई -चाल, पुणे - चाल, कल्याण - चाल, अशा सारखे होत. दाणे - चलनी रुपया हे धान्य बाजारातील चलनी नाणे होते. पोते चाल नावाची चलनी नाणी सरकारी खजीन्यात स्विकारली जात आणि अशा नाण्यांमध्ये धातूचे प्रमाण व नमुना पेशवे सरकारने ठरवून दिलेला असे.[११]

चांदीच्या रुपयाप्रमाणेच सोन्याच्या मोहरा व होन ही नाणीसुध्दा पंचमेळ, औरंगाबादी, गंजीकोट, वज्रजोगणी, लातुरी, अजमेर, अहमदाबादी, महंदशाही, अहमदशाही, शेटशाही, दिल्ली शिक्का, पुल्हेधाटी होन अथवा पुतळया अशा वेगवेगळया नावांनी ओळखली जात असत.

चांदीच्या रुपयाचे प्रमाणित वजन १८० ग्रेन म्हणजे ११ मासे २ गुंजा एवढे असे. भातवडी रुपयाचे नाणे १७१.३ ग्रेन वजनाचे होते. त्याची शुध्दता १४९.३१ ग्रेन इतकी असे. रुपयाच्या लहान भागांची नाणी म्हणजे साधारणत: अधेली [चांदीचे नाणे] व पावली

[चांदीचे नाणे] आणि पैसा [तांब्याचे नाणे] ही होती. रुपयाची नाणी सोन्याच्या नाण्यात बदलून घेण्यासाठी विनिमयाचा दर साधारणपणे १६.१ असा होता. असे तत्कालीन दस्तऐवजातून स्पष्ट होते.[१२]

३.२ पेशवेकालीन नगरचा पेढीव्यवहार :

अगदी शिवाजी महाराजांच्या काळापासून थेट पेशवाईच्या अखेरीच्या काळापर्यंत पेढीव्यवहारांनी एक महत्वाची भूमिका बजावली होती असे दिसून येते. विशेषत: पेशव्यांच्या अमदानीत या व्यवसायाची चांगली वाढ झालेली होती. महाराष्ट्रात पेढीव्यवहार करणा-या पुष्कळ संस्थांची त्या काळात स्थापना झाली व त्यांच्या शाखा भारतातील इतर भागात काढलेल्या होत्या. पेढयांचे व्यवहार खूपच भरभराटीस आलेले होते. ब-याच घराण्यांतून हा व्यवसाय वंशपरंपरेने चालू राहिलेला दिसतो. उदाहरणार्थ, दीक्षिती - पटवर्धन घराणे, घारपुर घराणे, अनगळ, पाठक, तांबवेकर, वैद्य, दुधाट, वैकर, देहाडराय ही घराणी. यांच्यापैकी काही घराणी त्या काळात बरीच प्रभावशाली होती व काहींचे पेशव्यांच्या घराण्यांशी सोयरी संबंधही होते. उदारणार्थ, दीक्षित - पटवर्धन यांच्या घराण्यातील एका मुलीचा विश्वासराव पेशव्याशी विवाह झालेला होता. मूळचे कोकणातील गुहागर या गावचे रहिवासी असलेल्या दीक्षित - पटवर्धन यांनी पहिल्या प्रथम नाशिक येथे एक पेढी उघडली. नंतर इ. १७२२ मध्ये औरंगाबाद येथे उघडली व शेवटी पहिले बाजीराव पेशवे यांच्या निमंत्रणाला मान देऊन ते पुण्याला इ. १७२९ मध्ये आले व तेथेच स्थायिक झाले.[१३]

पेढीचे रोजचे सर्व व्यवहार एका रोजकीर्दीमध्ये लिहिले जात असत. त्यामध्ये पैशांच्या देवाण घेवाणीच्या नोंदी दोन वेगवेगळया खात्यांमध्ये केल्या जात, पोते [रोखीचे व्यवहार], परभारे [पुस्तकातील देवघेवीचे व्यवहार]. या पेढयांची वर्षभरातील उलाढाल फार मोठया प्रमाणावर होई. इ. १७६९ यावर्षी दीक्षित - पटवर्धनांच्या पेढीमध्ये रुपये ३३,८७,३८१.३.९ एवढया रकमांचा भरणा झाला, तर खातेदारांना दिलेल्या रकमांची बेरीज रुपये ३०,७७,९७७.११.० इतकी झाली होती.

पेशवे काळातील आवश्यकतेप्रमाणे या पेढयांतून निरनिराळया प्रकारचे हिशोब ठेवले जात असत. अशी हिशोबांची खाती म्हणजे नफा, सूट, तूट, मनोती, सरदारांची वर्षासने, मसाले, भेटी, उपहार, बक्षिसे, न्यायालयीन दंड, इजारा, मामलतीची मोकासा गावे, पेशवे, दुकानांचे भाडे देहनगी, व्यक्तिगत किंवा खाजगी खर्च, किमती वस्तूंची खरेदी व संजायित इत्यादी होती असे दिसते.

नफा या हिशेबाच्या खात्यात व्याज, बट्टा [म्हणजे नाण्यांच्या विनिमयाबद्दलचे अगर बदलून देण्याबद्दलचे कमिशन],वटणावळ [हुंडया देऊन रोख रक्कम अदा करण्याबद्दलची] व इतर किरकोळ जमा होणा-या रकमा यांचा समावेश होत असे. किमती वस्तुंची खरेदी, या खात्यात मोती व हिरे यांच्या खरेदीबद्दलच्या रकमा, तसेच हेमगर्भ, प्रवाळ अथवा पोवळी, मोहरा, पुतळया, सोने अगर चांदी यांच्या खरेदीबद्दल नोंदी असत. संजायित खात्यामध्ये दुकानातून किंमत निश्चित न करता आणलेल्या वस्तूंसंबंधीचे हिशेब असत. या वस्तू पसंत असल्यास ठेवून त्याचे पैसे दिले जात असत. हा व्यवहार म्हणजे एक प्रकारे कर्जाऊ रकमेबद्दलचा अगर उधारीच्या देण्यासंबंधीचा हिशेबच असे. पेशव्यांची खाती दीक्षित - पटवर्धनांच्या पेढीमध्ये असत. ही सर्व खाती म्हणजे फौजेबद्दलचे खाते, कर्जव्यवहारांचे खाते, मालमतींबद्दलचे खाते, कापडाचोपडा विषयीचे खाते इत्यादी विविध प्रकारची असत.[१४]

मध्ययुगीन महाराष्ट्रात या पेढयांच्या अनेक कामांपैकी एक महत्वाचे काम म्हणजे हुंडयांच्या रुपाने पैशाची उपलब्धता करुन देण्याचे होते. हुंडयांच्या देवघेवीने मोठमोठया रकमांच्या देवघेवी, उलाढाली होऊ शकत असत. पेढयांना व हुंडयांच्या रोख रकमांच्या वटणावळीच्या रुपाने पैशाची प्राप्ती होत असे. हुंडी म्हणजे मालाची विक्री करणा-याला व्यापा-याने माल खरेदी करणा-या माणसाच्या नावाने केलेला एक उधारीचा दस्तऐवज असे. हुंडी सादर करणा-या व्यक्तीला [अथवा पेढीच्या प्रतिनिधीला] विकत घेतलेल्या मालाची रोख देण्यासंबंधीची सूचना हुंडी देणारा व्यापारी माल विकत घेणा-या व्यापा-याला अशा हुंडीच्या रुपाने देत असे. पेशवे कालीन अहमदनगरमध्ये अशा हुंडीला एक प्रकारे आजकालच्या **डिमांड ड्राप्ट** चे स्वरुप असे. **दर्शनी हुंडी** म्हणजे जर एखाद्याला ताबडतोब रक्कम हवी

असल्यास ती देण्याची व्यवस्था तो पेढीवाला करत असे. **मुदती हुंडी** विशिष्ट काळानंतर रोख रक्कम देण्याबद्दलची सूचना देणे होय. **लहानी हुंडी** एखाद्या हुंडी मध्ये पुरेशी रक्कम शिल्लक नसेल आणि दुस-या हुंडी मध्ये काही रक्कम शिल्लक असेल अशा हुंडीस लहानी हुंडी म्हणत. एखाद्या ग्राहकाने एखाद्या विशिष्ट व्यक्तीला एक प्रकारच्या नाणेपध्दतीतील विशिष्ट रक्कम दिली व त्याच्या कडून दुस-या शहरातील पेढीच्या नावे त्या शहरातील चालू असलेल्या नाणेपध्दतीतील रकमेची हुंडी देण्याबद्दल विनंती केली व त्या नाण्यांची किमत अधिक असेल तर हुंडी देणारी व्यक्ती त्या ग्राहकाकडून दोन्ही नाण्यांमधील विनिमयाच्या दराने, लहानशी रक्कम बटा लहानशी रक्कम बटा म्हणून कापून घेई. आता बटा [अथवा कमिशन] साधारणत: १ टक्का ते २ टक्के असे. पुष्कळदा बटा १.५ टक्का असे.[१५]

पेशवे सरकारने काढलेल्या हुंडीला **वरात** असे म्हणत असत. जेव्हा सरकारी नोकरांकडून सरकारला मोठया रकमांचे येणे वसूल करायचे असे, तेव्हा अशी वरात काढली जात असे. कमावीसदारांना आगाऊ दिलेल्या रकमा म्हणजे रसद रकमा ज्यावेळी वसूल करुन घ्यायच्या असत तेंव्हा अशा वरात **हुंडया** काढल्या जात होत्या. अशा प्रकरणांमध्ये रसद म्हणून दिलेल्या रकमेएवढया किमतीची **वरात** सरकारकडून सदर कामावीसदाराचे नावे काढली जात असे. पेशवे सरकारने [बेलापूरचे देशमुख] परशुराम रामचंद्र यांचे नावे रु. ३,३०० साठी काढल्याचा उल्लेख कागदपत्रातून आढळतो.

पेढयांकडून निरनिराळया कामांसाठी रक्कम कर्जाऊ घेण्याचा पेशवे सरकारचा सर्वसाधरण शिरस्ता होता. पेढीवाले वैद्य यांचे कडून इ. १७४० ते इ.१७४७ या काळात ज्यांनी कर्जाऊ रकमा घेतलेल्या होत्या. अशा ऋणको मंडळीच्या १५० जणांच्या यादीमध्ये नगरचे त्र्यंबकराव माणकेश्वर यांना आपल्या खात्यातून ९९० रुपयांची रक्कम देण्याविषयी लिहिलेले होते. सदर कार्यकाळ पेशवे सरकारांत श्रीमंत नानासाहेब पेशव्यांचा होता.

पेशवे सरकार आपल्या कामावीसदारांच्या नावे त्यांच्या रसदांसाठी वरात काढत असत व त्या वरात पेढीवाल्यांना विकून पैसा उभा करीत असत, हे आपण वरील परिच्छेदातून पाहिलेच आहे. या पध्दतीबरोबरच आपल्याला असेही आढळते की, कामावीसदार व इतर

सरकारी अधिकारी एखाद्या महालाची कमाविशी अगर मामलत आपल्या नावे सुरक्षित राहावी म्हणून सरकारला द्यावयाच्या ठराविक रकमा देण्याविषयी पेढीदारांना विनंती करीत असत. पेढीवाल्यांना बहुधा असे सांगण्यात आले होते की, काही विशिष्ट अधिका-यांकडून त्यांनी जहांगिरीचा महसूल गोळा करावा व ती रक्कम त्यांचेकडे ठेव म्हणून ठेवून घ्यावी. किंवा सूचनेप्रमाणे खर्च करावी. चिमणाजी नारायण सचिव यांनी वैद्य बंधू पेढीवाले यांना विनंती केली की, त्यांचेकडे भिकमशेठ यांचे बरेच दिवसांचे देणे असलेली रक्कम रु. २,००० त्यांनी भिकमशेठ सचिव यांचेकडे असलेल्या बीड प्रांताच्या महसूलाच्या रकमेतून देऊन टाकावी .[१६]

या पेढयांचे आणखी एक कामकाज म्हणजे आपल्या ग्राहकांना प्रसंगी एखादा व्यापार वा उद्योग सरु करण्यासाठी कर्ज देणे हे होते. राघोबा दारवे नावाच्या एका माणसाने अशा रितीने कर्जे देण्याविषयी वैद्य बंधूच्या पेढीकडे अर्ज केल्याबद्दलची नोंद आढळते.

साधारणपणे कर्जरोखा अगर वचनचिठी [Promissory Note] कर्जदाराने धनकोला लिहून द्यायची पध्दत होती. एखाद्या कर्जदार माणसाकडे कर्जाची परतफेड करण्यासाठी रोख रक्कम नसल्यास तो आपली एखादी स्थावर अगर जंगम मिळकत सावकाराला कर्जापोटी देऊन कर्जाच्या ओझ्यातून मोकळा होत असे. दिनांक ८ ऑक्टोबर, १७६८ रोजी झालेल्या एका नमुनेदार गहाणखतामध्ये ऋणको शिवाजी नरहर सहस्त्रबुध्दे - देशमुख यांनी धनको रामाजी बल्लाळ जोशी याला लिहून दिलेल्या पुढील तपशीलाची नोंद आढळते. ८,६०० रुपयांचे कर्ज दरमहा दरशेकडा १ टक्का व्याजदराने घेतलेले होते. व्याज कसे परत करावयाचे याबद्दल अगर अंशत: व्याज परत करण्याबद्दल काहीच अट लिहिलेली नाही. कर्जाची परतफेड अर्काटी नाण्यांमध्ये करावयाची होती. कर्ज ५ महिन्यांच्या मुदतीसाठी घेतलेले होते. त्या काळात व्याजाचा दरमहा दरशेकडा १ टक्का ठरलेला होता, पण कर्ज व्याजासह वरील मुदतीत परत न केल्यास, पुढे व्याजाचा दर दरमहा दरशेकडा २ टक्के पडणार होता. हे कर्ज रत्नखचित शिरपेच, माणिक, हिरे, सोन्याची अंगठी, मोत्याची

माळ इत्यादी सुमारे २,००० रुपयांचे दागिने, एक घर व ओंकारेश्वर मंदिराजवळील मोकळी जागा यांच्या गहाणावर दिलेले होते. हा व्यवहार करीत असताना दोन साक्षीदार हजर होते.[१७]

पेढयांचे मालक पेशवे सरकारशी दोन प्रकारच्या कर्जाचे व्यवहार करीत असत. पहिल्या प्रकारात कुठलेही तारण अथवा हमी न घेता पेशव्याला कर्ज दिले जात असे. पेशव्याला फक्त कर्जाऊ घेतलेल्या रकमेबद्दलचा व व्याजाच्या दराबद्दलचा [दरसाल दरशेकडा १२टक्यांप्रमाणे] कर्जरोखा लिहून द्यावा लागत असे. दुस-या प्रकारात सरकारला येणे असलेल्या महसूलापैकी काही भाग स्वत:च वसूल करुन घेऊ शकत असत. पेशवे सरकार त्यांच्या अधिका-यांना सावकाराच्या नावाने डिमांड ड्राप्ट [**हुंडया**] देत असत. त्यामध्ये येणा-या महसूलाची रक्कम कर्जापोटी सावकाराला देण्याबद्दलचे हुकूम अधिका-यांना दिलेले असत. अशा प्रकारच्या कर्जांना **मामलतीवरील कर्जे** असे म्हटले जाई. नगरमध्ये अशा पेढयांचे मालक वैकर, दुधाट, देशमुख इत्यादी आढळून येतात.

खासगी व्यक्तींना कर्ज देताना ते सोने, जमिनी, व घरांसारख्या मिळकतींच्या तारणावर दिले जात असे. ऋणको अशा व्यवहारांमध्ये धनको पेढीदारांना बहुधा कर्जरोखे लिहून देत असत. या रोख्यांमध्ये कर्जफेडीबद्दलचे वचन व कर्ज फेडण्याची पध्दत यांचा इतर गोष्टींबरोबरच अंतर्भाव केलेला असे. अशा प्रकारचे रोखे अथवा दस्तऐवज बहुधा तीन प्रकारचे असत. ते म्हणजे कर्जरोखा, वादारोखा, शरकतरोखा हे होत. अशा रोख्यावर साक्षीदारांच्या सहयांची जरुरी असे. कर्जरोख्यामध्ये ऋणको ठराविक हप्त्यांमध्ये व ठराविक कालावधीत [वायदा] कर्जफेडीची हमी लिहून देत असे, तर शरकत रोख्यामध्ये सावकार अगर धनको व ऋणको म्हणजे बहुधा एखादा शेतकरी यामध्ये शेतामधील उत्पन्न होणा-या मालाची अर्धी वाटणी करण्याबद्दलचा भागीदारीचा करार केलेला असे. इ. १७६४ मध्ये तयार केलेल्या पेशव्यांच्या सावकारांच्या यादीवरुन असे दिसते की, पेशव्यांनी ३० पेक्षा जास्त सावकारांकडून कर्जे घेतलेली होती. आणि त्या सावकारांच्या यादीत आबाजी नाईक काबरस, रामचंद्र नाईक परांजपे, शिवराम नाईक भिडे, शंकरपा नाईक अनगळ, गोपाळ नाईक कानडे,

महादोबा नाईक दामले, कृष्णाजी नाईक दातार, बाबूदेव पैठणकर आणि दीनानाथ नाईक महाजन यांची नावे आढळतात.

४.१ पेशवेकालीन अहमदनगर मधील व्यापारउदीम

पेशवेकालीन अहमदनगर हा भाग प्रथम मुस्लिम सत्ताधीशांच्या वर्चस्वाखाली होता आणि त्यानंतर मराठा सत्ताधीशांच्या अमलाखाली होता. महाराष्ट्राच्या आयात व्यापारामध्ये क्रयवस्तू आणि चैनीच्या वस्तू यांचा अंतर्भाव होत असे. अन्नपदार्थ, कापड, मसाले, औषधे, घोडे, तांबे, पारा आणि तत्सम वस्तूंचा समावेश क्रयवस्तूंमध्ये होत असे. मलमल आणि रेशीम कापड, मौल्यवान रत्ने, मोती आणि हत्ती यांचा समावेश चैनीच्या वस्तूंमध्ये होत असे. महाराष्ट्राच्या निर्यात - व्यापारामध्ये गहू, बाजरी, कापड, मलमल आणि डाळी यांचा समावेश होत असे.

४.२ पेठा व बाजार वसविणें

पत्र क्र. १

शेटये, महाजन व वाणी बाकाल व उदमी वगैर व्यवसाई कसबे मुखर्डे परगणे पाटोदें सरकार संगमनेर सुबे खुजिस्ते बुनियाद यांस कौल दिला ऐसाजे कसबे मजकुरी कदिम बाजार आहे, परंतु कित्येक कसाल्यामुळे बाजाराची वसाहत होऊन आमदानी होत नाही. याजकरितां साहेबीं कृपाळू होऊन कौल दिल्यानें बाजाराची आमदानी होईल व सरकाराचीही उगवणी होईल म्हणून. त्यावरुन बराये अर्ज खातरेस आणून तुम्हांवर कृपाळू होऊन व बाजाराचे आबादानीवर नजर देऊन येणेंप्रमाणें कौल सादर केला असे.

गांवचे कदिमकुळें हल्लीं वस्तीस आहे त्यास तीन वर्षे सालमजकुरापासून थळमोड व थळभरीत माफ केलें असें. घर देणें मात्र उदीम पाहून घेतलें जाईल. कलम नवें कूळ ज्या सालीं येईल त्या सालापासून थळमोड व थळभरीत पांच वर्षे पावेतों माफ केलें असे. व घर देणेंही ज्या साली कूळ येईल त्या सालापासून तीन वर्षेपर्यंत माफ केले असे. १

येणे प्रमाणें जुन्या कुळाचा व नव्या कुळाचा करार केला असे. तरी तुम्ही कोणे गोष्टीची शंका, अंदेशा न धरिता कसबे मजकूरचे बाजाराची वसाहत करुन आबादानी करणें. सदरहू कराराप्रमाणें कौलाची सालें भरलीयावर शिरस्ते खमोजी थळमोड व थळभरीत व घर देणें होतें जाईल त्याची उगवणी करुन वसवस न धरितां सुखरुप रहाणें. जाजती आजार लागणार नाही, अभय असे म्हणून कौल लिहून दिला असे.[१८]

४.३ पत्र क्र. २ सन १७५९ - ६० अहमदनगर, दौलताबाद येथे नव्या पेठेची स्थापना करणेबाबत अस्सल पत्र

जैसिंग वलद सुभा जाट, वस्ती शहर औरंगाबाद, याने हुजूर येऊन अर्ज केला कीं, किल्ले अमदानगर व किल्ले देवगिरी येथें नवी पेठेची वस्ती करुन बाजाराची अमदानी करावयास उमेदवार आहे. तरी साहेबी बाजारचे अमदानीवर नजर देऊन पांच वर्षे निम्मे हांशील रयतेस माफ व बाजारचें चौधरीपणाचें नूतन वतन आपणास करुन द्यावें म्हणजे उमेदवारीने रयत बेपारी आणून नवी पेठेची वस्ती करुन बाजाराची अमदानी करीन म्हणून त्यावरुन मनास आणून रयतेवर बाजारचे अमदानीवर नजर देऊन व तू सरकार चाकरीस उमेदवार, तुझे सरकारांत अगत्य जाणोन तुजवर कृपाळू होऊन हरदु जागा नव्या पेठा वसवावयाची आज्ञा केली असे. तरी खुष रजावंदिनें रयतेस पाळणें व दोन्ही बाजारचे चौधरीपणांचे वतन अनभवून सुखरुप राहणें. पांच वर्षे जाहालीयावर सुदामत शिरस्तेप्रमाणें हांशील देत जाणे. म्हणोन सनदा.

१ जेसिंग मजकूर याचे नावें

१. किल्ले अमदानगर येथील

१. किल्ले देवगिरी ऊर्फ दौलताबाद येथील खेरीज मुसलमान करुन वस्ती करणें

अमलदारांस की, नवा बाजार भरावयाशी जागा देऊन वस्ती करवणे. पांच वर्षे निम्मे हांशील माफ केला असे. निम्मे पांच वर्षे घेत जाणें पांच वर्षे जाहालीयावर शिरस्ते प्रमाणें हांशिल घेणें व जैसिंग मजकूर यास चौधरीपण दिले असे. तरी त्याजपासून सेवा घेऊन हरएक विषयी गौर करणें म्हणोन.

१. नारोबा बाजी यांस किल्ले अमदानगर [अहमदनगर] याविशी.

१. उध्दव विरेश्वर यांस किल्ले देवगिरी याविशी.

२ चिटनिशी कौल अभयपत्रे.

१ किल्ले अमदानगर येथील.

१ किल्ले दौलताबाद येथील खेरीज मुसलमान वस्ती करणें.[१९]

४.४ पत्र क्र . ३ कसबे वांबोरी तर्फ राहुरी येथे पेठा व बाजार वसविणें बाबत.

नागोराम उपनाम भागवत, गोत्र कपी, सूत्र आश्वलायन, यांचे नांवे सनद की, तुम्ही हुजूर कसबे पुणे येथील मुक्कामी विदीत केले. आपण स्वामिसेवा एकनिष्ठपणें बहुत दिवस केली त्यास स्वामींनी कृपाळु होऊन कसबे वामोरी तर्फ राहुरी परगणे संगमनेर सरकार मजकूर येथें सदाशिव पेठ नवी आपण श्रम साहस करुन वसाहत केली, तेथील शेटेपणांचे वतन नूतन आपणास करार करुन देऊन चालविले पाहिजे म्हणोन: त्याजवरुन मनास आणितां तुम्ही राज्यांतील पुरातन सेवक यास्तव तुमचें चालवणें आवश्यक जाणोन तुम्हावर कृपाळु होऊन कसबे मजकूर येथें सदाशिव पेठ नवी तुम्ही श्रम साहस करुन वसाहत केली तेथील शेटयेपणाचे वतन नूतन सरकारांतून तुम्हांस करार करुन देऊन वतनसंबधें हकदक मानपान बितपशील

कित्ता	कित्ता
१ भुसार केली हरजिन्नस दरगोणीस ..- दर गाडयास ..।।. येणे प्रमाणें दर बैली निठवे व गाडयास आधोली १ किराणा वजन पक्के हरजिन्नस. दर बैली वजन ..।।. दर गाडीस ..३ ।। दर बैली अच्छेर व दर गाडयास साडेतीनशेर १ डांका [डांक विशेष] घालील त्याजपासून	१ तेलियापासून ..।. दर घाण्यास दर आठवडयास तेल पावशेर तेल्याचे मापी. ...२।. बिछायती दुकानदार येतील त्यांस व बाजारकरी यांजपासून दर आसामीस दर आठवडयास. १ चांभाराचे दुकानास जोडा एक दरसाल.

नारळ विडा. १ तांबोळी यापासून दर बैली पानें सुमारे शंभर व दर रोज दर दुकानास पानें १३ तेराप्रमाणे १ शेटयाचे दुकानास व घरास पट्टी व वेठ बिगार व पालपट्टी नाही. १ पांती शेटयाची १ माळवे शेव वजन पक्के .।. दर गाडयास एकशेर ..१ दर बैली एकसेर ..१ मेवा द्राक्षे वगैरे आणतील त्यास दर बैली एकशेर. मोकळी भाजी बचक. निंबे वगैरे दर बैलास पंचवीस आंबे दर बैली दहा. १ पाट लागेल त्यास शेला व विडा. १ गोंधळास विडा वाटी व ऊंस फुले. १ बाजाराचे वाणी यांजपासून दर आठ वडा दर असामीस सुपा-या २ १ झेंडेपटी वर्षाभ-या. १ वैरण विकावयास येईल त्याजपासून पुले. १५गाडयास पंधरा ५दर कबाडास पांच १ ओझ्यास एक.	१ साळी कोष्टी दर माणसास दरसाल पासोडी सनंग .।।. निमे. १ गुडाखुवाल्यापासून दर दुकानास दोन चिलमांचा तंमाखू दर आठवडयास. १ दुकानदार व पालकरी वाणी यांजपासून दर असामीस दर सणास गूळ पावशेर. १ पेठेतून भुसार भरुन जातील त्यांजपासून दर गोणीस रुके २ दोन १ धनगर दुकानास चवाळे वर्षभ-या एक. १ पेठेंतील घर जागा व मिरासपत्रें केल्यास शेठयाची साक्ष घालून दर शेंकडा ५ पांच [रुपये]शेल्याबद्दल १ दिपवाळीस वाणीउदमी येतील त्यांनी भेट दर असामीस रुपया एक. १ दंड फुरोई शेठयाचे मार्फतीनें चुकवावी. १ पेठेंत शेटयाचे आधोलीनें व धडयाने माप व्हावें. १ बाहेरील उदमी वाणी येतील त्यांजपासून जीवन पाहून वार्षिक घ्यावें १ सूत व रेशीम व कापड जर मीना दर शेंकडा चवल. १ जोगी राऊळाच्या मागास, नवार वगैरे जिन्नस शेटयाचे घरास लागेल तो बिन मजुरी

२१ १ लांकडे विकावयास आणतील त्याजपासून सुमारें. ५दर गाडीस पांच १ दर मोळीस एक २ दर कबाडास दोन. ८ १ पाथरवटापासून जाते दर असामीस वर्षाभ-या. १ सरकारचा शिरपाव व विडा. १ सरकारचा शिरपाव व विडा १ पेठेंत जिनस विकावयास वाणी उदमी बिछाईत वगेरे येतात, त्यांचा निरख चौघे उदमी मिळोन शेटयाचे मार्फतीने करावा. १ शेटयाचे घरचें गुरुढोर मरेल त्याचा चरसा शेटयानें घ्यावा. १ पेठेंतील मान १ पोळयाचे बैल १ होळीची पोळी १ सणाचें वाजिवणें ३ १८ आठरा कलमे पेठेंतील दुकानें दोन तुम्हीं बांधिली आहेत,	विणून द्यावा. १ वार्षिक जिवन पाहून घ्यावें १ खिस्ती व शराफ १ बोहोरी सदरहू आसाम्यापासून १ सारे खेत्री यांजपासून शेला वर्षभ-या एक. १ सारे मोमिन यांजपासून वर्षभ-या पागोटों एक १ सारे बजाज मिळून वर्षभ-या लुगडें एक. १ नकाशावर दाखला शेटयाचा असावा, आकार होईल त्यास दर शेंकडा एक रुपया. १ सलतनगार यांनी शंभर सागळी विकल्यास एक सागळ द्यावी. १ गांवकुसूं दर असामीस चार गज करुन द्यावें . जिमा शेटयाचा. १ आठरा खूम व बारा बलुती यांनी जीवन माफक कामगिरी शिरस्तेप्रमाणें करावी. २२

तीं शेटेपणाकडे दिलीं असत.	

येणेप्रमाणे हकदक मान पान व दुकानें दोन वतनसंबंधें करार करुन दिल्ही असेत, तरी शेटेपणाचें वतन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेनें अनुभवून सुखरुप राहणें. वतन संबंधें तुम्हांकडे नजर रुपये १०० शंभर करार केले ते सरकारांत पोता जमा जाहले असेत म्हणोन. सनद १

याविषयी सदरहू अन्वयें सनदा व चिटणीशी पत्रें भोगवटीयास

१ मोकदम कसबे वामोरी परगणें संगमनेर सरकार मजकूर यास सनद.

२ चिटणिसीं

१ देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी परगणें संगमनेर सरकार मजकूर

२

दोन सनदा व दोन चिटणींशी पत्रे [२०]

४.५ पत्र क्र .४ सरकारात कागद गड्डयाचें खरेदीबाबत नारोबाबजी नगरकर, परगणे नेवासे यांस नानासाहेब पेशवे यांची सनद

नारोबाबजी परगणे नेवासे वैगरे माहाल यांस सनद की सरकारांत कागद गड्डयांचे प्रयोजन आहे कागद गड्डया सुमारे

१००० प्रत दर किंमत रुपये ११,१२,१३,१४,१५

१००० प्रत दर किंमत रुपये ७,८,९,१०

१००० प्रत दर किंमत रुपये ३,४,५,६

३०००

येणे प्रमाणे तीन हजार कागद गड्डयांचा दरकार आहे. त्यास शहाणा कारकून चवकस नेमून त्याजबरोबर माणसें देऊन कागद वाडयास पाठवून कागदवाल्याचे घरी माणसें बसवून कागद गड्डयांचे निमोणे [नमूणे] येथून आलाहिदा पाठविले आहेत. या प्रमाणे कागदाची लांबीरुंदी धरुन कागद चांगले बळकट मजबूद मोहरा बहुत होय या त-हेचे फर्माशी

लिहिल्याप्रमाणें किंमतीचे तयार करवून, जे तयार होत जातील त्याचा पैका वरचेवर देऊन कागद गड्डया हुजूर रवान करीत जाणे. सदरहु कागद गड्डया तयार होत तों दुस-यास कागद विकावयाशी प्रयोजन नाही. कागद फुटों लागल्यास अथवा निमोण्याचे लांबीरुंदीस कमजास्त जाहल्यास कागद माघारे बडा होतील आणि व्याजसुध्दां ऐवज कारागरापासून सरकारांत घेतला जाईल. कागदाची किंमत वाजवी द्यावी. आणि कागद लिहील्या प्रतीचे फर्माशी किफायतवार सरकारांत पडत असे तयार करवणे. वाजवी किंमत द्यावी. पैक्याविशी घसघस न करावी. येथून निमोन पाठविले आहेत हे लांबी रुदीचे नाही. तर या निमोन्याप्रमाणे कागद करतील याप्रमाणे कागद न करावे. या प्रमाणें लांब रुंद मात्र करावे. कागद जाडा मोहरा करुन बळकट न फटत ऐसे करावे. या कामावर चार महिले कारकून चांगला ठेवून पांच सात प्यादे कागद बहुत बेश फर्मासी करवणें. पैका देणें म्हणून परवानगी रुबरु १.[२१]

४.६ पत्र क्र.४ सरकारी दस्तक

मेंढराची खिलारे सरकारचे दस्तकाशिवाय आहेत, त्यांची चौकशी करण्याचे आदेश.

१ परगणे शेवगांव

१ तर्फ मानूर

१ परगणें अकोलें

१ परगणे कोतूळ.

१ प्रांत जुन्नर

१ प्रांत जुन्नर

१ प्रांत पारनेर

१ सरकार संगमनेर

१ परगणे कडेवळीत.

१ परगणे बारागांव नांदूर

१ परगणे नेवासें

एकूण दहा महाल वगैरे जागा मिळून चौकशी सांगितली असे, त्यास वनचराई घ्यावयाचा शिरस्ता.

खिलारे मोजून सरकारचें दस्तक असेल ते वजा करुन गैरदस्तकी असतील त्यांस वनचराई दर मेंढरास रुपये + पाव रुपया प्रमाणे घेणें उणे न घेणे, जाजती साधल्यास साधेल तें घेत जाणे. कलम १.

गेरदस्तकी मेंढरांस दरसदे दोन प्रमाणे घ्यावी.

१ सरकारांत घ्यावें

१ तुम्ही घेत जाणे.

तुम्हांस चौकशीची मामलत सांगितली असे, त्यास तुम्ही खासा व कारकून लिहिणार व प्यादे चौकशीस लागतील ते ठेवणें, त्यांस मोघम दोन चार महिने चौकशीस लागतील सबब मोघम खर्चास रुपये २०० करार करुन दिले असत. सदरहु ऐवज घेत जाणें कलम १

वनचराई व मेंढरें घ्यावयाचा करार करुन दिला असे, त्याप्रमाणे अमल चौकशीनें इमानें इतबारें करुन कच्चा हिशेब सरकारांत समजावणे. कलम १

येणे प्रमाणें चार कलमें करार करुन दिली असत. याप्रमाणें म्हणोंन, तुकोजी नाईक गायकवाड यास [२२] सनद १.

४.७ पत्र क्र. ५ समस्त साहुकार व रयत शहर अहमदनगर यांची गणेश विठ्ठल यांजपाशी करार

समस्त साहुकार व रयत शहर अमदानगर यांस सनद की, तुम्ही सालगुदस्तां मोगलाचे दंग्यांत गणेश विठ्ठल यांजपाशी करार केला की, दंग्यामुळे आमचीं मुलें माणसें व वस्तभाव किल्ले नगरांत व किल्ल्याचे पाळीस उतरी द्यावी, आणि आमचा बचाव करावा. म्हणजे आम्ही आपले सुखें एका रोजमरयाचा ऐवज रुपये १०००० दहा हजार तुमचे शिबंदी खर्चास देऊ.

याप्रमाणें करार केला, तो ऐवज अद्याप माशारनिल्हेस तुम्हीं दिला नाही. सबब हल्ली हे सनद तुम्हांस सादर केली असे, तरी कराराप्रमाणे सदरहू दहा हजार रुपये गणेश विठ्ठल यांजकडे वसूल देणें म्हणोन.

सनद १

सनद २

१ गणेश विठ्ठल तालुके अमदानगर यांस की, तुम्ही कराराप्रमाणें सदरहू दहा हजार रुपये वसूल करुन घेऊन सरकारचे हिशेबी जमा धरणें म्हणोन.

१ देशमुख व देशपांडिये तालुके अमदानगर यांस की, साहुकार व रयत शहरमजकूरचे यांनी करार केला असतां अद्याप ऐवज वसूल देत नाहींत. तरी तुम्ही ताकीद करुन सदरहू दहा हजार रुपये गणेश विठ्ठल याजकडे देणें म्हणोन. छ. १४ रजब [२३]

२ ३

४.८ पत्र क्र. ६ सन १७६४-६५ राघोबादादा यांची रोजकिर्द 'मोगलांची अहमदनगरवर फौज चालून येणार आहे त्यांच्यापासून संरक्षण करण्याबाबत मोगलांची खंडणी २०००० देण्याबाबत'.

सन सालासांत मोगलाची फौज आली ते समयी शहर अमदानगर येथील रयत वाणी, उदमी, सावकार वगैरे यांजकडे मोगलांची खंडणी रुपये. २०००० वीस हजार शिवराम राम कडेकर याचे मार्फतीने करार होऊन शिवराम यासी दरम्यान देऊन मशार निल्हेचे नांवे रोखा लिहून दिला. पुढे मोगलास ऐवज पावावा त्यास सरकारांतून मोगलांचे फौजेचे पारपत्य जाहलें त्यामुळे ऐवज पावला नाही. पट्टीपैकी वसूल जाहला तो सरकारांत घेतला. बाकी ऐवज राहिला त्यास शिवराम याजकडे तुमचा रोखा राहिला. याजकरितां. ऐवजाचा वसूल द्यावयास नवदिगर करिंता म्हणोन विदित जाहले. त्याजवरुन खंडणीचे करारापैकी विठ्ठल यांजकडे बेहडयास नेमणूक करुन दिली असे, तर बाकी पट्टीपैकी राहिली असेल त्याचा वसूल मशार

निल्हेकडे देऊन पावलीयाचें कबज घेणें म्हणोन तालुके नगर व हवेली येथील देशमुख व देशपांडे यांचे नांवे.

सदरहू प्रमाणें तर्फ हवेली व शहर अमदानगर येथील शेटे व महाजन व समस्त सावकार व रयत यांचे नावें [२४] सनद १

२

४.९ पत्र क्र. ७ सन १७७३-१७७४ सालचे अहमदनगर किल्ल्यातींल आर्थिक व्यवहार सांगणारे अप्रकाशित पत्र .

तेरीज येकुण जमा सुमारी सुमार कीले आमदानगर [अहमदनगर] सुमा अर्बा सभेन मया व आलफे

हात्यारे	आज सुमारी	बाा सदर
तांबे दागीने	१४७७।।.	१४७७
दगडी दागीने	१०४	१०४
हर जीनसी	१६७	१६७
	२१११।।।	१७०।।।
सीसे दागीने	१६५०७८।-	१६५०७८।-
चर्मी दागीने	५८९८९	५७०८९
लागडी दागीने	२१५४।।	१९५४।।
कापडी दागीने	८१३८।-	७४०५।-
लोखंडी दागीने	३५५४१।	३५४३२।
पीतली दागीने	१००	१००
पोलादी दागीने	१४	१४
कीता दागीने सुमार	१७	१७
पंचरसी	१	१
जस्ती दागीने	१	१

कांसे दागीने	३	३
तरटी दागीने	१३८	१२४
सुती दागीने	३८	३२

वरील रुपयांचा ऐवज किल्ले अहमदनगरमध्ये सन १७७३-१७७४ मध्ये होता. [२५]

४.१० पत्र क्र. ८ सन १७७५-१७७६ सालचे अहमदनगर किल्ल्यातील आर्थिक व्यवहार सांगणारे अप्रकाशित पत्र .

तेरीज खर्च साो मु।। कीले मजकुर कीले अमदानगर सुमा सीत सबैन मया व अलफे.

	नस्त	रुपये	खंडी
देवस्थाने	१९३।।।	१।।	०
शांतीखर्च	१००६	-	०
दप्तर खर्च	३७७	-	०
छावणी खर्च	१२६	।।।	०
भोजन खर्च	९००		०
देहनगी	५०३		०
रोशनाई	९३।।।		०
मेजवानी खर्च	३५।।।-।।।		०
संक्रात खर्च	१।-		०
दीपावली खर्च	६।।।		०
तुलसीपुजन खर्च	२		०
चांदरात खर्च	०		०
बर्कदाजी खर्च	०		०
उलफे खर्च	२६।।।-।।		०
हर्जे खर्च	१०२।।-		०
तेवज खर्च	१०२।।।		०

ईनाम खर्च	४९	०
××	××	××[२६]

४.११ पत्र क्र. ९ सन १७७५-१७७६ सालचे अहमदनगर किल्ल्यातींल आर्थिक व्यवहार सांगणारे अप्रकाशित पत्र .

राजमान्य

स्वारी राजश्री पंतप्रधान सुमा सलास

कीले अमदानगर बाकी साल गु।। ब।। हीसेब ब।। झडती अेन जीनस

सुमारी सुमार

१०५७९०।० तपसील

	कापडी		**तांबे**
५	थेल्या	१८	तपेली
४६	महमुदया	११	गुड
४१७२	थेल्या	३	घघाने
२५७।	खाद्या	७	तपेल्या
४	जाजगे	४	पराता
७	पडदे छीटी	१४	ताब्ये
७	पडदे सलाकदी	२	तराजु
३	खारवे	३	मोष
४	सत्रंज्या	६	दौती
५	बौर काबण्याच्या	१	वेल गरोल
२	टोप सलाकदी	१	सरणोस
७	तकीया मखमाली	१	तुजडे
५१	गलफे खार	१	घंटया
६	सुताडे	४	चंबु

३	गादया	७	बहुगुण्या
१०	पडदे खारव्याचे	३	तालबेल
६२८	थेल्या तोफी	१	अभीषेक पात्र
१	चौबच्या	१	कलस
१९	धागेय्या	७	घाघरी
३	रासीटया	१	देकच्या
१	घंटा टोप दमेदार	४	भवारे
२	असमान गीरया	४	रीकीळया
४	चादरा	११	गली
१	माहटीची खादी	१	तवली[२७]

४.१२ पत्र क्र. १० अहमदनगरचे पेशव्यांचे किल्लेदार नारो बाबजींचे व्यवस्थापत्र

इ.स. ३ आक्टोबर १७७५

यादी चिरंजीव राजश्री माधवराव यांसी नारो बाबाजी असीरवाद उपरी सन ११८५ मनमथ नाम संवछरे आपले शरीरी आज महिनाभर वेथा झाला आहे न जाने शरीराचा भरवसा नाही आपला धर्मांचा ऐवज अंतकाल वगैरे ठेविला आहे तो येणेप्रमाणे- धर्म करावा बी तपशील.

५०००	आपण जिवंत असता आपले हाते प्रायश्चित व हिरण्याव्दारा गोशत वगैरे प्रसंग आल्यास करवावे .
१००००	क्रियेस लावावे
२०००	मासीक वर्ष श्राध्द मिलोन
१०००	शभु भटाबरोबर चोरुन अस्ति पाठवाव्या त्याजबरोबर व त्यास द्यावे.

२००० कासीस प्रपंचामुळे तुम्हास जावयास अनुकूल पडणार नाही याजकरिता नारायण भट अभ्यंकर याजबरोबर शहाणा कारकून देऊन कासीस पाठवावे त्यसाजबरोबर द्यावे.

१५००० आपले गयावर्जन व कासीत येक गायीत्री पुर:श्चरण व किरकोल धर्म

५००० या सिवाय किरकोल धर्म कासीस अथवा आन्य क्षेत्री

४०००० सदरहू चालीस हजार रुपये धर्म जातीचा करार. या शिवाय कलमे

५००० राधाबाई सून तिजपासी बस्ता अदमासे पाचा सहा हजाराच्या आहेत यासिवाय कासीस गेली अथवा आपले बापाचे घरी [जनार्दनपंताची बायको] राहिली तर तीस रुपये द्यावे.

३००० तीर्थस्वरुप राजश्री दादाचे [बाळाजीपंत नारोबाबजी यांचे वडील बंधू] क्रियेस लावावे.

५०० भाचे सून रखमाबाईस वर्षास धर्माकरिता ५० रुपये देतच आहा पुढे तुम्हापासून जाईल तेव्हां तीस द्यावे.

३५००० तुम्ही आपले तिन्ही मुलाचे [यशवंतराव, रामचंद्रराव व मुलगी चिटकाबाई] लग्नास खर्च करावा.

५३५०० सदरहू प्रमाणे करार.

सदरहू रुपये जावून बाकी राहील त्यात तुम्ही विठोबाचे व त्याचे बायकोचे आपणपाशी ठेवून चालवावे पुढे तो थोर झाल्यावर कोण त्यास बीर देईल आणि तो तुम्हापासोन वेगळा निघो लागला तर बाकी निमे त्यास द्यावेत व तुम्ही निमे घ्यावे. कलम १[३९]

पत्र क्र. १ ते १० यामध्ये पेशवेकालीन अहमदनगर मधील आर्थिक व्यवहार स्पष्ट करणा-या अनेक नोंदी आलेल्या आहेत. नवीन पेठा वसवने, कागदांच्या गड्डयांचा पुरवठा करणे,किल्ल्यातींल आर्थिक व्यवहार यामध्ये आलेला आहे.

४.१३ सवाई माधवराव पेशवे यांच्या रोजनिशीत आलेल्या करांची यादी

१. मोहतर्फा [Tax on artisans,traders and carriers]

२. तरी [Farries]

३. जकात

४. जिनसांच्या खरकदीविक्रीवरील कर

५. लाकडे

६. घरपट्टी व म्हैसपट्टी

७. अबकारी

८. मच्छीमारी

९. कर्जपट्टी

१०. घासदाणा

११. किरकोळ

इ. करांचा उल्लेख सवाई माधवराव पेशवे यांच्या रोजनिशीत येतो.[२९]

४.१४ पेशवे काळात सोन्याचे व दैनंदिन वापरल्या जाणा-या वस्तुंचे पुढील प्रमाणे.

१. अष्टी सोन्याचा भाव मासे ८।। किंमत १० रुपये.

२. विडयाचे पाने ४००० दर १४०० प्रमाणें किंमत २।।।-

३. सुपारी ..२ शेर किंमत .।।.

४. ज्वारी १४ पायली किंमत १ रुपया

५. बाजरी १० पायली किंमत १ रुपया

६. हरबरे साहा पायली .१०

७. तूप दररुपयास ..३।.

८. तांदूळ १४ पायली रुपये ३.

९. गुळ ..३।।. रुपये .।।।. या प्रमाणे भाव लागला.

१०. कोल्हापुरातून आयात होणा-या तेलास चार शेरास एक रुपया भाव होता.

११. हळद दर एक शेरास ..४।।.

१२. मीठ एक शेरास एक आणा.

१३. कात अर्धाशेर .=

१४. उंट धुवावयाचा साबण पक्का एक शेर किंमत ९ आणे.

१५. अफू चौदा पैसे भार किंमत ३ रुपये.

१६. सोन्याचा भाव दर तोळयास रुपये ९।। व दर १२ व दर १३ प्रमाणे.

१७. तासगांव साखर दीड शेर किंमत सहा आणे.

१८. दुध .।. किंमत ८ आणे.

वरील नोंदी पेशवे काळातील आर्थिक व्यवहार स्पष्ट करतात.[३०]

४.१५ नारो बाबजी कामाविसदार परगणे पारनेर यांस पत्र की लग्नाचे प्रयोजनास सामान घेतले आहे. त्याचा निरख करार करुन सनद

१२८।।= कणीक कैली खंडी ६।३।।= दर रुपयास कणीक .१ प्रमाणे

३३।।। दाळ हरभरा कैली १।.।१ दर कैली .।।।

६.= दाळ तुरीची कैली ।.१।। दर .।।।१.

१२ बाजरी कैली .।।।. दर .१।.

२० हरभरे खंडी १ एकूण दर रुपये .१

.....

२००।। या प्रमाणे खर्च आलेला आहे. [३१]

४.१६ सन १७४९-५० मध्ये दुध,पालेभाज्यांचे दर पुढील प्रमाणे होते.

१. दुध १२ शेर १ रुपया

२. भाजी १ शेर ..६

३. मीरशेंगा १ शेर .१.६

४. दोडके १शेर ..९

५. कोथमीर १० पेडया ..९

६. लिंबे ३ ..३.

७. आलें १ शेर .३

८. कांदे पेंडया २ ..९ पोकळया पेंडया दोन ..३

९. कारली १. १,

१०. दुध भोपळा १ ..६

११. भेंडया १ शेर .१.६

१२. काळा भोपळा१ .४.६

१३. खरबुजे६ . १

१४. दूधपेढे पावणेदोन शेर १ रुपया.[३२]

३.१७ पेशवे काळातील हत्ती, बैल , उंट यांच्या किमती पुढील प्रमाणे.

१. आळंदीच्या बाजारातून ६ बैल जोड ६० रुपयास घेतल्याचा उल्लेख वाड डायरीत आलेला आहे.[३३]

२. शेषगीर रामराव वकील, सरकार श्रीरंगपट्टण यांणी पुण्यांत उंट १ नग किंमत रुपये २३० रुपयास खरेदी केला असे. त्याला जकात माफ केली आहे.

३. आपाजी गणेश यांनी हत्ती २ साडे अकरा हजार रुपयांस विकत घेतले आहेत त्यांना जकातीचा तगादा लाऊ नये [३४]

५. अहमदनगरचा सागरी व्यापाराशी संबंध :

पेशव्यांच्या अमलाखाली महाराष्ट्रामध्ये साखर, मसाले आणि सुकामेवा या वस्तू युरोपीय लोकांमार्फत चीन, अफगाणिस्तान, इराण आणि अंबोयना येथून आयात करण्यात येत असत. कोकण किना-यावर चौल, दाभोळ, राजापूर वगैरे मोठी बंदरे होती तर नागोठणा, मालाड, चिपळूण, रत्नागिरी, वेंगुर्ला, मालवण केलिये, बेलापूर, जंबुसार, पेण, पनवेल, कोलंबे वगैरे लहान बंदरे होती. कल्याण - भिवंडी येथे एक सुंदर बंदर होते आणि तेथे अनेक व्यापारी जहाजे भेट देत असत. या बंदरामध्ये वस्तू उतरवल्या जात असत. आणि

देशांतर्गत भागात दूर अंतरावर निरनिराळया बाजार पेठांमध्ये आणल्या जात असत. कधी कधी १०००० संख्या असलेले मोठ मोठी लमाणी लोकांचे काफीले या वस्तू वाहून नेत असत. पोर्तुगीजांकडून वसई आणि साष्टी जिंकल्या नंतर पेशव्यांनी ही बंदरे वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी या बंदरात स्थायिक होण्यासाठी व्यापा-यांना घरे व घरासाठी जागा दिली. तसेच जहाज बांधणीसाठी स्वंय प्रेरणेने पुढे झालेल्यांना मदत केली. उदा. पेशवे सरकारने अंजनवेल तालुक्यातील एक अधिकारी कृष्णाजी विश्वनाथ याला नवीन जहाज बांधण्यासाठी तीन खंडी लोखंड देण्याचे आदेश दिले होते. मेणबत्त्या, गुलाबपाणी, रंगीत काच, आरसे आणि इतर चैनीच्या वस्तू मुंबई, दमन आणि इतर बंदरामध्ये इंग्लीश, पोर्तुगीज अथवा डच लोकांकडून पेशवे खरेदी करत असत. घडयाळे, चष्मे, कॅमेरे, होका यंत्रे, कुलुपे, कागद, चहा आणि घोडा गाडया या वस्तू लहान प्रमाणात पेशवे आणि काही विशिष्ट लोक आयात करत असत. त्याच प्रमाणे चहाची भांडी [किटल्या], साबण, बंदुकीची दारु, शिसे आणि कापड या वस्तू परदेशाहून आयात केल्या जात असत. भारतातील युरोपियन वखारी मार्फत यातील काही वस्तू येत असत. उदा. बंदूकीची दारु आणि शिसे या वस्तू गोव्याहून येत असत. अर्मेनियन, डच, फ्रेंच आणि इतर युरोपिय लोक कापड आणत असत. नगरमध्ये प्रामुख्याने गोदावरी नदीच्या पात्रातून, मुळा, प्रवरा, घोड, भिमा नदीच्या पात्रातून वाहतूक झाल्याचे उल्लेख आढळतात.[३५]

कोकण प्रदेशातील समुद्रात भ्रमण करणारे कोणत्याही जहाजासाठी पेशवे सरकारकडून एक परवाना घ्यावा लागत असे. नाही तर ते जहाज प्रबळ आग्र्यांकडून जप्त केले जाण्याचा धोका असे. इ.स.१७५८ मध्ये शंकराजी केशव या वसई प्रांताच्या अधिकारा-याला घोगा येथील एका व्यापा-याच्या जहाजाला वेंगुर्ला येथील डचांच्या वखारीमध्ये कोकणच्या समुद्रातून जाण्यासाठी योग्य ते शुल्क घेऊन परवाना देण्याविषयी पेशव्यांनी सूचना दिल्या होत्या. इ.स.१७८५ मध्ये आनंदराव धुळप याने व्यापारी मालाने भरलेले एक जहाज जप्त केले होते. हे जहाज मस्कत येथील नरोत्तम जोशी याचे होते. व त्या जहाजासाठी पेशवे सरकारचा परवाना नव्हता. नरोत्तम जोशी मस्कतला जहाज घेऊन चालला

होता. चौकशी अंती असे समजले की त्याला आवश्यक तो परवाना देण्यात आला होता. परंतु जहाजाने मंगळुर सोडण्याआधी तो परवाना जहाजावर पोहचू शकला नाही . [३६]

५.१ अंतर्गत व्यापार :

अंतर्गत व्यापार दोन प्रकारचा होता - नदी मार्गाने होणारा व्यापार आणि खुष्कीच्या मार्गाने केला जाणारा व्यापार. व्यापारी ज्या वस्तूंचा वापर करत असत. त्या वस्तूंचे आठ विभागात वर्गीकरण करता येईल : अन्नपदार्थ, फळे, मसाले, धातू, कापड, प्राणी,चैनीच्या वस्तू आणि नित्याच्या वापरातील वस्तू. अन्नपदार्थामध्ये विविध प्रकारची धान्य उदा. तांदूळ, गहू, बाजरी, डाळी, मासे, मिरच्या, सुरण, दूध, गुलकंद, साखर, नारळ, गूळ, मीठ, तेल आणि तूप यांचा समावेश होत असे. फळांमध्ये केळी, खजूर, बदाम, आंबे आणि सुपारी यांचा समावेश होत असे. हळद, हिंग, आले, सुंठ, मी-या, वेलदोडे यांचा मसाले मध्ये समावेश होत असे. धातूंमध्ये जस्त, तांबे आणि शिसे यांचा समावेश होत असे. कापड विविध प्रकारचे होते आणि त्यात रेशमी कापड, धोतर आणि पासोडया यासारखे सूती कापड, जाडे भरडे कापड, रंगीत कापड, शाली, मलमल, साडया किनखाप, मखमल आणि कद यांचा समावेश होत असे. प्राण्यांमध्ये घोडे, उंट, बैल आणि म्हशी यांचा समावेश होत असे. चैनीच्या वस्तूंना फक्त एक लहान वर्गाकडून मागणी असे आणि त्यामध्ये युरोपमध्ये तयार होणा-या घडयाळ, दुर्बीण यासारख्या वस्तू, हस्तीदंती, कंगवे, रंगीत काचा, फर्नीचर आणि सौंदर्य प्रसाधने या सारख्या महाग वस्तू यांचा समावेश होत असे. रोजच्या वापरामध्ये फर्नीचर, लाकडी कंगवे, बूट, मातीच्या वस्तू यांचा समावेश होत असे. तंबाखूचा सुध्दा या यादीत समावेश करता येईल. मिरच्या कराचीहून आणि सुरण मुंबई येथून येत असे. खानदेशामधून पासोडया खरेदी करण्यात येत असत. शाली व गुलाबाचे अत्तर दिल्लीहून येत असे. सिहोर दुराहा येथून सुती कापडे येत असत. माहेश्वर येथून धोतरे येत असत. पैठण हे रेशमी कापडाचे केंद्र म्हणून प्रसिध्द होते. [३७]

पेशव्यांच्या काळामध्ये सुध्दा काही नदयांवर होडयांची वहातूक चालत असल्याचे अनेक उदाहरण आहेत. या नावांमधून थोडया अंतरावर वस्तू पोहचविल्या जात असाव्यात.

माहीम परगण्यामध्ये दांतिवरे नावाच्या ठिकाणी नावेतून वाहतूक चालत असे. पौडखोर तर्फ मध्ये जामगाव, कर्डे परगण्यातील सिन्नर झिराड तर्फ मधील मांडवे, खाडीवरील उंदेरी तालुका, घोडबंदर, ठाणे, भोगूर, नाशिक, राहूरी, संगमनेर, बेलापूर, देपूर आणि अशी - उंबरी याठिकाणी नावातून वाहतूक चालत असे. १७५५ मध्ये काही ठिकाणच्या कमाविसदारांना पेशव्यांनी १०० ते १२५ प्रवाशी नेता येतील अशा भक्कम नावा तयार करण्यास सांगितले होते. प्रत्येक नावेची किंमत ४०० ते ५०० इतकी असे. [३८]

यावरुन आपल्याला असे दिसून येते की, पेशवेकालीन अहमदनगरमध्ये जास्तीत जास्त व्यापार गोदावरी, प्रवरा, घोडनदी, भीमा या नद्यांमधून होत असे.

अंतर्गत व्यापार जलमार्गाने, घाटातील रस्त्यात आणि खुष्कीच्या मार्गाने अशा तीन मार्गाने चालत असे. पठारावरील खुष्कीच्या मार्गाइतकाच महाराष्ट्रातील घाटातील रस्ताही महत्वाचा आहे. या घाटमार्गावरील वाहतुकीचे नियत्रंण करण्यासाठी, प्रवाश्यांच्या काफील्यांना संरक्षण देण्यासाठी आणि प्रवाशांकडून वाहतूक कराची वसूली करण्यासाठी या घाटातील रस्त्यावर ठिक -ठिकाणी जकात नाकी होती. प्रत्येकावर **घाटपांडे** नावाचा एक अधिकारी असे. आणि या अधिकारा-याला **मोधवी, पानसरे, पथकदार, बिडवई, गुजर आणि गुमास्ते** हे अधिकारी मदत करत असत. घाटमार्ग रस्ते सुस्थितीत ठेवणे हे मोधवी या अधिका-याचे काम असे. एका चौकीपासुन दुस-या चौकीपर्यंतच्या घाटातील रस्त्यातील प्रवाशांना संरक्षण देणे हे पथक अथवा पथकी याचे काम असे. पथकीच्या या कामामध्ये गुजर हे शिपाई मदत करत असे. **बिडवई** हा मूलत: बाजारावरील अधिकारी होता. बाजारात येणारे व्यापारी कुटुंबाची यादी तो ठेवत असे. बाजारामध्ये येणा-या फिरत्या व्यापा-यांना संरक्षण देणे आणि व्यापार व्यवहार पूर्ण होई पर्यंत वाहणाकडे लक्ष ठेवणे हे त्याचे काम असे. फिरते व्यापारी घाट मार्गावरुन ये जा करत असत. तेव्हा पासून बिडवई लोकांना त्यांचे काम करावे लागत असे. त्यांच्या जवळ ठेवलेली व्यापारी कुटूंबाची यादी घाटपांडे लोकांना देणे हे त्यांचे काम असे. सरबिडवई यांच्या देखरेखीखाली बिडवई काम करत असत. गुमास्ते किंवा मुतालिक हा घाटपांडेचा कारकून म्हणून त्याच्या हाता खाली काम करत असे. प्रवाशांना

संरक्षण देणे आणि त्यांच्या कडून वाहतूक गोळा करणे अशी दोन कामे चौक्यांना करावी लागत असत. वाहनाचा प्रकार आणि व्यापारी मालाचे वजन यावर वाहतूक कर अवलंबून असे. उंबरे नाक्यापाशी नऊलाख दाम इतकी रक्कम गोळा होत असे. त्यामुळे त्याला **नवलाख उंबरे** असे म्हणण्यात येत असे. इतर काही ठिकाणी बावीस लाख दाम इतकी सुध्दा रक्कम जमा होत असे . [३९]

५.२ टपालसेवा :

एका जागेहून दुस-या जागी बातमी पाठविण्यासाठी टपालसेवा उपलब्ध होती. निरोप किंवा जासूद खुष्कीच्या मार्गाने पाठवण्यात येत आणि सागरी मार्गाने जाणारी पत्रे जहाजातून जात असत. सुरुवातीच्या काळामध्ये दोन प्रकारे टपाल जात असे. सरकारी टपाल आणि व्यापारी टपाल कल्याण ते काशी, कल्याण ते मुंबई, पुणे ते नाशिक, त्र्यंबक, ग्वाल्हेर ते सातारा, पुणे ते दिल्ली, माहेश्वर ते दिल्ली हे टपाल मार्ग अहमदनगर सुभ्यातून किंवा प्रांतातून जात. काही ठिकाणी उंटावरुन टपाल वाहतूक करण्यात येत असे. दिल्ली ते पुणे असे टपाल पोहचण्यास सुमारे सत्तावीस दिवस लागत असत. टपालाचा दर साधारण दोन रुपये प्रती दिवशी असा विशेष आणि तातडीच्या बाबतीत असे. टपालाच्या वजनाप्रमाणे त्यावर आकारण्यात येणारा दर आवलंबून असे. पेशव्यांनी एखाद्या ठिकाणी छावणी उभारली असली अथवा त्यांचा प्रवास चालू असेल तर तात्पुरती टपाल व्यवस्था करण्यात येत असे .

इ.स.१७५४ मध्ये लाला नाईक वंजारा नावाचा एक फिरता विक्रेता गुजराथी प्रांतातील उलपड परगण्यातून ओझी वाहू बैलावरुन माल वाहून नेत होता. त्यावेळी टेकडयांमधील भागात दोन दरोडेखोरांनी त्याच्या जवळील चार हजार रुपये लुटून नेले. आणखी १५०० रुपये त्यांना देण्याबाबत कबूली घेतली. त्याने तक्रार केल्यावर पेशवा सरकारने नंदुरबार परगण्यामधील अधिका-यांना दरोडेखोरांकडून पैसे परत मिळवून लाला नाईक वंजारा याला परत देण्याचे आदेश दिले, ही रक्कम परत देताना त्या व्यापा-याच्या सूचने प्रमाणे एक चतुर्थांश रक्कम सरकारकडे जमा करण्याविषयी सुचना देण्यात आली.[४०]

४.३ व्यापारी केंद्रे :

अनेक नागरी केंद्रे आणि बाजार पेठा यांचे अस्तित्व हे भरभराटीला येणा-या व्यापारासाठी आवश्यक असते. अशा नागरी केंद्रावर देशाच्या व्यापाराचे मान अवलंबून असते. इतर ठिकाणा प्रमाणेच मध्ययुगीन महाराष्ट्रात निरनिराळया शहरांची उदा. पुणे, सातारा, कोल्हापूर यांची साम्राज्याची राजधानी म्हणून वाढ झाली. कायगाव टोका, नाशिक, पैठण यांची तीर्थक्षेत्रे म्हणून वाढ झाली. तर येवला, सोलापूर यांची औदयोगिक क्षेत्रे म्हणून वाढ झाली. जुन्नर आणि नंदूरबार यांची मोक्याची जागा म्हणून मोठी वाढ झाली. ब-हाणपूर व मिरज यांची महामार्गावर वसलेली शहरे म्हणून वाढ झाली. एकेकाळी पैठण हे एक औद्योगिक केंद्र होते. तसेच ते एक तिर्थयात्रेचे ठिकाण होते. अशा प्रकारे मुख्यत्वेकरुन राजकीय, धार्मिक, सैनिकी तसेच औद्योगिक हेतू हा शहराच्या वाढीसाठी कारणीभूत होता. पुण्याप्रमाणेच इतर शहरांची सुध्दा नवीन पेठ वसविल्यामुळे आणि सरकारच्या प्रोत्साहक दृष्टीकोणामुळे वाढ होत होती. बाळाजी बाजीरावच्या काळात अहमदनगर परगण्यातील कोपरगाव, संगमनेर, श्रीगोंदे [चांभारगोंदे], राशीन, नगरभागातील नवीपेठ हे प्रसिध्द व्यापारी केंद्र असल्याचा उल्लेख आढळतो. नवी व्यापारी केंद्र वसविण्यासाठी पावले उचलण्यात आली. तर काही ठिकाणी टांकसाळ उघडण्यात आल्या. इ.स१७५१ मध्ये बैलांची किंमत १० रुपये होती. इ.स १७७१ मध्ये सुमारे १६ रुपये होती. इ.स १७७८ मध्ये २० रुपये होती. इ.स १७८६ मध्ये १५ रुपये होती सोन्याचा भाव प्रत्येक तोळयाला ९-८-० रुपये ते १५-२०-० रुपये असा बदलत असे. [४१]

५.४ अधिका-यांचे पगार

काही अधिका-यांच्या पगारासंबंधीचा तपशील आपण पाहू. इ.स १७७५ मध्ये एका जमादाराचा पगार १५ ते २० रुपये प्रत्येक महिन्याला असा होता. इ.स १७८५ मध्ये घोडदळातील एका माणसाचा अथवा राऊताचा पगार १२ रुपये होता. त्याच काळात एका सरदाराचा पगार १० रुपये होता. इ.स १७७५ मध्ये एका शिपायाला ८ रुपये मिळत असत. अशा रितीने आपण एखाद्या मध्यम वर्गीय माणसाचा सरासरी पगार २० रुपये मानला तर तो चाळीस शेर तांदूळ खरेदी करण्यासाठी एक रुपया, सोळा शेर गहू अथवा पीठ यासाठी १

रुपया, आठ शेर गुळासाठी १ रुपया आणि इतर गोष्टी विकत घेण्यासाठी १ रुपया असा खर्च करत असे. ४ रुपये खर्च करुन आणलेले हे सामान एका विभक्त कुटुंबाला साधारणत: १५ दिवसांसाठी पुरत असे. त्यामुळे प्रत्येक महिन्याला ८ रुपये पुरेसे होत असत. उरलेल्या १२ रुपयातील ४ रुपये कापड विकत घेण्यासाठी किंवा भांडी विकत घेण्यासाठी खर्च करु शकत असे.

६.१ अहमदनगर आणि व्यापार :

थेवेनॉट टॅव्हर्निअर, इंग्लीश वखारींचे आधिकारी या सर्वांनी मध्ययुगीन महाराष्ट्रातील रस्त्यांच्या असुरक्षित अवस्थेबद्दल वर्णन केलेले आहे. पूर्वी दर्शवल्या प्रमाणे जकात करात वाढ अगर कपात करुन सरकारला व्यापारावर नियंत्रण ठेवता येऊ शकत असे. इ.स१७६४ मध्ये दस-याच्या उत्सवासाठी [सणासाठी] किराणा माल व इतर गरजेच्या वस्तू अधिक प्रमाणावर वापरल्या जात असल्याचे पाहून सरकारने पुणे प्रांत व जुन्नर येथील जकात कमाविसदारांनी तूप, गुळ, तेल, हळद आणि तत्सम वस्तूंवर नेहमीच्या दराच्या अर्धा जकातदर घेण्याची सूचना केली होती. त्यांचा पुरवठा वाढविण्या करीता अशी सूचना करण्यात आली होती. कमावीसदारांना इ.स१७८६ मध्ये दिलेल्या एका सनदेमध्ये जकातीच्या जमेनीसाच्या कर्तव्याबाबत माहिती दिलेली आहे. त्याच्या कर्तव्यांमध्ये मामलतदाराच्या आज्ञेनुसार आकारल्या जाणा-या जकातीचा दर ठरविणे, याबाबतीत मुजुमदाराच्या सहीनिशी, मामलतदारच्या संमतीने स्मरणपत्रे पाठविणे आणि मामलतदाराच्या शिक्क्याचे कौल व्यापा-यांना लिहिणे या गोष्टींचा समावेश होत असे. इ.स १७७० मध्ये व्यापा-यांनी हा कर जाचक होत असल्याबद्दल निदर्शने केल्यांनंतर सरकारने तो रः केला इ.स १७७८ मध्ये सरकारने मालाच्या वाहतूकीवर जकाती शिवाय आणखी एक कर घेण्यास सुरुवात केली, याला हुंडया - भाडे असे म्हणण्यात येत असे.

संदर्भ :

१. डॉ. कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान , श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती - फेब्रुवारी २०११, पृ.१८,१९

२. चिटणीस.कृ.ना., मध्यकालीन भारतीय संस्था आणि संकल्पना भाग ४ चलन व्यवस्था व पेढी व्यवहार, समर्थ मुद्रणालय, मुंबई २००७, पृ. ९१

३. पारसनिस डि.बी. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, खंड, २ गव्हर्नमेंट बॉम्बे प्रकाशन सन १९०६ पृ. ९७

४. चिटणीस.कृ.ना., मध्यकालीन भारतीय संस्था आणि संकल्पना भाग ३ व्यापार व उद्योगधंदे , समर्थ मुद्रणालय, मुंबई २००७, पृ. ३५

५. कित्ता पृ. ३७

६. कित्ता पृ . ३९

७. कित्ता पृ. ४०

८. कित्ता पृ. ४०,४१

९. कित्ता पृ. ४३

१०. चिटणीस.कृ.ना., मध्यकालीन भारतीय संस्था आणि संकल्पना भाग ४ चलन व्यवस्था व पेढी व्यवहार, समर्थ मुद्रणालय, मुंबई २००५, पृ. ७५

११. कित्ता पृ. ७५

१२. कित्ता पृ. ७७

१३. कित्ता पृ. ८५

१४. कित्ता पृ. ८९

१५. कित्ता पृ. ९०

१६. कित्ता पृ. ९३

१७. कित्ता पृ. ९५

१८. पारसनिस डि.बी. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, खंड, २ गव्हरमेंट बॉम्बे प्रकाशन सन १९०६ पृ. १३४,१३५

१९. पारसनिस डि.बी. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, खंड, २ गव्हरमेंट बॉम्बे प्रकाशन सन १९०६ पृ. १३८,१३९

२०. रावबहादूर वाड गणेश चिमणाजी, माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, मुंबई सरकार सन १९११ पृ. २८४

२१. रावबहादूर वाड गणेश चिमणाजी, माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, मुंबई सरकार सन १९११ पृ. ९६

२२. रावबहादूर वाड गणेश चिमणाजी, माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, मुंबई सरकार सन १९११ पृ. १०१

२३. कित्ता, पृ. १०२

२४. कित्ता, पृ. १०३

२५. पेशवा दप्तर, नगर जमाव, किल्ले अहमदनगर पत्र १११,११२

२६. कित्ता पत्र १६६

२७. कित्ता पत्र १७०

२८. के.एन . चिटणीस , सोशो इकोनॉमिक हिस्टोरी ऑफ इंडिया, अटलांटीक प्रकाशन, २००९, पृ.१४४

२९. नगरकर चिंतामण लक्ष्मण, नारोबाबजी अभ्यंकर नगरकर, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, सन १९६८ पृ. ३०,३१

३०. रावबहादूर वाड गणेश चिमणाजी, सवाई माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, मुंबई सरकार सन १९०९ पृ. ३१७

३१. पारसनिस डि.बी. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, खंड, २ गव्हरमेंट बॉम्बे प्रकाशन सन १९०६ पृ. १८०

३२. पारसनिस डि.बी. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, खंड, २ गव्हरमेंट बॉम्बे प्रकाशन सन १९०६ पृ. १८२

३३. पारसनिस डि.बी. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, खंड, २ गव्हरमेंट बॉम्बे प्रकाशन सन १९०६ पृ. १८३

३४. कित्ता पृ. १८३

३५. चिटणीस.कृ.ना., मध्यकालीन भारतीय संस्था आणि संकल्पना भाग ३ व्यापार व उद्योगधंदे , समर्थ मुद्रणालय, मुंबई २००७, पृ. १०६

३६. कित्ता पृ. १०७

३७. कित्ता पृ. १११

३८. कित्ता पृ. १११

३९. कित्ता पृ. ११३

४०. कित्ता पृ. ११६

४१. कित्ता पृ. ११८

प्रकरण ४ भाग २

सांस्कृतिक व धार्मिक परिस्थिती

पेशवेकालीन अहमदनगरची सांस्कृतिक, धार्मिक परिस्थिती

प्रस्ताविक :

अहमदनगर शहराची सांस्कृतिक परिस्थिती ख-या अर्थाने निजामशाहीपासून उजेडात आली. या शहरात अनेक धर्मांचे मिलन झाले तसेच सांस्कृतिक देवाणघेवाण झाली. भारतातील अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्राला अधिक वैभवशाली संत व नाथ परंपरा लाभलेली आहे . अहमदनगर जिल्हा आजही संताची कर्मभूमी म्हणून प्रसिध्द आहे. संताच्या कृपेमुळे जिल्हयातील लोकांचे जीवन आनंदी झाले. महाराष्ट्रातील विशेषत: अहमदनगरमधील संतानी केवळ धर्मप्रसार केला नसून विस्कळीत झालेल्या समाजात संघटन निर्माण केली व ज्या प्रभावी मातृभाषेच्याव्दारे त्यांनी हे संस्कार व संघटन घडविली ती भाषा म्हणजेच नागरी मराठी होय. मराठी भाषा हे संस्कृत भाषेचेच अपत्य आहे. परंतु तत्कालीन कालपरिस्थितीनुसार संस्कृतचे अध्ययन करणे ही एका विशिष्ट वर्गाचीच मिरासदारी असल्याने बहुजन समाजाची भावणिकदृष्टया फार कुचंबणा होऊ लागली. ही कुचंबणा दूर करण्याचे व नागरी मराठी बोली प्रचारात आणण्याचे श्रेय व सर्व समाजात बंधुभाव व एकात्मता आणि प्रेम निर्माण करण्याचे श्रेय अहमदनगर जिल्हयातील सर्व संतांना द्यावे लागेल.

प्राचीन काळापासून अहमदनगर जिल्हयाचे सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक क्षेत्रात महत्त्वाचे योगदान आहे. संतश्रेष्ठ एकनाथ हे नगरवासियांना अगदी जवळचे वाटतात. नगर शहरातील मिरावली बाबा, शाहशरीफ, पुणतांब्याचे चांगदेव, मुंगीचे विसाबा खेचर, पैठणचे जगन्मित्र नागा, राशीन येथील केसरीनाथ, मांडवगणचे जयरामस्वामी, बारामतीचे दामाजी पंताचे चिरंजीव अरणगावचे बुवाजी बुवा, पिंपळनेरचे निळोबा, सुप्रसिध्द संत चरित्रकार महिपतीबुवा, देवदैठणचे निंबराज महाराज, श्रीगोंदयाचे शेख महंमद, रामदास परंपरेतील दिनकर स्वामी, पैठणचे शिवदिन - केसरी शिवचरित्रकार परमानंद, नगरचे जयराम नाना देशमुख, बाळाजी बुवा ही नगरमधील सर्वश्रेष्ठ संत मंडळी म्हणून प्रसिध्द होती. यातून

समाज एकवटला समाजात. सर्व धर्माचे आश्रय स्थान हे मठ, मंदिर, दरगाह होऊ लागले . यावर मुबलक लिखाण समोर येण्यास सुरुवात झाली. भक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ झाली.[२]

इतिहासाच्या आलेखात सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक प्रगतीच्या वाटा मानवाने कशा चोखाळल्या, त्यामध्ये कशी प्रगती केली हा ही एक भाग आहे. मानवी जीवनाचा आलेख काढताना तो सर्व समावेशक असावा ही संकल्पना दृढ झालेली आहे. स्वाभाविकच इतिहास अभ्यासाच्या कक्षा रुंदावल्या आहेत, अभ्यासाची क्षितिजे विस्तारलेली आहेत व संपूर्ण मानवी जीवन आपल्या कक्षेत घेण्याचे सामर्थ्य इतिहास पुरुषाने सिध्द केलेले आहे. त्यामुळे इतिहासाशी निगडीत असलेली परंतु पारंपारिक अभ्यासापेक्षा थोडी वेगळी आगळी वाट या ठिकाणी निवडलेली आहे. मानवी जीवन हे केवळ अन्न , वस्त्र व निवा-यापुरते मर्यादित नसते तर त्या जीवनाला एक सांस्कृतिक अंगही असते. संस्कृतीचा विकास म्हणजे पर्यायाने अप्रत्यक्षरित्या माणसाचाच विकास आहे. हा दृष्टिकोन आधुनिक काळात तज्ज्ञांनीही मान्य केला आहे. मानवाच्या प्राथमिक व आवश्यक गरजा संपल्यानंतर सांस्कृतिक गरजांची जाणिव तीव्रतेने होऊ लागते व ही गरज पारंपारिक जीवनमूल्यांवर ज्याप्रमाणे आधारित असते, त्याचबरोबर बौध्दिक विकास देखील आधारित असतो. पार्थिव व भौतिक गरजा संपल्यानंतर अधिभौतिक व आत्मिक विकासाचीही गरज माणसाला असते. म्हणूनच मानवी लोकजीवनाचा विकास होणे आवश्यक आहे. तोही सांस्कृतिक, धार्मिक, अध्यात्मिक विकास होऊन धार्मिकतेचा एक भाग म्हणून अहमदनगरचा सांस्कृतिक इतिहास अभ्यासणे हे क्रमप्राप्त ठरते.

अहमदनगर जिल्हा हा संतांचा जिल्हा म्हणण्यात कोणतीही अतिशयोक्ती नाही. या जिल्हयांतील प्रत्येक तालुक्यांत अनेक साधूसंत होऊन गेले व त्यांनी आपल्या प्रवचनात व लेखनाव्दारे समाजास उपकृत करुन ठेविलें हे पुढील काही संताच्या नामनिर्देशावरुन दिसून येईल.

नेवासा : ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली.

कोपरगांव : चांगदेव

पाथर्डी : नाथपंथीय संत कानीफनाथ [मढी]आदिनाथ [वृध्देश्वर], दिनकर स्वामी [तीसगांव] स्वानुभव दिनकरकर्ते

शेवगाव पैठण : श्रीएकनाथ, कृष्णदयार्णव, शिवदिन केसरी, श्रीसंत बिहरापिसा, जात वेद बहिरु

राहुरी , बेलापूर : महिपती बुवा ताहाराबादकर , भानुदासबुवा बेलापूरकर

श्रीगोंदा : शेख महंमद , हरीभक्त परायण प्रल्हादबुवा महापुरुष , श्री संत कैकाडी महाराज.

पारनेर : निळोबाराय , पिंपळनेर

कर्जत : गोदेड महाराज

जामखेड : हरी नारायण [आष्टा]

नगर : गोरक्षनाथ, निजानंद भैरवी, हणमंत शंकर कुलकर्णी, जयराम नाना देशमुख, गरीबदास, दासगणू, हरीभक्त परायण बाळाजी बुवा, सखारामबुवा महिपतबुवा ठाकर, बापूशा वली, खाकीदास बुवा, बुवाजी बुवा अरणगांवकर, तापीदासबुवा

अहमदनगर हा जिल्हा जसा नावाने मोठा त्याचप्रमाणे संतांचे कार्यही मोठे होते. या संतांच्या त्यांच्या पावन वाणीच्या माध्यमातून समाज एका छताखाली आणण्याचे महत्त्वाचे काम या संत मंडळींनी केले आहे. यातून मोठया प्रमाणावर लिखीत साहित्य, धर्म ग्रंथ यावर पुन्हा लिखाण झाले. विशेष म्हणजे हे लिखाण नागरी भाषेत झाले. यामुळे नगरच्या सांस्कृतिक इतिहासात वरील संतांचे मोठे योगदान आहे.

१. पेशवेकालीन अहमदनगरच्या सांस्कृतिक जीवनाचे वर्णन करणारे सदाशिव आठवले यांचे तुळशीबागवाले दप्तर यात आलेले उल्लेख .

पत्र क्र. १

श्री

तालिक १/२

तान्हाजी सोमनाथ

फरकती शके १६८२ विक्रमनाम संवछरे जेस्ट सुध प्रतिपदा गुरुवार ते दिवसी जिवाजी बिन सुभानजी पा.व्हिले मौजे डुडलगाव ता.हवेली प्रांत पुणे यास संक्राजी व बारकोजी बिन रुपाजी पा व्हिले मौजे मा सन हजार ११६९ कारणे फरखती लेहून दिल्ही येसीजे पूर्वी आम्ही उभयेता भाऊ येकवट होतो. आम्ही व तुमचे बाप मौजे कोल्हार व भगवती .. प्रांत संगमनेर येथील जकातीचा धंदा करीत होतो. तो ते समई राहादारीयाच्या वाणियाची गोणी गयाल (घायाळ)जाली. ते येमाजी यादव यास सापडली. त्याने वाणियाची वाणियास दिल्ही. त्या गोष्टीस चाळील पंचेचाळीस वर्षे चाली असतील. सांप्रत या चौपाचा [चार पाच] वर्षात तुमची आई व तुम्ही हरमोजी व्हीले यसी कजिया करु लागलेस की तुम्ही वाणियाची गोणी चोरली त्याबद्दल आपल्या बापास बारा रुपये पडले. तुम्ही बीजबदल गहू हरमोजी व्हीले यापासून कैली ७१७२ चौदा पायली वढीने घेतले त्यास सात वरशे जाली. सदरहू कजियाबदल गहू द्यानासे जाले त्याबदल हरमोजाचा व तुमचा कजिया राजश्री -------- हवालदार ता.हवेली सांडस यांसपासी पडला. त्यांनी मौजे फुलगाव ता.मजकूर गोत दिल्हे. गोताने मौजे कोल्हार व भगवतीपूर येथील पाटीलास आपल्या माणसाबरोबर सड पाठविली. त्यानी उत्तर पाठविले की, वाणियाची गोणी गायबली होती ते येमाजी यादव यास सापडली. ते वाणियाची वाणियास दिल्ही. गोणीचे बारा रुपये जिवाजीच्या बापास पडले नाहीत म्हणून उत्तर पाठविले. त्यावर तुम्ही मौजे कोल्हारास जाऊन त्यांचा कागद राजेश्री हवालदारास आणिला की दोघास आम्हा पावेतो पाठऊन देणे आम्ही दोघांचेही निर्मल करुन देऊ. त्यावरुन राजेश्री हवालदारांनी हर दोन जनास आज्ञा केली की जो खोटा होईल त्याने गुन्हेगारी द्यावी यैसे कतबे देणे. त्याजवरुन तुम्ही अर्ज केला की मौजे कोल्हारास कशास पाठविता. संक्राजीबावाने शपथ करुन सांगावे की, तुझ्या बापास बारा रुपये पडले नाहीत. म्हणजे आपण भांडण भांडतो ते खोटे. त्यावरुन संक्राजी पाटीलास आणून सदरहूप्रमाणे शपथ करता की काये म्हणून पुसिले. त्यावर आम्ही शपथ करितो म्हणून कबूल केले. आमचे शपथेस

तुम्ही राजी होऊन राजीनामा लेहून दिल्हा. त्याजवरुन राजेश्री हवालदारांनी देशमुख व देशपांडे यांचे विद्यमाने भंडार जोधले व तुलसी आणून आम्हापुढे ठेविल्या. त्याजवर आम्ही हात ठेवून बोलिलो की, काजियाचे गोणीबाबत बारा रुपये तुमच्या बापास पडले नाहीत म्हणोन शफत केली. त्यावरुन तुम्ही बारा रुपयाचे भांडण भांडत होतास ते लटके जाले. व आमचे गहू बीजाबदल चौदा पायेली वढीने घेतले होते त्याची वाढ साल वर्षाची दुपट जाली होती, परंतु पांचानी तिपट गहू ३।। साडेतीन मण तुम्हांपासून आपणांस देविले. ते तुम्ही आपणांस दिल्हे. याउपर आमचा गव्हाचा कजिया तुम्हावर राहिला नाही व तुमचा बारा रुपयांचा कजिया आम्हावर राहिला नाही. कजियाविसी अर्थाअर्थी समध नाही. फिरोन कजिया करील तर गुन्हेगार हे फरखती लि।। सही[१]

नि।। नागर

आपाजी रघुनाथ अण नि।। उमाजोसी कुलकर्णी मौजे माार

गोही

भिवजी बि रायाजी घुले
मौजे माजरी बु।। ता.हवेली १

सुभानजी बिन संताजी घुले
मौजे माजरी बु।।१

१.२ पत्र क्र. २

श्री

नकल

शके १६८३ ब्रशा नाम सवतछरे जेष्ट वद्य ७ सन हजार ११७१ ते दिवसी राजश्री श्री बालकृष्ण आपाजी व नारो आपाजी खिरे खोकदम चौथी तक्षीम वडीलपण दरोबस्त मौजे कोकमठाण मय मजरे कंचनपुर पाा कुंभारी यासी मूल वाा येमा माहारा व मोधा व।। सटवनाक व केरु वाा जाननाक व पुंजा वाा मुगानाक माहार व समस्त माहार मौजे माार मजरे मजकूर लेहून दिल्हे यैसीजे. मोकदम पाटील याच्या बैलाची व गुराची कातडी आम्ही महारानी घ्यावी

याप्रमाणे सिरस्ता आहे. तक्षीमचे मोकदम कदीम आहेत त्याची कातडी घेत आहोत त्या प्रो तुमचे बैल गुरे ढोरे वासरे याची कातडी घेत जाऊ हे लेहोन दिधले.

सही ----------

नि ।। बिवादोर

तेरीख छ २० जिल्काद

गोही

१ पुजाजी वाा त्रिंबक सुतार

१ नागोजी वाा जयदू लोहार

१ नथू वाा जाखू चांभार

१ खंडू वाा सटवा चांभार

१ भाऊ वाा बारवा कुंभार

१ मुका वाा येसू परीट

१ सजन वाा मलिकाजी मुळा

१ ताजी वाा वाकू न्हावी

१ मजू वाा कचू गुरव

सखंभट मुळे मौजे मजकूर

(हयाचे नाव उजव्या बाजूस आडवे आणि बालबोधीत आहे)[२]

१.३ पत्र क्र. ३

श्री

नकल

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री नारो बाबाजी क।। दार प्रो पारनेर गोसावी यांस ----------

सेवक माधवराव नारायण प्रधान ... सुा सीत सबैन मया व अलफ. दाभाडी पाटणे येथून तांदुल खंडी दाहा सरकारात पुण्यास आणिनील. तर सरकारच्या दस्तकाप्रमाणे तुमच्या तालुकियात आलियावर हाजिरीने दुसरे माहाल पाहचाऊन देणे. जाणिजे. छ८ रमजान. आज्ञा प्रमाणे.[३]

१.४ पत्र क्र. ४

श्री

नकल

राजश्री आपाजी महादेव गोसावी यांस ----------

सु।। समान सबैन मया व अलफ, मौजे पणदरे पाा सुपे येथील मानसिंग बिन हैबतराव पाा जगथाप हे दसरे याचे दिवसी घोडी बाहेरुन धुवोन आणितात. तेंव्हा बकरे सिवेत्त मारतात. त्यास विठोजी पाा जगथात्प म्हणतात की यास बकरे मारावयास कारण काये. गावात हे मातबर आहेत. तरी आपले दरवाज्यापासी मारावे. आम्ही दरसाल मना करितो. परंतु येकत नाही. सालगु।। पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणे करणे असे ताकीदपत्र नेले. आणि जाबसाल न होता बकरे मारिले त्याज करिता हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी येविसीचा मार तुम्ही कसा मनास आणिला आहे. किती दिवस बकरे मारतात दाखवाले भोवताले गावी. भोवताले गावी मातबर राहातात तेथे कैसे आहेत ते समाजोन लिहून पाठवणे. सालमारी पूर्वीच्या दाखला समजो न देता जबरदस्तीने बकरे मारितील तरी त्यास मारु न देणे. जाणिजे. छ ६ रमजान.[४]

१.५ पत्र क्र. ५

श्री

राजश्री रामचंद्र नारायण स्वामी गोसावी यांसी ----------

विनंती उपरी देणे चिमणाजी व्यंकटेश कुलकर्णी संगमनेरकर यांचे नातवाचे लग्न आहे. सबब बुरुडकाम वगैरे सुमारे ---------- सुमार

२५ बुरुडकाम वगैरे सुमारी ---------- सुमार

५ हारे

२ चालणी

५ सुपे

३ बिरडया

१० टोपली

२५

५० कुंभार काम

५ रांजण

५ माठ

५ चुली

१० कोलंबी

२५ लाहानथोर मडकी

५०

१०००पत्रावली

१०७५

एकूण १०७५ सुमारी देविले असे. प्रांत पुणेपैकी पावते करणे. याखेरीज बेगारी आसामी पाच लग्न होय तोपर्यंत पाच रोज देणे. जाणिजे. छ २३ रजब सु ।। सबा समानीत मया व अलफ.[५]

१.६ पत्र क्र. ६

श्री

दस्तक द.गो.कृष्णा बिन आपाजी माली रासकर मौजे खळद हली वस्ती मौजे कोथळ प्राा सुपे सन १२०० साधारण नाम सवछरे. कारणे साहेबांचे सेवेसी कतबा लेहून दिल्हा यैसाजे. आपली बायेको नबाणी हिण विटू बिन सेटी माळी सावळा मौजे धालेवाडी ताा करपटार प्राा पुणे याचा घरी चोरी केली व त्याचा मुदा इच्या आगी लागला. म्हणोन हिन तोची चितामध्ये कुन्हा धरुन तिसरे दिवशी सावळयाची लेक सासात वरसाची मासे धरावया म्हनोन नदीस घेऊन गेली आणि तिचे फडकीने तोड बांधून जाजुला हलवायाचे विहिरीत पोर ढकलाऊन दिल्हे ते पोर मृत्यू पावले तोही मुदा हिचेच आगी लागला. येणेप्रमणे चोरी व

खून दोन अपराध हिजकडे शाबूद जाहले. म्हणोन साहेबी तिला हुजूर सरकारात आणली आणि मजलाही हुजूर आनून आज्ञा केली की आपली बायको साभाळन म्हणोन हवाला करुन घेत म्हणून आज्ञा जाहली. यास ही बायको आपणास काही नलगे. साहेबी सरकारातून जे पारपत्य करणे ते करावे. आपणास काही ही बायेको लागत नाही. हा कतबा लेहून दिला. सही. कृष्ण रासकर छ २८ रमजान सु ।। सन बिहिदे तिसैन.[६]

१.७ पत्र क्र. ७

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नारापंत नाना स्वामीचे सेवेसी पो सखाराम भगवंत कृतानेक सांा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत गेले पाहिजे. विशेष वाो (फाटले) नाथ भट गंधे याचे कर्ज उमाजी एवले यांजकडे आहे. त्याविषयी सरकारचे पत्र तुम्हास आहे. तर पत्राप्राो व (वे) दमूर्तीचे कजै उगवु दयावे. सरकारचेही पत्र आहे त्याप्रमाणे कर्जही समजोन उमजून देवावे. बहूत काये लिहिणे. असो दीजे हे विनंती.[७]

२.१ अहमदनगरचा कला व खेळ

मराठी समाज हा तर तत्कालीन समाजाइतकाच रसिक व कलाप्रिय . या रसिकतेची गुणवत्तेची साक्ष संपूर्ण महाराष्ट्रभर आढळणा-या वाडे, मंदिरे, भित्तिचित्रे, सचित्रग्रंथ, लघुचित्रे इत्यादींच्या रुपाने डोळयासमोर उभी राहते. स्वराज्यात पुढे आलेली बरीचशी घराणी पूर्वी निजामशाही आणि आदिलशाही दरबारात वावरलेली होती. त्यांच्या कलाकौशल्याशी परिचित होती पेशवाईत उत्तरेकडील राजस्थानी दरबारांशी, खुद्द मोगल दरबाराशी संबंध आला व त्याचे पडसाद स्वाभाविकच मराठी कलेत उमटले. महाराष्ट्रात प्राचीन काळापासून एक उच्च कलापरंपरा नांदत होती. या मूळ रुपाला नव्या संबंधांमुळे अनेक अलंकरणे चढली, तिचे रुप अधिक प्रेक्षणीय बनले.

२.२ वास्तुशिल्प :

वास्तुशिल्पात पेशवेकालीन अहमदनगरमध्ये प्रगती झालेली दिसते. गोदावरी काठी घाट, कायगावटोक्याचे ठिकाण, नेवासा मधील घाट, प्रवरा येथील घाट यामुळे पेशवाईत संपन्नता आल्याची दिसते, सर्व प्रकारच्या शिल्पाला नवचैतन्य प्राप्त झाले. नाशिक, नगर, सोलापूर याशहरामधील काही गावांची याच काळी मोठया प्रमाणावर वाढ झाली. जुन्नर, पैठण, नेवासे, कोपरगाव, करमाळे या भागातील नदीकाठच्या भागांना विशिष्ट घाट बांधण्यात आले. हेमाडपंथी मंदिरांची रचना करण्यात आली. यामध्ये मढी, पुणतांबे येथील मंदिर, अकोले तालुक्यातील कळसूबाई शिखर वरील हेमाडपंथी मंदिर, शिव मंदिर, यांचा नव्याने जीर्णोध्दार करण्यात आला. नगरमधील टोके हे गाव याच काळात पेशव्यांचे आराखडायुक्त गाव म्हणून समोर आले. सगळीकडे अरुंद पण फरसबंद रस्ते दुतर्फा चिरेबंद वाडे. तसेच कमानदार वेशी, असे चित्र दिसू लागले. वाडयांचा तळमजला दगडी तर वरचे विटाचे व लाकडी खांब तुळया यांवर आधारलेले सामान्यपणे तीन पण कधी पाच मजले आणि प्रशस्त अशा मोकळया चौकांभोवती मांडलेले वाडे सर्वत्र दिसू लागले. बहूधा या वाडयांना दोन चौक असत. पण विस्ताप्रमाणे तीन ते सात चौक अहमदनगर मधील काही वाडयांना असत. त्यामध्ये कामरगावमधील गंध्यांची गढी, अकोळनेर मधील भोर, जाधवांचा वाडा विशेष प्रसिध्द होता. तर नगरमधील प्रतिष्ठित समजल्या जाणा-या शिंदे सरकारांच्या वाडया समोरील दर्शनी भागासाठी व दिवाणखाण्यासाठी सरुचे खांब व महीरपीच्या कमानी प्रचलित झाल्या. कमानी, खांबाच्या माथ्यावर असणारे हस्त [स्तंभशीर्ष] दिवाणखान्याची छते, पाणपटटया, त्याच्या कोप-यावरील लोलक दरवाजांच्या चौकटी क्वचित संपूर्ण दर्शनी भागावर असलेले लाकडीकाम हे बारीक नक्षीकामाने मढविलेले असे. त्यात भौमितिक नक्षीच्या जोडीला वेलपत्ती असे व मधेमधे पोपट, मोर, माकडे यांच्या आकृती असत. उत्तर पेशवाईत मंदिर - रचनेला मोठया प्रमाणावर आरंभ झाला. ही मंदिरे तीन प्रकारची होती. यादवकालीन घाटाची मंदिरे वटेश्वर, संगमेश्वर, विश्वेश्वर अशा तीन प्रकारात अहमदनगरमधील मंदीरांची रचना आढळून येते. ती आकाराने मोठी, नक्षत्रा कृती विधानीची

भिंतीवर थर आणि रथ असणारी दगडी बांधणीची असत. शिखरे मात्र चुनेगच्ची विटांची. नासिकची काळाराम, गोगाराम, संदरनारायण, त्र्यंबकेश्वर येथील महादेवाचे तसेच नेवाशाचे मोहिनीराज ही मदिरे माळवा - राजस्थान सारखी असून उत्तरेतच वावरलेला हिंगणे,चंद्रचूड, ओढेकर इ. मंडळींनी बांधलेली आहेत. यांची बांधणी संपूर्ण दगडी. या मंदिरामध्ये इतर प्रकारच्या मंदिरापेक्षा कोरीवकाम अधिक आहे. तिसरी पध्दत स्थानिक कोपरगाव, नाशिक, नेवासा, कायगाव टोके ही खास मराठी म्हणता येतील. चौकोनी गाभारा, समोर कमानींची [क्वचीत सुरुंच्या खांबाची ओवरी] व त्यासमोर लाकडी सभामंडप व गाभारा व ओवरी दगडी, पण शिखर विटाकामाचे, शिखर टप्प्याटप्प्याने निमुळते होत जाते. शिखरांवर लहान कोनाडयांतून चुनेगच्चीत मूर्तीकाम केलेले असून काही मंदिरांवरती मूर्ती सुबक व उठावदार आहेत. यांत दशावतार देव देवता मूर्ती, तसेच राजपुरुष, स्त्रिया यांच्या मूर्ती आहेत. यांचा पोषाख पेशवाई पध्दतीचा आहे. नाके खूपच धारदार आणि डोळे लांब आहेत. मात्र शारीरिक प्रमाण बध्दतेकडे कलाकाराने फारसे लक्ष पुरवले नाही. प्रत्येक मजल्यावर कमानदार देवळयांच्या व मनो-यांच्या छोटया प्रतिकृती एकाआड एक बसवीत. त्यात मूर्ती व चित्रे असत. या वस्तू आकाराने फारशा मोठया नसत, पण त्यांच्या प्रमाणयुक्त योजनेमुळे सौष्ठवपूर्ण दिसतात. पक्ष्यांच्या आकाराचे हस्त असणा-या दगडी दीपमाळा हे मराठी मंदिरांचे खास वैशिष्ठय आहे. अनेक ठिकाणी याच घाटाच्या छत्र्या व समाध्या बांधलेल्या आहेत. बहुतेक गावे व मंदिरे नदयांच्या काठी असल्याने मंदिरांच्या समोरच्या नदीतीरावर दगडी घाट मराठेशाहीत बांधण्यात आले. यात नाशिक, कायगाव टोके, नेवासे, कोपरगाव, प्रवरा या ठिकाणी विस्तीर्ण असे घाट अद्यापही दिसतात. कायगाव टोक्याचे घाट अत्यंत प्रेक्षणीय होते. पण आज पैठणच्या धरणामुळे ते पाण्याखाली गेले आहेत. अहमदनगरमधील वास्तू शिल्पाचा बराच भाग आता आधुनिकीकरणामुळे नष्ट होत चालला आहे.[८]

२.३ चित्रकला

अहमदनगर मध्ये चित्रकलेचे फारच थोडे नमुने उपलब्ध आहेत. तथापि त्यांवरुनही या कलेच्या गुणवत्तेची कल्पना येते. सचित्र हस्तलिखीत पोथ्या, पोथ्यांच्या खाली आणि वर

ठेवण्यात येणा-या लाकडी फळयांवरील चित्रे, पटचित्रे व चित्रित पत्रिका, सुटी लघुचित्रे आणि काचचित्रे या विविध स्वरुपांत मराठी चित्रकलेचा आविष्कार झालेला आढळतो. भागवतगीता, सप्तशती, भागवतपुराण अशा काही संस्कृत आणि ज्ञानेश्वरी, शिवलीलामृत, पांडवप्रताप अशा काही मराठी ग्रंथांच्या सचित्र प्रती उपलब्ध झाल्या असून त्यांतून दशावताराची चित्रे आढळतात. जोडीला विश्वरुप दर्शन, महिशासूरवध, शंभुनिशुंभाचे देवाशी युध्द अशीही विषयानुरुप काही चित्रे काढलेली आहेत. पोथ्यांच्या फळयांवर गणपती, रिध्दि सिध्दी, रामपंचातन, गोपालकृष्ण, विष्णू लक्ष्मी यांची चित्रे गडद अशा लाल, हिरव्या आणि पिवळया लाखेच्या रंगांनी चित्रीत केली आहेत. पटचित्रांमध्ये संक्रातीपट हे संख्यने अधिक आहेत. साधारण ६० सेंमी. लांबी रुंदीच्या कागदावर वरच्या एक तृतीयांश भागात तीन चौकटी आखून घेतात. मधल्या चौकटीत गणपती व रिध्दि सिध्दी, तर दोन्ही बाजूंच्या चौकटीत प्रमुख वाहनांवर बसलेल्या संक्रांती देवीची, चंद्रसूर्याची चित्रे रंगविलेली असतात. याशिवाय योगापाट, पिठोरीपट अस्सल मराठी कलेचा नमुनेदार आविष्कार आहे. ज्यांची मुले जगत नाहीत, अशा स्त्रियांनी श्रावण अमावस्येला चौसष्ट योगिनींची पूजा करण्याचे एक व्रत आहे. या व्रताच्या कहाणीतील स्त्रीची सात मुले दगावली व व्रताचा उपयोग होऊन आठवे जगले. कृष्णजन्माचा कथेशी असणारे साम्य ध्यानात घेऊन चित्रकाराने या पटात कृष्णलीलेचे प्रसंगच रंगविले आहेत. यातील माणसांची चेहरेपटटी व शरीरयष्टी, वस्त्रे अलंकार आणि ती रेखाटण्याची शैली ही अस्सल मराठी आहे.[९]

संक्रातीपट, पोथ्या यांवर पुष्कळदा कालाउल्लेख असतो. तसा जन्म पत्रिकेच्या पटावरही असतोच. जनार्दन बल्लाळ पेशवे याच्या जन्मपत्रिकेवर शके १७०६ असा जन्मकाल दिला आहे. पत्रिकेत राशी आणि ग्रह यांची चित्रे रंगविलेली आहेत. लघुचित्रांमध्ये व्यक्तिचित्रे, रागमाला, तालमाला, मिरवणुकी इ. प्रसंगांची चित्रे आहेत. थोरले बाजीराव पेशवे, नानासाहेब पेशवे, पिलाजी जाधवराव यांची उत्कृष्ट व्यक्तिचित्रे चित्रकारांच्या नावांसह उपलब्ध आहेत. रागमालेत मुख्यराग, रागवधू व रागपुत्र यांची चित्र रागमालेच्या काव्यातील वर्णनावरुन काढलेली असली तरी त्यांतील वेशभूषा, चेहरेपटी इ. मराठी वळणाची आहेत.

देवघराच्या चौकटीवर सणासुदीप्रसंगी कागदी तोरणे बसवीत. त्यांवर नवग्रह, दशावतार अशी चित्रे रेखाटलेली आहे. अहमदनगरच्या ऐतिहासिक वस्तु संग्रहालयात पोथी लघू चित्र, बारामासी चित्र, काच चित्र, गौरी पट, राजस्थान माळवा शैलीचे चित्र, सरदार घराण्यातील चित्र शैली पेशवेकालीन अहमदनगरच्या कला वैभवाची साक्ष देत आहेत. यात एक १८ व्या शतकाच्या पूर्वार्धाचे चित्र मोठे बोलके आहे. ब्रिटीश फौजा भारताच्या दिशेने जहाजातून कूच करत आहेत. या वेळी यांच्या पासून वाचण्यासाठी भगवान इंद्र, आणि इतर देवगण भगवान शिवाची आराधना करत आहेत. हे तत्कालीन परिस्थितीचे वर्णन करणारे चित्र आजही अहमदनगर संग्रहालयात उपलब्ध आहे. याचबरोबर १७ व्या शतकाच्या सुरुवातीला प्रचलित असणा-या मराठी चित्रकलेचे दर्शन रुक्मिणीस्वयंवर, हरिविजय अशा काही पोथ्यातून घडते. या कलेचे स्वरुप काहीसे निराळे आणि लोक कलेला धरुन आहे. व्यक्तिचित्रणातील स्त्रिया जराशा दणकट, ठेंगण्या, कपाळपटी थोडी उतरती, डोळे मोठे, हनुवटी थोडी आत गेलेली असून त्यांच्या बाहयरेषा जोरकस, पण प्रवाही वाटतात. लाल, हिरवे, पिवळे असे भडक रंग वापरलेले आहेत. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धातील चित्रांमध्ये खूपच नाजूकपणा आणि सफाई दिसून येते. यावरील रेषा, हावभाव लालित्यपूर्ण झाल्याचे दिसून येते. रंगयोजनेत अधिक साम्य आले. चेहरे पटटी, नाकडोळे तसेच राहिले, तरी त्यांत खूपच बदल झालेले आढळतात. प्रारंभीची चित्रे भित्तिचित्रांच्या परंपरेला अधिक जवळची तर उत्तरकालीन चित्र लघुचित्रपरंपरेला शोभेशी आहेत. मराठी चित्रकलेचे नमुने मुख्यत्वे मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयात तसेच औरंगाबादच्या विद्यापीठाच्या संग्रहालयात, अहमदनगरच्या ऐतिहासिक वस्तु संग्रहालयात आढळतात. [१०]

२.४ भित्तिचित्रे :

मराठेशाहीत सर्व उपलब्ध भित्तिचित्रे अठराव्या शतकापासूनची म्हणजे पेशवाईतील आहेत. हे चित्रकाम बहुधा वाडयाच्या दर्शनी भागांवर तसेच दिवाणखान्याच्या व शयनगृहांच्या भिंतीवर आढळून येते. देवालयात मंडपाच्या भिंती, ओस-या, शिखरे, काही प्रसंगी गाभा-याच्या भिंती आणि छत हीसुध्दा चित्रकामाने सुशोभित केलेली दिसतात. अकोले

अमृतेश्वर मंदिर, कळसूबाई शिखर, कायगाव टोका येथील शिवमंदिर, पळशीचे विठ्ठल रुखिमनी मंदिर, कोरठणचे खंडोबा मंदिर, राशीनचे रेणुका माता मंदिर, सिध्दीटेकचे गणपती मंदिर हे अहमदनगर जिल्हयातील वैभवाची साक्ष देतात. [११]

२.५ कला व खेळ :

मराठे शाहीत लावणी नृत्यास जोर आलेला दिसतो. ते लोकप्रिय होते. कोळी नृत्य, धनगराचे गजनृत्य, वाघ्या - मुरळीचे नृत्य, वासुदेवाचे नृत्य व लेझीम यांसारखे मर्दानी नृत्य यांची जोपासना महाराष्ट्राने केली त्यात अहमदनगर जिल्हा मागे नव्हता. येथील आदीवासी पाडयात म्हणजेच अकोले, राजूर याभागात मोठया प्रमाणावर आदीवासी समुदाय आहे या ठिकाणी हे नृत्य अविष्कार पहावयास मिळत. लावणी नृत्याने या भागात मोठा जम बसवला. लोककला सादर करुन आपली उपजीविका भागवणे हा या मागचा उद्देश दिसतो. जामखेड मधील पंचमी सण असेल, राशीन देवी उत्सव असेल, पारनेर तालुक्यातील वाळवणे गावची यात्रा असेल या ठिकाणी लोककला सादर करण्यासाठी नायकिणी [नृत्यकरणा-या] स्त्रियांची संख्या मोठया प्रमाणावर होती. साधरणत: कोल्हाटी परिवारातील स्त्रिया यामध्ये मोठया प्रमाणावर आढळतात. लोककला, मनोरंजनाचे केंद्र म्हणून या ठिकाणांचा अनेक दस्तऐवजात उल्लेख सापडतो. अहमदनगरचा निजामी राजवटी पासून कलेचे माहेरघर म्हणून नावलौकीक होता. याभागात फराह बाग, कलावंतींचा महल [भातोडी पारगाव], भिस्त बे हस्त बाग हे ठिकाण विशेष उल्लेखनीय होते. तीच कला पुढे मोगलांनी स्विकारली, त्यात काही बदलही झाले, आणि पेशव्यांनीही त्याच ठिकाणांना मोठे संरक्षण दिल्याचे उल्लेख आढळतात. पेशवे तर लोककलेचे जाणतेच होते . [१२]

कुस्ती, लेझीम, विटीदांडू, हूतुतू, चेंडू फळी, झिम्मा इ. कितीतरी खेळ पंधराव्या - सोळाव्या शतकांत महाराष्ट्रात रुढ होते. अव्वल मराठे शाहीतसुध्दा या खेळांना प्रोत्साहन मिळाले. नित्य नैमित्तिक स्वरुपात खेळांना प्रोत्साहन मिळाले. दैनंदिन नागरी जीवन सुखाने व आनंदाने जगण्यांत कलेचे केवढे मोठे स्थान आहे हे निराळे सांगण्याची आवश्यकता नाही .[१३]

२.६कला साहित्य :

नागरिकांच्या सामाजिक व राजकीय जीवनाबरोबरच त्यांस कलात्मक आनंद उपभोगण्यासाठी अशा व्यक्तीस व संस्थांस आश्रय देणे, व उत्तेजन देणे, हेंहि स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रमुख अंग होय. कला ही केवळ करमणुकीसाठी नसून जसा वैदिक वाड:मयांत सर्व शास्त्रे व कला यांचे अंतीम ध्येय मोक्ष प्राप्ती हे आहे. त्याप्रमाणेचं या चतु:षष्ट कलांपैकी गीत, वाद्य, नृत्य व नाटय याचाच प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल व या कलांचा जन्म नटराज श्री शंकरापासूनच झाला आहे.

एवं गांधर्व शास्त्रं भरतेन प्रणीतम.

तत्र नृत्य गीत वाद्य भेदेन बहुविधा अर्धा : प्रवंचिता :

देवता - आराधना निर्विकल्प समाधौ आदि

सिध्दिश्च गांधर्व वेदस्य प्रयोजनम.

याचाच अर्थ तेव्हा देवता आराधना सिध्दी व निर्विकल्प समाधि सिध्दि हे गांधर्व वेदाचे फल होय. त्यामुळे गीत, वाद्य, नृत्य या बरोबरच अनुषंगिक असलेली नाटयकला ही नरकाचे साधन नसून परंपरेने का होईना मोक्ष साधनच ठरत आहे. महाराष्ट्र रंगभूमीचा ऐतिहासिक ठेवा हा उत्तेजक असल्याने महाराष्ट्रांत ठिकठिकाणी खाजगी वैयक्तिक प्रयत्नाने जुन्या नाटक कंपन्यांचे अनुकरण करुन जनतेचे मनोरंजन करण्याचा परिपाठ महाराष्ट्रांत ब-यांच शहरांत आहे शाळा व कॉलेजच्या संमेलनप्रसंगी कालिदास व भवभूती यांच्या संस्कृत नाटकांचे प्रयोग करुन विद्यार्थी वर्गातही नाट्टयाची व अभिनयाची अभिरुची वाढल्याने त्याचे पर्यावसान यापैकी काही जणांनी आपल्या शहरी खाजगी हौशी नटांचे क्लब काढून नाटय प्रयोगाचे परिपाठ आरंभिले, यात नवल नाही, मराठी रंगभूमी वरील आजपर्यंतच्या नामवंत नाटककारांची नाटके केवळ करमणूकीकरतां नसून समाजकारण व राजकारण यांतील प्रचारासाठीही त्यांचा अवलंब केला आहे. त्यामुळे लोकरंजन व लोकशिक्षण हे दुहेरी फायदे मराठी नाट्टयकारांनी साधले आहेत. निजाम काळ, पेशवे काळ यामध्ये नगर मधील भातोडी पारगाव येथील कलावंतीचा महाल आजही त्याकाळची साक्ष देतात . तर फराहबक्ष महाल,

भिस्त - बे - हस्तबाग हा ही निजाम काळ, पेशवे काळातील मनोरंजानाचे एक ठिकाण म्हणून गौरविले आहे. [१४]

धार्मिक ग्रंथाच्या बाबतील पेशवेकालीन उल्लेख पत्र क्र. ३ मध्ये घेतलेला आहे.

अहमदनगर मधील प्रसिध्द व्यक्ती :

३.१ गणपतबुवा पुराणिक

अहमदनगर मधील पेशवे काळातील प्रसिध्द व्यक्तींमध्ये गणपतबुवा पुराणिक यांचा नामउल्लेख प्रकर्षाने आढळतो. पोट भरण्यासाठी बाहेर पडलेले हे कुंटुंब वारंवार कीर्तन करीत करीत त्यांनी इंदोर राजधानीत प्रवेश केला व तेथे रेशीमवाल्यांच्या गोपाळ कृष्णाच्या मंदिरात पुराण सांगण्यास सुरुवात केली. या चार पुराणिक बंधूंचा कीर्तनाचा व प्रवचनाचा लौकिक श्रीमंत तुकोजीराव महाराज व नानासाहेब पानसे यांजपर्यंत पोहोचल्याने ते त्यांचेवर फार खूष झाले. नानासाहेब पानसे हे पखवाज वाजविण्यांत फारच सुप्रसिदध त्यांची ही कला एकाने आत्मसात करुन घेतली होती. नाथबुवा पुराणिक या घराण्यांपैकीच होत. नाथबुवा दीक्षितांनी प्रथम आपल्या दत्तमंदिरात प्रतिष्ठित घराण्यांतील मुलींना गायनकला शिकविण्याची सोय करण्याच्या दृष्टीने जे वर्ग उघडले त्या वर्गातून शिक्षण घेऊन बरींच मुलें व मुली बाहेर पडल्या. [१५]

३.२ श्री कृष्णबुवा केणे श्रीगोंदा

श्री कृष्णबुवा केणे हे भजनी कथा करण्यांत फार प्रवीण असत. त्याप्रमाणें काशीकर बुवांच्याही कथा दत्तमंदिरांत होत असत. त्यास लोकांची फार गर्दी होत असे. कारण हे बुवा चांगले गात व तुकारामाचे अभंग बहुजन समाजास आवडणा-या लावणीच्या चालीवर म्हणत असत. [१६]

४.१ कोपरगावातील पेशव्यांचे वाडे

अहमदनगर जिल्हयातील कोपरगाव हे शहर गोदावरी नदीच्या पश्चिम तीरावर १९° - ५४°, उत्तर अक्षांस व ७४ - ३३', पूर्व रेखांशावर वसलेले असून पूर्व तीरानजीक साधारणत: १ कि.मी. अंतरावर बेट कोपरगाव ही छोटी परंतु प्राचीन व पौराणिक वारसा

आहे. फार पूर्वी गोदावरी नदीने पात्र बदलल्यामुळे एक बेट तयार होऊन, त्या बेटावर ही वसाहत झालेली असल्यामुळे त्याला 'बेट कोपरगाव' असे म्हणण्याची प्रथा परंपरेने अस्तित्वात आलेली आहे. याच बेटात 'श्री शुक्लेश्वर', श्री कचेश्वर , श्री विष्णू यांची पुरातन मंदिरे आहेत. येथे गुरु शुक्राचार्यानी कचदेवास संजीवनी विद्या दिली, अशी पौराणिक आख्यायिका आहे. त्यामुळे हा परिसर पुण्यक्षेत्र मानला जातो. येथे पेशवा रघुनाथ उर्फ राघोबादादांच्या आयुष्याचे अखेरचे दिवस गेले.

७ मे १७८२ रोजी पुणे दरबारचा इंग्रजांशी सालबाईचा तह झाला व दरमहा रु. २५०००/- निवृत्तिवेतन घेऊन रघुनाथराव उर्फ राघोबादादांनी राजकारणापासून अलिप्त राहण्याचे निश्चित केले. तेव्हा त्यांनी महादजी शिंदेच्या सल्ल्यावरुन कोपरगावला कायमचे वास्तव्य करण्याचे ठरवले व ऑगष्ट १७८२ मध्ये ते कोपरगावला येऊन स्थायिक झाले.

प्रशस्त वाडा

रघुनाथराव ऊर्फ राघोबादादांच्या वास्तव्याची ऐतिहासिक साक्ष देणारा कोपरगावातील वाडा प्रशस्त असून उत्तरायुष्यातील उपेक्षित व्यक्तिमत्वाच्या गतवैभवाची सहज आठवण करुन देणारी ही वास्तू आहे. राघोबादादा कोपरगावी राहण्यास येण्यापूर्वीच येथे हा वाडा बांधलेला होता : त्याबाबतची पेशवे दप्तरातील नोंद पुढील प्रमाणे आहे.

"श्रीमंत राजश्री दादासाहेब या मार्गेकरुन आनंदवल्लीस [नाशिक नजीक] गेले. वद्य १० मंगळवारी येथे [कोपरगाव] स्वारी आली. श्रीमंतांनी वाडा संपूर्ण हिंडून पाहिला. दुसरे दिवशी प्रात:काली भोजन येथेच करावे, ऐशी श्रीमंताची मर्जी होती. भोजनाची तर्तूद करावी म्हणून आज्ञा केली होती. मागती दिकत निघाली की, वास्तुशांती झाली नाही. यामुळे तो मनसुबा राहिला. त्यास मातबर इमारत प्रथम काम आले त्या तगाईत वास्तुशांती राहीली . यास्तव सूचनार्थ लिहले आहे."

वरील पत्रात कालदर्शक उल्लेख नाही हे खरे, पण पेशवे दप्तर संपादकांनी संदर्भाधिष्ठित तारीख २४ जुलै १७६७ अशी दिली आहे. थोरले माधवराव व राघोबादादा यांच्यातील बेबनाव आनंदवल्ली येथे या सुमारास त्या दोघांची झालेली भेट येथे लक्षात

घेण्यासारखी आहे. तात्पर्य इ.स. १७६७ च्या सुमारास कोपरगावातील पेशव्यांच्या वांडयाचे बांधकाम झालेले होते, असे मानावयास हरकत नाही.

कोपरगावाच्या वाडयासंबंधीचा दुसरा उल्लेख

"मौजे कोपरगाव, परगणा कुंभारी येथे गंगेच्या बेटात श्री. शुक्लेश्वर देवालयासन्निध सन इसने सबैनात [इ.स. १७७१-७२] सरकारचा वाडा व बाग नवा केला" याचाच अर्थ इ.स. १७७१ -७२ पूर्वी येथील सरकारवाडयाचे बांधकाम पूर्ण झालेले होते.

वाडयाची बाहयरचना

पेशव्यांचा कोपरगावातील हा प्रशस्त वाडा पूर्वाभिमुख, धाबा पध्दतीचा असून, पूर्व, पश्चिम व उत्तर बाजूने वाडयात प्रवेश करण्यासाठी साधारणत:
६'.६"✕४'.३'✕१'.३" आकाराच्या चौकटी व ३" जाडीचे पितळी फिरक्या बसवलेले व थोडेफार नक्षीकाम केलेले लाकडी दरवाजे आहेत. मुख्य प्रवेशव्दार गंगेच्या बाजूला म्हणजे पूर्वेकडे असून, या बाजूची दगडी जोत्याची उंची सुमारे २० फूट आहे. त्यासाठी दगडी २५ पाय-यांचा जिना आहे. मात्र जमिनीच्या चढावामुळे उत्तरेकडील प्रवेशव्दारांच्या जोत्यांची उंची कमी आहे. वाडयाच्या जोत्यावरील बांधकामासाठी पक्की, वीट, माती ,चुना व घडीव दगड वापरलेला असून, धाब्याच्या छपरासाठी लाकडी फळी, वीट व मातीचा वापर केला आहे. त्यावरुन वाळू व चुना यांच्या मिश्रणाचा साधारणत: दीड इंच जाडीचा कोबा आहे.

भरपूर प्रकाश, खुली हवा, यासाठी दक्षिण व पूर्व बाजूच्या भिंतीमध्ये ५'.६'✕२'.६" आकाराच्या प्रत्येक खणामध्ये एक अशा १५ खिडक्या आणि पूर्वेकडील भिंतीमध्ये त्याच आकारमानाच्या व तेवढयाच अंतरावरील १० खिडक्या आहेत. त्या मानाने उत्तर व पश्चिम बाजूच्या भिंतीमध्ये कमी खिडक्या आहेत, तरी परंतु वाडयामधील दोन चौकांमुळे भरपुर प्रकाश व खुली हवा ही सुविधा साधली आहे. या बांधकामामुळे मुख्यत: दिखाऊपणापेक्षा टिकाऊपणाकडे अधिक लक्ष दिलेले होते, असे दिसते.

अंतर्गत रचना :

पेशव्यांच्या या वाडयाचे पुण्यातील विश्रामबाग वाडयाप्रमाणे वाडयांतर्गत वाडा असे स्वरुप आहे. हे पहावयास मिळते. मुख्य वाडयामधील पहिल्या खोलीमध्ये झोपाळयाची व्यवस्था होती. त्या खोलीच्या छताचे लाकडावर सुबक नक्षीकाम आहे. वाडयामध्ये मुख्य प्रवेशव्दार व उत्तर प्रवेशव्दार यांच्या समोर अंदाजे १५ फूट × १५ फूट आकारमानाचा चौक आहे. चौकाच्या चारही बाजूंनी ओसरी व बैठकीच्या सदरेची रचना आहे. वाडयाच्या मध्यावरील दक्षिणोत्तर सामाईक भिंतीमध्ये भुयार असून त्यालगत आंतर वाडयातील बैठकीची खोली आहे. भिंतीतून निघालेल्या या भुयारी मार्गाचे दुसरे टोक बेट कोपरगावातील श्री शुक्लेश्वर मंदिराच्या देवडीजवळ निघालेले आहे. ब्रिटिश आमदानीपासून हा भुयारी मार्ग सुरक्षिततेसाठी बंद करण्यात आलेला आहे. सदर वास्तूचा ब्रिटीशांनी तहसील कचेरीसाठी वापर केला होता. तेथील शासकीय तहसील कचेरी १९५३ चे आसपास स्वतंत्र इमारतीमध्ये स्थलांतरित केली गेली.

आंतरवाडा

आंतरवाडयामध्ये १५ फूट × १५ फूट या आकारमानाचा चौक असून चौकाच्या चारही बाजूंनी घडीव दगडाची ओसरी आहे. ओसरीच्या वरील बाजूने देवघर, माजघर, इत्यादी खोल्या आहेत. वाडयाच्या या भागातच श्रीमंत आनंदीबाईसाहेबाचे सुमारे ९ वर्षे वास्तव्य होते.

स्नानगृह व शौचकूप

या आंतरवाडयातील दक्षिणेकडील कोप-यातील १०' ×१२' आकारामानाच्या खोलीमध्ये ५'×५' आकारमानाचे स्नानगृह व त्याला जोडूनच ५'×५'आकारमानाचे सौचकूप आहे.

पाणीपुरवठा व सांडपाणी

पेशव्यांच्या सेवेतील पाणके, गोदावरी नदीचे पाणी पखालीने वाडयामध्ये भरीत असत. पाणी साठवण्यासाठी मुख्यत: खापरांचे रांजण होते. सांडपाणी व पावसाचे पाणी वाहून

जाण्यासाठी बंद गटारांची सोय करण्यात आली होती. हे सर्व पाणी वाडयाबाहेर बंद गटारातून काढून उघडया गटाराने दूर नेऊन सोडलेले आहे, हे आजही पाहावयास मिळते. [१७]

४.२ विटाळशीचा वाडा

राघोबादादांच्या पत्नी श्रीमंत आनंदीबाईचे या वाडयात दीर्घकाळ वास्तव्य होते. [इ.स. १७६७ ते १७८३ या कालावधीमध्ये अधून - मधेन व इ.स. १७८३ ते १७९२ पर्यंत सलग वास्तव्य होते. तदनंतर या कुटुंबाला पुणे दरबारच्या आदेशानुसार नासिकजवळील आनंदवल्लीला स्थलांतरीत व्हावे लागले.] त्यांच्या सोबत पुत्र बाजीराव, कोपरगावातच जन्मलेले चिमाजी व दत्तक पुत्र अमृतराव ही तीन मुले आणि अमृतरावांची बायको सावित्रीबाई, बाजीरावाची बायको भागीरथीबाई असा राघोबादादांचा कौटुंबिक परिवार येथे होता. त्याशिवाय इतर सेवकांचा लवाजमाही होता. दादासाहेबांच्या पश्चात हे कुटुंब जवळ जवळ नजरकैदेतच होते. त्यांची देखभाल करण्यासाठी नाना फडणिसांनी गोविंद कृष्ण गोडबोले हे अधिकारी नेमले होते. असे पेशवेदप्तरातील नोंदीवरुन दिसते.

श्रीमंत आनंदीबाईच्या दिनचर्येवरुन त्यांचे येथील धर्मिक विधी, व्रतवैकल्ये बाजीरावाचा हुडपणा इ. बाबींची तपशीलवार माहिती मिळते. बहुतेक हे विधी ,व्रतवैकल्ये यामुळेच या वाडयाला 'विटाळशीचा वाडा' असे म्हणण्याचा प्रघात पडलेला असावा, हा प्रघात आजही प्रचलित आहे.[१८]

४.३ तीन भिंतींचा वाडा [हिंगणीचा वाडा]

रघुनाथराव उर्फ राघोबादादा राजकारणातून निवृत्त होऊन कायमचे वास्तव्य करण्यासाठी जेव्हा कोपरगावात आले. तेव्हा त्यांनी कोपरगावाचे पश्चिमेला तीन मैलांवर असलेल्या हिंगणी गावाजवळ भव्य वाडा बांधण्याचे ठरवले. त्यांनी वाडयासाठी गोदावरी नदीच्या पश्चिम तीरावरील निसर्गसुंदर जागेची निवड करुन तेथे वाडयाच्या बांधकामाला सुरुवात केली. दुर्देवाने वाडयाच्या तीन भिंतीचे बांधकाम झाले. पूर्वेकडील चौथ्या, गंगेच्या तीरावरील दर्शनी भिंतीचे बांधकाम चालू असतानाच, श्रीमंत दादासाहेब ११ डिसेंबर १७८३

रोजी आकस्मिकपणे निवर्तले. साहजिकपणे हा 'तीन भिंतीचा वाडा' आजही राघोबादादांच्या अतृप्त इच्छेची साक्ष देत उभा आहे.

उत्कृष्ट बांधकाम

तीन भिंतीच्या वाडयाचे बांधकाम अतिशय मजबूत, भक्कम व उत्कृष्ट दर्जाचे आहे. भिंतींची लांबी २००० फूट, रुदी - १००० फूट, आणि उंची ४५ फूट असून भिंतीच्या माथ्यावरील जाडी - ७ फुटांची आहे. या सर्व बांधाकामाला आत बाहेर कातीव स्वरुपाचा काळा दगड, चुना वापरलेला आहे. गोदावरी नदीच्या तीरावरील या वाडयाच्या उत्तर व दक्षिण भिंतीला एक एक बुरुज बांधलेला आहे. तर फक्त उत्तरेकडील भिंतीमध्ये प्रशस्त प्रवेशव्दार ठेवलेले आहे. राघोबादादांच्या इच्छेनुसार बांधला जाणारा हा तीन भिंतीचा वाडा पूर्ण झाला असता तर प्रशस्त, भक्कम आणि रेखीव नक्षीकामाचा प्रक्षेणीय [वाडा] पहावयास मिळाला असता, परंतु श्रीमंत राघोबादादांच्या आकस्मिक निधनाने चौथी भिंत आणि अंतर्गत बांधकाम जे राहून गेले ते आजतागायत अपुरेच राहिले, त्यामुळे पेशवेकालीन वास्तू शिल्पकलेतील प्रगतीचा एक उत्तम आविष्कार साकार होत असतानाच दुर्देवाने अपूर्ण राहिला. या तीन भिंतींच्या वाडयामध्येच राघोबादादांची समाधी आहे.[१९]

५.१ पेशवेकालीन अहमदनगर मधील धार्मिक इतिहासाचे वर्णन करणारे पत्र

पत्र क्र. १

किल्ले मजकुरी दस-याचे दिवशी नवा झेंडा लावला त्यावर वीज पडली, खांब उभा चिरला, त्याची शांती करावी म्हणोन शनीचा जप एक लक्ष वेळा करावा, आणि ब्राम्हण भोजन घालावे म्हणून बाळाजी बाजीराव यांच्या रोजनिशीत उल्लेख आढळतो. [२०]

५.२ पत्र क्र. २

चिरंजीव निळकंठ महादेव यांस अनुष्ठानाचे ब्राम्हणांस साहित्य प्रांत पुणेपैकी देणें म्हणोन सनदा.

श्री मोरेश्वर येथें, श्री सोमयादेव येथें, श्री सिध्देश्वर परगणा पारनेर, श्री बल्लाळेश्वर तर्फ पाल हवेली, श्री यवतेश्वर सातारा, श्री जेजुरी येथे श्री देव नारायण किल्ले पुरंदर येथे , श्री बनेश्वर येथे. श्री भगवती वेहर , श्री गणपती रांजणगांव तेरीज आसामी ४० साहित्य.

१ श्रीदेव.

५ अनुष्ठानाचे ब्राम्हण.

१ आचारी

१ खटपटया

आठ आसामींस साहित्य.[२१]

५.३ पत्र क्र. ३

विष्णु महादेव यांचे नांवे पत्र की, तुम्ही उदेपुरीहून पुस्तके खरेदी करुन पाठविली, ते गुजारत भिकाजी आप्पाजी पुस्तके ग्रंथ सुमार

१.	वराहपुराण	१४०००
२.	रेवाखंड	१५०००
३.	वामनपुराण	१००००
४.	मच्छपुराण	१५००००
५.	ब्रम्हनारदी	४५००
६.	लिंगपुराण	१२०००
७.	विष्णुपुराण	१७०००
८.	भविष्योत्तरपुराण	१२०००
९.	मिताक्षरा	१४०००
१०.	रामायण वाल्मिकी	२८०००
११.	अग्नीपुराण	१२०००
१२.	ब्रम्हवैवर्तक	२२०००
१३.	दुर्गापुराण	८०००

१४. काशीखंड २९०००

येणे प्रमाणे सरकाराने दोन लक्ष साडेबारा हजार धार्मिक पुस्तके सरकारात पावली म्हणोन जाब लिहून दिला.[२२]

५.४ पत्र क्र. ४

पादरी फरेलयान दरे माजरदेस यांनी हुजूर विदित केलें की रेवदंडा येथें आपली देवी आहे. तिचा उत्साह नवरात्र होतो. त्यास शेवटचे दिवशीं तोफेचा एक बार करावयाचा हुकूम आहे. त्यास साहेबी मेहेरबान होऊन जाजती दोन बार करावयासी आज्ञा केली पाहिजे. म्हणोन, त्याजवरुन हे सनद सादर केली असे तरी यांचे देवीचा उत्साह नवरात्र जाहलियावर शेवटचे दिवसीं तोफेचे बार

१ पेशजीचे सनदेप्रमाणे

२ जाजती सालमजकुरापासून

३

एकूण तीन बार तोफेचे करावयासी आज्ञा केली असे तरी जंजीरे रेवदंडा येथील तोफेचे सदरहू प्रमाणें तीन बार करणें. म्हणोन महादजी रघुनाथ यांस सनद[२३]

५.५ पत्र क्र. ५

जोगी, भराडी व गोधळी यांचा सूर संमोळ वाजवावयाचा कजिया होता. तो पेशजी सरकारांत मरास आणितां जोगी यांनी सूरसंमळ वाजवावा ऐसे ठरलें सबब त्यांजकडे सरकारची नजर ठरविली त्याचे पट्टीपैकी बाकी राहिली आहे त्याच्या यादी आलाहिदा पाठविल्या आहेत. त्याप्रमाणें ऐवज वसूल करुन गोपाळजी काळा व शेटयाजी व कान्होजी खैरा व रघोजी गाईकवाड वगैरे खिजमतगार पाठविले आहेत. तरी ऐवज वसूल करुन यांचे पदरी घालून हुजूर पाठवून देणें म्हणोन चिटणिशी.

१. खंडो बाबुराव कमावीसदार तर्फ हवेली संगमनेर यांस की तर्फ मजकूर येथील जोगी यांजकडे रुपये २८६ दोनशे शांयशी येणें त्यविशीं पत्र.

१. महादाजी नारायण हवेली अहमदनगर यांस की, हवेली मजकूर याजकडे जोगी असामी १२४ येकूण रुपये १२४० बाराशे चाळीस येणें त्याविशीं पत्र

१. गंगाधर यशवंत यांस की, परगणें कोतूळ येथील जोगी यांजकडे रुपये ४० चाळीस येणें त्याविशी

१. खंडो बाबुराव यांस की, परगणे आकोलें येथील जोग्याकडे रुपये ६० साठ येणें त्याविशीं.

१. नारो बाबजी यांस की, परगणे पारनेर येथील जोगी असामी १४ चौदा यांजकडे रुपये ६८ आडसष्ट येणें त्याविशी.

१. नरहर लक्ष्मणराव यांस की, परगणे शेवगांव येथील असामी ३५ पसतीस यांजकडे रुपये ४०७ चारशें सात येणें त्याविशी .

१. त्रिंबक लक्ष्मण यांस की, परगणे नेवासे वगैरे महाल येथील जोग्यांकडे ऐवज येणें.

४६९ परगणे नेवासे असामी ५८ अठ्ठावन यांजकडे

२६६ परगणे वैजापूर असामी २२ बेवीस यांजकडे

१८० परगणे खंडाळे असामी २० वीस यांजकडे

२०० परगणे दाभाडी असामी १५ पंधरा यांजकडे[२४]

५.६ पत्र क्र. ६

श्री महादेव रतनवाडी किल्ला खाली आहे त्यास बालोजी करालें यांनी किल्ले रतनगड घेते समयीं नवस केला त्या प्रमाणे.

नित्य नैवेद्यास नेमणूक			नंदादीपास दरमहा तेल
गल्ला कैली दरमाहे		तूप दरमाहे	वजन पक्के.
./२	तांदूळ	वजन पक्के	..२।.
	सडीक	..।.	
../१	डाळ	तूप दरमहा ...४ प्रमाणे	बारमाही
		वजन पक्के ..।।१२ किंमत सालिना रुपये .।.	

.।।.

१. किल्ले रतनगड पैकी देविले सदरहू सामान श्रीच्या गुरवाजवळ देऊन नित्य नैवद्य व नंदादीप ताकीद करुन चालवणें म्हणोन मोरो महादेव यांस सनद १

किल्ले रतनगड घेते समयीं बालोजी कराळे यांनी नवस केले त्यास साहित्य गल्ला कैली.

.।।. पिराचे केदारीस तांदूळ कैली.

.२।।।. किल्ल्याखाली श्री महादेव आहे त्याचे समार्धेस

.२।। तांदूळ सडीक

.।. डाळ

.२।।।.

.। १ गोंधळ ९ दर गोंधळास कैली .।।२ तांदूळ

.।४।. एकूण तांदूळ

२. किल्ले मजकूर पैकी मोरो महादेव याजकडून देविले.[२५]

५.७ पत्र क्र. ७

हाफीस गुलाम महंमद वगैरे हफीज यांनी हुजूर नजी कसबें साकर खेडेलें परगणें मजकूर येथील मुक्कामी येऊन अर्ज केला कीं आपले आजे हाफीज हसन व मुलजादा उदयास व सिती करीमा मलीक अंबर याचे बायकोचे कबरेस ऊद फूल व रोषनाई बद्दल खर्चास इनाम मौजें सालूं खेडें परगणें मजकूरपैकी सालीना रुपये ३५० साडेतीनशें शाहाजान पातशा यांनी फर्मान करुन देऊन व निजाम उल्मुलूक वगैरे यांनी सनदा करुन दिल्या त्याप्रमाणे साडे तीनशे रुपये आपणाकडे पावत आले. त्यास सन सित्तेनांत परगणें मजकूरचा मोंगलाई अंमल सरकारांत आल्यापासून चालत नाही. तरी साहेबीं कृपाळू होऊन पेशजीच्या सनदा आपणाजवळ आहेत त्या पाहून सदरील प्रमाणें करार करुन देऊन सनद करुन दिल्ही पाहिजे म्हणोन. त्याजवरुन मनास आणितां हे थोर, यांचे चालवणें जरुर जाणोन पेशजीच्या सनदा पाहोन पेशजीप्रमाणें सालीना खर्चाबद्दल रुपये ३५० साडेतीनशें करार करुन दिल्हे असेत.

सदरील प्रमाणें पुस्त दर पुस्त याजकडे चालवणे. ताजे सनदेचा उनूर न करणें. हें पत्र भोगवटीयास परतोन देणें म्हणोन कमाविसदार वर्तमानभावी परगणें टाकली सरकार दौलताबाद यांस पत्र. [२६]

वरील प्रमाणे पेशवेकालीन अहमदनगरमध्ये सांस्कृतीक, धार्मिक इतिहासात मोडीतील अस्सल पत्रातून धार्मिक जीवनावर प्रकाश टाकणारे उल्लेख आढळून येतात. पेशव्यांच्या काळात नगरच्या किल्ल्यात अनेक सैनिक ताप, पडश्याने आजारी पडतात त्यावेळी दर गुरुवारी किल्ल्यातील पिरास चपाती, साखरेचा, गुळाचा मलिदा करुन वाटावा असा उल्लेख आलेला आहे. याचाच अर्थ पेशव्यांनी धार्मिक सलोखा मोठया प्रमाणात टिकऊन ठेवला होता.

संदर्भ

१. आठवले सदाशिव तुळशिबागवाले दप्तर भारत इतिहास संशोधन मंडळाचे त्रैमासिक , पुणे एप्रील १९९८ पृ. ६७

२. कित्ता पृ. ६५

३. कित्ता पृ. ९३

४. कित्ता पृ. ९६

५. कित्ता पृ. ११३,११४

६. कित्ता पृ. १२१

७. कित्ता पृ. १७९

८. नगरपंचशताब्दी शतसंवत्सर ग्रंथ, नगर पालिका प्रकाशन सन १९९० पृ. ४७

९. अहमदनगर संग्रहालय, चित्रकला विभाग कपाट न.१२

१०. अहमदनगर संग्रहालय, चित्रकला विभाग कपाट न. १३

११. नगरपंचशताब्दी शतसंवत्सर ग्रंथ, नगर पालिका प्रकाशन सन १९९० पृ. २३

१२. कित्ता पृ. २४

१३. कित्ता पृ. ४८

१४. कित्ता पृ. ५२

१५. सरदार मिरीकर ना.य., अहमदनगर शहराचा इतिहास, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन तिसरी आवृत्ती सन २०१६ पृ. ११२

१६. पारसनिस डि.बी. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, खंड, २ गव्हरमेंट बॉम्बे प्रकाशन सन १९०६ पृ. १९९

१७. ओक प्रमोद, पेशवे घराण्याचा इतिहास, कॉन्टिनन्टल प्रकाशन दुसरी आवृत्ती १९९१ पृ.३३८

१८. कित्ता पृ. ३४०

१९. कित्ता पृ. ३४१

२०. रावबहादूर वाड गणेश चिमणाजी, माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, मुंबई सरकार सन १९११ पृ. ३३६,३३७

२१. पारसनिस डि.बी. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, खंड, २ गव्हरमेंट बॉम्बे प्रकाशन सन १९०६ पृ. १०२


२२. कित्ता पृ. १२०

२३. कित्ता पृ. ११७

२४. कित्ता पृ. १९४

२५. कित्ता पृ. १९५

२६. पारसनिस डि.बी. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, खंड, २ गव्हरमेंट बॉम्बे प्रकाशन सन १९०६ पृ. १२०


उपसंहार

निष्कर्ष / उपसंहार

प्रास्ताविक :

महाराष्ट्रात मुसलमानी अंमल इ.स. १३१८ पासून चालू झाला. मुसलमान राज्यकर्त्यांची दरबारी भाषा फारसी आणि उर्दू होती. हे राज्य सुमारे ३५० वर्षे चालले. या काळात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य भरडले गेले. शूद्रापैकी तांबोळी, रंगारी, महार, मांग या जातीतील काहींनी धर्मांतरण केले, मोगल राजवटीमध्ये गावांची नगरांची नावे बदलण्यात आली. जूलूम जबरदस्ती हे तर सर्वत्र पाहावयास मिळत होते. सर्वसामान्य जनतेचे जगने कठीण बनत चालले होते. हे सर्व काही महाराष्ट्र सोसत असतानाच पश्चिम किना-यावर डच, पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच या युरोपातील राज्यकर्त्यांनी व्यापाराच्या निमित्ताने किना-यालगतचा मुलूख ताब्यात घेतला. मुख्यत: पोर्तुगीजांनी बहुसंख्य असलेल्या हिंदू प्रजेचे मोठया प्रमाणावर धर्मांतर केले. धर्मांतराबरोबरच हिंदू संस्कृतीचा व त्यांच्या ग्रंथांचा सर्वतोपरी विध्वंस केला. ग्रामीण भागातील जनतेला जबरदस्तीने बाटवू लागले. न बाटणा-या व्यक्तींना कोणत्याही मार्गाने छळू लागले. या धार्मिक, सामाजिक छळामुळे सर्वसामान्य जनता भरडला जाऊ लागला. या छळाला सडेतोड उत्तर देण्याचे काम महाराष्ट्रातील विशेषत: अहमदनगरच्या संतांनी केले. त्यांच्या अध्यात्मविद्येने आपला धर्म व आपली संस्कृती जिवंत ठेवली. या काळात दक्षिणेतील मुसलमान शाहया बुडविण्यासाठी उत्तरेतील मोगल सत्ताधीश आक्रमण करू लागले. ते थोपविण्यासाठी या मुसलमानी शाहयांनी मराठे सरदारांना हाताशी धरले. त्यांनी गनिमी युध्दपध्दतीने लढून मोगल आक्रमणास काही प्रमाणात पायबंद घातला. या मराठे सरदारांपैकी शहाजीराजे भोसले हे एक होते. त्यांचे पुत्र छत्रपती शिवाजीराजे यांनी आपल्या पराक्रमाने अचेतन बनलेल्या महाराष्ट्रात चैतन्य निर्माण केले व स्वराज्याची स्थापना केली. पेशवेकाळात स्वराज्याचा विस्तार झाला. रजपूत, बुंदेले, पठाण, रोहिले आदी मराठी सत्ता मानू लागले. त्यांना चौथाई, सरदेशमुखी व इतर वसूल देऊ लागले. मराठयांचा दबदबा सर्व देशभर पोहचला. मोगल बादशाहने आपली बादशाही टिकविण्यासाठी मराठयांशी इ.स. १७५२ मध्ये एक करारनामा [अहमदनामा] केला.

मोगली साम्राज्य पूर्णत : मराठयांकडे सोपविल्याचे फर्मानही दिले. इ.सन १७६१ मध्ये त्यामुळेच पानिपतचे युध्द ओढावले. मराठयांनी आपल्या कर्तबगारीमुळे हिंदुस्थानातील इतर प्रांतीयांचे व राज्यकर्त्यांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. मराठयांच्या शौर्यधैर्यादी गुणांची पारख तत्कालीन हिंदुस्थानातील राजे रजवाडयांस झाली होती. त्याचेच भीषण परिणाम पुढे सा-या मराठयांनी सोसले .

पेशवेकालीन अहमदनगरची स्थिती :

दिनांक २८ मे १४९० साली अहमदनगर शहराची पाया भरणी अहमदशहाने केली. जवळ जवळ १२,१३ सुलतानांनी आपला अंमल या शहरावर गाजवला. अनेक लढायांत आपले कर्तृत्व सिध्द केले. चॉंद सुलताना नामक वीरांगना याच मातीत जन्मली. भोसले, जाधव, घाडगे अशा मातब्बर घराण्यांचा उदय याच निजामशाहीपासून झाला. मलिक अंबर, राजे शहाजी, लखूजी जाधवराव हे याच शाहीतील कर्तबगार सरदार मंडळी म्हणून समोर आली. इ.स १६३६ साली निजामशाही नष्ट झाली. मोगलांचा अंमल या प्रांतावर सुरु झाला. मोगलांनी शहरावर ताबा मिळवला खरा पण प्रांताचे नियोजन लावून ते येथे कधी स्थिरावलेच नाही. त्यांनी औरंगाबादेतून सर्व सूत्रे हालवली. मोगलांचा काळ हा सतत लढाया, स्वा-या यांतच गेला. विशेष म्हणजे हा काळ महाराष्ट्रातील सुवर्ण अक्षरांनी लिहण्याचा होता. कारण याच काळात छत्रपती शिवाजी राजाचा जन्म इ. १६३० ला शिवनेरी किल्ल्यावर झाला. मोगलांना सळो की पळो करुन सोडणा-या मराठयांनी त्यांना कधीच स्थिरता प्राप्त होऊ दिले नाही. परिणामी, मोगल बादशहा सम्राट औरंजेबचा मृत्यु इ.१७०७ मध्ये आलमगिरी, अहमदनगर येथे झाला. मोगलांच्या वंशजांनी राजे शाहूंची सुटका केली. पुढे शाहू महाराज गादीवर आले आपल्या एकनिष्ठ सरदारांपैकी बाळाजी विश्वनाथ यास पेशवे पदाची सुत्रे इ.स १७१३ मध्ये दिली. इ.स. १७२० मध्ये बाजीराव पेशवे गादीवर आले. त्यांच्या काळात मराठयांची किर्ती सर्वदुर पोहचली. निजामाला पालखेडच्या लढाईत धुळ चारली मराठयांना वेगळी प्रतिष्ठा या काळात प्राप्त झाली. इ. स १७४० ला पहिल्या बाजीरावाचा मृत्यु झाला. त्यांच्या जागी त्यांचे वारस नानासाहेब पेशवे गादीवर आले. हा काळ पेशव्यांच्या स्थिरतेचा

होता. या काळात पेशव्यांनी दिल्ली, अटेकेपार धडक मारली. दिल्लीच्या बादशहाच्या रक्षणाची जबाबदारीही याच काळात आली. खरे पाहता या काळापासूनच पेशवे कालीन नगरच्या इतिहासाचा प्रारंभ होतो. इ.स १७५९ पर्यत कवी जंग जो मोगलांचा किल्लेदार अहमदनगरच्या किल्यावर होता. त्याचा पराभव करुन मराठयांनी अहमदनगरचा अभेद्य किल्ला जिंकला. अहमदनगर हा प्रांत जसा नावाने मोठा होता तसा तो विस्तारानेही मोठा होता. उत्तर पेशवाईत तर सोलापूर, नाशिक, अहमदनगर हे तीन जिल्हयांचा भाग मिळून अहमदनगरची रचना असल्याचे आढळते. करमाळे, चांभारगोंदे [श्रीगोंदे], जामखेड, राशीन, पांडे पेडगाव, नगर, संगमनेर, सिन्नर असे सुभा याकाळात नगरमध्ये होते. भांबोरकर, राशीनकर भोसले, सुप्याचे पवार, राशीनचे काळे, कडयाचे देशमूख, जोर्वेचे थोरात, डोणगावचे यादव, दिघीचे निंबाळकर, जामगावचे नगरकर, श्रीगोंदेचे शिंदे, कुळधरणचे सुपेकर अशा सरदारांचा या काळात या प्रांतावर मोठा अंमल होता. पेशव्यांच्या काळात नगरचा किल्लेदार नारोबाबाजी नगरकर जो पारनेचा प्रांताचा होता. तो अेनक वर्षे किल्लेदार असल्याचे समजते .

इ.स१७९५ ची खडर्याच्या लढाईत मराठयांचा शेवटचा विजय झाला. त्यानंतर मराठे कोणत्याच मोहिमीत जिंकले नाहीत. मराठयांच्या विशेषत: पेशव्यांच्या समईचा महत्वाचे नगरमधील भाग म्हणजे कायगाव टोके हे धार्मिक स्थळ होय. राशीनच्या देवीला विशेष महत्व होते. पेशवे नित्यनेमाने येथे पूजा अर्चा करण्यास येत. सिध्दीटेकच्या गणपतीची ही ख्याती याच काळात सर्वदूर पोहचली होती. थोरले माधवराव यांनी या मंदिराचा जिर्नोध्दार केला. नवनाथांचे पवित्र स्थान मढी ही याच काळात प्रसिध्द झाली. या यात्रेच्या निमित्ताने राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रपदेश, कर्नाटक भागातून भाविक अहमदनगर मध्ये येत. चक्रधर स्वामींनी आपल्या पावन स्पर्शाने हा भाग पवित्र केला. आजही अनेक भागात मोठया भक्ती भावाने पूजा अर्चा केली जाते.

उत्तर पेशवाईत शिंदे, होळकर, गायकवाड, भोसले या घराण्यांना फार महत्व प्राप्त झाले महादजी शिंदे यांची सासुरवाडी निमगाव जाळीची होती. महादर्जीच्या पत्नीची समाधी श्रीगोंद्यास आहे. शिंदयांच्या फ्रेंच लष्करांच्या फलटणी अनेक दिवस नगर भागात वास्तव्यास

होत्या. दुस-या बाजीरावने तर शिंद्याच्या कामगिरीवर खूष होऊन नगरचा किल्ला शिंद्याना बक्षीस म्हणून दिल्याचे उदाहरण आहे. शिंदयांनी अहमदनगरमधील श्रीगोंदे, जामगाव या भागावर वाडे बांधले अनेक वर्षे येथूनच नगरच्या प्रशासनाची सुत्रे हालवली. परंतु शिंदे देशाच्या कारभारात व्यस्त असल्याने फारसा काही काळ त्यांनी नगरमध्ये घालवला नाही. प्रशासन, सैनिकी हालचाल्या, युध्दे, ब्रिटीशांचे आक्रमणे, पेशव्यांच्या उत्तर वारसांचे राजकारण या संगळया गोष्टी मुळे शिंदे फार काळ अहमदनगर मध्ये राहिल्याचे दिसून येत नाही. या सर्वांच्या सोबत एक नाव समोर येते ते म्हणजे नाना फडणवीस. नाना फडणवीसांचा शेवटचा काळ नगरच्या भूईकोट किल्यात बंदीवान म्हणून गेला. राघोबा दादा, आनंदी बाई पेशव्यांचा शेवटचा काळ बंदीवान कोपरगावच्या वाडयात गेला .

उदगीरच्या मोहिमे समई नानासाहेब पेशवे, सदाशिवराव भाऊ यांचा अनेक दिवस मुक्काम नगरच्या फराह बागेत होता. त्या आशयाचे अनेक पत्र आजही नगरच्या ऐतिहासिक वस्तु संग्रहालयात आहेत. श्रीमंत माधवराव पेशव्यांच्या निजामाबरोबरच्या स्वा-या हया नगरच्या प्रांतामधूनच झाल्याचे अनेक दाखले उपलब्ध आहेत.

राजकिय इतिहासाबरोबरच नगरला सामाजिक संस्कृतिक महत्व प्राप्त होते. याच नगरच्या मातीत १२ व्या शतकात नेवासे येथे संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी लिहीली. त्यामुळे वारकरी संप्रदाय आणि नगरचा तसा जवळचाच संबंध. कर्जत सारख्या ठिकाणाला धाकटी पंढरीचा दर्जा होता. आशाढी वारी हा तर सणाप्रमाणे साजरा केला जात . लोक भक्ती भावे सर्व घरदार सोडून पांडूरंगाच्या वारी मध्ये सामील होत. याचे सर्व श्रेय संतांना जाते. श्रीगोंदयांचे शेख महमंद हे तर वारकरी पंथाचेच समजले जात. त्यामुळे या शहरात भक्ती भाव मोठया प्रमाणात दिसून येतो. नगरमधील कोठला बारा ईमामचेही असेच महत्व होते. येथेही हसन आणि हुसेन यांच्या सवा-या काढल्या जात होत्या. डोले हा उत्सव कधी नगरवासीयांनी मुस्लिम सण म्हणून साजरा केला नाही. त्यात सर्व जाती धर्माचे लोक गुण्या गोविंदाने सामील होत. यामध्ये नवसाचे वाघ होण्याचा मान सर्व समाजाला मिळत असे. या उत्सवाच्या आधल्या दिवसी कत्तल की रात हा उत्सव साजरा केला जात.

जमीन महसुलाच्या बाबतील पेशव्यांनी मराठी शाहीचा बराचसा स्विकार केल्याचे समजते. छत्रपती शिवजी महाराजांनी आखून दिलेले धोरणे पेशव्यांनी काही अंशी त्याच पध्दतीत थोडया फार फरकाने स्विकारल्याचे दिसून येते. शिवकाळात सैनिकांचा पगार हा रोखीने व्हायचा पण पेशवे काळात चौथाई सरदेशमुखीमुळे हे धोरण बदलून महसूलाच्या स्वरुपात गाव किंवा जाहागि-या बक्षीस म्हणून दिल्याचे उल्लेख आढळतात. दुस-या बाजीराव पेशव्यांनी महादजी शिंदयांना नगर सुभा बक्षीस दिल्याचे समजते. यामुळे शासनाकडे पाहण्याचा जनतेचा दृष्टिकोन बदलला. तेच शासन कर्ते जनतेने नाकारले आणि पेशवाई बुडून ब्रिटीश विजयी व्हावे असा जनतेत सुर दाटला.

पेशवे कालीन नगरमधील काही उनीवा

पेशवाईत नानासाहेब पेशव्याने व नंतर पहिल्या माधवराव पेशव्याने सुरळीत कारभार करण्याचा प्रयत्न केला, पण व्यापार करण्याची कल्पना नानासाहेब पेशव्यांनी पुढील वारसांना शिकवली नाही. किंबहुना इंग्रज व्यापा-यांकडून चलाख बुध्दीच्या नानासाहेब पेशव्यांनी हे आत्मसात करायला हवे होते. पण त्याकडे त्यांनी कधी लक्षच दिले नाही. समुद्र किनारा ताब्यात असल्या शिवाय परदेशी व्यापार व युरोपीय परशत्रूंचा बंदोबस्त होत नाही. हे शिवाजी महाराजांचे सूत्र पेशव्यांपर्यत पोहोचले असते, तर नानासाहेब पेशव्यांनी इंग्रजांची मदत घेऊन बलाढय आरमाराधिपती आंग्रे यास बुडविले नसते. हे आरमार बुडाल्यापासून महाराष्ट्राचा पश्चिम किनारा इंग्रजांच्या ताब्यात गेला. समुद्रावर त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले. लष्कर व व्यापारांच्या हालचालीसाठी राज्यात आणि राज्याबाहेर पक्के रस्ते हवेत, गावोगावी पाण्याची व्यवस्था पाहिजे, तथापी पेशव्यांनी स्वतंत्र खाते उघडून त्याची खास तरतूद केल्याचे दिसत नाही .

मुंबईत इंग्रज कोणते उद्योग करत आहेत साधी याची माहीतीही जवळ पुण्यातील पेशव्यांना नव्हती. व्यापारी मुंबईस राहून धनसंपन्न होतात. याकडे पेशव्यांचे लक्षच गेले नाही. युरोपात विज्ञानाचा प्रभाव पडून शास्त्रज्ञ निरनिराळे शोध लावीत. त्या शोधांचा उपयोग माणसाचे जीवन गतिमान, सुखी व समृध्द करण्याकडे होत होता. या बदलाची कल्पना पेशवे

दरबारातील मुत्सद्दी व शहाणे म्हणविणा-यांसही आली नाही हे मराठयांचे दुर्देवच म्हणावे लागेल. युरोपाच्या सामान्य ज्ञानाच्या तुलनेत पेशवाईतील राज्यकर्त्यास इतिहास व भूगोलाचे ज्ञान फार थोडे होते असे समजते. लोकशिक्षण, विद्यापीठे, पदार्थसंग्रहालये, संशोधन सभा, पृथ्वी पर्यटन यांचा मराठयांना पत्ताच नव्हता असे म्हटले तर वावगे ठरु नये. त्या वेळी समुद्रपर्यटन भारत वासियांना निषिध्द मानले जात होते. अव्वल इंग्रजी काळातही समुद्रपर्यटन घडल्यास प्रायश्चित्त घ्यावे लागे आणि हे कोण देत तर राज्यकर्ते शासक. त्यावेळी सामान्य जनता राजकारणापासून अलिप्त होती. राजकारण हा राजे लोकांचा खेळ आहे असाच सामान्य जनांचा समज होता. आपण मुके, बिचारे आहेत असेच ते मानीत. पेशवाईच्या उत्तरकाळात दंगेधोपे, जाळपोळ, लुटालूट इत्यादींनी सर्वसामान्याचे जीवित असुरक्षित झाले. उलट इंग्रज आले. दरारा बसला. जीवनाला सुरक्षितता आली. म्हणून त्या वेळची प्रजा मनातल्या मनात मराठयांचा पराभव व्हावा, इंग्रजांचा जय व्हावा म्हणून सार्वजनिक प्रार्थना करताना आढळते. त्याचे कारण लूटारु नकोत, इंग्रज परवडले, असे स्वदेशियांना वाटले.

या पेक्षा वेगळी नगरची परिस्थिती नव्हती. इडा पिडा टळो आणि बळी राज्याचे राज्य येवो. म्हणना-यांनी इंग्रजांना पहिली पसंती दिली. आणि शासक म्हणून स्विकारले. १८०३ साली नगर ताब्यात घ्यायला वेलस्लीला जास्त परिश्रम करावे लागले नाही. उलट सगळयात सोपा विजय इंग्रजांच्या दृष्टीने अहमदनगर शहराचा होता. त्यात त्यांचेही लोक जास्त कामास आले नाही. शिंदयांच्या सैन्याचा थोडा विरोध सोडल्यास नगरच्या जनतेने फारसा काही प्रतीकार केला नाही. जे या लढाईत वीरमरण पावले त्याचे आजही स्मारक माळीवाडा वेशी समोर उभा करण्यात आले आहे. ब्रिटीश हे मुळत:च एकनिष्ठ, कमालीचे हुशार तितकेच एकसुत्री कार्यक्रमात बांधलेले यामुळे त्यांना अहमदनगर हा प्रांत जिंकण्यासाठी फारशी झुंज दयावी लागली नाही. ब्रिटीशांचा तळ नगर जवळील वाळकी भागात होता. तेथेही ग्रामस्थांनी त्यांना विरोध केला नाही .

उत्तर पेशवाईत होळकर, गायकवाड, भोसले हे घराणे ब्रिटीशांना एकनिष्ठ राहिले त्यांच्या जहागि-या तशाच त्यांच्याकडे ठेवण्यात आल्या. ब्रिटीशांनी कोणत्याच जाहगि-या इनामे परत घेतल्या नाहीत. त्यामुळे पुढे हेच स्वकिय ब्रिटीशांचे जवळचे प्रतिनीधी झाले. आणि संस्थांनाच्या स्वरुपात उदयास आले. शिंदे हयांचे उत्तर पेशवाईत जास्तीत जास्त लक्ष उत्तरेत होते. ग्वाल्हेर, दिल्ली, आग्रा भागात त्यांनी आपले वर्चस्व प्रस्थापीत केले. आणि हा बराचसा भाग बागायती स्वरुपाचा होता. यमुना सारख्या नदया उत्तरेच्या भागात होत्या त्यामूळे त्यांनी फारसे काही लक्ष अहमदनगर प्रांतावर दिल्याचे दिसत नाही .

अहमदनगरच्या पराभवाचे कारणांमध्ये हे ही एक महत्वाचे कारण आहे. पेशवाईच्या शेवटच्या समई ब्रिटीशांचा प्रचंड हस्तक्षेप मराठयांच्या राजकारणात वाढला. मराठयांना सरंक्षण देण्याच्या भूमिकेतून ब्रिटीशांनी प्रत्यक्षात एक फौजच मराठयांवर लक्ष ठेवण्याकरता ठेवली होती. याचाच परिणाम असा झाला, मराठयांच्या प्रत्येक हालचालीवर ब्रिटीशांनी करडी नजर ठेवली. होळकर, शिंदे, भोसले, गायकवाड यांचे वैर उत्तर पेशवाईत येवढे वाढले की हेच सेनापती एकमेकांचे शत्रू बनले. होळकरांनी अहमदनगर प्रांतातील शिंदयांचा श्रीगोंदयांचा वाडा, पारनेर मधील वाडयांची जाळपोळ केल्याचे उल्लेख आहेत. याचाच फायदा ब्रिटीशांनी घेतला. पेशव्यांमध्ये दुसरा बाजीराव हयास शिंदयाचे हस्तक्षेप सहन होत नव्हते म्हणून बाजीरावाने होळकरांच्या मदतीने शिंदयांवर स्वारी केली. आणि नगरमधून पेशवाईचा अंत झाला.

आम जनतेच्या बाबतीत ही ब्रिटीश निती फार वेगळी होती. ब्रिटीशांनी कधीच नगरकरांच्या धार्मिक गोष्टीत लक्ष घातल्याचे दिसून येत नाही. दुसरे प्रमाण असे देता येयील इ.स १८१२ साली इंग्लंडहून छापून आलेला एक नकाशा ऐतिहासिक वस्तू संग्रहालयात लावण्यात आला आहे. या नकाशात छोटया गावांचाही उल्लेख करण्यात आला आहे, नदयांचा उगमही त्यात दाखवण्यात आला. यावरुन असे समजते की ब्रिटीशांनी राज्य करण्याआगोदर देशाचा खुप आभ्यास केला होता असे दिसून येते. आणि त्यामूळेच ब्रिटीश पुढे १९० वर्षे राज्य करु शकले.

एकंदरच पेशवेकालीन अहमदनगरवर नानासाहेब पेशवे, पहिले माधवराव, राघोबादादा, नाना फडणवीस यांसारख्या राज्यकर्त्यांचा राज्यकारभार झाला. या प्रबंधात पेशवेकालीन नगरमधील अनेक अप्रकाशित उल्लेख घेण्यात आलेले आहेत त्यामूळे नक्कीच हा प्रबंध अभ्यासकांसाठी मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो.

संदर्भ सूची

संदर्भ सूची :

लिखित साधने [अप्रकाशित]

१. पुणे पुराभिलेखागार , पुणे [पेशवा दप्तर]

- १८१८ पूर्वीचे रेकॉर्ड
- संशोधनासाठी निवडलेले कागद
- किल्ले अहमदनगर, नगर जमाव

२. भारत इतिहास संशोधक मंडळ , चंद्रचूड दप्तर

३. राजवाडे इतिहास संशोधन मंडळ धुळे

४. अहमदनगर जिल्हा वस्तु संग्रहालय

- भांबोरकर भोसले दप्तर
- दिवान पळशीकर दप्तर
- देशमुख दप्तर
- पवार घराने दप्तर

मुळ साधने [प्रकाशित]

- निसळ स.शि. दिवाण पळशीकर दप्तर खंड १ ला आवृत्ती १ ली अहमदनगर जिल्हा वस्तु संग्रहालय , १९७२
- आठवले सदाशिव, तुळशीबागवाले दप्तर, भा. इ.स मंडळ १९९७
- पारसनिस इतिहास संग्रह

दुय्यम साधने [इंग्रजी]

1. Apte B.K. A history of Maratha Navy and Marchantship. Bomby , 1973

2. Bhattacharji Arun , History of Mordern India , New Delhi , 1976
3. Chitnis , K.N. Socio - Economic aspect of Medieval India Poona 1979
4. Chakravorty ,U.N. Anglo Maratha Relations and Malcolm New Delhi , 1979
5. Choksey , R.D. After Math 1818 - 1826 (Peshwa Dafter Act), Bombay 1950
6. Choksey , R.D. History of British Dipomancy at the court of the peshwas 1786 - 1818 poona 1951 After Math 1818 - 1826 (Peshwa Dafter Act) , Bombay 1950
7. Rande M.G. The Rise of the Maratha Pawer ,1961
8. Sen S.N. Administrative system of the Marathas , Culcutta 1976
9. Sardesai G.S. New History of the Maratha History Three Volumes , Bombay 1957
10. Varma SP A. Study in Maratha Diplomacy ,Agra 1956

दुय्यम साधने [प्रकाशित]

१. बेंद्रे, वा.सी. महाराष्ट्र इतिहासाची ऐतिहासिक साधने ३ खंड मुंबई १९६६ - ६७
२. बेंद्रे, वा.सी. श्री. छत्रपति शिवाजी महाराज , २ खंड मुंबई १९७२
३. भावे, वा. कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र , पुणे १९३५
४. कुंटे, अहमदनगरची निजामशाही, महाराष्ट्र शासन
५. काटे, रा. गो. संपा. राज्यव्यवहारकोश, औरंगाबाद , १९५६
६. केळकर न.चि. मराठे व इंग्रज, पुणे ,१९२२

७. जोशी, शं.नां .कृष्णाजी अनंत सभासद विरचित छत्रपती शिवाजीराजे यांची बखर पुणे १९६०

८. जोशी सुरेश, ऐशी लढाई झाली नाही, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन १९७०

९. जोगळेकर वि.क्र.,कुंपणी सरकारचे डाक्टर अहमदनगर संग्रहालय, १९७५

१०. जोशी रेवती, नारायणराव खुनाची बखर, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, १९८०

११. नगरकर चिंतामण लक्ष्मण, नगरचे किल्लेदार नारो बाबाजी, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, १९९०

१२. जोशी सुरेश, अहमदनगर शहराचा इतिहास, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, १९९०

१३. ढेरे, रा.चि. संपा. आज्ञापत्र , पुणे १९६०

१४. नगर पालिकेचे अहमदनगर पंचशताब्दी, अहमदनगर १९९०

१५. नगर पालिका, नगर शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथ, आमचे वैभवशाली नगर

१६. निसळ अरविंद, दिवाण पळशीकर दप्तर खंड १, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन सन १९७२

१७. पोतदार, द.वा. मराठी इतिहास आणि इतिहास संशोधन, पुणे १९३५

१८. मराठी विश्वकोश, खंड १२, महाराष्ट्र शासन प्रकाशन

१९. मिरीकर ना. अहमदनगर शहराचा इतिहास, तिसरी आवृत्ती, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन २०१५-१६

२०. मेजर चॉवल, टेल ऑफ अहमदनगर, अहमदनगर १९७०

२१. वैकर पुरुषोत्तम सुरेंद्रनाथ, वैकर घराण्याचा पेढी व्यवसाय, अहमदनगर

२२. वनहटटी, श्री.ना. संपा. अज्ञापत्र अर्थात शिवाजी महाराजांची राजनीती, पुणे १९६१

२३. राजवाडे, वि.का. संपा. मराठयांच्या इतिहासाची साधने खंड १ वाई १८९८

२४. राधेशाम,किंगडम ऑफ अहमदनगर , दिल्ली १९७५

२५. लोकमत पंचशताब्दी, दैनिक लोकमत, अहमदनगर १९९०

२६. शहा जी.बी. उपेक्षित दुर्गाचा इतिहास सुमेरु प्रकाशन नाशिक २००६

२७. ओक प्रमोद पेशवे घराण्याचा इतिहास, कॉन्टीनेन्टल प्रकाशन दुसरी आवृत्ती, १९९१

२८. रावबहादूर वाड गणेश चिमणाजी, माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे यांची रोजनिशी, खंड २, मुंबई सरकार सन १९११

२९. पारसनिस डि.बी. बाळाजी बाजीराव पेशवे यांची रोजनिशी, खंड,२ गव्हरमेंट बॉम्बे प्रकाशन सन १९०६

३०. आठवले सदाशिव तुळशिबागवाले दप्तर भारत इतिहास संशोधन मंडळाचे त्रैमासिक , पुणे एप्रील १९९८

३१. के.एन. चिटणीस, सोशो इकोनॉमिक हिस्टोरी ऑफ इंडिया, अटलांटीक प्रकाशन, २००९


३२. नगरकर चिंतामण लक्ष्मण, नारोबाबजी अभ्यंकर नगरकर, अहमदनगर संग्रहालय प्रकाशन, सन १९६८

त्रैमासिके :-

- इतिहास शंशोधन प्रदीप,त्रैमासिक अहमदनगर जिल्हा वस्तु संग्रहालय प्रकाशन
- ज्ञानोदय
- भारत इतिहास संशोधन मंडळ त्रैमासिक

कोश :-


- केतकर श्री .व्य. महाराष्ट्रीय ज्ञानकोश आ. १ ली खंड १२ पुणे महाराष्ट्रीय ज्ञानकोश मंडळ १९२१


परिशिष्ठ

परिशिष्टे




अहमदनगर मधील फराह बक्ष महाल या ठिकाणी विश्वासराव भाऊ यांनी आपला तळ ठोकला होता.




अहमदनगर मधील प्रसिध्द भूईकोट किल्ला जो १७५९ ते १८०३ दरम्यान मराठयांच्या ताब्यात होता


त्याचा दुर्मिळ फोटो सौजन्य डॉ. शशी धर्माधिकारी



पेशवेकालीन अहमदनगरमधील कायटोका हे प्रसिध्द धार्मिक स्थळ



श्रीगोंदा तालुक्यातील बहादुर गड किल्लयावरील हेमाडपंथी मंदीर



पेशवे काळात प्रसिध्द असलेले कर्जुले हर्याचे मंदीर



कानिफनाथ गड [श्री क्षेत्र मढी]



इ.स १७९५ मध्ये मराठयांनी जिंकलेली खडर्याची लढाई [खर्डा किल्ला]




अहमदनगर किल्यातील जेल ज्यामध्ये नाना फडणवीस, त्रिंबकजी डेंगळे यांना


कैदेत ठेवण्यात आले होते



पळशी [पारनेर]मधील दिवान पळशीकरांची गढी



पेशवे काळात प्रसिध्द असलेले घौटनचे मंदीर




पेशवे काळात वापरात असलेले नाणे ज्यावर शाहू असे फारसीत लिहीले आहे



श्रीमंत नानासाहेब पेशवे यांची मोहर [शिक्का]




श्रीमंत माधवराव पेशवे आणि नानासाहेब पेशाव्यांचा दुर्मिळ फोटो



अहमदनगर सुभ्यावर आधिपत्य गाजवनारे माहदजी शिंदे सरकार



दुसरे बाजीराव पेशवे आणि ब्रिटीश अधिकारी



बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब पेशव्यांचा प्रिन्स ऑफ वेल्स मुझीअम, मुंबई मधील फोटो



अखेरच्या काळात पेशवाई टिकवणारे नाना फडणवीस यांचा फोटो



पेशवा दरबाराचा फोटो




कोपरगाव येथील वाडयात राघोबा दादा पेशवे यांचा शेवटचा काळ गेला




सवाईमाधवराव पेशवे

पेशव्यांची वंशावळ





३० ऑगष्ट १७७३ रोजी पेशवा नारायणरावाचा वध झाला. त्यानंतर रघुनाथरावने स्वत:ला पेशवा घोषित केले. त्याला बारभाईनी ऑक्टोबर १७७३ मध्ये पेशवेपदावरुन काढून टाकले.

पेशवेकालिन अहमदनगरचे किल्लेदार नारोबाबजी नगरकर यांची वंशावळ




होळकरांचे दिवाण पळशीकर यांचा वंशवृक्ष






पारनेर तालुक्यातील ऐतिहासिक गावांचा नकाशा अहमदनगर कॉलेज सौजन्य




खर्डा लढाई १७९५ चा मार्ग




अहमदनगर जिल्हा एतिहासिक वस्तु संग्रहालय , अहमदनगर



अहमदनगर जिल्हयातिल अभिलेख कक्षातील रेकॉर्ड



पेशवे काळातील हत्यारांचे काही प्रकार



.।. करडई खंडु तली याच्या ..१।।।.

.।. करडई मोहाना उसेटीन

बीन जोधळयाचे सकाराम

सेटयाचे पाच पायल्या

दर पैसे आठ पायली

बाली गव्हाना यास चोन

तीन याचे दाने घातले

दोन पायल्या हस्ते

त्याची लहा तरी भाद

वा वदये ११ वार मंगळवार

बाकी नदारत असे

३ गोटीराम मारवाडी करडई

तीन पायल्या दुजी प्राो

६ सकाराम पांडेकर याचे बीन

सापा पायल्या हींडी प्रो

१।।. मालु मारवाडी याचे गहु

तीन पायली प्राा पीढाचे

भादवा वदये १०

हारबरे नागु नीसळ याचे


आटया पायल्या जुन्या मापाने

आनले दुजी प्राा

भादवा वदये १० हस्ते

बाळाजी बावा

पेशवे कालिन अहमदनगरमधील आर्थिक बांबीसदर्भात अस्सल मोडी पत्र



श्री

तपसील

९।।. तुरीची दाळ सेर...१ ।।

दीड सेर चवक ची

१० हारबा-याची दाळ सेर ..१

२।।. तांदुळ चीपट भरन्न ..

२ मीरच्या पावसेर ...

३ मीठ आदरे ..।।.

८ दोन पायली भर ..१

३५ पैसे येकदर पस्तीस

मो-याचे बायकोस सरजाम

२२।। दाने तीन पायल्या कैली

३ गुळ साळु भादवा वदय

१२

२।।. तांदुळ पावसेर ..

पेसे

१।।. गहु पावसेर ..

२६।।. पैसे येकंदर साडे सवीस

७।। दोन पायली भर

आस्वीन श्रु।।१

१० राजगीरा नवरात्रास ..१

सेरभर पैसे दाहा

८ तेल श्रादरे पका नवरात्रास

१५ दोन नगद दोन पायल्या पैसे

१५ दोन दोन पायल्या हस्ते मोरी


आस्वीन -

७।। दोन म्हाता-यास पायलीभर

कार्तीक श्रु।। ५

७।। दोन म्हता-यास कार्तीक श्रु।। ८

उबरख उतरक आसे



श्री


श्री
राजा शाहु नरपती
हर्ष निधान बाळाजी
बाजीराव प्रधान

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर
वीस्वास नीधी राजमान्ये बाळाजी पंडीत प्रधान
ताा मोकदमानी मोजे भांबोरे ताा ची भाबोर गाव
प्राा मजकुर हुजुरुन राजेश्री कक्काजी राजे भोसले
यांस मुकासा पेशजी पासुन आहे त्या प्रमाणे करार
असे तरी प्रत जीले कडील कमावीस क्षराची रुजु
राहुन मुकास बाबची वसुल सालाबाद प्रमाणे
सुरळीत देणे जाणीजे छ ११ रमाजान आज्ञा
प्रधान


लेखन
सीमा

असल पत्र शीवाजीराव भोसले
यांस पासी आहेत मागीतले असता
मीळाले नाही सबब नकल करुन
ठेवला आहे
भीकाजीराव

भांबोरकर भोसले यांच्या कडील मोडी दस्तऐवज



श्री




राजश्री काकाजी भोसले गोसावी यांसी
अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य
स्भो. माधवराव बल्लाळ प्रधान असीरवाद सु।। ई
हीदे सबेन ११७१ मया व अलफ खासी स्वारी
पुण्याहुन जेऊरास आली येथुन कुच करुन मजल
दर मजल कर्नाटकात जात आहे तरी तुम्ही
देखत पत्र जमानीसी हुजुर येणे घडीचा
वीलंब न करणे जाणीजे छ २०
रजब बहुत काय लीहीणे

लेखन
सीमा
असलपत्र शीवाजीराव भोसले याजपासी आहे
त्यावरुन ही नकल करुन ठवली आहे
भीकाजीराव


अहमदनगर मधील धार्मिक माहिती देणारे पत्र

संशोधनाकरीता




स्वारी राजश्री पंतप्रधान सुमा सीत कीले अमदानगर खर्च येक बर्जी कीले मजकुर साो मु।।

	रुपये
देवस्थान खर्च	१९९।।।-।।
शांती खर्च	१००.- रुपये
दप्तर खर्च	३१७।-
छावणी खर्च	१२.-।।। रुपये
भोजन खर्च	९०० रुपये


संशोधनाकरीता

म//र देहनगी खर्च		५३। रुपये
रोशनाई		बेरीज
नख्त ९३।।।	रुपये वजनी वजन तेल पेला	३११.८।।।रुपये
मेजवानी खर्च		३५।।।-।।।रुपये
संक्रांत खर्च		१।- रुपये
दीपावली खर्च		६।।। रुपये
तुलसीपुजन खर्च		२ रुपये

पेशवेकालीन अहमदनगर मधील महत्वाची ठिकाणे दर्शविणारा नकाशा



हे ठिकाण तंतोतंत असेल असे नाही . फक्त माहितीस्तव ठिकाणे दर्शवलेली आहेत.